


।। गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः ।।



खरा तो एकची धर्म, रुग्णसेवा हेच नित्य कर्म ।

सुनिलदत्त शिवराम चौधरी

# अबोल प्रवास सेवेचा

१९८५ - २०१०

## प्रकाशन सोहळा

हस्ते :
क्षेत्रोपाध्याय श्रीयुत श्रीकांत मधुकर दिक्षीत
सौ. माधुरी श्रीकांत दिक्षीत

कार्तिक शु.।। १० शके १९३२
दि. १६-११-२०१०
श्री सप्तश्रृंगी गड, वणी (नाशिक)

द्वितीय आवृत्ती :
अश्वीन शु.।। १० शके १९३४
दि. २४-१०-२०१२

## प्रस्तावना...

'अबोल प्रवास सेवेचा' ही केवळ एक स्मरणिका नसून एक 'चिंतनिका' बनली आहे. म्हणूनच ती वाचकांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. वैद्यकीय सेवेतल्या पंचवीस वर्षांच्या कारकिर्दीची आणि कसलाही गाजावाजा न करता विलक्षण यशस्वी ठरलेल्या वाटचालीची ही अनमोल अशी मुद्रा आहे.

डॉक्टरांचं व्यक्तिमत्त्व तसं तुमच्या आमच्यातलंच एक वाटावं, इतकं सहज आणि साधं! पण तरीही असामान्य इतिहास निर्माण करणारं! परिस्थितीचे चटके हुं की चुं न करता निमूटपणे सहन करत त्या प्रत्येक चटक्याच्या डागातून एक देदीप्यमान किर्तिमान आणि जाज्वल्य इतिहास निर्माण करणारं!

स्मरणिकेतील मनोगतांच्या अंतरंगातून डॉक्टरांच्या या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू सहजगत्या उलगडत जातात. पेशंटला हातही न लावता त्याची वेदना ओळखण्याची डॉक्टरांची शैली, त्यामागे असलेले त्यांचे आध्यात्मिक अधिष्ठान, रुग्णांची डॉक्टरांवर असलेली विलक्षण श्रद्धा अन् त्यातूनच त्यांना

प्राप्त झालेलं देवत्व या सगळयाच गोष्टी यातून जाणवतात.
या सा-यांपासून अलिप्त असणारे डॉक्टर मात्र सेवेचा अबोल प्रवास
कायम राखत, स्मरणिकेत स्वतःचा फोटोही न छापण्याचा आग्रह धरतात.

विविध भाषी असलेल्या या स्मरणिकेला खरं तर प्रस्तावनेची गरजच नाही.
समस्तांचा आग्रह आणि एक उपचार एवढाच अर्थ या प्रस्तावनेला आहे.
दासबोध, तुकारामाची गाथा, ज्ञानेश्वरी, यांना कुठे प्रस्तावना होती?
'गाथा तुक्याची' तर नदीत बुडविली गेली. तरीही ती कोरडी होती,
हिच जणू त्या गाथेची प्रस्तावना होती !

।। श्रीराम समर्थ ।।

## दोन शब्द स्मरणिकेच्या मांडणीविषयी...

- डॉक्टरांच्या स्वभावातल्या नवनवीन छटा, सेवेतील वेगळेपण, रुग्णांना आलेल्या अलौकीक अनुभूती, अशा वर्णनांचे मुद्रण त्याच अभिप्रायात वेगळ्या रंगात केले आहे.
- अभिप्रायाव्यतिरिक्त हितचिंतकांच्या मनातील शंका-कुशंका, कुजबूज, तसेच सिस्टिमविषयीची नाराजी, दवाखाना परिसरातील फोटोग्राफ्सच्या मदतीने प्रदर्शित केली आहे.
- डॉक्टरांचे अनेक कलंदर शब्दप्रयोग चित्ररूपात प्रतिकात्मक छायाचित्रणाच्या साहाय्याने रेखाटण्याचा प्रयत्नही केला आहे.

## दुस-या आवृत्तीच्या निमित्ताने..

लेखणी कधी हातात धरली नाही, समाजाच्या बोली भाषेवरच व बरोबर लहानाची मोठी झाली. वाङमयाचा गंध नाही, बहिणा बाईच्या जिभेवर सरस्वती विराजमान होती, येथे तर तो हि अंधार पण...! पण...!

पण, जाणीवांच्या वेदना संवेदनां मधुन आंतरात्म्यातील सरस्वतीला खडबडुन जाग करणारी हि एकारात्रीची बहिणाबाई आपला संकल्प मोडक्या तोडक्या शब्दात लिहते व दचकुन भाना वर येते, पाहाते तर काय? बाबांवर लिहलेली बहिणाबाई ची "उज्वला गाथा" तयार असते... स्वप्नात आहे की जागी आहे हे समजण्या आधी आनंदान धाय मोकलुन अश्रुंना वाट करून देते. तिच गत हरिरामची व गिरमिट गोटया ह्या हुन वेगळा नाही. तरी हि...

हातात पेन धरून लिहणारे...
हातात पेन न धरता लिहणारे...

गेल्या २०-२५ वर्षा पासून रूग्ण व डॉक्टर सबंधात ब-याच गोष्टी अनुभवून, न अनुभवल्या सारखे करणारे आपला पाखंड सुद्धा इमानदारीत न करता फक्त औषधी घेण्यात धन्यता पावलेले तथा कथीत समाज धुरीण आपल्या पांढरपेशयातच वावरत वरून किर्तन व आतुन तमाशा' यातच फक्त फेटे उधळत राहिले.... पण कधी नागवले गेले याचा सुगावा न लागलेले नागडे आपल देणं (ऋण) द्यायचे विसरले, नव्हे! 'देणं दानत मागितल' तरी द्यायचे विसरले जाणीव पूर्वक....

किंबहुना 'ऐश्वर्य ज्यांना सहन झाल नाही म्हणुन लिहण्याचं टाळंल गेल, जणू संधी चालुन आली असतांना कर्म ठोक पणा मुळे ऐश्वर्यवंत होण्याचच राहुन गेल अश्याच्यां विद्वत्ते मुळे आम्ही भाग्यवान ठरून स्मरणीकेचा भार न वाढता स्मरणीका कोणासाठी गीता/कुराण/बायबल/ग्रंथसाहेब ठरली म्हणुन आदराने पुज्यनिय झाली (तर...) तर... स्मरणीका कोणासाठी-गाथ/दासबोध ठरून माथ्यावर घेतली गेली.

ब-याच वेळा विचार केल्यास काहींना असे जाणवून येईल की ज्यांनी लेख लिहला नाही म्हणुन हा राग, रोष किंबहुना द्वेष असावा परंतू त्यांच्या सकट सर्वांनाच हे ज्ञात आहे की या गोष्टींचा लव लेश हि डॉक्टरांना शिवणार सुद्धा नाही.

अपेक्षांच्या पलिकडील समाजमन जे केवळ या आणि याच विचारांनी पोखरलेल आहे अश्या पोखरलेल्या समाज मनाचे हे लोक प्रतिनिधीत्व करतात व जहाल/नकारात्मक म्हणुन आमच्या सारखे तथाकथीत बुध्दीजीवी ते लिहण्याच टाळतात हे बुरख्याखालील बेगडीपण जेव्हा बुरखा फाडून स्पष्ट होत, समाजान जाग व्हावं म्हणुन, अन् त्यालाच कदाचित निर्भिड पणा म्हणत असावे.

एका बखरकाराने औरंगजेबाची सुध्दा वाखाणणी केली आहे, औरंगजेब म्हणतो "मैं इस सल्तनत का बादशाह अल्ला ने मुझे सभी खुशीयाँ दि इतना हि नही, गनिम दिया तो सिवाजी जैसा दिया".

- प्रकाशक (संपादक)



## अध्यात्म, विज्ञान आणि सेवेच्या कसोटीतील एक चमत्कार

जळगांव शहरातील होमिओपॅथी तज्ञ डॉ. सुनिलदत्त चौधरी यांचा 'मानवतेचा देवदूत' हा किताब देऊन सन्मान करण्यात आला. मानवी सेवेतच देव शोधणा-या डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी विज्ञान युगात एक आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या कार्यावर हा संक्षिप्त प्रकाशझोत -

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. काळाबरोबर आपण बदलले पाहिजे. थांबला तो संपला, असं म्हणतात. बदलत्या कालप्रवाहात माणूस माणसांपासुन दुरावतो आहे, नातेसंबंध विसरले जाताहेत, स्वार्थ बळावतो आहे. व्यवसायातील नैतिकता संपून त्याला बाजारू स्वरूप प्राप्त होत आहे. सेवाभाव नावापुरता शिल्लक राहिलेला दिसून येतो. वैद्यकीय सेवा देणा-या डॉक्टराला तर देवाच्या रूपात पाहिले जायचे. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. हे सत्य असले तरी अजूनही काही माणिक-मोती या समाजात आहेत. मानव सेवा हीच खरी सेवा, हाच धर्म ते मानतात. मानवामध्येच देव आहे, तो शोधावा लागतो. ते शोधण्याचे कार्य करताहेत जळगांव शहरातील होमिओपॅथ तज्ञ डॉ. सुनिलदत्त चौधरी. डॉ. सुनिलदत्त चौधरी यांचे कार्य विशाल आहे. अध्यात्म हा त्यांचा आत्मा तर विज्ञान हा त्यांचा प्राण आहे. अध्यात्माला विज्ञानाची सांगड घातल्यानंतर कसा चमत्कार होऊ शकतो हे डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी सिद्ध केलेले आहे. डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी होमिओपॅथी शास्त्रातील एम.डी. ही पदवी प्राप्त केली. अनेक असाध्य रोगपीडितांच्या ह्या देवदूताने आपल्या प्रॅक्टीसमधून खो-यांनी पैसे ओढले असते, एखादे मोठे हॉस्पिटल बांधले असते. परंतु डॉक्टरी सेवेतून जेवढी कमाई होते, त्यापेक्षा जास्त दान-धर्मात, अध्यात्मात व सेवा कार्यात खर्च करणारा हा डॉक्टर निराळाच. त्यांच्या या आदर्शाने आपण सर्वजण नतमस्तकच झाले पाहिजे.

निःस्वार्थपणा आणि निरपेक्ष भावना हा त्यांच्या सेवेचा अलंकार आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या परिसरात कोणत्याही

धर्माचे साधू-संत-महात्मा यांचे धर्म कार्यानिमित्त वास्तव्य असल्यास त्यांच्या स्वास्थ्य रक्षणाची जबाबदारी जणू आपलीच असे समजून त्यांच्या स्वास्थ्याची स्वखर्चाने निगा राखण्याचे काम डॉ. सुनिलदत्त चौधरी करतात. काही वर्षांपूर्वी तर २००-२५० किलोमीटरपर्यंत मोटारसायकलीवर जाऊन संत महात्म्यांच्या आरोग्याची सेवा त्यांनी केलेली आहे. संतांच्या आरोग्याची सेवा म्हणजे सर्व धर्म सेवा होय असे त्यांचे म्हणणे आहे. अनेक असाध्य रोगपीडितांचे डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी रोगनिदान करून त्यांना जीवनदान दिले आहे. त्यांच्याकडे रुग्णांची रांग लागलेली असते. त्यांना वेळ अपुरा पडतो. पूर्ण चिकित्सा केल्यानंतरच त्यांचे समाधान होते. गरीब-श्रीमंत असा भेदभाव त्यांच्याजवळ नाही. प्रत्येक रुग्ण हा त्यांच्या दृष्टीने देवच असतो.

जळगावच्या या सुपुत्रामुळे जळगांव नगरीची शान वाढलेली आहे. जळगावची वैद्यकीय सेवा मुळातच प्रगल्भ आहे. डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्यासारख्या सेवाभावी डॉक्टरांमुळे त्या सेवेची प्रतिष्ठा आणखीन वाढलेली आहे, एवढे मात्र निश्चित. रुग्णांसाठी हा डॉक्टर देवदूतच आहे. होमिओपॅथीसारख्या शास्त्रात प्राविण्य मिळवून त्याद्वारे सेवेचा आदर्श निर्माण करणाऱ्या या डॉक्टरास आम्ही संपूर्ण ललवाणी परिवार अभिवादन करतो.

'अबोली' (न बोलता सर्वकाही) समाजसेवा धर्मरक्षण, मंदिराचा जीर्णोद्धार असे अनेक सेवा प्रकल्प अबोली प्रतिष्ठानच्या माध्यमाने होत आहे व भविष्यातही समाजसेवेचे अनेक उपक्रम राबविले जावेत ही प्रभुचरणी प्रार्थना व डॉक्टरसाहेबांच्या (आदरणीय बाबांच्या) कार्याला व डॉक्टरी सेवेला अंतःकरणपूर्वक अनंत अनंत शुभेच्छा!

- अजय ललवाणी
जळगाव

## जनसेवेत समर्पित एक परमपुरुष

आदरणीय दादासाहेब,   होमिओपॅथी उपचारात निष्णात, धाडसी, प्रेमळ व रोगाचे अचूक निदान करून योग्य उपचार करणारे व व्यवसायात धार्मिक श्रद्धेची भावना बाळगणारे व आम्हा रुग्णांचे अत्यंत लोभस स्थान, म्हणजे दादासाहेब चौधरी आहेत.

माझे टॉन्सीलचे ऑपरेशन चुकीचे झाले, घसा सुजला, योग्य उपचार न झाल्यास असाध्य रोग होण्याची भिती यावर दादासाहेबांनी योग्य उपचार केला व सूज उतरून घसा जवळ-जवळ पूर्ण बरा झाला. आज जवळजवळ पंधरा वर्ष झाले मी त्यांची औषधी घेत आहे. त्यामुळे ६७ व्या वर्षातसुद्धा प्रकृती चांगली आहे.

यावर्षी आषाढी एकादशीला मी पंढरपूरहून आल्यावर सहज म्हणून दादासाहेब म्हणाले, "देव भेटला का?" यावर माझ्या मते देव दूताच्या रूपात भेटला. कारण दादासाहेब पीडित, आजाराने त्रस्त, आजाराला कंटाळून जगण्याची आशा सोडलेले, अशांवर औषधरूपी संजीवनी देऊन दादासाहेब तेच कार्य करीत आहेत.

तरी दादासाहेबांच्या हातून अशीच सेवा घडो व परमेश्वर त्यांना आनंदमय दीर्घायुष्य देवो ही प्रभूचरणी प्रार्थना करतो.

- जवानसिंग राजपूत, जामनेर

Respected Dr. Kaka,

You are a person who is very very dear, To our hearts you will always be near. You are a person having branches of care. You have guided us and have thought us to share. As you walk ahead we will always follow you. Tommarrow your footsteps shall guide us and shall quench our thirst like a dew.

- Nidhi Daruwale (Maushi)

## बाबा... एक प्रगल्भ किमयागार.

आदरणीय बाबा, माणसानं खरं तर आजारीच पडू नये... पडलंच कधी आजारी तर काही त्रास होऊ नये... झालाच काही त्रास तर कमीतकमी व्हावा... वेडी कल्पना!!! खरंच असं शक्य होईल का?

(डॉक्टर) बाबा, आधी वाटत होतं की हे कधीच शक्य नाही, पण जेव्हापासून तुम्हाला आम्ही डॉक्टर या नात्यापेक्षा कुटुंबातील एक सदस्य समजू लागलो आणि हे नातं तुम्हीही मनापासून स्वीकारलं तेव्हापासून आम्ही खरंच आजारी पडत नाही... पडलोच आजारी तर आम्हाला काही त्रास होऊ नये याची तुम्ही काळजी घेतात... झालाच थोडाफार त्रास तर तुम्ही तो कमी करतात...

खरं तर मी 'बाबा' म्हणते तेव्हाच मी चांगली होऊन जाते... माहीत नाही, पण तुम्ही पाठीशी आहात याचा भास कायम असतो... (डॉक्टर) बाबा, आम्ही ठणठणीत आहोत! अभिनंदन (याचं सर्व श्रेय तुमच्यातल्या डॉक्टरला व डॉक्टरमधल्या माणसाला!!! 'बाबा' माझे कुटुंब सदैव तुमचे आभारी आहे.)

'बाबा', सदैव आमच्या पाठीशी राहा...

- सौ. ज्योती विजय शिंपी

## शुभकामना...

इस धरती पर धन्य बना है गौरवमय आपका जीवन
मंगल कामना, मंगल भावना, मंगलमय आशा है,
चिरायु रहो, स्वस्थायु रहो, अंतर की अभिलाषा है,

इसी शुभकामनाओं के साथ...

- डॉ. भरत बंब, कोपरगांव

## देवत्वाचे प्रतीक पुरुष - डॉ. सुनिलदत्त चौधरी

नेत्रात भविष्याची चमक, मनगटात कर्तृत्वाची धमक. असाच एक उत्साहाचा झरा, माणुसकीचा सागर, लहान-थोरांना आदर देणारा, खळाळता ओहोळ, आम्हा सर्वांशी समरसून, मिळून मिसळून राहणारा, चैतन्याचा धबधबा म्हणजे आमचे नन अदर दॅन डॉक्टर - डॉ. सुनिलदत्त चौधरी. यांना आम्ही आमच्या घरातील एक कुटुंब सदस्यच समजतो. त्यांचे लोभस रूप, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व आमच्या घरातीलच नव्हे तर समाजाच्या मनावर ठसलेले, अनंत काळापर्यंत कायम राहणारे आहे. त्यांच्या चारित्र्याचे व कार्याचे वर्णन करावे तेवढे कमीच आहे.

समुद्राची शाई, आकाशाचा कागद आणि पर्वताची लेखणी जरी केली तरी या डॉक्टरांविषयी लिहिण्यासाठी शब्द अपुरेच पडतील. आमच्यावर असलेले त्यांचे अगणित उपकार साता जन्मातही आम्ही विसरू शकणार नाही. दया, माया, प्रेम आणि वात्सल्य या शब्दांनी भरलेला अथांग सागर आहे.

आपण घालून दिलेल्या आदर्श, कठोर परिश्रम आणि कसोटींच्या पायावर आम्ही आपल्या आशीर्वादाने मार्गक्रमण करीत आहोत. झाले बहु, होतीलही बहु परंतु या सम हाच।

- डॉ. महेश, सीमा, जान्हवी बोरा (पुणे)

## बधाई...

मंगलमय घडीयाँ आयी, खुशियाँ है मन में छायी।
रजत जयंती के दिवसपर हम देते है खूब बधाई।
खुशियों से भरा हो दिन आपका आज
सारे जलगाँव को है आप पर नाज।
हमेशा स्वस्थ रहे, आरोग्यपूर्ण
देते शुभकामना मनीषा, महेन्द्र, समीप प्यार से ।
जिसने बनाई स्वयं ही तकदीर है।
अभिनंदन करते, सुनिल दत्त भाई का
जो जलगाँव शहर के कोहिनूर है।
अमृत जैसी वाणी है, सुनिल दत्त चौधरी नामनिधान
आप हो गुणों की खान, और हो जलगाँव की शान।
लोभ और पैसों से आप को नहीं है प्यार
तभी तो लिम्का बुक में आया नाम, हमें है खुशी।
किए है आपने ऐसे काम, जिससे अमर रहेगा नाम,
मानव कल्याण का किया काम, मिले आपको खुशियाँ तमाम।
आप के हाथों में है जादू, उपचार होते है भारी,
इसीलिए तो देश के कोने-कोने से दौडे आते है नर-नारी।
ऐसी करनी हो तुम्हारी, की महक उठे जीवन न्यारी
सदियों तक याद करेगा जमाना, वाह! क्या जिंदगी तुम्हारी।
देश की यह अमर ज्योति युग-युग तक जलती जाए,
लाखों वर्षों तक जिओ आप, मनीषा यह गुण गाए।
हर फुल खुशबू दे आपको, सूरज रोशनी दे आपको
हम तो बस दुआ के काबील है, खुदा हर खुशी दे आपको।

इसी शुभकामनाओं के साथ...

- महेन्द्र, मनिषा, समिप बंब, पुणे

## अनमोल धरोहर

इस संसार में जन्म लेनेवाला हर व्यक्ती महान नहीं होता, पर कुछ विरले ही व्यक्ती ऐसे होते है जो जन्म के बाद अपने पुरुषार्थ से अपने अस्तित्व एवं व्यक्तित्व को बनाए रखते हैं। "सर्व जन सुखाय, सर्व जन हिताय" जिनका जीवन होता है वे दुनिया के चमन में विश्व विख्यात होते हैं। और इसी कडी में नाम लेना चाहूँगी डॉ. सुनिलदत्त चौधरीजी का!

इनके हाथों में अनोखी जादू है। उदा. देना चाहूंगी... मेरा बेटा श्रेयांस भरत बंब (कोपरगांव), जिसे ॲलर्जीक अस्थमा था। हर दो महिने में उसे तकलीफ होती थी। वह तकलीफ ८, १५ दिन तक रहती थी, जिसे अस्थमा ॲटॅक भी कह सकते है। उसे ॲडमीट करना पडता था। वह रातभर खाँसता था। इतने छोटी आयू में (१२-१३ साल) भारी दवाईयाँ, लेकर भी फर्क नहीं पडता था। हम सब परेशान थे। बच्चे की हालत देखी नहीं जाती थी। एक दिन हमारे ब्याही श्री. दलीचंदजी जैन इन्होंने कहाँ, 'तुम एक बार जलगाँव आकर डॉ. चौधरी को दिखा दो। हम जलगाँव गए। डॉक्टर ने उसको जाँचा और कहा, "इतने दिन आप क्या कर रहे थे? इतने छोटे बच्चे पर स्टेरॉईड की मार कर रहे हो।" मैंने डॉक्टर से पूछा, "डॉक्टर यह ठीक हो जाएगा ना?" डॉक्टर ने कहा 'हाँ' और एक विश्वास और माँ की ममता से मेरी आँखे भर आई। इनका हाथ परमेश्वर का हाथ है, जो मेरा बेटा इतने साल से जो सह रहा था वो डेढ साल में खत्म हो गया।

डॉक्टरसाहब की नजरों में कोई अमीर, गरीब का भेदभाव नहीं है, इसका फल ही तो लिम्का बुक वर्ल्ड रेकॉर्ड में लिखा गया है। हम तो शुभकामना करते है की उन्हें पद्मभूषण से सन्मानीत करें।

डॉ. चौधरी तो आनेवाली पिढी के लिए अनमोल धरोहर हैं। ऐसे महान विभूति को शुभकामना...

- डॉ. बंब, पुणे

## निंज गुण से नाम हो, सफल आपका हर काम हो...

आ.डॉ. सुनिलदत्तजी इनके पच्चीस साल के आरोग्य विशेष चिकित्सा हेतु -

आदमी अपने नामसे जाना जाता है, तथा उसके कर्म से कुछ विशेष उपाधियाँ उसे मिलती रहती है। नाम आपका 'सुनिलदत्त' है जो किसी जमाने में अच्छे कॅरेक्टर रोल करनेवाले अभिनेता के नाम से साम्य और प्रभाव से रखा गया होगा? जो नामकरण आपके हाथ में न था।

लेकीन आज कार्य के हिसाब से नामकरण होना चाहिए।


*हर्ष न शोक न राग न रोष, ना बंध ना मोक्ष की आस नहीं है।*
*वैर न प्रीती न हार न जीत न गार न गीत सोरित प्रही है।*
*उँच न नीच न जात न पात न दिन न रात सुदृष्टी मही है।*
*निर्गुण ज्ञान अनन्य कहे अवधूत अत्तीत की रीत यही है।*

आपकी निर्गुण तथा सगुण चिन्मयी पराशक्ती पूजनीय है। इसलिए अभी आपके कार्यानुसार आपका नामकरण होना चाहिए -

**डॉ. अवधूत !**

- राजेश ललवाणी

## कुजबुज हितचिंतकांची...




डॉक्टर १५-१५ दिवस दवाखाना बंद ठेवतात, इमर्जन्सी मध्ये कुठे जायचे ?

## सामान्यांचा असामान्य दैवी पुरुष

डॉ. सुनिलदत्त चौधरींची व आमची दोघांची भेट फेब्रुवारी २००० मधली.

खरे तर पहिल्या भेटीत हे डॉक्टर आहेत की महाराज - बाबा? असे वाटले. १२-१३ वर्षे मानसिक, शारीरिक, आर्थिक त्रास सहन करून मोठ्या विमनस्क अवस्थेतील आमची भेट होती. आम्हाला मूल नव्हते. परंतु डॉक्टरांशी बोलता-बोलता टेन्शन कमी झाले. ट्रीटमेण्ट सुरू झाली. यात सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आमची मानसिकताच बदलत गेली. विशेषतः मी ब-याचशा गोष्टी पॉझिटिव्हली घ्यायला शिकले.

२००० ते २०१० या दहा वर्षांत मला १ मुलगी व १ मुलगा झाला. डॉक्टरांशी संपर्क वाढला. डॉक्टर प्रत्येक वेळी वेगवेगळे वाटले. त्यांची धार्मिकता, अध्यात्मिक ताकद, एक उच्च शिक्षित, हुषार डॉक्टर, त्यांची उदारता असे अनेक पैलू दिसून आले. डॉक्टर म्हणजे आम्हाला फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड असेच वाटत आले.

डॉ. सुनिलदत्त चौधरींच्याबद्दल लिहायला बसले तर बरेच काही लिहिता येईल. माझे १० वर्षांतील अनुभव मला माहितच आहेत. इतर अनेकजण वर्षानुवर्षे त्यांच्याशी सबंधित आहेत, त्यांचे अनेक अनुभव आहेत. परंतु मनातील सगळे विचार वाटणे, येथे सांगणे शक्य नाही.

एक गोष्ट मात्र निश्चित. प्रत्येक वेळी डॉक्टर एक वेगळेच रसायन आहेत हे जाणवत रहाते. त्यांच्या वेगवेगळ्या कार्यासाठी आमच्या खूप-खूप शुभेच्छा! डॉक्टरांच्या या सगळ्या प्रवासात त्यांना डॉ. सौ. स्मिता वहिनी व मुलगा राघव यांची मोलाची साथ आहे हे मात्र विसरून चालणार नाही.

- सौ. हर्षदा कुलकर्णी

# सांब - सदाशिव - पती परमेश्वर

मर्यादा पुरुषोत्तम राम, की आई-वडिलांचा आज्ञाधारक श्रावणबाळ, धर्मपरायण धर्मराज की एक आदर्श पिता, डॉक्टरच्या रूपातील पेशंटसाठीचा देवदूत की एक माझे पती म्हणून संपूर्ण, सर्वांगीण, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व...!

जे भावलं, गावलं, कधी काळी प्रत्यक्ष अनुभवलं, अर्धांगिनीच्या रूपानं जे काही जगले वागले ते कसे लिहू वा साकार करू? भावनांना बंदिस्त करून मोजक्या शब्दांचा अर्थ शोधतांना माझी लेखणी जे काही 'अबोल' बोल माझ्याशी बोलली, तो सगळा हा प्रपंच.
मानलं तर सुख आहे, न मानलं तर... सन १९८९ पासूनच सहजीवन पंच परमेश्वरानं बांधलेली लग्नगाठ. 'कर्तव्यपरायण', 'कर्तव्यतत्पर' हे दोन विशेष गुण मला आमच्या उभयतांच्या आयुष्यात, त्यांचे भावले ते कधी सगुण होते कधी निर्गुण. संसाररूपी रथाचे दोन चाक, एक ते अन् दुसरं मी. माझ्या चाकालाही सक्षम बनवत, जो हा गाडा ओढला जातो आहे त्याचा लौकीक दिवसेंदिवस वाढत आहे.

मला माहीत आहे त्यांच्या या अफाट व्यापात व नावलौकीकात माझा वाटा शून्य आहे. हा वाटा मी शून्यतेतच राहण्यात मला योग्य वाटतो. फरक एवढाच की हे शून्य या गोळाबेरजेवर कधी आधी येतं तर कधी नंतर. यालाच मी माझं सहचारणी रूप समजते.
मोजकंच बोलणं, तसं खूप बोलतात पण 'अबोल', त्यांचं नेहमी संवाद साधणं असतं ते केवळ मनाशीच. व्यक्ती विशेष म्हणून ते कधीही निरर्थक बोलणार नाहीत. मला असं वाटतं की साता जन्माची पुण्याई एकवटून या पुण्यात्म्याचा एक वाटा किंवा भाग म्हणून हे यथार्थ जीवन माझ्या नशिबी आलं. मी कृतकृत्य झाले. विधात्याची कृपा!

आयुष्य म्हटलं की सुख-दुःखे आलीच. दुःखाच्या प्रसंगातून सुख शोधणारी ही अवळ व्यक्ती. यांची धर्मपत्नी असण्यात जणू मला देवानंच सन्मानीत केल्याचं जाणवतं. यांच्याबरोबर आलेले प्रवासाचे योग, वर्तमानपत्रात आलेले लेख, ठिकठिकाणी झालेले सन्मान, लिम्का बुक्सचे विक्रम, गुरुविषयीची श्रद्धा, परदेश भ्रमण, होमिओपॅथी कॉन्फरन्सेसच्या निमित्तानं सादर केलेले शोधनिबंध, संत व साधू पुरुषांची केलेली सेवा, दान-धर्म, धर्म कोणताही असो त्याविषयी त्यातील सारखेपणा, वेगळेपणा, आचारणशुद्धता याविषयी असलेले परिपक्व विचार.

एवढं सगळं या कारकिर्दीत कमावलेलं, त्यासाठी केलेलं रक्ताचं पाणी अन् क्षणाक्षणाच्या उपयोगाचे महत्त्व अन् तरीदेखील पाय जमिनीवर एवढे असूनही पती-पत्नी नात्यातील भावबंध मुक्त नियंत्रण सारं कसं स्वप्नवत्! दुःखाच्या डोंगरावर सुखाची पालवी फुलवून केलेली कृतकृत्यता सारे कसे अवर्णनीय.

जीवनशैलीतील साधेपणा, कोठेही बडेजाव नाही. गरजा मर्यादित, फक्त मर्यादितच नाही तर आवश्यक तेवढ्याच, खऱ्या अर्थाचा पारमार्थिक चरितार्थ. सहजीवनातही शक्य तितकी दुःखे त्यांनीच त्यांच्यापर्यंत राहू दिलेली. आनंद तेवढा फक्त माझ्या वाट्याला किंबहुना माझी दुःखं हळवी ती माझ्यापर्यंत कमीतकमी पोहोचतील म्हणून त्यांचे प्रयत्न, सर्वार्थानं एक नंदनवनच जणु काही भरलेलं गोकुळ. वक्तशीर व बिनचूकपणा व योजनाबद्ध विकास, नियोजन... कसे? तर माझ्या घरासाठी म्हणून आलेली माझ्या डोक्यातील एखादी कल्पना, सुचलेली कधीतरी माझ्या वाट्याला ते आल्यावर त्यांना सांगू म्हणून शक्य झाल्यास मी ठेवलेली सोशिकता... पण त्याही पुढचा विचार करून ती कल्पना कधीच माझ्या पुढे साकारलेली मला त्यांनी दिली. आंधळा मागतो एक अन् देव देतो दोन. त्यांच्याविषयी मला काही लिहिता येईल हे माझ्यासाठी धक्कादायक अन् विलक्षण!

कधी मला जाणवतं की मी अविचारी, कारण मी विचार करते तोवर त्यांची कृती साकारून झालेली असते. या विशाल वटवृक्षाच्या छायेत जणू काही मी वास्तवातील स्वर्ग सुखात व आनंदात न्हाऊन निघत आहे. कोण जाणे केव्हापासून व कशामुळे यांना बरीच पेशंट मंडळी 'बाबा' म्हणून हाक मारतात. हेही लगेच पोटच्या गोळ्याच्या आवाजाला 'ओ' देतात ना तसाच 'ओ' देतात. स्त्रीसुलभ स्वभावानुसार माझंही मन त्या 'ओ'तील अतर्क्यावर गहिवरून अन् उगाच कुठे तरी या निमित्तानं का होईना भिरभिरतं. मला या सगळ्यांची 'आई' झाल्यासारखं वाटतं. त्यातील काही बोबडे बोल कानावर आल्यानं माझं वात्सल्य अधिकच बहरतं.

सालंकृत कन्यादानाचं भाग्यही यांच्यामुळे मला मिळालं. खरंच! खरंच!! येथे मला कळालं 'विठू माझा लेकुरवाळा.'

- डॉ. सौ. स्मिता चौधरी

# मित्र, मार्गदर्शक, हितचिंतक...

श्रीमान आदरणीय डॉक्टर सो., आपल्या वैद्यकशास्त्राच्या सेवेला २५ वर्षे झालीत म्हणून प्रथम अभिनंदन!
आपली ओळख होऊन ११ वर्षे झालीत. पण आपणास डॉक्टर संबोधणे हे अन्यायकारक ठरेल. तुमची ओळख होण्याअगोदर डॉक्टर या शब्दाबद्दल मला एक प्रकारची घृणा वाटायची. पण डॉक्टर हा एक चांगला मित्र, मार्गदर्शक, हितचिंतक असतो याची जाणीव आपणाकडे आल्यावरच झाली.

या शहरात पैशाकरिता रुग्णास हेलपाटे मारावयास लावणारे, उद्धटपणे वागणारे व नियमित औषधोपचार केल्यावर गुण न आल्यावर औषधे बदलवणारे अनेक आहेत. मी 'आयसीयू'च्या परिसरात राहत असल्याने मला या पेशाबद्दल एकप्रकारे तिटकारा वाटतो. आपण मात्र योग्य निदान, रुग्ण बरा होत असेल तरच औषधोपचार, पैशांकरिता न अडविणारे यामुळे आपल्याकडे वैद्यकशास्त्राचा फायदा घेण्याकरिता मुंबई, पुणे, नागपूर तसेच इतर देशातून दूरवरून येणारे, समाजातील सर्व थरातील गरीब-श्रीमंत व सर्व जाती-धर्माचे रूग्ण येतात. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिपाई असो, व्यापारी असो, पोलीस अधिकारी असो वा कलेक्टर. आपणाकडे एकच नियम असतो हे ठळकपणे जाणवते. तसेच आपण पूजा-पाठ करून, धर्मशास्त्रानुसार सांगितलेल्या रस्त्याने रुग्णसेवा करतात. त्यामुळे स्वतः धन्वंतरीचा गुण आपल्या औषधात असतो.

आपल्या औषधोपचाराने माझा दमा पूर्णतः बरा झालेला आहे.
आपणास व आपल्या कुटुंबास पुढील आयुष्याकरिता अनेक शुभेच्छा!

- सौ. शोभा श्याम शिंदे

## आभाळ क्षितिजा पलीकडचे...

आदरणीय डॉ. सुनिलदत्त चौधरी (मामा),

शिंपल्यात पाणी घालून समुद्र कधी दाखवता येत नाही
हाताने काढलेल्या फुलाला सुगंध कधी येत नाही
निळ्याभोर गगनाचा अंत कधी होत नाही
आणि तुमच्या अगणित यशाचा उल्लेख देखील शब्दात करता येत नाही.
धन्यवाद !

- स्नेहल कमलाकर देसाई

## डॉक्टरच नव्हे; स्नेही, मित्र.

डॉक्टरांकडे औषध घेण्यापूर्वी डॉक्टरांबद्दल बरेच ऐकून होतो. साशंकता मनात होती. डॉ. फणसासारखे आहेत. वरवरच्या बोलण्यावर न जाता औषधाचा गुण पाहिला तर उत्तम अनुभव येतो. गुण आल्यावर हळूहळू आमच्या फॅमिलीमधील बरेच जण त्यांचे औषध घेऊ लागले. आता तर डॉ. आपले सखे, नातेवाईक वाटतात.

माझ्या मिस्टरांची कंबर खूप दुखत होती. काही जण शेक, तेल मालीश, ट्रॅक्शन इत्यादी करण्याचा सल्ला देत होते. पूर्णपणे डॉक्टरांच्या औषधावर भरवसा ठेवून महिन्याभरात पूर्ण बरे वाटले. ते एक डॉक्टर न वाटता हितचिंतक वाटतात.
आमच्या सगळ्यांतर्फे त्यांच्या या उपक्रमास खूप-खूप शुभेच्छा!

- पाटणकर परिवार

## बाबा तुसी ग्रेट हो !

पूज्यनीय बाबांना अमेरिकन लॉलीपॉपचा जय श्रीकृष्ण व चरणस्पर्श. बाबा खरं सांगू? तुम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचं सामर्थ्य माझ्यामध्ये नाही. परंतु एक गोष्ट मात्र नक्की आहे की, माझा देव ठाकोरजी फार दयाळू आहे. त्याने आम्हा सर्वांना (माझा परिवार व सुरेंद्रभाऊंचा परिवार) तुमच्या पायावरती टाकलं व आमच्या अंधःकारमय (ज्याच्या काळोखाची कल्पना आम्ही करू शकत नव्हतो.) जीवनाला कलाटणी मिळाली.

तुम्ही जीवन जगण्याचा खरा मार्ग दाखवला, तोही इतक्या बेमालूमपणे की आत्मचिंतन केल्यानंतर त्यातला आनंद व त्यासाठी तुम्ही केलेल्या क्लृप्त्या व वेळप्रसंगी आमच्यासाठी तुम्ही सोसलेल्या, अंगावर शहारे आणणाऱ्या भयंकर यातना हे सर्व आठवलं की शब्द फुटतात, "बाबा तुसी ग्रेट हो."

खरंच बाबा तुम्ही माझं नशिबच बदलून टाकलं. कदाचित प्राप्त परिस्थितीमुळे मी अजून जास्त कर्जबाजारी झालो असतो, दारूडा झालो असतो, अनेक नानाविध बिरूदं माझ्या नावापुढे लागली असती. परंतु तुमच्या धाकामुळे नवीन कर्ज घेण्याची हिम्मत झाली नाही. येवले व्यतिरिक्त कुणाकडे कर्ज मागण्यासाठी खेटे मारले नाहीत. तुमचा अनादर होऊ नये म्हणून दारू प्यावयाची इच्छा झाली नाही. बाबा एक गोष्ट अजून सांगाविशी वाटते. परमेश्वराने नैसर्गिक कुटुंब पद्धती बनवली आहे. ज्याला आपण रक्ताचे नाते म्हणतो त्याही पुढे जाऊन आपण जे जंबोजेट कुटुंब (अबोली परिवार) निर्माण केला आहे व त्याची जी कडी गुंफली आहे त्याचे वर्णन करण्यासाठी सुयोग्य शब्दच निर्माण झाला नाही असे वाटते. पण एक भाग्यशाली, अभिमान आहे की त्याच जंबोजेट कुटुंबातला मी एक सदस्य आहे. बाबा तुम्ही आम्हाला आमच्या परिवाराच्या प्राथमिक जबाबदाऱ्या पार पाडताना येणाऱ्या अडचणींना कसे समर्थपणे तोंड द्यावे ते शिकवलं.

बाबा मी अबोली परिवारातला भाग्यशाली सदस्य असल्याचा मला अभिमान आहे, असं म्हणालो त्याचं खरं कारण म्हणजे स्वतःच्या परिवारासोबत सामाजिक बांधिलकीची खरी जाण तुम्ही आम्हाला करून दिली. त्यासाठी शिस्तबद्ध पद्धतीने वेगवेगळे कार्यक्रम कसे पार पाडायचे ते शिकवलं. खरं म्हणजे माझी लायकी व कुवत नसतानाही वेळोवेळी माझ्याकडून फक्त श्रमदान करवून घेतलं व लायक बनवलं. सुरुवात मनुदेवी येथील कार्यक्रमाने झाली. त्यानंतर श्री क्षेत्र पद्मालय येथील अंगारकी चतुर्थी कार्यक्रम, बडवानी येथील श्री गुरू चरित्र पारायणाचा व दत्त जयंतीचा सोहळा व तेथून पुढे कवडा हनुमान व विंध्यांचल पर्वतातील आदिवासींना त्रिसंगमावर वाटलेले ते कपडे व अन्नधान्य, श्री क्षेत्र वणी येथील देवी भागवताचा कार्यक्रम, श्री क्षेत्र वणी येथी प्राचीन गणेश मंदिराचा जीर्णोद्धार कार्यक्रम, श्री क्षेत्र शेंदूर्णी येथील श्री त्रिविक्रम मंदिराचा जीर्णोद्धार कार्यक्रम. टागोरनगरमधील देवी जागराचा कार्यक्रम व ११ सप्टेंबर २०१० रोजी सातपुड्याच्या पहाडातील गोरगरीब आदिवासींसाठी घेण्यात येणारा होमिओपॅथी कॅम्प व मोफत औषध वाटप यासाठी (श्री. निलेशभाऊ व श्री. नेवेसरांच्या मार्गदर्शनाखाली) टाकलेली जबाबदारी, या सगळ्या आठवणींचा उजाळा झाला की परत तेच वाटतं, माझा देव ठाकोरजी किती दयाळू आहे? माझ्या ठाकोरजीला एकच मागणं आहे. तुमची ही प्रभूसेवा (मानवसेवा) चिरकाल, अखंडीत, अविरतपणे सुरू राहो व आपणास लोकवास लाभो.

बाबा, चूकभूल माफ करावी. जय श्रीकृष्ण व चरणस्पर्श.

सदैव आपलाच (राहण्याची सद्बुद्धी मला द्या),

- अमेरिकन लॉली

## गुरु - माय - बाप

पू. बाबा, स्मरणिकेतील वाचकांसाठी मला माझे दोन अनुभव लिहावेसे वाटत आहेत. कृपया त्याची आपण परवानगी द्यावी, ही नम्र विनंती.

मित्रांनो, आपल्या सर्वांना सुनिल गुजराथीचा सप्रेम नमस्कार. सर्वप्रथम बाबांशी माझी भेट ही माझी मुलगी साक्षी हिच्या दम्याच्या औषधोपचारासाठी गेलो असताना झाली. मी स्वतः ॲलोपॅथी औषधांचा ठोक व्यवसाय करतो, त्यामुळे दमा म्हटलं की ॲलोपॅथीमध्ये स्टेरॉईड औषधांचा वापर हा करावाच लागतो, याची जाणीव व सोबत त्याच्या दुष्परिणामांची भीती होती. परंतु साक्षीचा दम्याचा आजार हा कोणतेही स्टेरॉईड न घेता फक्त बाबांनी दिलेल्या होमिओपॅथी औषधांनी पूर्णपणे बरा झाला आहे.

सहा महिन्यांपूर्वी साक्षीला व्हायरल इन्फेक्शन झाले होते. बाबांचे औषध सुरू होते. मध्ये शनिवार व रविवारी तिची तब्येत जास्त खराब झाली. बायको एकसारखी तगमग करत होती. बाबांना कॉन्टॅक्ट करा, औषध मागवा. मला माहित होते, सोमवारशिवाय पर्याय नाही. म्हणून मी गप्प बसलो होतो व ताप चढला की थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे व कॉम्बीफ्लेम देणे सुरू ठेवले. सोमवारी तिला चालतासुद्धा येत नव्हते. नंबरप्रमाणे बाबांनी तिला आत घेतले. सर्वप्रथम बाबांनी तिच्या हाताची नाडी तपासली. साक्षी पोट दुखत असल्याचं सांगत होती. बाबांनी तिचं पोट तपासलं व तावडतोब तिची सोनोग्राफी करण्यासाठी पाठवलं. सोनोग्राफी झाल्याबरोबर परस्पर दुसऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांकडे तपासणीसाठी पाठवलं. श्री. नेवे सरांच्या फोनवरून सोनोग्राफीचा रिपोर्ट काय आला आहे ते मला विचारलं व लगेच सांगितलं की तज्ज्ञ डॉक्टरांचं म्हणणं काय आहे ते ऐकून घ्यायचं, मी दिलेले औषध सुरू करायचं व साक्षीला घरी घेऊन जायचं. त्या तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचा सोनोग्राफीचा रिपोर्ट बघून व क्लिनिकली तपासून सांगितलं की सध्या जे स्वाईन फ्लू किंवा डेंग्यूची लक्षणं आहेत. ती लक्षणं साक्षीमध्ये दिसत आहेत. तब्येत फार सिरियस आहे. एक ब्लड टेस्ट व छातीतून पाणी काढण्याची

टेस्ट करावयाची सांगितली. नंतर तिला आय.सी.यू.मध्ये टाकावे का दुसरीकडे ॲडमीट करावे ते नंतर ठरवू असे सांगितले. हे सर्व ऐकून मुलगी व बायको दोघेही घाबरले. मी त्यांना सांगितले की, बाबांचा फोन आलेला आहे, घाबरायचे कारण नाही. घरी जाऊन बाबांचे औषध घ्यावयाचे आहे व दुपारपासून औषध सुरू केले. आश्चर्य म्हणजे संध्याकाळीच साक्षी पेज खायला लागली व टणटणाटण झाली. त्याच दिवशी संध्याकाळी बाबांनी पुन्हा एकदा दुस-या तज्ञ डॉक्टरांकडे पाठवले व विचारण्यास सांगितले की छातीतून पाणी काढण्याची तपासणी करण्याची खरंच गरज आहे का? त्या तज्ञ डॉक्टरांनी साक्षीला तपासले व म्हणाले, तब्येत सिरीयस आहे. त्यांनी काढलेल्या एक्स-रेमध्ये पाणी झालेले दिसत होते. त्यांनी तीन दिवसांचे औषध लिहून दिले व म्हणाले या औषधांनी फरक पडला तर टेस्टची गरज नाही, अन्यथा टेस्ट करावी लागेल. औषध फक्त बाबांचेच सुरू होते. घड्याळाचा अलार्म लावून एक-एक तासाने औषध सुरू होते. दुस-याच दिवशी सकाळी बाबांनी परत साक्षीची सोनोग्राफी करण्यास पाठवले. आश्चर्य म्हणजे साक्षीच्या छातीतील पाणी पूर्णपणे कमी झाले होते व साक्षी ९० टक्के बरी झाली होती. त्यानंतर बाबांनी सांगितले की माझे डायग्नॉसीस बरोबर होते, पण साक्षीला पोटात दुखत होते म्हणून पहिल्या तज्ञ डॉक्टरांकडे ॲपेंडिक्सच्या पडताळणीसाठी पाठवले व दुस-या तज्ञ डॉक्टरांकडे छातीतील पाणी काढण्याच्या तपासणीची खरोखर गरज आहे का हे तपासण्यासाठी पाठवले.

मित्रांनो, यापूर्वी ट्रीटमेंटमध्ये बाबांच्या औषधांची फी फक्त ६४०/- रु. झाली. सोनोग्राफी, एक्स-रे व दोन डॉक्टरांची फी मिळून खर्च होता रु. ३०००/-. जर बाबा आमचे फॅमिली डॉक्टर नसते तर कदाचित साक्षी जास्त सिरियस झाली असती व होणारा खर्च अंदाजे ४० ते ५० हजारांच्या वर गेला असता.

- सुनिल गुजराथी

## कुजबुज हितचिंतकांची...



## **मा**नवरुपी देव...

परमपूज्य बाबांना त्रिवार साष्टांग नमन.   आपल्या पवित्र सहवासात येण्याचं भाग्य खरं तर मला माझ्या भावामुळे डॉ. युवराजमुळे लाभलं. २००५ साली जेव्हा मी प्रथम दवाखान्यात आलो, त्यावेळेस खरं सांगायचं तर होमिओपॅथी, ॲलोपॅथी, आयुर्वेद यांपैकी कोणत्याही वैद्यकशास्त्राविषयी सखोल माहिती नसल्यामुळे इतर डॉक्टरांप्रमाणे हेसुद्धा एक डॉक्टर आहेत एवढीच माझी धारणा होती. आणि घेत असलेल्या होमिओपॅथी गोळ्यांवर तेवढा विश्वाससुद्धा नव्हता.

मात्र त्यानंतर आलेल्या एक-एक प्रसंगातून मला मनोमन असं वाटायला लागलं ही व्यक्ती इतर डॉक्टरांपेक्षा खूपच निराळी आहे. या व्यक्तीत काहीतरी भव्य-दिव्य-गूढ-दैवी शक्ती आहे असं वाटू लागलं. त्याचा वेळोवेळी मला प्रत्यय आला. समोरच्या व्यक्तीच्या मनातील विचारांचा गोंधळ हे डॉक्टर कसे ओळखतात? अगदी एक-दोन शब्दांत त्याने केलेली चूक कशी लक्षात आणून देतात? काही मिनिटांत त्याच्या आजाराचे निदान कसे बरं करतात? असे शेकडो प्रश्न आजही माझ्या मनाला पडतात.

जुलै, २००९ मध्ये ज्यावेळेस माझा घसा खराब झाला त्यावेळेस मला असं वाटत होतं की ऑपरेशन केल्याशिवाय आपण बरे होणार नाही. मात्र बाबा आपल्या औषधातील चमत्कार मी त्यावेळेस ख-या अर्थाने अनुभवला. मी बरा झाल्यावर मला असं वाटलं की बाबा हे परमेश्वररूपी आहेत आणि हो त्यांच्या प्रत्येक क्षेत्रातल्या सामर्थ्यांचं गूढ त्यांच्या साधनेत व समर्पणात आहे, हेसुद्धा कळून चुकलं.

आपल्यासारख्या महान व्यक्तीबद्दलचे अनुभव लिहायला मिळणं हे खरंच मी माझं भाग्य समजतो. लिखाण पुढे जास्त न लांबवता, बाबा आपल्या आज्ञेने थांबतो. कारण मला माहीत आहे. आपल्या पवित्र पावलांच्या धुळीची सुद्धा सर मी करू शकत नाही. मात्र प्रयत्न नक्कीच करीन.

- भूषण सुरवाडे, किनगांव

## बाबा - एक परिक्रमा

प.पु. बाबा यांना गोटूचा साष्टांग नमस्कार. तुम्ही मागितलेल्या अभिप्रायाबद्दल लिहितांना माझी लायकी नाही की मी कुठल्या कणाकणातसुद्धा बसत नाही. माझ्या देवाच्या कृपेने मला माझे बाबा म्हणून मिळालात.

माझ्या आयुष्यात मी फक्त धंदा करणे, पैसे कमविणे, या व्यतिरिक्त आपले शरीर, आपला संसार यासाठी वेळच दिला नाही. मला दातांचा त्रास होत असे. माझे जवळचे मित्र नेहमी आग्रह करीत असत की, तू बाबांना दाखव. एवढ्या गर्दीत कोण जाईल? एकदिवशी तुमच्याकडे आलो. तुम्ही सांगितले वेळीच उपचार केले नाहीत तर पुढे फार प्रॉब्लेम्स येतील. दातांच्या डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे सात दात काढले व फ्लॅब सर्जरी करण्यास सांगितले. ऑपरेशन करण्याआधी ते झाल्यानंतर पूर्णपणे मी होमिओपॅथीची औषधे घेतली. त्यानेच ती जखम बरी व्हायची. एकदा तर डॉक्टरांनी ऑपरेशन करताना विचारले, तुम्ही मी दिलेल्या औषधी घेता की नाही? डॉक्टरसाहेब आजपर्यंत मी फक्त होमिओपॅथीचीच औषधे घेतली. त्यावर त्यांचा विश्वासच बसेना. कारण रिकव्हरी इतक्या लवकर झालेली असायची.

उपचार पूर्ण झाल्यावर मी माझे चिंतन करत राहिलो. डोके दुखणे, सर्दी होणे, एकाच वेळी दहा-बारा वेळा शिंका येणे हे हळूहळू कमी झाले. प्रत्येक कामात मन रमू लागले. बाबा तुमच्या होमिओपॅथीची मजा काही औरच आहे. कुठलाही आजार असला, नंबरप्रमाणे कितीही वेळ लागला तरी औषध घेतल्याशिवाय परत जाणे मला शक्य झाले नाही. हे चालू असतानाच काही घरगुती कारणाने व आर्थिकदृष्ट्या माझ्या आयुष्यातील पुढील जीवन अंधारमय झाले होते. पुढे येणारा दिवस कसा असेल याची मला व माझ्या छोट्या भावाला चिंता असे. ही सर्व हकीकत तुम्हाला सांगितली, त्यावेळेस तुम्ही आमच्या वडीलबंधूंचा आदर ठेवण्यासच सांगितले. त्यावेळेस आम्हाला समजावून सांगण्याची कळकळीची व त्यासाठी लढवाव्या लागणाऱ्या युक्त्या माझ्या डोक्यापलीकडच्या होत्या.
टेन्शनच्या अवस्थेत आपल्या दवाखान्यात रोज सकाळी १० वाजता येऊन बसत असे आणि तुमच्या बोलण्याची व प्रसादाची वाट पाहत असे. तुमची भेट झाल्यावर मनातल्या शंका-कुशंका सांगितल्यावर मन मोकळे व्हायचे. दिवसभराची चिंता दूर व्हायची. आपले

बाबा आपल्या पाठीशी असल्याचा एक दृढ विश्वास माझ्यात निर्माण झाला. त्या सर्व परिस्थितीतून निघत गेलो. माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या जीवनातील अंधार संपत गेला.

अशातच तुमच्याबरोबर आम्ही नर्मदेच्या काठी जाण्याचा योग आला. तेथील आदिवासी समाजाला कपडे वाटप व अन्नधान्य वाटले होते. त्यावेळी त्यांच्यातला आत्मा इतका तृप्त झाला असेल, त्याला मोलच नव्हते. शहरातील गर्भश्रीमंत, राजकारणी सत्तेसाठी व पैशांसाठी धडपड करणारे, मारहाण करणारे, शहरी सुख साधनांच्या सवयींनी मजबूर असणाऱ्या लोकांच्या दुनियेपासून ते फार वेगळे जग होते. त्या वस्तू वाटत असताना तुमच्यातला त्यांच्याबद्दलचा आदर व प्रेम पाहून तर नर्मदामाईसुद्धा प्रसन्न झाली असेल. वाटण्यासाठी आणलेले सामान त्या लोकांना पूर्णपणे मिळावे यासाठीची तुमची तगमग, त्यासाठी लागणारा लवाजमा, सारे कसे आपोआपच घडत गेले. या जगात राहून फक्त पैसे कमविणे उपयोगाचे नाही तर अशा गरीब व दारिद्र्य पदरी पडलेल्या लोकांना व होतकरू मुलांना मदतीचा हात पुढे केला तर त्यात काय उणे आहे?

हे काम काही संस्था आपल्या स्वार्थापोटी करत असतात. सरकारकडून आलेला पैसा पूर्णपणे तेथील स्थानिक गोरगरीबांपर्यंत न पोचवता तेथील दुष्ट प्रवृत्तीचे लोक स्वतःचे खिसे लाखोंनी भरतात. हे कळाल्यानंतर मन कळवळून जाते. त्यासाठी तुम्ही मेडिकल कॅम्प व जीवनावश्यक वस्तू देण्याचा जो प्रकल्प राबवता तो आमच्यासारख्या तरुणांना एक आदर्श आहे.

या सर्व गोष्टी पाहता मी विचार केला की बाबांनी हे प्रश्न विचारलेच का? स्वतःचे साम्राज्य नव्हे अधिराज्य त्यांचे तुम्ही अनभिषिक्त सम्राट, आम्ही कोण त्याची उत्तरे तुम्हाला सांगणारे? दुसऱ्या मनाने लगेचच कौल दिला. गोट्या, हे पण आपल्याला २ ते ३ वर्षांनंतर कळेल. आपण उत्तर देऊ. विचार पक्का अन् उत्तर शोधू लागलो. आपण विचारले की, रुग्णांना बरे केले? पैसे कमविले? समाजसेवा केली? की ईश्वरकृपेने होमिओपॅथीद्वारा रुग्णांना बरे केले? आम्हाला आमच्या जीवनप्रश्नांची उत्तर मिळाली नाहीत, आम्ही याचक

तुमच्या दारात झोळी घेऊन उभे... आम्ही काय देणार उत्तर?

संतांनी शब्दांनाच शस्त्र करून समाजसुधारण्याचा प्रयत्न केला, पण येथे शब्द नाही. अबोल्याचीच अशी शस्त्रे झाली की बाबांचे डोळे, हात, नाक, कान, चेहराच माझ्याशी बोलू लागला. तोंड तेवढे गप्प होते. हे काय अजब रसायन? काय म्हणावं याला?

पृथ्वी प्रदक्षिणा घालण्यास जेव्हा गणपती बाप्पास सांगण्यात आले तेव्हा बाप्पांनी काय केले, तर आईला म्हणजे पार्वती माईला एक प्रदक्षिणा घातली. झाली त्यांची पृथ्वी प्रदक्षिणा! आम्हाला वाटतं ही जीवन प्रदक्षिणा कशी पूर्ण करावयाची? शेवट मग जग अन् बाबांकडे जाणं म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणा नव्हे का?

- सुरेंद्र नटवरलाल गुजराथी

## एक दैवी शक्ती

मी व माझे कुटुंब सन १९८६ पासुन सुमारे २४ वर्षांपासून डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याशी जोडलेले आहोत व ज्या-ज्या वेळी मला वा माझ्या कुटुंबियांना आजारपणाच्या वेळी औषधांची आवश्यकता असेल त्यावेळी डॉ. सुनिलदत्त चौधरींकडून औषधे व ट्रीटमेंट घेत गेलो.

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याबद्दल बोलण्याकरिता किंवा अभिप्राय देण्याकरिता माझ्याजवळ शब्दच नाहीत. गुरु, देव, ईश्वर हे शब्दसुद्धा त्यांच्याकरीता लहान वाटतात.

- कैलास गणेशप्रसाद अग्रवाल

## एक आस्था

हम पहले अकोला में रहते थे। यहाँ जलगांव में आने और रहने को हम अपना सौभाग्य मानते हैं, क्योंकि हमें यहाँ संत हरदासराम साहब का पूज्य सेवा मंडळ स्थान करीब मिला और डॉक्टर के रूप में मिले डॉ. सुनिलदत्त चौधरी।

डॉ. सुनिलदत्त चौधरी की विशेषता यह है कि पहलीही बार उनसे मिलनेवाले व्यक्ति को लगता है कि जैसे किसी पुराने मित्र, रिश्तेदार, हमदर्द से मिल रहा हूँ, दुखों को दूर कर देगा। अन्य डॉक्टरों के विपरित वे आनेवाले मरीज को घबरा नहीं देते है, बल्की उसकी घबराहट को क्षण भर में दूर कर देते हैं। केवल बातों में ही खुश नहीं करते। अपनी लगन और मेहनत से किए गए अभ्यास से वे इलाज भी ऐसा करते हैं कि बिमारी जड से गायब हो जाती है। तभी तो आज दूर-दूर से अपने रिश्तेदारों को जलगांव के निवासी बुलाकर यहाँ इलाज करवाने की सलाह देते है।

मेरी माताजी सावित्रीदेवी ईश्वर में बडी आस्था रखती है। सत्संग मंडली से जुडी है। अपना काफी समय ईश्वर-भजन और आराधना में व्यतीत करती हैं। लेकिन वे डॉ. सुनिलदत्त चौधरी की ईश्वर आराधना के कार्यक्रमों का नियोजन देखकर आश्चर्यचकित हो जाती है। हमेशा कहती हैं कि इतने व्यस्त जीवन में इस तरह समय निकालकर ऐसा कार्य करना किसी साधारण व्यक्ती का काम नहीं हैं।

ऐसे व्यक्तीत्व का सान्निध्य हमें मिला, यह हमारी खुशनसिबी। उनके हाथों परोपकार के कार्य होते रहें, यही ईश्वर से प्रार्थना।

- जीतू कुकरेजा

## नराचा नारायण

फुलासंगे मातीस वास येई ! असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे आपल्या सेवेच्या रूपाने अनेकांच्या जीवनात आशेचा किरण जागविणारे, तसेच हे आयुष्य गंधमय बनविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे जळगांवचे सुप्रसिद्ध होमिओपॅथीक वैद्य डॉ. सुनिलदत्त चौधरी. मानवी जीवन हे सुख-दु:खमिश्रीत आहे. आरोग्य हे सर्व संपत्तीपेक्षा महत्त्वाची संपत्ती मानली जाते. पण एखादा आजार आपल्याला फार खचवून टाकतो. अशातच चिंता वाढते. पण डॉ. सुनिलदत्त
चौधरींच्या रुपाने एक मसिहा मानवाची आणि मानवतेची सेवा करणारा भेटल्यावर जगण्यात आनंद आहे.

*फुलासमान कोमल। देवापरि सुनिर्मळ।*
*विनम्र या तृणासम। सदैव हो मति मम्।।*

या उक्तीप्रमाणे डॉक्टरांचे व्यक्तिमत्त्व आम्हाला पहायला मिळाले. गेल्या ६-७ वर्षांपासून डॉक्टरांकडून औषधोपचार होत असतांना त्यांचा सेवाभाव, त्यांची रुग्णांबद्दलची आपुलकी, रुग्णांवरची श्रद्धा असे स्वभावाचे अनेक पैलू दिसून आले. त्यांच्या वागण्यातून व बोलण्यातून त्यांची कर्तव्यनिष्ठा दिसून येते.

*जगाच्या कल्याणा देह कष्टवावा।*
*कारणी लावावा सत्यासाठी।।*

याप्रकारे माझ्यासारख्या अनेक रुग्णांवर ते दररोज औषधोपचार करतात. वडिलांकडून मिळालेला वारसा ते यशस्वीपणे सांभाळताहेत. त्यांनी त्यांच्या कार्यामुळे समाजात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. पैसा कमविणे किंवा फक्त पैसा हाच धर्म न मानता समाजातल्या तळागाळातील गोरगरीब माणसांची सेवा करावी हाच मुख्य धर्म त्यांचा दिसून येतो.

'जे असे आपणापाशी ते द्यावे दुसऱ्याशी' या वचनानुसार त्यांनी वैद्यक क्षेत्रात आपल्या कामाच्या जोरावर एक वेगळा ठसा उमटवला

आहे. स्वतःच्या जगण्यात आनंद आहे, पण दुसऱ्यासाठी जगण्यात परमानंद आहे, असे मानून त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू आम्हाला पाहायला मिळाले. रुग्ण म्हणून त्यांच्याकडून सेवा घेत असताना त्यांच्या कामाचा, वागण्याचा साहजिकच परिणाम आमच्यावरही झाला.

संत आपल्याला दगडात देव शोधण्याऐवजी मानवात देव शोधावा असे सांगतात आणि रोग्यावर उपचार करणारा वैद्य हा आपण परमेश्वराचेच एक रूप आहे असे मानतो. त्यापैकी डॉ. सुनिलदत्त चौधरी हे एक आहेत. आजार म्हटला म्हणजे आपल्याला दुःख होते. पण डॉक्टरांची उपचार पद्धती म्हणजे श्रद्धा आणि सबुरी. होमिओपॅथीक उपचार पद्धतीत आजाराचं समूळ उच्चाटन होते. पण त्यासाठी वेळ लागतो. पण म्हणतात ना, सब्र का फल मिठा होता है। त्यानुसार आयुष्यभर आपली रोगातून मुक्तता होते. आपला जास्त विश्वास ॲलोपॅथीवर असतो. परंतु तत्काळ निदानाच्या मागे न लागता आत्मविश्वासाने होमिओपॅथी औषधोपचार करून डॉक्टरांनी होमिओपॅथी हे एक वरदान आहे हे सिद्ध करून दाखविले.

अशाप्रकारे स्वतःचे छंद जोपासून, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्या कार्याला आमच्या कोटी-कोटी शुभेच्छा!!!

*कलेत जो आहे अमर प्राण, आणि विकास मानवतेचा*
*त्यासच मानितो मी अधिष्ठान भगवंताचे, जनतारूपी जनार्दनाचे !!*

- हेमंत ललवाणी व परिवार, जामनेर

## ... अन् मला भेटला देव

हजारो रुग्णांना जीवन देऊन त्यांचे भविष्य घडविणाऱ्या, 'सेवा' हाच जीवनाचा स्थायीभाव मानणाऱ्या प.पू.डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी यांना रुग्ण सेवेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

१ डिसेंबर २००१ ची रात्र माझ्यासाठी काळरात्र ठरली. त्या रात्री मला अपघात झाला. माझ्याबरोबर एक मित्र होता, तोही शुद्धीवर असून नसल्यात जमा होता. कारण त्यालाही बरेच लागलेले होते. त्यावेळी एकही वाहन थांबायला तयार नव्हते. अशा परिस्थितीत एक देव माणूस भेटला - डॉ. राजेंद्र जैन (पहूर) व गाडेगावचे पोलीस पाटील यांनी मला जळगांव येथील ट्रामा सेंटरमध्ये ॲडमीट केले. साक्षात यमदेवाने मला नेल्यात जमा होते. परंतु ट्रामा सेंटर येथील डॉ. राजेश जैन (न्युरोसर्जन) यांनी माझ्यावर उपचार सुरू केले. परंतु फक्त परमेश्वर जे करेल तेच सत्य. सर्व मित्रपरिवार, सहकाऱ्यांच्या दुवा कामी आल्या. जीवनात सर्वत्र अंधारच अंधार... आशेचा किरण फारच धूसर... सर्व प्रयत्न सुरू... नाडीचे ठोके २ मिनिटांना १ तर ५ मिनिटाला ३ हा नियतीचा खेळ ७० तासांपर्यंत सुरू होता. मी १६ दिवस कोमात होतो... परमेश्वराची असीम कृपा... कोमातून बाहेर आलो. पण समोर काय चाललंय काहीच कळायला मार्ग नव्हता. हळूहळू सुधारणा होत होती. अजून ओळख कोणाचीच पटत नव्हती. ३१ डिसेंबरला डिस्चार्ज मिळाला. दरम्यान काही प्रेमाच्या नात्यांमुळे डॉ. सुनिलदत्त चौधरी साक्षात परमेश्वर यांच्याविषयी सांगण्यात आले. माझ्या आयुष्याला काही वेगळेच वळण मिळायचे होते. देवाच्या मनात म्हणूनच मला हे देव भेटले आणि या देवाने मला जीवन दिले. जीवन जगण्याची ताकद दिली. त्यांच्या पवित्र दवाखान्याच्या दालनात पाय ठेवताच मला अंतर्गत साक्षात्कार झाला. मी पूर्ण विश्वासाने होमिओपॅथीक औषधोपचार सुरू केला आणि काय चमत्कार? दीड दिवसात मी उभा राहिलो व कुणाचाही आधार न घेता चालायला लागलो.

जेव्हा-जेव्हा मी त्यांना भेटतो तेव्हा मला जीवन देणारा हाच तो परमेश्वर... हाच तो देव... असेच माझे मन मला सांगते. आणि ते सत्य आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते, '...मला भेटला देव'.

*"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति, देह कष्टविती चंदनापरी"*

ज्याप्रमाणे चंदन स्वतः झिजते व दुसऱ्यांना सुवास देते, सुगंध देते, त्याप्रमाणे डॉ. सुनिलदत्त चौधरी हे स्वतः झिजून रुग्ण सेवा करून रुग्णांच्या जीवनात आनंद निर्माण करतात. निरोगी जीवन जगण्याची कला शिकवितात व रोग्याला जीवनदान देतात. माझ्या अपघाताचे वृत्त माझ्या एका मित्रास माहित होते. त्याच्या चुलत भावाचा अपघात झाला होता पेशंट जळगांव सहयोग क्रिटीकलमध्ये ॲडमीट होता. सहा दिवसांनंतर त्याला औरंगाबाद येथे 'कमलनयन बजाज हॉस्पिटल' येथे हलविले. त्या ठिकाणी दर १५-२० दिवसांनी मेंदूचे तीन वेळेस ऑपरेशन झाले. काहीही फरक जाणवत नव्हता. पेशंट औरंगाबादलाच असताना आम्ही डॉ. सुनिलदत्त चौधरी यांचा सल्ला घेतला व त्यांनी आमच्या सोबतच औषधी दिली. पावणेतीन महिने असून नसल्यागत जमा असलेल्या पेशंटला दुसऱ्याच दिवसापासून थोडा-थोडा फरक दिसायला लागला. आज सदर पेशंट ७५ ते ८० टक्के बरा झाला आहे.

म्हणूनच मला देव भेटला असे म्हणावेसे वाटते. मला नेहमी असे वाटते की डॉक्टरांची होमिओपॅथीक औषधी एक निमित्तमात्र आहे. पण आमच्या या देवाजवळ असलेली ही दैवी शक्तीच सर्व कार्य करते. कारण उपचार होणार नसेल तर सरळ नाही सांगितले जाते आणि तोसुद्धा अनुभव मी एका संदर्भात घेतलेला आहे.

मी जेव्हापासून आमच्या या मानवरूपी देवाला पाहातो, भेटतो, अनुभवतो -

'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता-घेता देणाऱ्याचे हात घ्यावे'

या उक्तीप्रमाणे डॉक्टरी व्यवसायातून मिळविलेल्या पैशातून या ना त्या मार्गाने समाजसेवा करीत आहे. तसेच ईश्वरीय पूजा-पाठ करून भरपूर दान-धर्म केला जातो. जसा की, सुरुवातीला मनुदेवी, पद्मालय, राजघाट-बडवानी, सप्तश्रृंगी देवीवर देवीचे पाठ, तसेच कवडा हनुमान-बडवानी जिल्हा येथे झालेले कार्यक्रम.

सदर कार्यक्रमांचे आमंत्रण जवळजवळ सर्व रुग्ण परिवाराला असतेच असते. तेथे असलेल्या सर्वांची राहण्या-खाण्यापासून सर्व व्यवस्थासुद्धा केली जाते. यातून एवढेच दिसते की आमच्यासारख्या रुग्णपरिवाराच्या आरोग्याकरिता सुख, शांती, समाधान मिळावे एवढे निश्चित!

*'सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना'*

- सतीष केशवराव चौधरी, जळगाव

## कुजबुज हितचिंतकांची...



## पितृ देवो भव।

खरंच डॉ. सुनिलदत्त चौधरी (बाबा) हे माझ्यासाठी केवळ डॉक्टर नसून ते माझे वडील आहेत. आजार कोणताही असो, बरं होण्यासाठी गॅरन्टी १०० टक्के. माझी प्रेग्नंन्सी, डिलीव्हरी, साधं सर्दी-खोकला असो, औषध पूर्ण त्यांचंच.

केबीनमध्ये गेल्यावर असे वाटते की जसे आपण देवळातच आलो आहोत व आपल्यासमोर साक्षात देवच बसले आहेत. पेशंटची काळजी पण तेवढ्याच प्रामाणिकपणे घेतली जाते. सगळीकडे 'ऑल-आऊट' लावलेले आहेत. नंबर येईपर्यंत बसावे लागले तरी कंटाळा येत नाही. एकही मच्छर दिसत नाही. त्या वेळात गप्पा मारण्यासाठी बरेच जण भेटतात.

दैवी शक्ती एवढी जबरदस्त की बाबांना पाहिल्यावर अर्धे आजार तर सांगायचेच राहून जातात. तरी पण मात्र औषध बरोबर मिळून जाते (सांगायचे राहून गेलेल्या आजारावरसुद्धा). फसवणुकीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मी स्वतः १९९७-९८ पासून त्यांचं औषध घेते. माझी पूर्ण फॅमिलीसुद्धा त्यांचंच औषध घेते व १०० टक्के समाधान मिळते.

As Sir Willium Hamilton said,

"On Earth there is nothing great but man is man, there is nothing great but mind."
Which only Dr. Sunildatta Chaudhari (My Father) has.

- Aasha Sudeep Mutha

## एक प्रवासी पक्षी - 'डॉ. सुनिलदत्त चौधरी'

आई भगवतीच्या सेवेत मी गेल्या पंचवीस वर्षांपासून याज्ञिकी करतोय. हे सांगणं मला फार अभिमानास्पद वाटतं. याचं कारण आहे सेवेला पूर्ण झालेली पंचवीस वर्षे ही पंचवीस वर्षे आहेत काहीशी सुखाची तर काही दुःखाचीही माझ्या या गडावरच्या पंचवीस वर्षांच्या सेवेत मी जे काही पुण्य मिळवलं, त्यातील महत्त्वाची मिळकत म्हणजे आमचे आदरणीय बाबा डॉ. सुनिलदत्त चौधरी. डॉक्टर म्हणजे एक स्वच्छंदी व्यक्तिमत्त्व म्हणजेच,

रमता जोगी बेहता पानी, कभी इधर कभी उधर !

१९९३ मध्ये पहिल्यांदा डॉक्टरांची माझी भेट झाली. त्यावेळी त्यांनी गडावर केलेल्या नवचंडी यज्ञानंतर माझं आणि त्यांचं नातं घट्ट होत गेलं. आज माझ्याही सेवेची २५ वर्षे पूर्ण झालेली असतानाच डॉक्टरांसारख्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचीही वैद्यकीय आणि सामाजिक सेवेतील २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. हा एक योगायोगच म्हणावा लागेल. त्याबद्दल विशेष आनंद वाटतो. डॉक्टरांची भेट हा योग भगवतीनेच घडवून आणला आहे. या दैवी व्यक्तिमत्त्वाबरोबर माझ्यासारख्याने वेळ घालवावा, त्यांचे अनुभव पदरात पाडून घ्यावेत हीदेखील भगवतीचीच इच्छा असं मला नेहमीच जाणवत आलंय. डॉक्टरांना प्रवास करण्याचा छंद असल्याने कित्येक वेळेस त्यांच्याबरोबर तिरूपतीला जाण्याचा योग आला. केवळ हाच योग नाही, तर नर्मदा परिक्रमा प्रवास हे मला आयुष्याचं संचित वाटतं. या प्रवासात डॉक्टरांमधील दानवीर समाजसेवक जवळून बघण्याची संधी मिळाली. कारण हा धार्मिक प्रवास करताना पूजाकार्य घडणारच होतं, पण ज्या शोषीत वर्गाची दोन वेळेला खायची भ्रांत आहे, त्या मध्यप्रदेशातील झांबुआ जिल्ह्यात कवडा हनुमान येथे डॉक्टर चौधरी (आमचे बाबा) यांनी एक ट्रक वस्त्रे दान केली. त्यावेळी कपडे मिळाल्यानंतर आदिवासी लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद डोळ्यात पाणी आणणारा होता. साक्षात भगवतीनेच आपला हात डॉक्टरांच्या हाताला लावला आहे असं वाटलं. आमच्या नर्मदा परिक्रमेच्या प्रवासात डॉक्टरांमधला धार्मिकतेबरोबरच आधुनिक बाजू असलेला जिद्दी माणूसही मी जवळून पाहिला. 'भूक लागली आहे बाबा'

असं म्हटल्यावर त्यांनी एका ठिकाणी बसलेल्या सीताफळ विक्रेत्याकडून सगळी सीताफळं विकत घेतली. पोट भरलं पण सीताफळं संपली नाहीत, असा डॉक्टरांचा अन्नपूर्ण हात. एका सकाळी डॉक्टरांचा निरोप आला की, कन्याकुमारी ते लेह हा प्रवास विक्रमी वेळेत पूर्ण केल्यामुळे आमची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली आहे, हे ऐकल्यावर मी त्यांचं अभिनंदन केलं. पण त्यांच्या विक्रमाबद्दल मला अजिबात आश्चर्य वाटलं नाही. कारण त्यांच्यामधली जिद्द मी जवळून पाहिली होती आणि मला याचा विश्वास होता की ही जिद्द एके दिवशी विक्रमी टोकाला जाणार.

बाबा आताही आपण कोणाबद्दल तरी कल्याणाचा, त्यांच्यावर करावयाच्या उपचाराचा विचार करत असाल आणि काही क्षणात तुम्ही वेगळा कोणता तरी विक्रम करण्याकरता बाहेर पडाल याबद्दल भाकीत वर्तवता येणार नाही. पण माझा हा विश्वास ठाम आहे की, तुमच्या हातून जे घडेल ते लोककल्याणकारीच घडेल. त्याबद्दल आई भगवती आपल्याला शक्ती देवो हीच माझ्या सर्व कुटुंबियांची सदिच्छा!

- बाबा दीक्षित, सप्तशृंग गड

## 'निष्काम कर्मयोगी'

आदरणीय डॉ. सुनिलदत्त चौधरी, आपल्या २५ वर्ष होमिओपॅथी सेवेबद्दल हार्दिक शुभेच्छा. अशीच सेवा आपल्या हाताने होत राहो. ही ईश्वरचरणी प्रार्थना.

आपल्या सेवेबद्दल माझ्याजवळ फक्त दोनच शब्दांची प्रतिक्रिया आहे -

'निष्काम कर्मयोगी'

- नरेंद्र रतन (पानवाले)

## द्वैत - अद्वैत

माननीय बाबा,    होमिओपॅथी तज्ञ म्हणून वैद्यकीय सेवेची आपण २५ वर्षे पूर्ण करीत आहात, ही आम्हा सर्वांना खूप अभिमान वाटावा, अशीच बाब आहे. या दोन तपाच्या आपल्या तपश्चर्येसाठी आपण फक्त चार मार्मिक प्रश्न विचारले आहेत. एका-एका प्रश्नाचं उत्तर म्हणजे जणु आपण वेचलेलं आयुष्य आहे. त्याला शब्दबद्ध करण्याचं म्हणजे एक तारेवरील कसरत आहे. आमचे वेडेवाकडे बोबडे बोल कुठे तोल सावरलेले तर कुठे तोल गेलेले... ते आमचे आहेत म्हणून तुम्ही ते गोड करून घेणार. नेमकं, मुद्देसुद मोजकच शब्दबद्ध करावं कसं हा माझ्यासह आम्हा सर्वांना पडलेला एक यक्ष प्रश्न.

'।। बाबा समर्थ ।।' म्हणून लिहायला केलेली सुरुवात...

या आपल्या सेवाकाळात आपण माझ्या आयुष्यात आलात ते सन १९९२ ते २०१० ही १८ वर्षे. बाकी राहिलेल्या ७ वर्षांची उणेवारी, खंत सुरुवातीला होती, पण आता ती नाही. द्वैत... अद्वैत! क्षणाक्षणाच्या कालओघात कळालं ते असं होतं कि सोबत जन्मोजन्मीची... विधात्याच्या विधीनुसार ठरलेली भेट झाली हे निश्चित... "आयुष्य बाबामय झालं!!"

**प्रश्न : रुग्ण सेवा केली ?**

उत्तर : होय. अनावश्यक सामोपचाराला आपण तिलांजली दिली, तथाकथीत समाजमन दुखलं या ढोंग पांघरलेल्या समाजमनातील काही घटकांना जी जाग आली ती कायमचीच. प्रामाणिक सल्ला, योग्य उपचार, योग्य मार्गदर्शन, रुग्ण बरा करणं हे अंतिम ध्येय. हे साधतांना काही ढोंग्यांचे शिव्या-शाप याचीही पर्वा आपण केली नाही. कारण सत्य हे अंतिमतः सत्यच असते. त्याला 'अ'च्या बाधेपासून मुक्तता... हे आपले समर्पण होय. आपण फक्त रुग्ण सेवाच केली. हे ढोंग पांघरलेल्यांना ओरडून सांगायची गरज नाही.

**प्रश्न : पैसे कमविले ?**

उत्तर : होय. पैसा कमविण्याचे अनेक अर्थ जो ते आपल्यापरीने लावत असतो. आपल जीवनयात्रेत आपण लावलेला अर्थ व आम्हास उमजले. अर्थ... (पैसा) प्रामाणिकपणे व सचोटीने कमविलेला पै न् पैचा योग्य विनियोग म्हणजे पैसा कमविणे हा अर्थ...
आपण खूप पैसा कमवला चरितार्थासाठीचा ठेऊन बाकी दान-धर्म व पिडितांच्या पीडा कमी करण्यासाठी योग्य विधिमार्गाने त्याचा

विनियोग केला, त्या विनियोगाचे एक फळ 'अबोली प्रतिष्ठान' हा ट्रस्ट.

पैशाअभावी हुशार होतकरूंची आबाळ रोखली... खऱ्याखुऱ्या गरीबाला आपण दिलेला मदतीचा हात, रुग्णसेवेतील अद्ययावतता व तत्परता मिळविण्याची धडपड व यथार्थने चालविलेला चरितार्थ व आपल्या कुटुंबात समाविष्ट करण्यासाठी आपला अट्टाहास हाच आपला पारिवारीक उदय व विकास. खूप पैसे कमविले पण लोकार्थी संपत्ती नाही. द्वैत-अद्वैत.

**प्रश्न : समाजसेवा केली ?**

उत्तर : होय. आलेला प्रत्येक रुग्ण हा समाजाचाच एक घटक... एक गरजवंत... बहुतांश वेळा समाजातील लुटारू प्रवृत्तींकडून लुटला गेलेला व अनुभवांनी शहाणा झालेला... त्यांची लूट थांबली. योग्य उपचार, सल्ला, मार्गदर्शन मिळाले. रुग्ण बरे झाले, त्यांनी विश्वास दाखविला... अशांत, अविश्वासाच्या वादळात जे उखडले, कोलमडले त्यांची कीव करत बसण्यापेक्षा गरजूंची गरज भागवली ही सार्थ समाजसेवाच नाही का? वरील दोन्ही प्रश्नांची उकल हीसुद्धा समाजसेवाच तर आहे ना!

**प्रश्न : की ईश्वरकृपेने व होमिओपॅथीद्वारे रुग्णांना बरे केले ?**

उत्तर : होय. He can hear us, God is never silent ! Because, He is within us...
स्वतःतल्या ईश्वराला जागे ठेवून होमिओपॅथीचा सर्वांगाने विकास करण्याचा आपला अथक प्रयत्न व त्यासाठीची तळमळ... अंतरात्म्याच्या आवाजास ओ देवून रुग्णाच्या अंतरात्म्याशी जर का संवाद साधला तर रुग्ण बरा होतो. याला जन्मोजन्मीच्या पुण्याईचे पाठबळ, निरपेक्ष भावनेने केलेले प्रयत्न प्रामाणिक राहून, या अजोड व अवघड कार्याची कर्माशी घातलेली सांगड म्हणजे ईश्वरी कृपेने व होमिओपॅथीच्या माध्यमातून रुग्णांना बरे केल्याचेच द्योतक आहे.
"मला माझ्या सर्व तक्रारी सांगायचया होत्या. पण मुख्य किंवा इतर तक्रारी मी विसरलो... म्हणूनच मी कागदावर लिहून आणलेले आहे. पुन्हा विसरू नये म्हणून... पण काय आश्चर्य? तो कागद खिशातून काढण्याचे विसरलो. जेथे माणूस आपलं दुःख/तक्रारी विसरतो ते ईश्वरी स्थानच नाही काय?"

दवाखाना - की देवालय?   डॉक्टर - की देव?   रुग्ण व डॉक्टर? - की हरी हर भेट?   तात्काळणे? - की आराधना?
पैसा? - की परमार्थ?   व शेवटी द्वैत - की अद्वैत?   सगुण- निर्गुण निखळ आनंद.

मुद्देसुद, मोजके असेलही पण शब्दबद्धतेचा खोडसाळपणा पूर्ण करणे या जन्मी तरी शक्य नाही. या बाबांची फक्त जाणीवदेखील आयुष्यात क्षणाक्षणात चैतन्य निर्माण करते. आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. म्हणूनच शक्य झाले त्याचं सामर्थ्य मला केवळ आपल्यामुळेच लाभलं या जाणिवेसह....

- जयंत नेवे - डॉ. सौ. हेमलता नेवे

## आपमें भगवान पाया...

आदरणीय बाबा,   कहते हैं आत्मकल्याण और लोककल्याण एकही सिक्के के दो पहलू हैं। सच! आपका जीवन इसका सौ फिसदी सही उदाहरण है। परमात्मा पर आपकी अटूट श्रद्धा, परम विश्वास और अखंड भक्ती हो तो आपके हृदय में लोककल्याण की भावनाओं का निर्झर बहाती है और एक डॉक्टर होने के नाते मानवता का मसिहा बन, आप जीवनदान देते हैं।

आपका विश्वास परमात्मा पर और हमारा विश्वास आपपर। आप मेंही हम भगवान का विराट रूप देखते हैं। आप हमारे पिता, गुरू और प्रभु है। आप पर हमारी तीव्र श्रद्धा और समुचित विश्वास है। कथनी-करनी की एकता, विचारों की सुगमता अजोड है।

जिन्दगी में सदा ध्येय शुभ अपनाया,  साधना, निष्ठा, लगन को पाया ।
हर कोई अपने लिए जीता यहाँ, औरों को अपनाके आपको जीना रास आया।

जब कभी आप को देखते है, लगता है परमात्मा का दर्शन हो गया। मानवसेवा परमात्मा की प्रत्यक्ष सेवा है। इसी भावना से ओतप्रोत आपकी सेवा है। प्रभु ने जो सामर्थ्य दिया, तन, मन, धन, बुद्धी, प्राण, वाणी, व्यवहर, प्रार्थना इन सबका उपयोग आपकी सेवाओं में होता है। आप कहते हैं, मैं कुछ नहीं करता, यह तो प्रभुकृपा है, लेकिन आप जेसे भक्तों के दिल में ही प्रभु वास करते हैं।

आचरण ही जीवन का दर्पण है, व्यक्ती मुख्य यही है आकर्षण ।
तथ्य है, जीवित प्रमाणपत्र है, निष्काम सेवा ही समर्पण है।

"Poorest of the poor and richest of the rich, both get similar blessings and similar treatment from you! Spiritual bliss always reflect on your face, by which others feel peaceful."

आपके लिए क्या कहूँ? क्या न कहूँ? शब्दों की सीमा में बाँध पाना असंभव लगता है। सूरज को दीपक दिखाने जैसा लगता है। लेकिन विगत २५ सालों से आप अपनी सेवाएँ समाज में दे रहे हैं। आपकी कार्यक्षमता, आपकी तत्परता, आपकी सरल हृदयता और आपकी परमात्मा पर असीम श्रद्धा, सबने आपको सफलता के उस मुकाम पर पहुँचाया है।

हर थकी राह को मंजील से मिलाया,
हर दुखी साँस को फूल-सा खिलाया,
पीडित असहाय, लाचार, गरीब बनाया जिन्हे किस्मतने
प्यार के हाथ से सबको सहलाया
मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा में नहीं
हमनें तो आपमें ही हमारा भगवान पाया।

- सौ संगिता निलेश ललवाणी

## कुजबुज हितचिंतकांची...



## हे ईश्वरा,

वास्तविक ही परिस्थितीची विडंबना आहे की, माझे जीवन दुसऱ्यांच्या आजारपणावर अवलंबून आहे. परंतु तरीसुद्धा हे माझे सौभाग्य आहे की तू मला त्यांच्या कष्टांचे निवारण करण्यासाठी एक उत्तम संधी दिली आहेस. तू मला ही जबाबदारी पूर्ण करण्याची योग्यतादेखील दिली आहेस.

हे ईश्वरा,
मला अशी शक्ती प्रदान कर की माझे कार्य मी अत्यंत निष्ठेने पूर्ण करू शकेन. वास्तविक तूच सर्व कष्टांचे निवारण करतोस आणि सुखाचा उगमदेखील तूच आहेस. मी तर फक्त निमित्तमात्र आहे.

हे ईश्वरा,
माझ्या रुग्णांवर तू कायमची कृपादृष्टी ठेव.

हे म्हणणे एका डॉक्टरचे आहे, पण या म्हणण्याला सार्थक ठरवणारा मला डॉ. सुनिलदत्त चौधरी शिवाय दुसरा कोणीही डॉक्टर मला या जगात दिसला नाही.

- अखिल, निखिल राजू अग्रवाल

## हृदय शिंपल्यातील मोती

आदरणीय डॉक्टरसाहेब, आपल्या वैद्यकीय सेवेला २५ वर्ष पूर्ण झाली, त्याबद्दल हार्दिक अभिनंदन. आपल्या कार्यकक्षेचा वेग अफाट आहे. त्याला क्षितिज नाही. केवळ औपचारिक शब्दाने अभिनंदन न करता आपल्यावर श्रद्धासुमनांचा वर्षाव करण्याचा मोह टाळता येत नाही. आपल्याबद्दल लिहायचे धाडस करणे म्हणजे सूर्यापुढे पणती दाखविण्यासारखे आहे. तरीही दोन शब्दांची श्रद्धासुमने आपल्या चरणी अर्पित करावी असे मनोमन वाटते.

आपण घेतलेलं जनसेवेचं व्रत ज्याचं बीजारोपण तुम्ही पंचवीस वर्षांपूर्वी केलं होतं. परंतु आज त्याचं रुपांतर वटवृक्षात झालं आहे. त्या वटवृक्षाच्या छत्रछायेत येणाऱ्या प्रत्येक माणसाचं जीवन आपण निर्धास्त करून टाकलंय. माझ्या निकटवर्तीयांकडून मी आपणाबद्दल भरभरून ऐकलं होतं. ते आपल्याविषयी बोलतांना जराही थकत नव्हते. एका सत्यवादी, प्रामाणिक, निःस्वार्थी, निगर्वी व्यक्तिमत्त्वाला जवळून पाहण्याचा योग लवकरच आला.

एका धार्मिक कार्यक्रमानिमित्त माझी व आपली भेट झाली. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पाहताक्षणी पडला. आधुनिक पाश्चात्य विज्ञानाचे संशोधन, वैद्यकीय चिकित्सा, सत्याचा शोध घेण्यासाठी केलेली भ्रमंती, कोणताही गाजावाजा न करता सातत्याने केलेली प्रदीर्घ अध्यात्मिक साधना, त्याचा आविष्कार करण्यासाठी चालवलेली धडपड, तळमळ, सारे काही मोहवून गेले. आपल्या थोरपणाचे नवनवे पैलू ध्यानात घेऊन आपल्या कार्याविषयीची क्षितिजे ही अधिकाधिक विस्तारलेली मी स्वतः पाहिली. मानव, पशु, पक्षी, प्राणी, निसर्ग यांच्यावरील प्रेम मी स्वतः पाहिले आहे. अगदी मध्यरात्रीही प्राणिमात्रांची निगा, स्वच्छता करून प्रेमाने, वात्सल्य भावनेने कुरवाळून नंतरच आपण झोपता हेदेखील मी स्वतः पाहिले आहे. वैद्यकीय उपचार करून घेण्याकरीता येणाऱ्या लोकांना आपण कितीही उशीर झाला तरी टाळत नाहीत. उलट आस्थेने त्यांची विचारपूस करून आपलेसे करता. आपले मार्गदर्शन व औषधोपचार घेत लोक श्रद्धेने आपल्या सूचनांचे पालन करतात.

'सेवा परमो धर्मः' असे म्हणत मी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. सत्ता, संपत्ती हेच जीवनाचे साधन मानणाऱ्या कळपात माझे मन घुसमटत होते. राजकारणातील उदासीनतेमुळे हताश, निराश झाले होते आणि अचानक आपली गाठ पडली. माझी उदासीनता आपण जाणली. त्यावर आपण केलेले मार्गदर्शन माझ्यासाठी संजीवनी ठरली. आपल्यासारख्या तेजःपुंज चमकणाऱ्या ताऱ्याचा कवडसा माझ्या अंधुकमय जीवनाला सूर्यासारखा प्रकाशमान करून गेला.

युगायुगातून जगाच्या पाठीवर महत्कार्यासाठी ज्या निवडक विभूति जन्म घेतात, त्यापैकीच हा एक दूत जन्माला आला आहे. त्याने जनकल्याणाचा वसा घेतला आहे. आपण अध्यात्मिक अनुभूतीच्या विचाराने, सहानुभूतीच्या अद्‌भूत उदारपणाने, नर्मविनोदाने तर कधी शिवराळ भाषेच्या भांडाराने आणि ज्ञानप्रबोधनाने आपल्या सहवासात आलेल्यांना मंत्रमुग्ध करता. लोहचुंबकाप्रमाणे आपले व्यक्तिमत्त्व सर्वांना आकृष्ट करते. लौकिक जगातील मोठेपणाची व यशाची आपण कधीच पर्वा करीत नाही. आपली अध्यात्मिक क्षेत्रातील प्रतिमाच आम्हाला अभिप्रेत आहे.

म्हणूनच आपला शब्द म्हणजे आम्हासाठी, 'हृदयातल्या शिंपल्यातील मोती'. जीवनाचा प्रवास ऊन-सावल्यांमधून सुरू असतानाच अशी काय सुंदर वळणे येतात... आणि जीवनाला वेगळी दिशा देऊन जातात. आपल्या वैद्यकीय सेवेच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीला माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या हार्दिक शुभेच्छा!

पुनःश्च एकदा त्रिवार अभिनंदन!

धन्यवाद!

- सौ. नीला पद्‌माकर देसाई
माजी आमदार (वि.प.स.), मुंबई

## मनकवडा

समाजाच्या दुःखांशी नाती सांगणाऱ्यांना मर्यादांची कुंपणं अडवीत नाहीत. ते शब्द कुरवाळीत नाहीत आणि स्वतःच्या व्यथा गोंजारीत नाहीत. सभोवतालच्या दुःखांना आव्हान देत ते येतात आणि व्यक्तिगत जीवनाचा होम करून समाजातल्या दुःखभरल्या रात्री अन् अंधारलेली मने लख्ख उजळून टाकतात. असाच एक अवलिया मला भेटला. जो दुसऱ्यांच्या मनात चाललेली घालमेल अचूक ओळखणारा 'मनकवडा' होता.

डॉ. सुनिलदत्त शिवराम चौधरी (रा. जळगांव) हे 'मनकवडे', आदर्श व्यक्तिमत्त्व सोळा-सतरा वर्षांपूर्वी भेटले. पहिलीच भेट होती ती. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या तेजाचा कवडसा, त्यांनी घातलेली 'आईसाहेब नमस्कार' ही साद माझ्या मनावर निश्चितच परिणाम करून गेली. एवढ्या बहुमानाने संबोधणाऱ्या व्यक्तीची वैचारिक पातळी फार उच्च होती. त्यांच्या स्वभावाच्या विविध छटांच्या पैलूंच्या लडी अशा काही उलगडत गेल्या की त्यांची आकस्मिक भेट त्यांना माझी अविस्मरणीय भेट आणि आदरणीय व्यक्ती बनवून गेली.

'सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो।' या उक्तीचा प्रत्यय गेल्या सतरा वर्षांत आम्हा उभयतांना सातत्याने आला. मनुष्याला घडवायला संगतीच प्रामुख्याने कारणीभूत ठरते. सुसंगती ही मनुष्याच्या प्रगतीच्या कळत-नकळत त्याच्या भाग्याला कारणीभूत होते. निसर्गातही संगतीचा परिणाम दिसून येतो. फुलांच्या सहवासाने मातीला गंध प्राप्त होतो. परिसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते. फुलांमुळे माळेतील सुतालाही मान्यता मिळते. एखादे काम बिनबोभाट पार पाडून त्याचे श्रेयही न लाटणारे डॉक्टर सुनिलदत्त आम्ही जवळून पाहतो. अफाट वैधकीय विद्वत्ता, त्याच्या जोडीला दैवी शक्ती यांचा एकत्रित अविष्कार जेव्हा आम्ही पाहतो, नुसताच आम्ही पाहत नाही तर अनुभवतोदेखील. तेव्हा आम्हास धन्य वाटते. सेवा तत्परता, अफाट दानधर्म, न बोलता कार्य करत करण्याची वृत्ती व दुसऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्याकरीता सतत धडपडणारे आमचे डॉ. सुनिलदत्त...

पुराणकाळातील कथा आपण वाचल्या आहेत, ऐकल्या आहेत. आपल्या आई-वडिलांना काशीयात्रेस नेणारा श्रावणबाळ आपण ऐकला आहे. परंतु आधुनिक युगात अनेकांना स्वखर्चाने अनेक तीर्थयात्रा करवून आणणारा आमचा आधुनिक श्रावणबाळ दुसरा तिसरा कोणी नसून डॉ. सुनिलदत्त चौधरीच आहेत. डॉक्टरी सेवेतून अनेकांसाठी आपले संपूर्ण जीवन सार्थकी लावणारे, आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे जीवन मोतीमय करणारे डॉ. सुनिदलदत्त आमच्या सान्निध्यात आहेत, याचा आम्हाला अभिमान वाटतो. ईश्वराने आमच्यासाठी पाठविलेले ते

एक देवदूतच आहेत. साधे, सरळ, उमदे व्यक्तिमत्त्व बघता-बघता आमचे 'गॉडफादर' कधी बनून गेले ते आम्हाला कळलेच नाही.

आमचेच अनुभव बोलके नाहीत. असे अनेकांचे अनुभव आहेत. डॉक्टर अनेकांसाठी धडपडलेत. अनेकांसाठी जगलेत. त्यांनी अनेकांचे जीवन उजळून काढले. आज आमचे तर श्रद्धास्थान आहेच, त्याचबरोबर अनेकांचे ते 'बाबा' बनलेत. 'बाबा' हे अत्युच्च स्थान मिळवितांना डॉक्टरांना अनेक यातनांचे काटे टोचलेत. जी-जी व्यक्तिमत्त्व आज आदरणीय, पूजनीय, महान मानली जातात, त्या सा-यांच्या मागे यातनांचा प्रचंड इतिहास आहे. असं म्हटलंय की, "Uneasy lies the head that wear a crown." खरंच आपल्याला राजाचं मोठेपण, राजेपण दिसतं. पण त्याचे कष्ट, त्याच्या जबाबदा-या काळज्या दिसत नाहीत. गुलाब! फुलांचा राजा! सौंदर्याचा अत्युत्तम आविष्कार, त्याला सदैव मिठी घातली आहे ती काट्यानेच... निसर्गातील या बोलक्या प्रतिकाप्रमाणेच जीवनही आहे. मोठ्या व्यक्तींच्या मोठेपणाच्या पाकळ्या यातनांच्या काट्यानेच फुलत असतात. दुस-याच्या दुःखांचा भार स्वतःच्या खांद्यावर घेणा-या डॉक्टरांना स्वतःला होणारा मानसिक व शारीरिक त्रास आम्ही स्वतः जवळून पाहिला आहे. वैयक्तिक सुखाची होळी केलेली आम्ही पाहिली आहे. 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' इतरांसाठी असणारे 'बाबा' आम्हा उभयंतांचे नुसतेच श्रद्धास्थान नसून तो एक 'दीपस्तंभ' आहे. भरकटणा-या जीवननौकेला योग्य दिशा दाखवून ती अलगद व सुखरूप पैलतीराला लावण्यास मदत करणारा 'दीपस्तंभ'.

'ईश्वर' ही एक अजब शक्ती आहे. अमूर्त सत्य आहे. आपल्या सा-या श्रद्धा, भावना, भक्ती त्याच्यापाशी एकवटलेल्या असतात. सत्य द्वापार व त्रेता युगात प्रत्यक्ष ईश्वर पृथ्वीतलावर अवतरत असे. पण आजच्या कलीयुगातील देव कोणता? आम्हा दोघांना व आमच्या दोन मुलींना विचाराल तर आमचे पंढरपूर जळगांवात आहे. आमचा पांडुरंग आम्हाला डॉक्टरांच्या ओजस्वी, तेजस्वी व सात्विक चेह-यावरील हास्यात दिसतो. आम्ही समस्त परिवार या 'मनकवड्याच्या' पुढे नतमस्तक होऊन त्रिवार वंदन करतो व त्यांच्या यशोकीर्तीचा परिमल उत्तरोत्तर वाढून मैलोन् मैल पसरू देत अशा हार्दिक शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

- आईसाहेब, मुंबई

## पाकिटावरील 'सु'-विचार



परावलंबी करतो तो योग,
प्रयत्नशील करतो तो प्रयोग,
निरर्थकता दाखवतो तो योगायोग.

एखादा प्रश्न तुम्ही सोडवू शकत असाल,
तर चिंता करण्याची गरज काय ?
सोडवू शकत नसाल, तर
चिंता करून उपयोग काय ?

परिस्थिती चांगली आली की,
नाम घेईन म्हणणारा
कधीच नाम घेत नाही.

## सदिच्छा सुवर्ण महोत्सवासाठी...

आदरणीय डॉक्टर काका,

ओजस्वी व्यक्तिमत्त्वाचे असे तुम्ही.
आमचे प्रेरणास्थान... ।।
जागवता मनामध्ये तुम्ही नेहमी आशा,
दाखविता आम्हास नव्या प्रगतीच्या दिशा।।
आपण आधार ठरता नेहमीच आम्हासारख्यांचे,
प्रसंगी छत्रही होता येता क्षण ऊन-सावलीचे।।
तुमची मूल्ये आम्हास नेहमीच प्रेरणादायक ठरती,
आज मनसागरास आली सदिच्छांची भरती।।
आपल्या या जीवनाची होवो शतकपूर्ती,
दूरवर पसरावी आपली यशोकीर्ती।।
आम्हास भावतं तुमचं स्वतःला असं झोकून देणं,
प्रत्येक वळणावर जीवनाच्या स्वच्छंदीपणे पुढे जाणं।।
तुमचं हे मोकळेपण कुठल्या देवाचं वरदान की निसर्गाचं देणं!
किती सहज जमतं तुम्हाला, इतरांना आपल्यात सामावून घेणं।।
देव जर कधी भेटला तर एकच असेल आमचं मागणं,
असंच आनंदानं फेसाळत श्रीमंत व्हावं प्रत्येकाचं जगणं।।

- सौ. पूजा बंगाळे (लंडन)

## आमचे बाबा - एक आराध्य दैवत !

आपण होमिओपॅथी वैद्यकीय सेवेची २५ वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल अनेकोत्तम शुभेच्छा! रौप्य महोत्सवी स्मरणिकेच्या निमित्ताने मला खात्री आहे की आपली सुवर्णमहोत्सवी स्मरणिकाही प्रकाशित होईल. या गोष्टी बडबडण्याचा मला अधिकार नाही, ते योग्यही नाही, असे मी मानतो व जर हे चिरंतन सत्य आहे तर २५, ५० वर्षे नगण्य आहेत.

आयुष्य वाचणे, लिहिणे इतके सोपे नाही. त्याहूनही कठीण ते एखाद्याच्या आयुष्यात उतरवणे जेथे ठरलेली गोष्ट ठरल्या वेळेप्रमाणेच होतेच होते! सूर्य ज्याप्रमाणे रोज उगवतोच, त्याचे अस्तित्व जाणवतेच. त्याप्रमाणे आपल्या सामर्थ्यानिशी आमचे बाबा आपल्याला जाणवल्याशिवाय राहात नाही, यात शंका नाही.

सर्वसामान्यांना प्रश्न पडतो किंबहुना आमच्या रक्ताच्या नात्यांनासुद्धा हा प्रश्न भेडसावतो कि 'बाबा' या एकाच शब्दाच्या दोन अक्षरी नावात असं काय दडलंय? याच्या शोधात माझ्यासह अजून खूप कितीतरी आयुष्य व्यस्त आहेत, कार्यमग्न आहेत. रोज नवनवीन शोध लागताय. आयुष्य समृद्ध होत आहेत, पण दडलंय ते दडलंय, समस्त शोध घेणाऱ्यांना त्याची जाणीव आहे की हे न उलगडणारं कोडं आहे. तरीही वाट कोणी सोडलेली नाही, हेही सत्य आहे. माझ्यासह अशी कितीतरी आयुष्य विस्कटलेली असतील, जी काही ज्ञात काही अज्ञात, ती गुंफण्याचं काम त्यांचं निरंतर सुरू आहे. एक 'डॉक्टर' ते 'गॉडफादर' व गॉडफादर ते आमचे बाबा या संशोधनांनाही एक रोमहर्षक इतिहास आहे, विचार करून दमल्यावर मेंदूने त्या प्रत्येक पायरीवर घेतलेला तो विसावा आहे. 'बाबा' बाबाच आहेत.

एक स्वयंभू परिपूर्ण जीवनशैली व त्यात इतरांना सामावून घेऊन त्यांना त्यांच्या योग्य जागी नेमणूक देऊन केलेली उन्नती हा बाबांचा स्थायीभावच. सूर्यासारखं अखंड तळपणं 'तुक्या (संत तुकाराम)सारखं असावंत पण तुक्यासारखं नसावं!' हा सगुण-निर्गुणभाव विवाद, चक्रधर स्वामींच्या दृष्टांत शिकवणीची प्रत्यक्ष प्रचिती अशा किती अन् काय विविधांगी पैलूंची चमक व त्यातील नित्य नाविन्य यामुळे भिरभिरणारी मनं इथे गुंगतात व त्या मकरंदातलं ताजेपण आपल्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षणाला ताजं करण्यात गुंतत जातो, अन् मिळतो तो जीवनातल्या प्रत्येक क्षणाच्या जगण्याचा ताजेपणा. जीवन म्हणजे काय? ते कसं जगावं याचा साक्षात्कार अन् तोच एक आत्माविष्कार.

जीवन जगणं ही एक कला आहे. तसं जीवन वाचणं हीसुद्धा एक भाषा आहे. ही भाषा व्यक्तिपरत्वे भिन्न असते. परंतु सार शेवटी एकच

असतो. हे फार थोड्यांच्या जीवनाबाबत घडतांना आपणास दिसून येतं. या साररूपी जीवन वाचन भाषेला एका सूत्रात बांधण्याचं बाबांचं काम अव्याहतपणे नेहमी सुरू असतं. सूत्र तयार होण्यासाठी वेळ व काळाचं बंधन नसतं. सूत्र तयार होताच त्याची उकल हवी असते. देवाचंही अगदी असंच असतं आमच्या बाबांसारखं. त्यानुसार किंवा त्याचप्रमाणे बाबांचा फोन आमच्यासारख्यांच्या खिशात कोणत्याही क्षणी वाजेल हे सांगता येत नाही. ते रात्री अगदी १, २ वाजेच्या सुमारासही याच वेळांचा या लिखाणात वापर केलेला आहे. एवढेच ते काय! असो. समजावूनच घ्यायचं झालं तर असं म्हणता येईल की ज्याप्रमाणे जन्म वा मृत्यु माणसास कोणत्या क्षणी येईल हे माहित नसतं पण ते देवाचं एक काम असतं, तो ते करत असतो. आम्ही आमच्या दैनंदिन आयुष्यकर्मात एवढे मग्न असतो की, कधी याचे संदर्भ आम्हाला १-२ महिन्यांत मिळतात तर कधी वर्षात. लवकरात लवकर म्हटलं तर ३ ते ४ वर्षांत याची उत्तरं आम्हास नक्कीच मिळालेली असतात. आम्ही मोठ्या फुशारकीने सांगतो की, आयुष्य बाबामय कधी झालं ते कळलंच नाही. अरे वेड्या, तुझ्या आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रमंडळी, जवळचे, घरच्या संबंधासारखे ते तरी कुठे एवढ्या उत्कंठेने गुंततात. मग या नात्याला कुठलं नाव द्यावं? फक्त एकच - 'देव दीना घरी धावला...' दीनांचा कैवारी...

'वसुधैव कुटुंबकम्' याचा शब्दकोषातील अर्थ आम्हास माहीत आहे. नसल्यास शब्दकोष पाहावा. त्या अर्थाचा अर्थ कळण्यासाठी बाबांच्या जीवनशैलीकडे उघड्या डोळ्यांनी पाहावं. ज्याला जे वाचता येईल ते वाचावं. रेशनकार्डावर किंवा माय-बाप सरकार दरबारी नोंद कुटुंबातील व्यक्ती फक्त तीन! त्या कर्ता करवित्याच्या दरबारातील नोंद त्याच्या खतावणीत खाते उघडून अंदाजे ४-५ पानं त्यानं सोडूनच दिली असतील! मग विचार पडतो की, त्याला ही इतकी पानं का सोडावी लागली?

कारण त्यांचं कुटुंब! बाबांचं वाचन करणं किंवा बाबांना समजणं तुम्ही आम्ही समजतो तितकं सोपं नाही. त्या बाराखडीतील 'अ' जरी समजला किंवा लिहिता आला तरी आयुष्य नव्हे पुढच्या सात पिढ्यांचं भलं झाल्याशिवाय राहणार नाही, इतकं सोपं ते आहे.
बाबांची प्रेम करण्याची रीतही जगावेगळीच. अलौकीक, अन् चमत्कारीक. टोचल्यागत वाटलं तरी ते प्रेम, बोचरल्यासारखं वाटलं तरी ते प्रेम, चावल्यासारखं वाटतं तरी ते प्रेम... याला काय प्रेम म्हणतात? अहो, तुम्हाला म्हणून सांगतो, कधी काळी आम्ही रक्तबंबाळ होत होतो. तरी ते प्रेम असतं हे आत्ता-आत्ता आम्हाला कळायला लागलं आहे.

जगातले अनेक देश अभ्यासदौ-यानिमित्त भ्रमण करून होमिओपॅथीला उच्च शिखरावर पोहचविणारा हा 'पोर्शिदा' म्हणजेच आमचे 'बाबा' भारतीय संस्कृतीशी आपल्या जन्म व कर्मभूमीशी फक्त नातं सांगून आहे असं नाही तर ते नातं टिकवून, निभावून तुम्हा-आम्हाला होमिओपॅथीद्वारे फक्त बरं करीत नसून ढोंग पांघरलेल्या व लुटारू वृत्तीपासून दूर ठेवत आहे. खंत एकच आहे कि, आम्हाला हे ढोंग्यांकडून, लुटारूंकडून फसल्यानंतर कळत आहे. विनाकारणच्या तपासण्या, गरज नसतांना हॉस्पिटलमध्ये अॅडमीट, यात भरपूर पैसा व वेळ खर्च हे निमूटपणे अद्ययावतता या नावाखाली आम्ही सहन करीत आहोत, पण डॉ. सुनिलदत्त चौधरींकडे ३-४ किंवा ६-७ तास नंबरमध्ये थांबणं आम्हाला वेळेचा अपव्यय वाटतो, समाजमनावरचा हा पगडा व डोळे असून आंधळ्यासारखे व शिक्षित सुसंस्कृत असून अशिक्षितासारखे आत्मवर्तन आम्हाला थांबवता येणार नाही काय?

जब तक बिके न थे, कोई खरिददार न था।
आप ने हमें खरिदकर, अनमोल बना दिया।

\- निलेश ललवाणी

## An Unique Angel

In our childhood we used to here from our elders and also used to dream that Angels are sent on Earth by God to end agonies of our life.

Today when we look at your work and dedication towards mankind we believe you are one of those Angels sent by Almighty on Earth to end the agonies and the problem of several people.

Baba we all love you

\- Dr. Arun Oza


# जीवन पथ पर बढे चलो...

आदरणीय सुनिलदत्त चौधरी,

सुनते हो हर दुखियारे इन्सान की फरियाद,
भेजते हो वापस उसे हँसी-खुशी देने के बाद।
नित्य आपकी दुआ भी, प्रार्थना रूप से आती है,
यही अदा आपकी सबके दिल को भाती है।
लगन प्रभू सेवा की लोगों की जान बक्श देते हो,
इलाज में है ऐसा जादू, हर समस्या दूर कर देते हो।
दंग रह जाता है हर कोई आपका तरीका देखकर
आप मुस्करा देते हो, सब ठीक हो जाएगा कहकर।
तस्वीर आपके सद्‌गुणों की सदा ही हमारे दिल में रहेगी,
आपके हाथों में ऐसा गुण है दुनिया सदियों तक याद करती रहेगी।
चौडी हो जाती है छाती आपसे मिलकर मरीज की,
दवा के साथ-साथ मिलती है उसे सुगंध प्यार की।
धरा पर फैलता है उनका ही यश और कीर्ती,
जिनके कार्य करने में होती है आपके जैसी नीति।
रीत संसार की सदैव से यही चलती है,
नाम उन्हीं का होता है जो करते हैं सच्ची कमाई।
आपके हाथों इसी तरह लोककल्याण होता रहे, यही शुभेच्छा!

- पद्‌मा, पवन, प्रदीप कुकरेजा

# कुजबुज हितचिंतकांची...



## अध्यात्म और विज्ञान

किसी की प्रशंसा में लिखने में पूरी एक किताब भी कम पड जाए, वहाँ मर्यादित शब्दों में लिखने के लिए कहा गया है। इसलिए समझ में नहीं आ रहा था, कि क्या लिखे और क्या न लिखें? मन असमंजस की स्थिती में था। लेकिन अपने भाव प्रकट करने का अच्छा अवसर मिला है, (चाहे थोडे में ही सही) प्रयास कर रहे है।

**समर्पण की भावना :** कोई भी व्यक्ति अपने कार्य में अगर ऊँचाईयों को छूता है तो उस में सबसे महत्त्वपूर्ण बात होती है, समर्पण की भावना। डॉ. सुनिलदत्त चौधरी ने डॉक्टर के वेष को केवल कमाई का जरिया न मानकर लोकसेवा के रूप में अपनाया है। सभी जानते है कि कई बीमार चारों ओर बडे-बडे डॉक्टरों से निराश होने के बाद होमिओपॅथी का सहारा लेने पहुँचते हैं। तब तक उनकी बीमारी की जडें मजबूत हो चुकी होती हैं। ऐसे मरीजों का इलाज, साहस और समर्पण की भावना रखने वाला डॉक्टर ही कर सकता है। डॉ. सुनिलदत्त चौधरी ने आरंभ से ही ऐसी चुनौतियों को स्वीकार किया। TOYI का सन २००३ में मिला सम्मान इस बात की पुष्टी करता है।

**अध्यात्म और विज्ञान :** यह विश्व उस परमपिता की कृपा से चल रहा है। डॉक्टरी पेशा अर्थात विज्ञान से जुडे व्यक्ती अध्यात्म की बातों को कम ही मानते हैं। लेकिन डॉ. सुनिलदत्त न केवल दोनों को समझते हैं, बल्की उन्होंने दोनों क्षेत्रों में ऐसा तालमेल बिठाया हुआ है कि उनसे जुडे लोगों को यह निर्णय कर पाना कठीन है कि वे किस क्षेत्र मे कम है और किस क्षेत्र में अधिक।
समबद्धता : आज के इस भाग-दौड के युग में अपने लिए समय निकाल पाना कठीन लगता है। लेकिन नियोजन अगर सही है तो वर्ष भर के कार्यों को किस प्रकार बिना तनाव के हँसते-खेलते पूरा किया जा सकता है यह कोई डॉ. सुनिलदत्त से सीखें।

हमारी माताजी लक्ष्मीदेवी का इलाज आज से २५ वर्ष पूर्व डॉ. सुनिलदत्त चौधरी ने एक चुनौती के रूप में शुरू किया। उसका जो रिजल्ट उन्होंने दिया तो उसके बाद हम और हमारे बच्चे अंग्रेजी दवा लेना ही भूल गए हैं। दिनों-दिन डॉ. सुनिलदत्त चौधरी मेहनत और लगन से मरीजों के कष्टों को दूर कर रहें हैं।

उन्हें दीर्घायुष्य प्राप्त हो, यही ईश्वर से प्रार्थना!

- विसराणी परिवार

## वात्सल्याचा झरा

आदरणीय श्री. डॉक्टर (माझे गुरूजी),

आहे तुमच्या वात्सल्याचा प्रवाह अखंड
असतो तो समुद्राच्या लाटांपेक्षाही प्रचंड
आहेत गंगेच्या काठी अनेक पवित्र क्षेत्रे
एकवटली आहेत ती सर्व तुमच्यात हे जाणवते.
वात्सल्याचा प्रवाह, त्यागाचे घाट, त्यागाची मूर्ती,
यांच्या प्रभावाने होतो आम्ही पवित्र मिळते सन्मती
खरे तर देता येत नाही कोणतीही उपमा तुम्हाला
म्हणूनच आहात तुम्ही अलौकिक, उद्धारसी जगाला
व्हावे कसे आम्ही उतराई तुमच्या ऋणातून
कळे नकळे आम्हाला, वाहतो शुभेच्छांचा प्रवाह
मनातून व्यक्त करण्यासाठी शुभेच्छा
शब्द अपुरे, तरी तीव्र इच्छा...

आपल्या वैद्यकीय सरावाच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

- बाजी सुधीर दारूवाले, मुंबई

## या सम हाच !

पूजनीय श्री. बाबा यांस, सौ. अश्विनी युवराज सुरवाडे हिचा साष्टांग नमस्कार! तो आपण स्वीकारावा ही क्षुल्लक अपेक्षा! (इच्छा)! आपल्या कृपाशीर्वादाने सर्वकाही क्षेमकुशल आहे आणि ते असेच टिकण्यासाठी आपली कृपादृष्टी आम्हावर अशीच टिकून राहावी ही इच्छा! खरं तर, बाबा, मी आपणास फक्त दोन वेळेस भेटले आहे. पण, त्यादरम्यान मी आपणास जे अनुभवलं ते शब्दात सांगण्यासाठी मी आपणासमोर फार लहान आहे किंवा माझ्याजवळ त्यासाठी शब्दच नाहीत, तर मी अभिप्राय कसा व कोणत्या शब्दांत व्यक्त करू? बाबा, आपल्या कृपेने मला सर्वोत्तम असे सौभाग्य लाभले आहे. ते असेच अखंड टिकावे अशी श्रीचरणी विनंती आणि या तुच्छ, मूर्ख देहाकडून अखंड श्रीसेवा आणि उत्तोमत्तम संसारप्रपंच घडावा व टिकावा या करता सामर्थ्य व वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करावे, ही विनंती.

बाबा, आपणाबद्दल काय बोलावे? माझ्या अनुभवांपेक्षा आपणाबद्दल जे काही मी ऐकून आहे त्यातून तरी मी माझ्या तोकड्या शब्दांत एवढंच सांगू शकते "आहेत बहु होतील बहु पण या सम हाच!" आपल्या यश-किर्तीबद्दल कौतुक करण्यासही हा देह तुच्छ आहे असे वाटते, असो.

आपली कृपादृष्टी आमच्यावर अशीच टिकून राहावी, अशी अपेक्षा.

- अश्विनी सुरवाडे

## बाबा म्हणजे परिस

२५ वर्षांपासून सातत्याने न बोलता (अबोली) साधू-संतांची, जनसामान्यांची, दीनदुबळ्यांची हृदयाच्या अंतःकरणातून आपल्या सर्वस्व त्यागातून कसलीही अभिलाषा न बाळगता फक्त सर्वांचे स्वास्थ्य हे निरोगी राहो हेच आपले सत्कर्म, हीच आपली जनसेवा हे ब्रीद वाक्य जोपासणारे आम्हा सर्वांना आपलेसे वाटणारे डॉक्टर म्हणजेच 'बाबा'

- दीपक संघवी व परिवार

## कुजबुज हितचिंतकांची...



## त्वमेव माता, पिता त्वमेव, त्वमेव बंधु, सखा त्वमेव

२२ वर्षांपूर्वी मी ॲलर्जीक अस्थमा यासारख्या दुर्धर आजाराने त्रस्त होते. मला सगळ्याच डॉक्टरांनी २२ वर्षांपूर्वी सांगितले होते की हा त्रास वयोमानाप्रमाणे वाढणार. जवळजवळ १९ वर्षांपूर्वी माझी डॉक्टरसाहेबांशी पेशंट म्हणून भेट झाली.

आज मी संपूर्ण रोगमुक्त आहे. कुठल्याही सिझनमध्ये काहीही खाल्ले तरी मला काहीचाही त्रास होत नाही. हे खरोखरच आश्चर्य आहे. यासाठी मी देवाचे उपकार मानते की ज्याने मला अशा महामानवाच्या संपर्कात आणले. हा चमत्कार असेल का? मला वाटतं धन्वंतरी, लक्ष्मी, सरस्वती या तिघांनी डॉक्टरांच्या हातावर यशाची हळुवार फुंकर घातली आहे. विद्वत्ता, विक्रम, वैराग्य इथे एकाच वेळी नांदत आहेत. जसे परीसाने लोखंडाचे सोने करावे, तसे डॉक्टरसाहेबांचे आहे. जी केस त्यांच्या हातात गेली तिचे सोने झालेच समजा. यामागे डॉक्टरसाहेबांचा अथक अभ्यास आहे. परफेक्ट डायग्नोसीस आहे. कोणीतरी म्हटलेच आहे, प्रॅक्टीस मेक्स मॅन परफेक्ट. तो प्रत्यय इथे येतो.

प्रत्येक पेशंटशी ते एकरूप होतात. परंतु ते बोलण्यात ललोपत्या करू शकत नाही. अतिशय परखड व कडक शब्दांत समज देतात. कारण त्यांची सगळ्या पेशंटवर आईसारखी माया आहे. जी दिसत नाही, अनुभवावी लागते. माझ्या तिन्हीही मुलांना माझ्या रोगासारखा त्रास होणार नाही हे त्यांनी मूल होण्याआधीच सांगितले होते.

पैसा प्रत्येकाला हवा असतो. पण डॉक्टरांनी कधीही पैशाला माणुसकीपेक्षा जास्त महत्त्व दिले नाही. याचे उदाहरण द्यायचे तर प्रत्येक पेशंटला विचारा, उत्तर हेच मिळेल. आम्हाला सार्थ अभिमान आहे की, परमेश्वराने आम्हाला एक खरा डॉक्टर, एक खरा मित्र, एक खरा मार्गदर्शक व एक खरा गुरू एकाच माणसात दिला आहे. आमचे आप्त यांच्यापासून सुरू होऊन यांच्यावरच संपतात.

*पिंजरा गुंफला आम्ही आपुल्या भवती, तोडून जगातील हळवी नाती-गोती.*
*जग बघते आम्हा हसतांना रडतांना, जगविते आम्हाला केवळ तुमची प्रीती.*

- सौ. मानसी शाह, जळगांव

## 'मसीहा'

डॉ. सुनिलदत्त चौधरी आप इसके पर्यायवाचक हैं। मसीहा अर्थात दुसरों के कष्टोंको दूर करनेवाले। आप आज जलगांव के नामवंत होमिओपॅथी तज्ञ हो। छोटी से छोटी बिमारी हो या कोई असाध्य रोग से ग्रस्त, आपने उसका हौसला बढाते हुए उसका कष्ट निवारण किया है। आपने कभी भी मरीजों से शुल्क पाने के हेतू से कोई काम नहीं किया। आपका उद्देश मात्र इन्सानीयत के नियमों का पालन कर आपने मरीजों की देखभाल करना है व आप इसे अपना परमधर्म मानते हैं।

- सौ. संतोष कैलास अग्रवाल

Successful people do not plan results, they just plan the right beginings,
right results always flollow right beginings.

You have never treated us just as a patient; you have always been our guardian. It is proved in many situations & many ways. Your service towards patients is 'as smooth as velvet'. You treat them so softly & gently that they too are unaware about it; & they are out of their pains & troubles.

The returns we get from you are so precious that it cannot be expresses or valued in any words & are exceptional.

**Fortune Favour The Brave**

**साहसे श्रीः प्रतिवसति**

- Madhusudan Vadnerkar

## अष्टपैलू व्यक्तिमत्त्व...

आमची पंचवीशी असं म्हटलं की आम्हाला आमचा ऐन तरुणाईचा काळ आठवतो. ज्या काळात आम्ही सप्तश्रृंगी गडावर भगवतीच्या सेवेला सुरुवात केली पण आमच्या या सगळ्या गडाच्या विकासात्मक संघर्षमय प्रवासात हक्काची साथ लाभली ती डॉ. सुनिलदत्त चौधरी यांची. मला हे व्यक्तिमत्त्व अगदी अष्टपैलू वाटतं. कारण डॉक्टरांकडे कोणत्याही बाजूने पाहिलं तरी त्यांचा प्रत्येक वेळी वेगळा पैलू मला नेहमीच दिसला. अगदीच आठवणींना उजाळा द्यायचा झाल्यास गडावरील गणपती मंदिराचा सभामंडप बांधायचा होता. बऱ्याच भाविकांनी शब्दही दिला की हे काम आम्ही करून देऊ. पण प्रत्यक्षात ते काम काही मार्गी लागेना. पण एके दिवशी डॉक्टर थेट आर्किटेक्टचा प्लॅन घेऊनच माझ्यासमोर हजर झाले आणि आता कामाला सुरुवात करूयात असं म्हणून ते काम पूर्णही झालं. अशी ही डॉक्टरांची अतुलनीय जिद्द. हीच जिद्द वयाच्या या वाटेवर सात दिवसांत डॉक्टरांना कन्याकुमारी ते लेहपर्यंत घेऊन गेली. त्यातून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्यांची नोंद झाली.

आतापर्यंत गडावरील बऱ्याच कामामध्ये डॉक्टरांचं सहकार्य लाभलं पण हे करत असतांना माझं नाव पुढे येऊ द्या अशी अपेक्षा त्यांनी कधीही व्यक्त केली नाही. निस्सीम भक्तीचं उदाहरण म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरी असं मला म्हणावसं वाटतं. त्यांच्यातील निःस्वार्थीपणामुळे त्यांनी आतापर्यंत समाजसेवाही केली. होमिओपॅथीसारख्या संयमी क्षेत्रात वैद्यकीय सेवा करता-करता पंचवीस वर्ष पूर्ण केलीत. 'डॉक्टर' आता खऱ्या अर्थाने आपल्याला म्हणावसं वाटतं कि आपण आता आपल्या सेवेने तरुणाईत आला आहात. त्यामुळे या पुढची आपली झेप ही गरुडासारखी असेल. आपली पंचविशी सुरू झाली आहे. त्यामुळे आणखीन नवीन विक्रम नोंदवले जातील. बहुतांशी गोरगरिबांना मदत मिळेल. आपल्या औषधी उपचाराने अजून बऱ्याच रुग्णांची व्याधी दूर होईल, यात तिळमात्र शंका नाही. पण याकरता आवश्यक असणारी ऊर्जा भगवती आपल्याला देवो अशीच प्रार्थना आम्ही तिच्या चरणी व्यक्त करतो. आपल्याबद्दल आणि आपण केलेल्या कार्याविषयी सांगण्यासारखं बरंच काही आहे, पण आपल्या नवीन सुरुवातीकरता असंच म्हणेन, शब्द समजून घ्या शब्द उमजून द्या, हवा तेवढा केव्हाही, निःशब्द शब्दाला मान द्या.

- **सुरेश निकम**, सप्तश्रृंगी गड

## डॉक्टर, वडील कि देव ?

डॉक्टरांची व आम्हा सर्व कुटुंबियांची ओळख उणी-पुरी तीन-साडेतीन वर्षांचीच. पण एवढ्या कमी वेळात आमच्या कुटुंबातील प्रत्येकाचे डॉक्टरांसोबत जमलेले भावबंध हे जणू जन्मोजन्मीचे आहे असे प्रत्येक भेटीत वाटत राहते.

तीन-साडेतीन वर्षांपूर्वी माझे अपघातामुळे दोन ऑपरेशन्स् झाले होते. हाता-पायांमध्ये इम्प्लॅन्टस् होते. त्यातच माझे वडील डॉ. आर. बी. चौधरी (नशिराबादकर) यांचे निधन झाले. पप्पा नसल्यामुळे मी जळगावात कोणत्याच दवाखान्यात जात नव्हते. परंतु श्री. नितीन महाजन व सौ. सुषमा या दांपत्याने जिद्द करून पुढाकार घेऊन डॉक्टरांकडे तपासणीस आणले व या पहिल्या भेटीमध्येच माझे सर्व दुखणे दूर झाल्याचा तसेच जणू वडीलच परत भेटल्याचा आनंद मिळाला, तो आजपर्यंत कायम आहे. नंतर सर्व कुटुंबीय/नातेवाईक डॉक्टरांची ट्रीटमेंट घेऊ लागले.

अशा माझ्यासारख्या हजारो रुणांची रुग्णसेवा करणा-या, त्यांना शारीरिक व्याधी मुक्ततेबरोबरच मानसिकदृष्ट्या सक्षम होण्याचे आयुष्य देवो व त्यांच्या हातून ही रुग्णसेवा अशीच चालू राहो, हेच प्रभुचरणी मागणे आहे.
तसेच प्रकाशित होणा-या स्मरणिकेस आम्हा चौधरी कुटुंबाच्या लाख-लाख शुभेच्छा!

- सौ. पूनम जगदीश चौधरी

## एक दिशा दर्शक

डॉक्टर बाबा, आपके बारे में तथा जलगांव शहर में आपका बहुत नाम सुना था। लेकिन कभी आपसे मिलने का सौभाग्य नहीं प्राप्त हुआ था। जब मेरी लडकी प्रणाली का इलाज कराने के लिए हम आपके पास आए तो मुझे ऐसा लगा की अब मै सही जगह पर पहूँच गया हूँ। आपने प्रणाली को पहली बार जब देखा तो आपने तुरंत बताया, की लडकी को बाल दमा है। जो की हमें कोई डॉक्टर ने नहीं बताया था। और फिर आपकी दवाई से आपके आशीर्वाद से प्रणाली ठीक होने लगी। तब से आज तक प्रणाली को कोई भी तकलीफ होती है, तो हमारे मुँह में से एक ही नाम निकलता है कि डॉक्टर बाबा के पास जाकर आते हैं। और क्या पता

दवाखाने में आकर आपकी दवाई मिलने के बाद बीमारी गायब हो जाती है। आपने मेरी बीवी को अपनी लडकी और मुझे जवाई कहा तो मुझे बहुत खुशी हुई। उस दिन के बाद आपने कई रिश्तों में बाँध दिया। मुझे और गणेश बारी को आपने साडू बना दिया।

आपने मुझे बीच के दौरान मिलने से मना किया था। मेरी कुछ गलती की वजह से और गलती सुधारने कहाँ। तब मुझे बहुत बुरा लगा की बाबाने अपने से मिलने से मना किया है। लेकिन जो होता है वो अच्छे के लिए होता है। वो दिन है और आज का दिन है। मैने मेरी गलतीया सुधारकर आपसे मिलने के बाद मुझे अच्छा लगने लगा। और आपने मुझे जो कुछ मेरी जिंदगी के बारे में बताया, तो मै उस दिन से बहुत मेहनत करने लगा और बहुत मेहनत करना चाहता हूँ। आपने मुझे अपना समझकर अबोली प्रतिष्ठान का काम करने का मौका दिया। लेकीन कुछ वजह से काम वक्त पर न होने से आप कभी डाँटते हैं तो बहुत डर लगता है की आज कुछ सच्चा नहीं हैं। लेकीन आपने मुझे जो काम दिया है वो मेरे से पूरा हो यह मेरी बहुत इच्छा है। और वो जल्द से जल्द पूरा होगा ऐसा मुझे लग रहा है।

आपके साथ बाहरगाँव जब ट्रीप पर जाने का मौका मिलता है तो बहुत अच्छा लगता है। मुझे जिंदगी की सही राह आपने बताई है। क्या करना चाहिए और क्या नहीं अब मैं जान गया हूँ। आज मै जिस जगह पर खडा हूँ वो सिर्फ आपकी वजह से अगर आपका साथ और आशीर्वाद नही मिला रहता तो आपका जावई (कांडेश्वर) रोशन पगारिया कहीं ओर पडा रहता था। लेकीन आपने मुझे बचाया है। मेरी गलतियों को माफ किया है। इससे बडी बात मेरे लिए क्या हो सकती है? अगर मुझे किसका डर लगता है तो सिर्फ आपका, की बाबा को पता चला तो अपना क्या होगा? आपका डर हमारे मन में ऐसा ही रहे ताकि हम गलती कर ना पाएं। और आपके बारे में लिखने के लिए तो बहुत कुछ है। पर शब्द ही कम पड रहे हैं।

आपका आशीर्वाद आपके कांडेश्वर पर ऐसा ही बना रहे, यही प्रार्थना मै करता हूँ।

आपका कांडेश्वर (जवाई)
रोशन पगारिया

## दिव्य अनुभूति

*R*espected Baba, मै शिल्पा आपके बारे में अभिप्राय दू इतनी बडी सोच तो नहीं है मेरी। लेकीन कुछ ३ साल के आपके हमारे साथ हुए एक्सपेरियन्स के बारे में लिखने की कोशिश कर रही हूँ।

प्रणाली जब २ साल की थी तब हमने उसकी तबीयत के बारे में तीन डॉक्टर्स से कन्सल्ट किया। लेकीन कुछ फर्क पडता दिखाई नहीं दिया। फिर मेरे जेठजी (निलेश पगारिया) ने हमें आपके बारे में बताया। पहले तो फर्स्ट टाईम दवाखाने में आकर मुझे कुछ पॉझिटीव्ह महसूस नहीं हुआ। मेरे दिमाग में ऐसा की होमिओपॅथी बहुत स्लो प्रोसिजर है। टू बी व्हेरी फ्रँक... शुरू-शुरू में कुछ असर नहीं हुआ। लेकीन २ महिने बाद होमिओपॅथी और आपके बारे में सोचने का मेरा नजरिया ही चेंज हो गया। प्रणाली की हालत सुधारने लगी थी। फिर धीरे-धीरे दवाखाना कम घर का माहौल जैसा लगने लगा और फिर आपने मुझे अपनी बेटी का दर्जा दिया। ये सुनकर तो मै फुले नहीं समाई। इसलिए शायद तब से मेरा वजन बढने लगा।

आपके लिए मेरे मन में जो इज्जत है शायद मेरे पापा से भी बढकर है। आपने मुझे और मेरे पती को सही ॲडव्हाईस दी है। जिससे मेरी और मेरे पति की लाईफ काफी चेंज और स्ट्रॉंग हो गई हैं। आपके सामने बैठकर कुछ बाते शेअर कर मन काफी हल्का हो जाता है। आपका साथ हमें जबसे मिला तब से मुझे और मेरे पति को काफी प्रोटेक्टिव्ह-सा महसूस होता है। ऐसा लगता है कि किसी बहुत बडे इन्सान का हाथ हमारे सर पर है। (हमारे माता-पिता के अलावा) जो हमारे बारे में कभी गलत नहीं सोच सकते हैं। पर गलती करने पर हमारी बँड बजा सकते हैं। हमें हक्क से डाँट सकते है। और सजा भी दे सकते हैं।

आपके साथ ट्रॅव्हलिंग का एक्सपेरियन्स भी बहोत अच्छा रहा। खासकर तिरूपती बालाजी का, जो कभी भूल नहीं सकती। आपकी हम सब के बारे में सिमिलर सोच है। जहाँ कोई भेदभाव नहीं। ये सब बाते ही आपको बडा बना देती है। जैसे एक्स्ट्रा ऑर्डनरी आदमी के बारे में ये सब बातें सोच-समझकर नहीं लिख रही हूँ। मेरे मन में जो आया वही मैने लिखा है। कई गलती हो गई हो तो

बेटी समझकर माफ कर दीजिएगा। आपका आशीर्वाद हम पर ऐसे ही बना रहे, जिससे हमें काफी शक्ती मिलती है। हमारी सोच काफी पॉझिटीव्ह हो जाती है, जिसकी हमें आज के दौर में बहुत जरूरी है। और आप हमसे कभी नाराज ना रहे और आपके हाथों से हमारे जैसे लोगों का कल्याण हो। यही मनोकामना भगवान से करती हूँ।

**A small para from Roshan, Shilpa & Pranali...**

Baba is someone wonderful, someone who is always there to give the help and confidence and share the joys and take care of us. Baba gives inspiration with words or just a smile. Baba is someone just like seven colours of Rainbow who makes your life more colourful and Joyful.

- Shilpa Roshan Pagariya


## कर्मयोगी - धर्मयोगी

मा. डॉ. सुनिलदत्तजी चौधरी सो. यांना साष्टांग दंडवत. माझ्या अल्प बुद्धीनुसार आपल्या प्रती दोन शब्द भक्ती सुमने अत्यंत सेवाभावाने सादर केलेले आहेत. त्यांत काही चुकी झाली असल्यास कृपया मला उदार अंतःकरणाने माफ करावे, ही विनंती.

कर्मावर निष्ठा ठेवून व्यावसायिक मूल्यांची जोपासना करताना निस्सीम सेवाभाव मनात ठेवून रूग्णसेवा, समाजसेवा करणारे कर्मयोगी सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रयोगशीलतेतून असाध्यतेवर मात करण्याची ईश्वरीय देणगी प्राप्त असलेले कर्मयोगी, धर्मयोगी, विश्वासु, सहृदयी, माणुसकी जपणारे, न बोलता समाजसेवा करणारे, सामाजिक बांधिलकी जपणारे, रुग्णासाठी पृथ्वीवरील आराध्य दैवत. आपल्याप्रती कृतज्ञतेची आणि नितांत आदराची दोन शब्दसुमने सादर.

आपला नम्र सेवक... र. भि. बडगुजर

## कुजबुज हितचिंतकांची...



## अबोल धन्वंतरी

सदैव स्मरणीय बाबा,       बाबांविषयी काही लिहिणे म्हणजे समुद्रातून थोडे पाणी काढण्यासारखेच !
डॉक्टरसाहेबांनी गेल्या इतक्या वर्षांत पैसे कमविले नाहीत, तर आपल्यासारख्या हजारो लोकांचे पैसे वाचवलेत व ऑपरेशन न करता इलाज केल्यामुळे आपल्या शरीरालाही सांभाळले जे आज बाहेर कुठेही पाहायला मिळत नाही. बाबांनी जे काही कमवले ते इतरांच्या कल्याणासाठीच !

आपले डॉक्टरसाहेब म्हणजे...

| | | |
|---|---|---|
| रामयुगातील | - | श्रीराम |
| कृष्णकाळातील | - | श्रीकृष्ण |
| शिवकालीन | - | छत्रपती शिवाजी महाराज |
| संत काळातील | - | संत रामदास स्वामी |
| व आजचे | - | 'धन्वंतरी'च |

डॉक्टरसाहेबांच्या दीर्घायुष्यासाठी समर्थचरणी प्रार्थना व त्यांच्या रौप्य महोत्सवी स्मरणिकेसाठी खूप-खूप शुभेच्छा!

*(अनवधानाने यातील काही शब्द किंवा भाषाप्रयोग कमी-अधिक असल्यास कृपया क्षमा असावी.)*

- प्रकाश राजपूत, जळगांव

# एक दैवी आशिर्वाद

डॉ. सुनिलदत्त चौधरी (बाबा) सो. बाबत लिहिण्यास सुरुवात केली, परंतु त्यांच्याबद्दल लिहिणे म्हणजे सूर्याला दिवा दाखविणे. बाबांनी सूचना केली असता त्यांच्याबद्दल मी लिहित आहे. या लिखाणात काही चुका झाल्यास मी बाबांची मनःपूर्वक माफी मागतो.

सर्वांना एक अनाकलनीय व्यक्तिमत्त्व वाटत असलेले, त्यांच्या भोवतालचे गूढ तेजोवलय त्यांना पेशंटबद्दलची कळकळ, सदैव एक ध्यास पेशंट लवकरात लवकर बरे करण्याची एक दैवी शक्ती आणि त्यांनी दिलेली औषधी पेशंटचा त्यांच्याबद्दल असलेला विश्वास या गोष्टी पेशंटला बऱ्या करीत असतात.

श्री. पप्पू लुंकड व श्री. मिनेश शहा हे माझे मित्र बाबांच्या सानिध्यात नेहमी राहणारे. त्यांच्यामुळे त्यांच्या जवळ आल्याचा आणि सान्निध्यात राहण्याचा योग नाशिक सप्तश्रृंगी गडावर आला. अर्थात त्यासाठी बाबांची परवानगी मिळाल्यावर माझ्या मते दोन दिवस तेथे राहून परत जळगांवी येऊ अशी इच्छा मनात ठेवून मी गेलो. परंतु तिथे गेल्यानंतर तिथे जे काही अनुभवले ते शब्दांत वर्णन करू शकत नाही. मी तेथून तब्बल सात दिवसांनी घरी आलो. त्यांनी माझ्याकडून जे करवून घेतले ते मी आयुष्यभर विसरू शकत नाही. माझ्या ते स्वप्नातदेखील येणार नाही. अर्थात सर्वकाही बाबा आणि माझे काम हलवायाच्या घरावर तुळशीपत्र!

माझ्या मुलाच्या पायात कुरूप झाले होते. सर्व तज्ञ डॉक्टरांकडून औषधोपचार करून पाहिला. नंतर त्यांनी सांगितले की ऑपरेशन करून कुरूप काढावे लागतील. या सर्व सोपस्कारात सहा ते सात महिने निघून गेले. शेवटी ऑपरेशन करून कुरूप काढायचे हे नक्की झाले. परंतु माझा लहान भाऊ विजय वर्मा जो बाबांकडून नियमीत औषधोपचार घ्यायचा. त्याने सांगितले एकदा बाबांना दाखवून नंतर काय ते ठरवू. त्यानुसार त्याला बाबांना दाखविले. बाबांनी सात दिवसांचे औषध दिले आणि आश्चर्य! कुरूप नाहिसे होऊन तळपाय एकदम चांगले झाले. असे माझा कुटुंबाला आणि नातेवाईकांना बरेच अनुभव आलेले आहेत. सर्व अनुभव लिहिले असता एक संपूर्ण कादंबरी तयार होईल.

त्यांच्यासोबत यात्रा करण्याचा एक अविस्मरणीय योग. ज्याला सुवर्ण मणीकांचन योग असे म्हणणे योग्य ठरेल. त्यावेळी असे वाटले

की आपल्या दोन बोटे स्वर्ग राहिला. त्यावेळी त्यांची प्रत्येक वेळी पाहिलेली रूपे आठवून सर्व रोमांचित होतात.

अबोली प्रतिष्ठानचे ते संस्थापक, परंतु जसे अबोलीचे ब्रीदवाक्य जनसेवा न बोलता तसेच त्यांनी स्वतःचे नांव कुठेही नमूद केले नाही. त्यांचे कार्य आज अबाधित चालू आहे आणि ते उत्तरोत्तर चालू राहो आणि त्यांची सर्व कार्य निर्विघ्न होत राहोत अशी प्रभू चरणी प्रार्थना. आदरणीय बाबा म्हणजे मूर्तीमंत साक्षेप (हा शब्द बाबांचे गुरू श्री. डॉ. सो. अनिल गांधी यांची आत्मकथा मनसर्जना या पुस्तकातून घेतला आहे.) साक्षेप हा शब्द श्री समर्थ रामदासांचा. त्याचा अर्थ निरलस दीर्घोद्योगी, अखंड परिश्रम.

या गोष्टी आदरणीय बाबांना तंतोतंत लागू पडतात. कारण सकाळी १० वाजेपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत, नंतर सायंकाळी ६ वाजेपासून जोपर्यंत पेशंटनी दवाखाना भरलेला आहे, म्हणजे रात्री १२ ते १ वाजेपर्यंत अखंड सेवा न खाता-पिता मी नेहमी पाहिलेली आहे. तिथे येणाऱ्या प्रत्येक पेशंटला असे वाटते की, आपण दवाखान्यात नाही कोणत्यातरी मंदिरात आलो आहोत. अशी भावना आणि श्रद्धा पाहावयास मिळते.

मी हा अभिप्राय बाबांच्या दवाखान्याच्या नोटीस बोर्डावरील सूचनेनुसार लिहित आहे. लिहिण्यास बरेच काही आहे, परंतु शब्द अपूर्ण पडतात. लिहिण्यास घेतलेला कागद अपूर्ण पडतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी स्वतः अपूर्ण पडतो...

- राजेंद्र वर्मा व परिवार

## अद्‌भुत, अतुलनिय बाबा

आदरणीय बाबा, आपण वेळोवेळी आम्हाला जी अनुभूती देतात त्याचे शब्दांत रूपांतर करणे या जन्मी तरी शक्य नाही. परंतु ईश्वरचरणी मागणी करतो की पुढील जन्मी मला ईश्वर एवढी शक्ती देवो की आमच्या बाबांबद्दल दोन शब्द लिहिता येतील.

- कमलाकर

## तिन्ही भूमंडळी असा कोण आहे?

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु। गुरुर्देवो महेश्वरः।।
गुरुः साक्षात् परब्रह्म। तस्मै श्री गुरवे नमः।।

या अभिप्रायाची सुरुवात मी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांना गुरूंच्या स्थानी ठेवून करते. कारण जीवनात सुखात आणि दुःखात मार्गदर्शन करणारे गुरूच असतात. उन्हातदेखील आम्रवृक्ष बनून सर्वांना सावली देणारे असे गुरू. आमच्या जीवनातील खूप कठीण अशा प्रसंगी जिथं जीवन-मृत्युच्या लढाईत झुंज देत असणाऱ्या दोन वर्षीय चि. कृष्णास परत आणणारे आमचे बाबा (गुरू डॉ. सुनिलदत्त चौधरी).

दि. ०८/१०/२००६ या दिवशी प्रसंग बिकट होता. माझा मुलगा चि. कृष्णा हा अवघ्या एक वर्षांचा असताना त्याला डबल न्युमोनिआ झालेला होता. त्याला आम्ही जनरल सर्जनकडे नेले, तेव्हा त्यांनी आमची केस घेतली नाही. त्याच दिवशी आम्ही जळगांवमधील चार ते पाच मोठे दवाखाने फिरलो. पण त्यांनीदेखील आमची केस घेतली नाही. शेवटी आम्ही निराश होऊन संध्याकाळी घरी परत आलो, तेव्हा आम्हाला एक व्यक्ती भेटली जे बाबांना खूप-खूप मानतात. ते म्हणजे सुनिलभाई गुजराथी भेटले. त्यानी बाळाला पाहिले आणि ७ वाजता स्वतः त्यांनी तेथे नंबर लावला. माझा विश्वास बसत नव्हता की हा मुलगा वाचेल. जेव्हा आम्ही दवाखान्यात गेलो, तेव्हा आम्हाला भाऊने विश्वासाने सांगितले की बाळ लवकरच बरे होईल. रात्री ८.३० वाजेनंतर आमचा नंबर लागला. बाबांजवळ (डॉक्टरांजवळ) केबीनमध्ये गेलो. बाबांनी त्याचे निरीक्षण केले. आम्हाला होमिओपॅथीचे ८ दिवसांच्या गोळ्या दिल्या. त्यात पहिलाच डोस दिला आशिर्वादाच्यारूपाने बरा होण्याचा. कारण आम्हाला सर्व डॉक्टरांनी एकच सांगितले होते कि निमोनिआमध्ये लगेच ताप उतरविला जात नाही. एकच दिवसात इंजेक्शन्स देवून ताप उतरत नाही. मात्र सुनिलदत्त चौधरींनी पहिला डोस केबीनमध्ये दिला. दुसऱ्या दिवशीच्या २-२ तासांनी दिल्या जाणाऱ्या गोळ्या दिल्या आणि सांगितले की काहीच नाही. उद्यापर्यंत ताप उतरेल. आणि खरंच! त्याचा ताप हळुहळू कमी झाला. आणि फक्त तीन दिवसांत जी केस हातात येणारी नव्हती ती केस त्यांच्या रात्रंदिवस केलेल्या अभ्यासाच्या

मदतीने, आत्मविश्वासाने परत आली. डॉक्टरांनी होमिओपॅथीने कृष्णाला लवकरच बरे केले. खरं सांगते माझासुद्धा या औषधांवर विश्वास नव्हता. साबुदाण्याच्या गोळ्यांनी गुण लागत नाही. परंतु मी तर म्हणते ॲलोपॅथीपेक्षा कुठल्याही प्रकारची इजा न होता होमिओपॅथीनेसुद्धा चांगलाच गुण येतो.

पुन्हा दि. १३ ऑक्टोबर २००७ रोजी डॉक्टर बाहेरगावी गेले असता, त्याला परत डबल न्युमोनिआ झाला. आमच्या आर्थिक अडचणींमुळे त्याला आम्ही मध्यंतरी बाबांकडे नेऊ शकलो नाही. डॉक्टरसाहेब बाहेरगावी गेलेले. अशा परिस्थितीत आम्हाला कृष्णाला चिरायू हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करावे लागले. तरी या आठ दिवसांतील रिपोर्ट डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याकडे जमा होत होते. ते जरी जळगांवमध्ये नव्हते तरी त्यांची आपल्या पेशंटवर नजर होती. आम्ही त्याला कोणत्याही प्रकारचा कंटाळा न करता डॉक्टरांकडे (बाबांकडे) घेऊन जातो. जर त्यांना बाहेरगावी जायचे असेल तर ते त्या काळात औषधी देऊन जातात.

त्या माऊलीने एका नजरेने जरी कुठल्याही पेशंटला पाहिले तरी तो पेशंट त्यांच्या ट्रीटमेंटने बरा झालाच पाहिजे, एवढा विश्वास आमच्या डॉक्टरांवर आहे. डॉक्टरांचे या पेशाव्यतिरिक्तचे त्यांच्या आयुष्यातील यश हे प्रत्येक खडतर ठिकाणी आत्मशक्तीने यशाचे शिखर गाठत आहे. आपले गुरू आपल्याला मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्याकडून जिद्द, चिकाटी आणि मन लावून सेवा करण्याची वृत्ती हे गुण त्यांच्यात आहेत. त्यांनी इतरांचासुद्धा विचार करूनच गरिबांनासुद्धा परवडेल अशीच फी ते घेत असतात. सर्वांपेक्षा खर्चाने कमी व गुण जास्त अशी गुणकारी होमिओपॅथी औषधी आहे.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।

- सौ. उज्वला प्रकाश भामरे, मेहरुण

## कुजबुज हितचिंतकांची...



## डॉ. नव्हे एक अमृतच

*आपुलिया हिता जो असे जागता*
*धन्य माता पिता तयाचिया*
*कुळी कन्या पुत्र होती जे सात्त्विक*
*तयाचा हरीक वाटे देवा*
*तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा*
*तरी माझ्या दैवा पार नाही*

अशा अमूल्य हि-याला जन्म देणा-या माता-पित्याच्या चरणी कोटी-कोटी नमस्कार.

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याबद्दल दोन ओळी लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे. खरे तर शब्द सुचत नाही. असे अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे आमचे डॉक्टर प्रथमदर्शनी वज्रासारखे कठोर वाटणारे परंतु लोण्यासारखे मऊ हृदयाचे. खरे तर दवाखाना व डॉक्टर म्हटल्यानंतर एक वेगळे चित्र डोळ्यासमोर निर्माण होते, परंतु इथे येणारा प्रत्येक पेशंट त्यांच्या केबीनमधून हसतमुखाने बाहेर पडत असतो. जणू काही जगण्याचे अमृत घेऊनच.

प्रत्येक पेशंटशी जगावेगळी नाते निर्माण करणारे देवरूपी डॉक्टरांच्या चरणी महाजन परिवाराच्या श्रद्धासुमने अर्पण.

- सौ. सुषमा नितीन महाजन

## सेवा, समर्पण, समाधान

'डॉ. सुनिलदत्त चौधरी' सब आपको इस नाम से जानते है और कुछ लोग आपको 'बाबा' के नाम से जानते हैं। आपको होमिओपॅथी का ज्ञान हैं और पिछले २५ सालों से आप इस ज्ञान के माध्यम से कई लोगों की बिमारीयाँ और तकलिफें दूर करते आ रहे हैं। आपके इसी ज्ञान के कारन कई लोगों की बिमारीयाँ ठीक हो चुकी हैं और लोग आपके आभारी हैं। मेरी बहन का अपेंडिक्स् का ऑपरेशन सिर्फ आपके बदोलत टला है। जहाँ दूसरे डॉक्टर ऑपरेशन के लिए कहते है वहाँ आपकी दवाई और आशीर्वाद के कारन ऑपरेशन टल जाते हैं।

आपने कभी गरीब और अमीर में फर्क नहीं किया और हमेशा उनकी मदत की हैं। आप केवल बहुत अच्छे डॉक्टर ही नहीं बल्की एक अच्छे इन्सान और भगवान के भक्त भी हैं। आपको भगवान का आशीर्वाद और देन है। जिसकी मदत से आप दुसरों की तकलिफे कम करने का प्रयास करते हैं। इन २५ सालों में आपने कभी भी कोई काम खुद के लिए पैसे कमाने के लिए नहीं किया। आप हमेशा 'जनसेवा न बोलता' में विश्वास रखते हैं।

आपके कारन मेरी बहन आज एक बहुत अच्छे कॉलेज में टॉप कर सकी हैं। आपके कारन मुझे बहुत अच्छे शिक्षक (नेवे सर) के द्वारा ज्ञान प्राप्त करने का मौका मिला है। आपके कई उपकार है। हमारे दिल में आपके लिए जितना प्यार, सम्मान और इज्जत हैं वह कभी शब्दों में बयान नहीं कर सकते हैं। मैंने यह एक छोटी-सी कोशिश की है। आपका आशीर्वाद हमपर हमेशा बनाए रखना।

- अंजली सुरेशकुमार पंजाबी

## .............. चा आहेर

'येडा' डॉक्टर! सर्वांना लावले वेड!
फटकळ शब्द ऐकण्यासाठी आवारात
ताटकळत बसतात किती वेळ
असू दे काही, पण गुण येतो जबरदस्त
अचूक निदान अ-भ्रष्ट औषधी
दैवाचा वरदहस्त डॉ. सुनिलदत्त

शब्द कधी फटकळ कधी कॉमेडी
समजते पण उमजत नाही शब्दातील कोडी
मेलेडी खाओ खूद...

चक्रमने केले जागतिक विक्रम
होमिओपॅथीत तर किती मोडले विक्रम
'कन्याकुमारी' ते 'लेह' नॉनस्टॉप भरारी
'लेहू' धन्य झाली, ठेचा न् कैन्याची भाकरी !
'विक्षिप्त' वेधतो सर्वांचे चित्त

लोककल्याणासाठी झिजते काया आणि वित्त
प्रभावाने विस्मित, झाले काही चकीत
काही तर बनले भक्त

उत्तुंग व्यक्तिमत्त्व, ज्यातून झिरपते दिव्यतत्व!
आचरणातून प्रकटते सत्व
असे महत् अधिष्ठान
'बाबा' बनले प्रतिष्ठान

न बोलता सेवा अबोलीची
अमृत बोल बोलून गेली
जिवाला बोल लावून गेली

- प्रकाश किरण

## सेवा महर्षी

नमस्कार डॉक्टरसाहेब, तुम्हाला नोव्हेंबर २०१० ला होमिआपॅथीक तज्ञ व्हायला २५ वर्षे होत आहेत. हे तुम्ही पेशंटमार्फत जाणून घेत आहात हे एक विशेष आहे. तरीही मी माझ्या ५ ते ६ वर्षांच्या अनुभवानुसार तुम्ही 'रुग्णसेवा करून पैसे कमवता व काही पैसा हा समाजसेवेसाठी वापरता. समाजसेवेला तुम्ही ईश्वराची कृपा समजतात.

**रुग्णसेवा :** तुम्ही प्रत्येक रुग्णाचे अचूक निदान करून त्याचा आजार पूर्णपणे बरे करता. हीच एक रुग्णसेवा आहे असं मला वाटतं.

**पैसा :** पैसा प्रत्येक व्यक्ती कमवते, ते तुम्हीही करतात. पण त्यातला काही पैसा हा गोरगरिबांसाठी वापरता व काही सामाजिक कार्यातसुद्धा.

**समाजसेवा :** तुम्ही अबोली प्रतिष्ठानामार्फत गरजू विद्यार्थ्यांना राहण्यासाठी म्हणा किंवा अभ्यासासाठी खोली केली किंवा शेंदुर्णीचे त्रिविक्रम मंदिर बांधण्यासाठी मदत करतात किंवा मंदिर बांधत आहात ही एक समाजसेवाच आहे.

**ईश्वराची कृपा :** हे सर्व करून तुम्ही ईश्वराची कृपा आहे म्हणून होमिओपॅथीद्वारे रुग्णांना बरे करतात असे मला वाटते. मी काही लेखक नाही की व्यवस्थित लिहू शकेन. पण मला सांगावेसे वाटते की तुम्ही असाधारण व्यक्तिमत्त्व असलेले सत्वपुरुष आहात. कारण माझ्या दाढी-कटींगच्या दुकानातून मी बऱ्याच गि-हाईकांना (पेशंटना) पाठविण्याचा प्रयत्न केला. ते १५ ते २० प्रख्यात (एम.डी.) डॉक्टरांकडून जाऊन ५० हजार ते १ लाखापर्यंत खर्च करूनसुद्धा त्याचे समाधान झालेले नसते. त्रास होतच असतो. पण मी असं समजतो की ज्याच्या नशिबात म्हणा की योगात (कर्मात) म्हणा तुमच्यासारखे (न फसविणारे) डॉक्टर भेटणे कठीण असते. दुसरे पेशंट डॉक्टरांचे नाव काढताच घाबरतात. पण तुमचे पेशंट खास तुम्हाला भेटण्यास आतूर असतात. कारण मी जेव्हाही नंबरमध्ये असतो तेव्हा पेशंट लोक तुमच्याविषयी बोलत असतात. भेटण्याविषयी आतूर असतात, मी सुद्धा. तुम्ही पेशंटच्या मनात विशिष्ट स्थान मिळवून आहात. (नवीन) पेशंट सुरुवातीला तुमच्याविषयी तिरस्कार करतो. नंतर आपोआप शांत होतो. तुमच्याविषयी आदर

वाळगतो. पेशंटना तुम्ही देवास्वरूप आहात. तुमच्याजवळ पेशंट आल्यानंतर त्याला कळते की वेळ आणि पैसा आजारापुढे काही नाही. तो त्याच्या आजारासाठी बरोबर वेळ काढतो व पैसाही खर्च करतो.

तुम्ही स्मरणपत्रिका छापणार होते व रद्दसुद्धा करणार होते. रद्द करू नका. जेवढ्या पत्रिका जमल्या आहेत त्या छापाच. कारण ज्यांनी स्मरणपत्रिका दिल्या आहेत ते हिरमुसले होणार नाहीत. तुमच्याविषयी माझ्यासारख्या पेशंटना बरेच काही लिहिण्यासारखे आहे. पण ते व्यवस्थित मजकूर लिहू शकत नसल्यामुळे ते स्मरणपत्रिका लिहू शकत नाहीत. पण त्याच्या मनात तुम्ही कायम राहत असाल असं मला वाटतं. म्हणूनच स्मरण पत्रिका कमी आल्या असतील. डॉक्टरसाहेब तुमचा पैसा स्वतःहून कोणी बुडवत नसणार. विसरला ती गोष्ट वेगळी. कारण मी स्वतः माझ्या पत्नी सविताची तपासणी फी न दिल्यामुळे मला १० ते १५ हजार रुपये भरावे लागले होते. कारण तिला विषारी मलेरिया झाला होता. तुमची तपासणी फी न दिल्यामुळे असं मला वाटतं. (मी विचारले होते तुम्हाला फी विषयी).

तुम्हाला पेशंटची गरज नाही, पण पेशंटला तुमच्यासारख्या अचूक निदान करणाऱ्या डॉक्टरांची गरज आहे. तुम्ही त्रिविक्रम मंदिर जनसेवेतून उभारत आहात, तेही 'अबोली प्रतिष्ठानातून' म्हणजेच 'जनसेवा न बोलता.' तुमच्याकडे पेशंट स्वतःहून पेटीत पैसे टाकतात. मात्र दुसऱ्या डॉक्टरांकडे लोक बिलसुद्धा पूर्ण भरत नाहीत किंवा नाक मुरडतात. तुमच्याजवळ तुमचे बिल देऊन पेटीत पैसे टाकतात. जळगावकरांचे भाग्य आहे म्हणूनच तुम्ही जळगावात आहात. तुमचा दवाखाना केव्हाही बंद होतो, पण तुमचे पेशंट मात्र जराही कमी होत नाहीत. इतर दवाखाने २४ तास सुरू असतात.

तुम्हाला दंडवत, नमस्कार !

- मयूर सोनवणे, मेहरूण

## अंतर्यामी, कर्तव्यनिष्ठ वल्ली

आदरणीय डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी हे माझ्या जीवनातील श्रद्धास्थान आहेत. मी त्यांना प्रेमाखातर 'बाबा' म्हणून संबोधतो. त्यांना काहीजण दादाही म्हणतात. अनेकजण बाबा किंवा मामा म्हणतात. प्रत्येकाचे त्यांच्याशी अतूट नाते आहे. वैद्यकीय क्षेत्रातील अचूक माहिती असणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. सुनिलदत्त चौधरी.

*"जिथे बोलण्यासाठी शब्दांची गरज नसते*
*आनंद दाखविण्यासाठी हसण्याची गरज नसते।।*
*दुःख दाखविण्यासाठी आसवांची गरज नसते*
*न बोलताच ज्यामध्ये सारे समजते ते म्हणजे आमचे 'डॉ. बाबा...।।"*

मी साधारणतः ४ वर्षांपूर्वी बाबांकडे ट्रिटमेंट सुरू केली. मला मानेच्या मणक्यांचा (मान अखडण्याचा) अतिशय त्रास होता. इतका की दर १५ दिवसांनी माझी मान अखडून जायची आणि एकदा का ती अखडली की कमीतकमी १० दिवस तरी ती काही सरळ व्हायची नाही. मी शेवटी ॲलोपॅथी, आर्थो, ॲन्टीबायोटीक्स उपचार करून थकल्यावर सरळ बाबांकडे जायचे ठरवले. बाबांच्या औषधीने साधारणपणे १ महिन्यात मला फरक जाणवला व तो ही कोणत्याही प्रकारचे व्यायाम न करता अथवा पथ्य न पाळता. नंतर-नंतर माझ्या लक्षात येऊ लागले की दर १०-१२ दिवसांत अखडणारी मान आता ८-१० महिन्यांनंतर अखडली. मागच्या ४ वर्षांमध्ये मोजून २ ते ३ वेळा मला त्रास झाला असावा. आणि त्यातही ती अखडल्यावर जास्तीतजास्त २ दिवस त्रास व्हायचा. मी स्वतः खरंच काही चांगले काम केले असेल की मला बाबांकडे जाण्याची बुद्धी सुचली आणि मी बाबांकडे गेलो.

बाबांकडे एक वेगळीच जादू आहे. त्यांना आपल्या पेशंटला आता काय होत आहे हे बहुधा आधीच समजत असावे. कारण एकदा मी मानेसाठी बाबांकडे गेलो असता त्यांनी मला विचारले की 'काय, आज उजव्या बाजूला मान दुखते आहे का?' आणि खरं म्हणजे नेहमी डाव्या बाजूला दुखणारी माझी मान त्या दिवशी खरंच उजव्या बाजूला दुखत होती. यावरून बाबांच्या होमिओपॅथीमध्ये किती खोल अभ्यास आहे याचा प्रत्यय आलाच.

कदाचित म्हणूनच बाबांकडे येणा-या पेशंटसमध्ये 'पेशन्स' खूप असतो. कधी-कधी रात्रीचे २ वाजेपर्यंतही दवाखाना सुरू असतो. आणि विशेषतः म्हणजे पेशंटदेखील इतका वेळ काहीही ऑब्जेक्शन न घेता थांबतात. कारण येणा-या प्रत्येक पेशंटचे बाबांवर स्वतःपेक्षा जास्त प्रेम

व विश्वास असतो. बाबांकडे गरीब-श्रीमंत अथवा जातीचा कुठलाही फरक नसतो.

अफाट पसरलेल्या या जगात आपलं म्हणून कोणी असतं
सुख-दुःख जाणायला हक्काचं माणूस असतं।
भरकटलेल्या पावलांना दिशा देणारं कोणी असतं
निराश झालेल्या मनाला आधार देणारं कोणी असतं
आपल्यावरही त्या प्रेमाला 'डॉ. बाबा' हे नाव असतं।।

बाबांमध्ये अतिशय सहनशीलता व चिकाटी आहे. आणि म्हणूनच ते सकाळपासून ते रात्री उशीरापर्यंत एकाच जागी बसून पेशंटवर उपचार करीत असतात. अशी सर्वगुण संपन्न व्यक्ती नक्कीच साधारण असू शकत नाही. आज त्यांचे जे नाव आहे ते त्यांच्या मेहनतीचे फळ आहे. आणि म्हणूनच 'आमच्या बाबा'सारखी म्हणजे आदरणीय डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी यांच्यासारखी व्यक्ती आधी झाली नसेल आणि भविष्यातही होणार नाही याची मला खात्री आहे.

नुकतेच बाबांना होमिओपॅथीचे जनक डॉ. हॅनिमन यांच्या नावाचा पुरस्कार देण्यात आला. परंतु बाबांनी ते पुरस्कार मिळाल्यावरही कोणत्याही वर्तमानपत्रात अथवा टी.व्ही. चॅनलवर प्रसिद्धी मिळविण्यासाठी बातमी देऊ केली नाही. म्हणजे यावरूनच डॉ. बाबांचे व्यक्तिमत्त्व कळते. तर असे आहेत आमचे 'बाबा'. आमच्या बाबांमुळे अनेकांना जीवनदान मिळाले आहे. आणि अनेक व्यक्ती असे असतील की जे बाबांच्या औषधी एवं आशीर्वादापासून वंचित आहेत. माझी ईश्वरचरणी एकच प्रार्थना आहे की त्या लोकांनाही बाबांपर्यंत पोहोचण्याचे मार्ग मिळू देत आणि आमच्या बाबांनाही सुखी-संपन्न व निरोगी असे दीर्घायुष्य लाभू दे!

*"कादंबरी म्हणून उल्लेख असावा*
*त्याला सुरुवात हवी पण शेवट नसावा।।*
*तसेच डॉ. बाबांच्या अभिप्रायासाठी*
*सुरुवात असावी पण शेवट नसावा।।"*

- गणेश विठ्ठलराव बारी

कुजबुज हितचिंतकांची...



कुलूप लावून घेतलं...

## एक चमत्कार, दैवी साक्षात्कार.

बाबांना मी ३-४ वर्षांपासून ओळखत होतो. पण एखादी व्यक्ती आपल्या कामाला, प्रोफेशनला कशी पूर्णपणे समर्पित असते, हे माझ्या लक्षात आले. जेव्हा बाबांनी नवीन क्लिनिक 'अबोली' मध्ये सकाळी दहा ते रात्री अडीच वाजेपर्यंत पेशंट चेक केले होते...!'

आज बाबांच्या उपचाराने माझा मुलगा मयूर जांगीड हा पूर्णपणे बरा झालेला आहे. आज मला बाबांविषयी खूप कमी माहिती आहे. तरी पण मी बाबा आणि त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल मी खूप काही लिहू शकतो.

आज आणि संपूर्ण आयुष्यभर बाबा माझ्यासाठी प्रेरणास्त्रोत राहतील. आज बाबांमुळे मला माझ्या जीवनात आणि माझ्या कामात एक प्रतिबद्धता मिळाली आहे. त्यांच्या आशीर्वादाने आज माझे पूर्ण आयुष्य बदलले आहे.

बाबांना शतशः नमन!

- आर्कि. नवीन डी. जांगिड

## संजीवनी देणारा माणूस

आदरणीय बाबा,    मोजक्या शब्दात विषयच म्हटलं तर जसे प्राचीन युगात रामायणामध्ये हनुमानजींनी आणलेली संजीवनी. त्याप्रमाणे आजच्या युगात डॉ. सुनिलदत्तजींनी दिलेली होमिओपॅथीक औषधं.

- सौ. वैशाली श्रीकांत बांगड

# आपणा आयुष्य लाभो उदंड

आदरणीय गुरुदेव,

तुम्ही आमचे धर्मपिता
आम्ही तुमचे लेकरू
तुम्ही आहात कामधेनू
अन् आम्ही वासरू ।।१।।

आम्हा रुग्णांना तुम्ही
जसे धन्वंतरी माऊली
मनाने खचतो जेव्हा आम्ही
तुम्ही कल्पतरू सावली ।।२।।

तुमच्या मार्गदर्शनाने
वाढते आमचे मनोबल
तुमच्या कर्तव्यदक्षतेने
आम्ही होतो हतबल ।।३।।

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा
तुमच्या मनी मनीषा
तुमच्या यशाने उजळून
जावो दाही दिशा ।।४।।

आम्हावरील मायेने
पडो न कधी खंड
ईश्वरचरणी हीच प्रार्थना
आपणा आयुष्य लाभो उदंड ।।५।।

- सुनिल न्याती, जळगांव

# हेचि दान देगा देवा

तीर्थरूप बाबा साहेब यांच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम ! माझा मुलगा चि. यश बारी याची औषधी मी सुमारे पाच वर्षांपूर्वी सुरू केलेली आहे. प्रथम माझ्या मुलाला स्कीन तज्ञ चंद्रकांत कोतकर यांची काही दिवस औषधी घेतली. परंतु तेवढ्यापुरते समाधान असायचे, त्यानंतर डॉ. प्रकाश एन. पाटील व नंतर होमिओपॅथी डॉ. हिराणी यांची औषधी घेतली. परंतु कुठलेही समाधान झाले नाही. परंतु आमच्या घरातील लोकांची औषधी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याकडे चालू होती. आमची बहिण बबीता बारी हिला झालेला आजार मुळापासून बरा झाल्याने,

परंतु नंबर लावून थांबण्याचा कंटाळा येत असल्यामुळे मी माझ्या मुलास बाबांकडे आणत नव्हतो.

माझ्या मुलाला रोज रात्री खाज सुटत असे व सारखा रडत असे. पण आम्हास तो लहान असल्यामुळे त्याला काय झाले आहे हे कळत नव्हते. परंतु आता तो बाबांच्या औषधाने पूर्ण बरा झाला असून, त्याचे या औषधीने अभ्यासातही तल्लख बुद्धी बनली आहे. तो बाबांच्या औषधाने बरा झाला असून, त्यास कुठलीही तक्रार नाही. खरोखरच, होमिओपॅथी औषधीने व बाबांच्या आशिर्वादाने सोरायसिससारखा आजारही बरा होतो. हा माझ्या आयुष्यातील कदाचित पहिलाच अनुभव असावा असे वाटते. याप्रमाणे अनेक रुग्णांचे अनुभव बघावयास मिळाल्यावर माझ्या मनाचे समाधान झाले व आपण धन्य आहोत की या जन्मी असा गुरू मिळाला, याचे मला समाधन आहे.

या गुरुंकडून अनेक रुग्ण बरे होवो व माझे गुरू बाबा यांना उदंड आयुष्य लाभो व अनेकांना त्यांचा अनुभव येतो, ही परमेश्वराजवळ प्रार्थना.

"बाबा, हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा।
तुझा विसर न व्हावा, हेचि दान देगा देवा।।"

\- सुभाष दशरथ बारी

## माझी पंढरी

आदरणीय बाबांच्या चरणी मनोहरचा सा.न.   आपल्यापासून वेगळी असतात, त्यांच्यासाठीच मते मांडतात. मी काय मत मांडणार? जेव्हा तुम्हीच आहात माझ्या हृदयात !

येथे मी माझे मत न मांडता माझे अनुभव देत आहे. गेल्या १०-११ वर्षांपासून मी बाबांच्या संपर्कात आहे. माझ्या पत्नीची बाबांकडे ट्रिटमेंट चालू होती. नंतर माझ्या मुलीचीही तिथेच ट्रिटमेंट होती. माझी मुलगी सिद्धी ही ६ महिन्यांची असताना तिला गळ्याला जखम झाली होती व त्यातून पाणी येऊन खूप दुर्गंधी यायची. त्यावेळेस तिची अवस्था पाहून माझ्या घरची मंडळी व नातेवाईक आम्हा दोघांवर ओरडले व माझ्या पश्चात माझी पत्नी व माझी आई मुलीला जळगावातील एक स्कीन स्पेशॅलिस्टकडे घेऊन गेले. त्यांनी गोळ्या, औषधींची मोठी लिस्ट दिली. मी घरी आल्यावर जेव्हा मला हे समजले तेव्हा आमच्या घरी वादही झाला. माझ्या सासरकडील लोकांचासुद्धा होमिओपॅथी औषधीला विरोध होता. पण मी व माझी पत्नी ठाम होतो. आम्ही परत बाबांकडे गेलो त्यावेळेस त्यांनी "औषधींची लिस्ट मढवून ठेव व त्याची रोज पूजा कर आणि अगरबत्ती ओवाळीत जा" असे सांगून आम्हाला माघारी पाठवून दिले. जी औषधी अगोदर चालू होती तीच चालू ठेवायला सांगितली आणि आठवड्याभरातच माझ्या मुलीच्या गळ्याची जखम बरी झाली.

त्यानंतर जळगांवमध्ये चिकुनगुनियाने थैमान घातले. त्यावेळेस आम्ही पूर्ण कुटुंब चिकुनगुनियाने आजारी पडलो. ज्या वेळेस मी आजारी पडलो त्यावेळेस बाबांचा दवाखाना बंद होता म्हणून घराजवळ असलेल्या एका डॉक्टरकडे गेलो. त्यांनी अगोदर माझे मलेरियाचे निदान केले व नंतर रक्त तपासून टायफाईडचे निदान केले व दोन्ही आजारांवर औषधी दिल्या. त्यामुळे माझ्या पूर्ण तोंडाला आतून छाले पडले व माझी तब्येत जास्तच खालावली. कारण औषधी जास्त पॉवरच्या होत्या. मात्र बाबांचा दवाखाना चालू झाल्यावर मी लगेचच बाबांकडे गेलो व त्यांच्या औषधीने १-२ दिवसातच मला आराम पडला. पण पूर्ण बरे व्हायला १५-२० दिवस लागले. मात्र माझ्या मुलीला ३ दिवसांतच आराम पडला. पत्नीला बरे व्हायला ८ दिवस लागले. कारण माझ्या मुलीचे जन्मापासूनच होमिओपॅथी उपचार आहेत, तर पत्नी १० वर्षांपासून होमिओपॅथी औषधी घेत आहे. मी मात्र कधीतरीच होमिओपॅथी औषधी घ्यायचो.

वरील दोन अनुभवावरून माझी खात्री पटली की, होमिओपॅथी ही सर्वात चांगली उपचार पद्धती तर आहेच परंतु बाबांचा हात लागल्यावर ती औषधी न राहता संजीवनी ठरते.

"बाबांचे मन एवढं-एवढं जणू खाकसाचा दाणा, बाबांचे मन केवढं-केवढं त्यात आभाळ मावेना"
बाबांचे हृदय म्हणजे जणू विशाल सागरच आहे. समुद्र ज्याप्रमाणे वरवर शांत वाटत असला तरी आतून मात्र तो अशांतच असतो. तसेच वरून शांत वाटणा-या बाबांच्या मनात ही एकाच वेळी खूप-खूप विचार चालू असतात व मिळालेल्या प्रत्येक क्षणाचा ते पुरेपूर जनकल्याणासाठी उपयोग करीत असतात. परंतु शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की,

## ।। तुम्हीच माझा सहारा ।।

माझ्या अंधा-या या जीवनाला प्रकाश तुम्ही दिला
कधी स्वप्नी नव्हते मिळेल सहारा अभाग्याला
रात्रंदिन लाख विचारांनी निर्धार हा केला
म्हणून आज दिन प्रकाशमय झाला
या गोष्टींचा मी खूपच विचार केला
गुरफटलेल्या या जीवनाला कसा सहारा तुम्ही दिला
देह, मन, विचार तुम्हाला अर्पुन हा दिला
तुमचे भव्य स्वरूप, मोठे मन, वाटे अभिमान मला

माझ्यासाठी बाबा हेच माझे आई-वडिल गुरुच नव्हे तर माझे सर्वस्वच बाबा आहेत.
शेवटी बाबांना एकच विनवणी आहे की,
"ज्या-ज्या स्थळी हे मन जाय माझे
त्या-त्या स्थळी ही निजरूप तुमचे।
मी मस्तक ठेवितो ज्या ठिकाणी
तेथे सद्गुरू तुमचे पाय दोन्ही ।।"

- मनोहर एम. बारी

## मानवरूपी दैवी शक्ती

आदरणीय बाबा, जय श्रीकृष्ण ! मेरे लिए बहुत कठीन हो रहा है लिखना। क्योंकि मुझे आपके विषय मे लिखना है। मैं इतनी बडी भी नही कि आपके बारे (विषय) में कुछ लिख सकू । फिर भी लिखने का प्रयत्न करती हूँ। मेरे आज तक के अनुभव (करीब ९ साल से) वाचकों को बाँटना चाहती हूँ।

बाबा जब आपने दवाखाने में बोर्ड लगाया की ('मी पैसा कमविला? जनसेवा केली? समाजसेवा केली? लोकांना आजारातून बरे केले? आपला अभिप्राय पाठवा').

अपने खुद के बारे में अभिप्राय माँगना मजाक नहीं है उसके लिए विशाल हृदय लगता है। आपके बहुत चाहनेवाले हैं, लेकिन साथही साथ निंदक भी है। येतो सच है। फिर भी आपने अभिप्राय मांगे ये आपका बडप्पन है।

मेरे बहुतसे अनुभव है, जैसे -

१. मेरी बडी बेटी साक्षी ४ वर्ष की थी। वह बहुत बीमार रहती थी। तब मैं रातभर उसके पास बैठी रहती थी। मुझे बहुत डर लगता था की कहीं इसकी साँस रूक न जाए। लेकिन जब से आपकी ट्रिटमेंट शुरू की है, तब से मुझे रात-रातभर जागना नहीं पडा। धीरे-धीरे उसकी तबियत सुधरने लगी और आज वह एकदम स्वस्थ है। पहले शुरु-शुरू में मुझे बहुत टेन्शन रहता था कि डॉक्टर साहब तो कुछ सुनतेही नहीं। लेकिन वह जैसे-जैसे ठीक होती गई मेरा विश्वास बढता ही चला गया। तब बाबा केवल एक या दो शब्दों में मुझे धीरज देते थे।

२. मेरी छोटी बेटी तनिशा जब उसका ॲडमिशन करना था। स्कूल के बारे में तब बहुतही कश्मकश में थी। लेकिन बाबा की सलाह ली। मेरे मन जो किंतु-परंतु चल रहे थे वो निकल गए। लेकिन ये उतना ही सही है कि अगर मैं बाबा से नहीं मिलती तो मै मेरा निर्णय गलत ले लेती।

३. करीब डेढ साल पहिले में बहुत-बहुत टेन्शन में थी। मुझे ऐसा लगत था कि मैं अपने आप को खत्म कर लू। उस समय एक मात्र बाबा ही थे जिनके कारण मैं उस समय से लड सकी। और आज अपने परिवार में अपने बच्चों व पति के साथ बहुत खुश हूँ। आप १३ नवंबर २००८ को रात १०.३० से ११ के बीच सुबह से खाना भी नही खाया था। मुझे मिलने एचडीएफसी चौक पर आए थे। वह दिन मेरे लिए अविस्मरणीय है।

बाबा आप मेरे लिए सिर्फ डॉक्टरही नहीं हो आप मेरे लिए मेरे परिवार के एक वरिष्ठ सदस्य हो, जिनका मार्गदर्शन मेरे लिए बहुत महत्त्वपूर्ण है।

मैं अपने आप को बहुत ही भाग्यशाली समझती हूँ, क्योंकि मुझे डॉक्टर के रुप में आप जेसे बाबा मिले और भगवान से प्रार्थना करती हूँ कि मैं जब तक इस दुनिया में हूँ तब तक आपका साथ और आशीर्वाद मेरे साथ रहे।

वैसे शेअर करने के लिए तो बहुत कुछ बाकी है। लेकिन मैं इतनाही लिखूंगी।

- सौ. वंदना सुनिल गुजराथी

## कुजबुज हितचिंतकांची...



## चार तत्व जीवन के

आपके चार सवाल -

पेशंट की सेवा की ? समाज सेवा की ? पैसे कमाये ? भगवान के सहारे पेशंट अच्छे किए ?

हमारा सौभाग्य है कि, आपके जैसा डॉक्टर हमें बाबा (गुरू/भगवान) के रूप में मिले। वैसे तो आपके हजारो पेशंट है, होंगे, होते रहेंगे। उसमें से हम भी आपही के पेशंट है।

**अ) पेशंट की सेवा की...** आपके पास आये हुए हर पेशंट को आपने सही राय दी। जो आज कम देखने मिलता है। आपसे होता हो तो आपने उसका पेपर बनाया, नहीं तो आपने उसे उसकी तकलीफ के अनुसार अच्छा डॉक्टर सजेस्ट किया। आप से अच्छा होनेवाला हो तो आपने उसे दवाई और साथ में जिसे ज्यादा तकलीफ है या सिरीयस है उसके लिए रात को दो-तीन-चार बजे तक पूछताछ की।

बच्चो के लिए तो आप भगवान ही हो। बचपन की बीमारी बडे होने पर तकलीफदायक न बने उसके लिए उसे जड सेही दूर करते देखा है। दुसरी या तिसरी बार में भी पेशंट की तकलीफ कम नहीं हुई हो तो आपने उसके केस पेपर पर विचार करके रात-रातभर पढकर और सोचकर उसकी तकलीफ दूर की हैं।

उदाहरण के तौर पर -

१. आर्कि. नवीन जांगीड का एकलौता लडका उपरसे गिरा, कोमा में गया। वह रोता हुआ आपके पास आया। आपने उसे नया जन्म दिया।
२. योगेश गांधी : २८ साल का शादीशुदा, दो बच्चों का बाप जिसका ॲक्सिडेंट हुआ। वो आपका पेशंट भी नहीं था। फिर भी आपने बिना पैसे लिए उसे ठीक किया। उसीका भाई जो डॉक्टर था, वो बेड पर से हिल नहीं सकता था। उसे आपने तीन महिने में चलने, फिरने, पढने के लायक बना दिया।

ऐसे अनगिनत पेशंट हैं जो मैं नाम के साथ यहाँ लिख सकता हूँ, जो सिर्फ न आपकी सेवा से अच्छे हुए, बल्की उन्हे नया जन्म भी मिला।

**ब) समाजसेवा...** रिश्ते में हम उनके कुछ भी नहीं लगते, लेकिन आज तक उन्होंने हम सब के लिए जो कुछ किया है वो सगे भी नहीं कर सकते। डॉक्टर आप अपने मूड के हिसाब से कभी १०-१५ मिनिट बैठाते या कभी तो २ मिनिट में बाहर भेज देते थे। आपका बर्ताव हर पेशंट को मालूम है। लेकीन हर पेशंट से आपने दोस्त का, प्रेम का रिश्ता बनाया है, जो कोई नही बना सकता। हरेक पेशंट से आपको पूरा

लगाव है। सुख में तो बहोत साथी मिलते हैं, दुख में एकमात्र आप उसे साथ देते हैं। उस वक्त आपको डॉक्टर के रूप में नहीं भगवान के रूप में देखा है। इससे बडी समाजसेवा और क्या दिखाऊँ, दिखाने को तो समाजसेवा के ढेर सारे उदाहरण हैं।

नर्मदा परिक्रमावासी को लूटना जिन आदिवासीयों का धर्म है उन्हें आपने अपने हाथों से इतना लुटाया कि वे आदिवासी लूटना ही भूल गए। ट्रक भरकर अनाज उन आदिवासीयों को दिए। कभी कपडे पहने नहीं उनको कपडे पहनाकर जीने का रास्ता दिखाया।

मास्क वाटप, फराळ वाटप, भागवत कथाएं...

"सहारा न होता आपका तो जिन्दगी उब गई होती,
साहिल न होते आप तो नैया डूब गई होती।
आपहीने तो गिरने से बचाया हमें,
वरना हमारी जिन्दगी मौत बन गई होती।"

**क) पैसे कमाए...** पैसे कमाये या लुटाये (दान में) ये तो आपको जिसने नजदीक से देखा है वोही बोल सकता है। आपने पैसे को अगर महत्त्व दिया होता तो आप जो भी हो वो नहीं रहते। पैसे कमाते तो 'टाटा-बिर्ला' बन सकते। लेकीन 'भगवान का अवतार'। 'मानवता का मसीहा' जो आज हो वह नहीं रह सकते।

(हम बोले तो आपकी 'रावण सेना' और उसका परिवार)

हमने देखा है, जो भी कार्य हो चाहे वो सप्तश्रृंगी गड के मंदिर का जीर्णोद्धार हो या पद्मालय का चांदी का सिंहासन (महीरप) हो या शेंदुर्णी का मंदिर हो, या शंखेश्वर, राणकपूर, नाकोडाजी, पालीताना, गिरनार, सम्मेतशिखर ऐसे कई मंदिर, मस्जिद जहाँ आपने अर्थसहाय्य किया है। बहोत-सी जगह तो आपने पैसे आपके दिए और नाम किसी ओर का लिखा है। आज तक जो भी कार्य आपने अपने हाथ में लिया या करने का सोचा भी है तो तुरंत किया है। चाहे उसके लिए आपने हमसे पैसे भी लिए है, तो तारीख से तारीख आपने उसका ब्याज भी दिया है। देते आ रहे हो।

मेरे ख्याल से जग में शायद ही कोई इन्सान होगा जो ब्याज से पैसे लेकर धार्मिक, सामाजिक कार्य करता होगा, फिर चाहे वो मंदिर का कार्य हो या गरीब बच्चों को पढाने का, रहने का, खाने का, कपडे का, दवा का हो, आपने पूरा किया है। मैने कई बार इस कार्य के लिए आपको रोकने की कोशिश की, की डॉक्टरसाहब अभी आपके पास पैसे नहीं, तो आपने हमेशा यही कहाँ है, "अभी इसकी जरूरत ज्यादा है, इसके बाद कोई प्रोजेक्ट नहीं करेंगे।" ऐसा कहकर वो कार्य पूरा किया है।

मुझे कहने में जरा भी ...... नहीं है। मै दावे के साथ कह सकता हूँ - आपका का दातृत्व अतुलनीय है, आपकी बराबरी कोई करोडपती भी नहीं कर सकता।

"महान वो नही जो चाँद सितारों पर जाकर आए,
महान वो नहीं जो धन के बलपर अपना नाम कमाए,
यो तो महानता का नकली बाना कोई भी ओढ लेंगा,
पर महान तो वो ही है जो असार में भी सार पा गए।"

**ड) भगवान के सहारे पेशंट अच्छे किए...**

"वाद-विवाद के लिए उत्पाद की बुध्दी चाहिए,
चमत्कार दिखाने के लिए भी सिध्दी चाहिए,
उन्नती की ओर बढना हो तो,
जीवन निर्माण के लिए भी विचार शुध्दी चाहिए।"

मैंने देखा है, आपने दवा देते वक्त पूरा विचार करके दवा दी है। लेकीन भगवान से उस पेशंट के लिए प्रार्थना भी की है। आपकी विचारशुध्दी और आपकी सिध्दी भी जरूर देखता हैं - इस बात में तो कोई दो मत नहीं हो सकता। आपके लिए लिखना हो तो बहुत कुछ लिख सकते हैं, जो पचास-सौ नोट-बुक भी कम पड सकती हैं।

आखिर में इतना ही लिखूंगा -

"तुम अंधेरे की रोशनी हो, पथ भटकों की मशाल हो,
दिल के मंदिर की मूरत, तुम सच में बेमिसाल हो।"

।। श्रीश्रीश्री १००९ भगवान कांडेश्वरजी।।

# जीवन दर्शन

डॉ. सुनिलदत्त चौधरी उर्फ काशिनाथ यांच्या होमिओपॅथी प्रॅक्टीसला २५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्याबद्दल काही अभिप्राय वा प्रतिक्रिया द्यावी अशी सूचना मी जळगावला गेलो असतांना वाचनात आली व मनात विचार आला की ही सूचना जरी त्यांच्या रुग्णांसाठी असली तरी पण त्यांचा मित्र म्हणून आपणही काही तरी त्यांच्याबद्दल लिहावे. अर्थात एवढा २३-२४ वर्षांचा स्नेह आमचा, त्यामुळे सुनिलविषयी लिहिण्यास एवढे काही आहे की, स्मरणिकेची कितीतरी पाने त्यात व्यापली जातील. त्यामुळे विस्तारभयामुळे मी काही प्रसंग, अनुभव याबद्दल माझे विचार व्यक्त करतो आहे.

सुनिलला प्रथम मी भेटलो ते आमच्या पुण्याच्या मेडिकल कॉलेजमध्ये (ऑगस्ट-सप्टेंबर १९८२) मी कॉलेजला नुकतीच ॲडमीशन घेतली होती व कॉलेजमध्ये अगदी नवखा होतो. सुनिल मला सिनियर होता. मला आठवते, कॉलेजमध्ये तेव्हा इलेक्शनचे वारे होते. सुनिल तेव्हा जी.एस. (जनरल सेक्रेटरी)च्या पदासाठी उभा होता. चौधरी पॅनलच्या प्रचाराच्या वेळी तो मला प्रथम भेटला होता व मी धुळ्याचा व तो जळगांवचा असल्याने त्याने तेव्हा माझी आस्थेने चौकशी केली होती. त्यावेळी तो व त्याचे पॅनेल निवडून आले होते. मला आठवते त्यावेळी त्याच्या डोक्यावर बरेच केस होते व दाढी लहान होती. आताच्या एकदम उलट परिस्थिती.

सन १९८७-८८ असेल. मी संजीवनी हॉस्पिटलमध्ये हाऊसमॅन म्हणून काम करत होतो व सुनिल ग्रेडेड डिग्रीचे प्रशिक्षण घेत होता. त्यावेळीच सुनिलने पण ग्रेडेड डिग्रीसाठी ॲडमिशन घेतली व तोदेखील संजीवनी हॉस्पिटलमध्ये हाऊसमॅन म्हणून जॉईन झाला व माझ्याच रूममध्ये तो पार्टनर म्हणून आला व तेथून आमचा ऋणानुबंध खऱ्या अर्थाने जुळला. दोन वर्षे आम्ही रूम पार्टनर होतो व सुख-दुःखाचे भागीदार होतो. त्या काळात त्याच्या स्वभावाचे अनेक पैलू मी बघितले. त्याला नीटनेटके (उंची राहणीमान) राहणे आवडायचे. त्याचा कष्टाळूपणा, जिद्द, प्रेमळ स्वभाव तेवढाच करारीपणा, खोडकरपणा, दुसऱ्याला सढळ हाताने मदत करणे, अभ्यासू वृत्ती व आणखी बरेच काही.

संजीवन हॉस्पिटलमध्ये तेव्हा काम करून शिक्षण घेत असताना जळगाव येथील त्याने सुरू केलेल्या क्लिनिकला पूर्ण बंद ठेवणे शक्य नव्हते. म्हणून तो दर शुक्रवारी रात्री पुण्याहून जळगांवला जायचा. तेथे शनिवार-रविवार क्लिनिक करून पुन्हा तो रविवारी रात्री जळगांवहून पुण्यास यायला निघायचा व सोमवारी पुन्हा हॉस्पिटल ड्युटीवर रूजू व्हायचा. विशेष म्हणजे तो कधी-कधी त्याच्या मोटर-सायकलने देखील पुणे ते जळगांव व जळगांव ते पुणे असा एकट्याने प्रवास करायचा. मला ही गोष्ट खूप अद्‌भुत व आश्चर्यकारक वाटायची की, काय करतो हा मुलगा,

केवढे कष्ट व धाडस. मी त्याला त्याबद्दल बोलायचो तर तो म्हणायचा, "गरिबी वाईट असते." मला त्या बोलण्याचा अर्थ तेव्हा कळायचा नाही (अजूनही कळत नाही). एक गोष्ट तो मात्र करायचा. भरताच्या वांग्यांच्या सिझनमध्ये मस्तपैकी वांग्यांचे भरीत व भाकरी सोबत आणायचा व तेही थोडेथोडके नाही तर आम्हा १०-१२ सहका-यांना पुरेल एवढे असायचे. मात्र आम्ही सोमवारी सकाळी सर्वजण त्या भरीत-भाकरीवर यथेच्छ ताव मारत असू. आम्ही तर नंतर-नंतर सोमवारी तो येण्याची, भरीत-भाकरीसाठी वाटच बघत असायचो.

सुनिलने मला नेहमी लहान भावासारखी वागणूक दिली. मला त्याचा तेव्हापासूनच मोठ्या भावासारखा आधार वाटतो. हॉस्पिटलच्या मिळणा-या ३०० रुपयांत मी महिना भागवायचो. त्यालाही तेवढेच पैसे मिळायचे. खर्चाची जुळवाजुळव करताना खूप तारांबळ उडायची. त्यावेळचा एक प्रसंग माझ्या चांगला लक्षात आहे. मी एका दवाखान्यात प्रॅक्टीस व अनुभवासाठी जात असायचो, एकदा पावसाळ्याचे दिवस होते. माझ्याकडे स्वतःचा रेनकोट नव्हता. "पैशांची तजवीज करून घेऊ नंतर," असे मनात ठरवून होतो. मी पावसात भिजतच पावसात ये-जा करायचो. एक दिवस असाच मी संध्याकाळी जायला निघालो, बाहेर खूप पाऊस असल्याने मी जरा पाऊस कमी होण्याची वाट बघत थांबलो होतो. सुनिल मला म्हणाला, "बबन्या हा माझा रेनकोट घालून जा" (त्याने बहुतेक नुकताच डक-बॅकचा खाकी रेनकोट घेतला होता. जो तेव्हा माझ्या दृष्टीने बराच महाग होता). मी नको म्हणत असतानाही त्याने त्याच्या स्टाईलमध्ये सांगून मला तो घालायला दिला. नंतर त्याला मी धन्यवाद देऊन तो परत करायला लागलो. तर म्हणतो कसा, "तो तुझ्यासाठीच आहे, राहू दे तुला. मी माझ्यासाठी दुसरा आणला आहे," असे म्हणून त्याने कपाटातून दुसरा रेनकोट काढून दाखवला. मला काय बोलावे काहीच सुचेना. माझे डोळे भरून आले. कारण माझी अशी अडचण दूर करण्यासाठी अशी काळजी फक्त मोठा भाऊच घेऊ शकतो. नंतर मी बरेच वर्ष तो रेनकोट वापरला व त्याची प्रेमाची भेट म्हणून सांभाळला होता.

आर्थिक चणचणीमुळे तेव्हा आम्ही दोघांनी जेवणाचा एकच डबा लावला होता व दोघेही एकच डब्यात जेवत असू. रात्री मला ब-याच वेळा हॉस्पिटलच्या रुग्णांचे काम संपवून वर यायला ११/१२ वाजायचे. तरी पण सुनिल माझ्यासाठी थांबून राहायचा. "भोकन्या खाली काय .......... होता का?" असे रागावून तो राग व्यक्त करायचा, नंतर आम्ही जेवत असू. त्यावेळची गंमत सांगतो. सुनिलचा खोडकर स्वभाव (किडे) कधी-कधी उफाळून यायचा. तो करायचा काय, मी येण्याआधीच डबा खाऊन टाकायचा व डब्यातला भात संपवून टाकायचा व नंतर मी वर आल्यावर पलंगावर झोपल्याचे सोंग करून पांघरूण घेऊन पडून राहायचा. डबा उघडल्यावर ही गोष्ट माझ्या लक्षात आली की मी म्हणायचो, "—— भोकन्या सगळा भात खाऊन कसा मस्त झोपला आहे बघा." मी असे काही म्हणायचा अवकाश की पांघरुणातून मला खी... खी... खी... असा हसण्याचा

आवाज यायचा व नंतर म्हणायचा कसा, "बबु, आज वरण-भात फार मस्त होते ना!" अशी चेष्टा मस्करी आमची खूप वेळा व्हायची. मी पण कधी-कधी जेवताना आधीच एक पोळी जास्त घ्यायचो व त्याला चिडवायचो, पण एक गोष्ट सांगतो, कधी-कधी डब्यातील भात जरी गायब असला तरी त्याऐवजी खाऊचे पार्सल मात्र मला दिसायचे. अर्थात हे त्यानेच ठेवलेले असायचे.

मागे वळून बघताना आता वाटते की काय हा बालिशपणा आम्ही करायचो का? पण नाही. यातून आमचे स्नेहबंध घट्ट झालेत व त्याच्या स्वभावाचे पैलू मी बघू शकलो. त्याच्या प्रेमळ स्वभावाच्या खूपच गोष्टी सांगता येतील. असो.

प्रेमळ स्वभावाबरोबर करारीपणा व वक्तशीरपणादेखील त्याच्याकडे आहे. उदाहरण द्यायचे म्हणजे त्याच्याच मदतीने मी व त्याने त्यावेळी संजीवनी हॉस्पिटलमधील कामगार, नर्सेस यांचा बेशिस्तपणा पूर्णपणे बंद केला होता व सर्व सुरळीत केले होते व विशेष म्हणजे आम्ही हे कामगारांना न दुखावता केले होते. अजूनही त्यावेळचे कामगार व नर्सेस कुठे भेटले तर आम्हा दोघांची आदराने व आस्थेने चौकशी करतात. कन्सलटंट डॉक्टर्सदेखील म्हणतात, त्यावेळी तुम्ही असताना हॉस्पिटल खूप छान चालायचे. परवाच त्यावेळचे कॉलेजचे प्रिन्सिपल व हॉस्पिटलचे सुपरिटेंडेंट माझ्या सौ.ला भेटले. त्यांनी असाच अभिप्राय दिला. असो. हॉस्पिटलमध्ये असताना इतर सहकारी डॉक्टर्समध्ये देखील तो खूप प्रिय होता. कारण त्याचा सगळ्यांची काळजी घेण्याचा स्वभाव, मग रात्री अभ्यास करताना स्वतः आम्हाला चहा-कॉफी करून देणे असो की सकाळी कँटीनमध्ये नाश्त्यासाठी निरोप पाठवून बोलावणे असो किंवा रूममध्ये कँटीनवाल्याला सांगून चहा पाठवणे असो. हॉस्पिटलमध्ये आम्ही खूप धमाल करायचो. खरेच ते आमचे कधीही न विसरता येणारे सुवर्ण दिवस (गोल्डन डेज) होते. आमच्याकडे पैसे नव्हते पण आम्ही खूप आनंदी होतो. नवनवीन गाणी, कॅसेटस् ऐकणे सुनिलला खूप आवडायचे. एकदा तर या महाशयांनी १०-१२ कॅसेटस् एकदम आणल्या. त्यात पंकज उधासच्या गजलांचा अल्बम, मराठी प्रभात गीते, लोकप्रिय हिंदी गाणी इत्यादींच्या कॅसेटस् होत्या. आणि हो, त्यावेळी पॉप्युलर असलेल्या इंग्लिश गाण्यांच्या म्हणजे एबीबीए, समान्था, फॉक्स, फंकी टाऊन इत्यादीदेखिल होत्या. मग नंतर काय रूममध्ये धमालच. हे राजे इंग्लीश गाणी लावून त्यांच्या स्टाईलमध्ये डान्स करायचे. मग मीदेखील डान्स मध्ये सहभागी व्हायचो. हिन्दी लोकप्रिय गाण्यांचे आम्ही विडंबन करून नवीन गाणी तयार करायचो व एकमेकास ऐकवायचो. ते विडंबन मी येथे उदाहरण म्हणून देखील लिहू शकत नाही. अजूनही तो व मी गाण्यांवर विडंबन सुचले तर आवर्जून एकमेकास ऐकवतो. एका गोष्टीचा मात्र मला त्याचा राग यायचा (अजूनही येतो). ती गोष्ट म्हणजे त्याचा एखादी गोष्ट रहस्यमय (सस्पेन्स) ठेवण्याचा स्वभाव. काहीही झाले, प्रयत्न केले तरी त्याने ठरवले तर तो एखादे गुपीत मनात लपवून ठेवण्यात वाकबगार आहे. त्याबद्दल मी त्याच्यावर जाम चिडायचो. पण

हा बाबा ढिम्म असायचा. असेच त्याने ठेवलेले 'गोड गुपित' म्हणजे डॉ. स्मिता शेणॉय (जी आता त्याची पत्नी सौ. स्मिता चौधरी आहे) बरोबरचे प्रेमप्रकरण. दोघेही छुपे रुस्तुम निघाले. असो. अर्थात त्यानंतर त्यांचे लग्न होईपर्यंतच्या प्रवासात माझा महत्त्वाचा सहभाग होता. त्याबद्दल मला 'वकील' असा शेरादेखील मिळाला होता व या प्रकरणानंतरच तो काशिनाथ व मी बबन्या झालो ('व-हाड निघालंय लंडनला' ऐकल्यावर कळेल) असो. माझाही प्रेमविवाह आहे. त्याला आमच्या घरच्यांचा प्रचंड विरोध होता. पण त्यावेळी ज्यांनी मला मोलाची साथ दिली, आधार दिला, त्या यादीत सुनिलचे नाव अग्रभागी आहे, तो साधनाला (माझी पत्नी) म्हणाला होता, "बबनी (मी बबन म्हणून ती बबनी) नाही तुझ्या वडिलांनी कन्यादान केले तर मी स्वतः तुझे कन्यादान करेन." केवढा हा आश्वासक आधार होता आम्हास.

त्याला मिळालेली परमेश्वरी देणगी म्हणा की त्याचा सिक्स्थ सेन्स म्हणा, अध्यात्मिक किंवा स्पिरिच्युअल पॉवर म्हणा. त्यावेळी (१९८८-८९) मध्ये त्याने पुढे काय होईल असे म्हणून स्पेसिफिकली सांगितलेल्या गोष्टी नंतर खऱ्या ठरलेल्या मी प्रत्यक्ष बघितल्या आहेत. त्याची ही अध्यात्मिक शक्ती वाढवण्यासाठी त्यावेळी तो परमेश्वराची, गुरूची उपासना व साधना करायचा असे मला वाटते. कारण मला तो कधी-कधी रात्री सांगायचा, "बबन्या, रात्री एक ते दीड वाजेपर्यंत रूममध्ये येऊ नको. मी त्यावेळी त्याला चेष्टेने 'बुवा' चिडवायचो. तोच बुवा आज सगळ्यांचा 'बाबा' बनला आहे. त्याच्याप्रति असलेला आदर, श्रद्धा मी वणी येथे, गणगापूर येथे, जळगांव येथे संबंधितांच्या वागण्यातून बघितला आहे. त्यांची 'रावण सेना' (त्यांच्या भाषेत) खरोखरच प्रशंसेस पात्र आहे.

डॉ. सुनिलदत्त चौधरी हे नाव एक यशस्वी होमिओपॅथ म्हणून आदराने घेतले जाते. पण यशाचे रहस्य त्याच्याकडे असलेल्या गुणांचा साठा असावे असे मला वाटते. मला नाही वाटत की त्याने फक्त पैसा कमवण्यासाठी प्रॅक्टीस केली असेल किंवा करतोय, असे असते तर 'अघोली परिवारा'तर्फे जी लोकसेवा केली जाते ती झालीच नसती. सुनिलची होमिओपॅथीवर प्रचंड श्रद्धा व विश्वास आहे व त्यामुळेच त्याने त्याच्या एकुलत्या एक लाडक्या मुलाला कुठलीही लस (वॅक्सिन) दिली नाहीय. आम्ही पती-पत्नी त्याला अनेक वेळा म्हणायचो, अरे निदान वॅक्सीन देण्यास काय हरकत आहे. तेव्हा तो म्हणायचा, "साबुदाणा झिंदाबाद." केवढे हे धाडस असेच मी म्हणेन. त्याला धाडस, चॅलेन्ज स्वीकारायला खूप आवडते. अर्थात यात त्याला परमेश्वराचा जबरदस्त पाठींबा असतो. आठवत असेल कन्याकुमारी ते लेह प्रवास.

त्याच्याकडे असलेल्या अध्यात्मिक शक्तीचा, ईश्वरी आशीर्वादाचा व त्याच्या सिक्स्थ सेन्सचा त्याला होमिओपॅथीक औषध देण्यात नक्कीच उपयोग होत असावा असे मला वाटते. कारण होमिओपॅथीमध्ये औषधांची योग्य निवड (ड्रग सिलेक्शन)ला खूप महत्त्व आहे व हेदेखील २५ वर्षांच्या होमिओपॅथीक प्रॅक्टीसचे एक कारण असावे.

त्याच्या या शक्तीचा मलादेखील अनुभव आला आहे. एक घटना येथे नमूद करतो. माझ्या पत्नीच्या पहिल्या बाळंतपणानंतर अचानक तिला काहीही कारण नसताना दम लागू लागला. औषध (ॲलोपॅथी) दिल्यावर जरा बरे वाटायचे. पण पुन्हा त्रास व्हायचा. रिपोर्ट नॉर्मल होते. ॲलर्जी म्हणाल तर तशी काही हिस्ट्री नव्हती. काही कळेना. दोन दिवसांनी जळगावहून सुनिलचे पाकीट आले. त्यात होमिओपॅथीक औषधं होती. ती कशी घ्यायची ते लिहिले होते. ती औषधं दिल्यावर साधनाला बरे वाटू लागले. आम्ही दोघेही तेव्हा आश्चर्यचकित झालो होतो की याला कसे कळले? कोणी सांगितले? नंतर आठ दिवसांनी एकदा रात्री १२ ते १२.३० वाजता सुनिलचा फोन आला (त्याची फोन करण्याची नेहमीची वेळ). तो म्हणाला, "बबनी (साधना)ला असा-असा त्रास झाला होता का? औषध दिल्यावर बरे आहे का?" मी 'हो' म्हणालो व त्याला आश्चर्याने विचारले की, "तुला कोणी सांगितले, कसे कळले?" तो फक्त "हं" म्हणाला व "काळजीचे कारण नाहीय, सगळा बंदोबस्त केला आहे." खरंच असे अजूनही काही प्रसंग आहेत पण विस्तारभयामुळे मी येथे लिहीत नाही.

असा हा माझा मित्र, मोठा भाऊ, मार्गदर्शक. सुनिलमध्ये अनेक वैशिष्ट्ये आहेत. पण त्याच्या काही गोष्टी आहेत ज्या मला खटकतात. त्या मी येथे नम्रपणे मित्र म्हणून नमूद करू इच्छितो.  हे माझे वैयक्तिक मत असू शकते. तो जेवढा प्रेमळ आहे, तेवढाच हट्टी पण आहे. कधी-कधी तो खूप हटवादीपणा करतो. त्याचा त्रास त्याच्या जवळच्या व्यक्तिंना होऊ शकतो हे तो कधी-कधी मान्य पण करतो. मला वाटते त्याने त्याच्या हट्टीपणा जरा कमी करावा. धाडस करताना जरा विचारपूर्वक करावे. अर्थात ईश्वर त्याच्या पाठीशी असतोच. कधी-कधी तो फटकळपणे बोलतो, वागतो. त्याने थोडसं हे कमी करावं.

अशा या माझ्या सहृदयाचे त्याच्या होमिओपॅथीक प्रॅक्टीसच्या २५ वर्षपूर्तीबद्दल मी, माझी पत्नी साधना, मुलं दर्शन व ईशानकडून खूप-खूप अभिनंदन व परमेश्वरचरणी प्रार्थना की त्याची ही रुग्णसेवा जी त्याच्या मते ईश्वरसेवा आहे, अशीच अखंड सुरू राहो व त्याच्यावर असलेल्या ईश्वरी आशीर्वादाचा प्रसाद आम्हाला व इतरांना सदैव मिळत राहो. तसेच एक गोष्ट आवर्जून सांगेन की या २५ वर्षांच्या वाटचालीत त्यास साथ देणाऱ्या त्याच्या पत्नीचे (सौ. स्मिताचे)देखील मनापासून अभिनंदन. कारण माझ्या या मित्राला समजून घेऊन त्याच्या मागे सावलीसारखी ती राहिलेली, तिने साथ दिलेली आम्ही (मी व साधना) बघत आहोत. देव तुम्हास उदंड आयुष्य देवो. पुन्हा एकदा भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!

- डॉ. महेन्द्र बागुल ऊर्फ बबन, पुणे

## नरोत्तम - शिष्योत्तम

एखाद्या कलाकारामध्ये कलेचे बीज उपजत असतं. तसंच विविध व्यावसायिकांमध्ये त्याच्या व्यवसायाला अनुलक्षून काही मूल्ये, काही निष्ठा उपजतच असतात. मग तो लेखक असो, शिक्षक असो, वकील असो डॉक्टर किंवा आणखी काही.

डॉक्टरबद्दल बोलायचं झाल्यास आत्मविश्वास, सेवाभावी वृत्ती, कनवाळूपणा व परोपकारी वृत्ती असायला हवी. इतर गोष्टी प्रयत्न साध्य असतात. असे उपजत व प्रयत्नसाध्य गुणांचा संगम असलेल्या डॉक्टरचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरी. डॉक्टर चौधरींविषयी लिहिण्यापूर्वी एक विचार मांडतो -

"जीवनाला लांबी (वय), रुंदी (सुदृढ प्रकृती) आणि खोली (इतरांसाठी तुम्ही काय केले) आहे. जीवनाच्या या तिन्ही मिती संतुलित (बॅलन्स) असतील तर त्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. माणसाचे खरे मोठेपण हे या तिसऱ्या मितीवर ठरते."

त्यात थोडीशी भर घालून मला असे म्हणावेसे वाटते की, डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणखी एक जादा मिती आहे आणि ती म्हणजे उंची. यामध्ये मी प्रामुख्याने अंतर्भाव करेन तो लोकोपयोगी काम करून या कानाची त्या कानाला खबरही न लागू देता केलेली परोपकाराची कामे. याच पठडीतला सुनिलदत्त हा माझा विद्यार्थी आहे.

१९८२ साली पुणे येथील धोंडूमामा साठे होमिओपॅथीक कॉलेजमध्ये तो शिकत असताना मी तेथे अध्यापनाचे कार्य करीत होतो. त्यावेळी त्याचा विनम्र आणि जिज्ञासू स्वभाव यामुळे त्याने माझे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर एक वर्ष तो माझ्या हॉस्पिटलमध्ये हाऊसमन म्हणून कार्यरत होता. त्यावेळी त्याचा कष्टाळूपणा व कनवाळू वृत्ती नजरेत भरली. त्यानंतर त्याने स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. अनंत अडचणींना तोंड देऊन स्वतःच्या पायावर उभा राहिला. १९८९ ला बी.एच.एम.एस. आणि १९९९ ला एम.डी. झाला. त्याच्या ज्ञानपिपासूपणाचे हे मूर्तीमंत उदाहरण आहे.

अल्पावधितच तो एक उत्तम धन्वंतरी म्हणून नावारुपाला आला. त्याच्या पेशंटच्या लेखी त्याचे स्थान देव्हाऱ्यातच आहे. आजकाल पेशंटसूची डॉक्टरवरची श्रद्धा डळमळीत झालेली असताना असे उदाहरण अगदी विरळेच पाहावयास मिळते. सर्वसाधारणपणे डॉक्टर

पेशंटना प्रभावित करण्यासाठी झकपक राहतात. पण सुनिलला असल्या वरकरणी गोष्टींची गरज भासत नाही. त्याची राहणी साधी, दाढी वाढलेली.

होमिओपॅथीमध्ये मनाच्या लक्षणांना (Mental Symptoms) अनन्यसाधारण महत्त्व असते. पेशंटचे मन जाणून घेणारा सुनिल त्यामुळे पेशंटचे मन सहज जिंकताना दिसतो. मनास जिंकल्यानंतर पेशंटच्या तनास उपचार अगदी सहजसोपा होऊन जातो. कुठल्याही डॉक्टराला कोणते पेशंट ट्रीट करावेत व कोणते करू नयेत, आपल्या व आपल्या पॅथीच्या मर्यादा काय आहेत हे कळणे फार महत्त्वाचे असते. त्यात सुनिलचा हातखंडा आहे.

रोखठोक व काहीशा फटकळ बोलण्यामुळे काही वेळा त्याच्याविषयी गैरसमज होतो. पण असे लोकच मनाने निर्मळ असतात. त्याचे ज्वलंत उदाहरण आहे डॉ. सुनिलदत्त. धार्मिक वृत्ती रोमरोमी भिनलेली असल्याने मंदिराचा जिर्णोद्धार असो वा भाविकांच्या सुखसोयी, निवासी व्यवस्था, भोजन. प्रत्येक बाबतीत तो अग्रेसर असतोच.

कष्टकरी वर्ग, गोरगरीब, गरजू पण हुशार विद्यार्थी, सर्वांसाठी मदतीचा हात सतत पुढे. 'दुरितांचे तिमिर जावो, विश्वस्वधर्म सूर्ये पाहो' या ओवींची सतत आठवण ठेवणारा हा नरोत्तम! त्याची समाजसेवा, गुरुभक्ती वाखाणण्याजोगी आहे. गुरुऋण फेडण्याचा एक प्रयत्न म्हणून त्याने ५ (पाच) ठिकाणी आपल्या गुरुजींच्या नावे पुरस्कार देण्यासाठी विद्यापीठाला (देणगी दिली आहे) गोल्ड मेडल पुरस्कृत केले आहे.

आपला व्यवसाय नेकीने करत-करत सुनिलदत्त अनेकानेक समाजोपयोगी गोष्टीही करतो हे पाहून माझा ऊर भरून येतो. आध्यात्मिक विकास, समाज प्रबोधन, अन्नदान, औषधदान, ग्रंथप्रसार, ज्ञानदान या सर्व पुण्यकर्मात अग्रणी असलेला हा शिष्योत्तम पाहणे हे गुरुचे भाग्यच.

'शिष्यात् इच्छेत् पराजयम् ।'

- डॉ. अनिल गांधी, पुणे

## सुधर्मा

सुधर्माचे जो वांछील लेणे
निरामय आरोग्याचे देणे
लहान-मोठ्यास मान देणे
दया, क्षमा, कणव असणे
तथा संतांचे आशिष घेणे
चौफेर दिव्य दान करणे
धगधगते जीणे, जगणे
रिते न जाईल हे करणे

- डॉ. अनिल गांधी, पुणे

## *Y*ou are a Pancea

Dear Baba, Strong belief in Homeopathy comes from you. For me, "Doctor is there everything will be all right with us. It is not exageration that your medicine makes me healthy. I had severe problem of acidity but it is reduced very much. Before 4-5 years I have undergone a surgery. I was anxious without its effect in future. But now I am relaxed, If I follow your instructions (treatment), I won't have to face any physical problem. I willl be always a healthy person for my child and hubby and enjoy life with them, because of your grace.

I heartily wish you to give treatment to my husband also for even normal cold, cough, acidity. I am sure he will have no obstacle in his progress and obviously I will always be thankful for that.

- Aparna Shroff, Pune


कुजबुज हितचिंतकांची...
डॉक्टर ग्रेट आहेत
दवाखाना वेळे
आधीच बंद केला...

## डॉक्टररूपी देव

तीर्थस्वरूप डॉ. सुनिलदत्त चौधरी यांस, लिहिण्यास आनंद होत आहे की, आपण करीत असलेल्या सेवेला नोव्हेंबरमध्ये २५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्याबद्दल अभिनंदन! अभिनंदन!! अभिनंदन!!!

माणूस जन्मापासूनच जगण्यासाठी धडपड करीत असतो. सुखाने, समाधानाने जगण्याची जी मूळ प्रेरणा ती त्यास जन्मतःच असते. पण काही काळ तो परावलंबी असतो. माता-पित्यांवर सुरुवातीच्या काळात अवलंबून असतो. पण प्रत्यक्षात पाहता जन्माला येण्याआधी काळजी घेणारे एक चांगले डॉक्टर, गुरू लागतात. आपण त्यापैकी एक आहात. अध्यात्मिक क्षेत्रात जसे ईश्वरी आज्ञा, संकेत झालेले गुरू आवश्यक असतात. त्याचा उपयोग अधिदैविकासाठी व अधिभौतिकात ही सतत होत असतो. तसेच डॉक्टर ही व्यक्तीदेखील माणसास या तिन्ही क्षेत्रात अत्यंत जवळची व पेशंटबद्दल माया, आपुलकी, आदर, माणुसकी असणारी हवी असते. आपण त्यापैकीच एक आदर्श डॉक्टर आहात. आपण करीत असलेली ही सेवा रुग्णसेवा तर आहेच जनसेवाही आहेच तशी ईश्वरी कृपाही आहेच. कारण कोणतेही कार्य, कुठल्याही क्षेत्रातले असो, ते करतांना त्यास एक प्रकारचे ईश्वरी अधिष्ठान लागते. विश्वास, श्रद्धा, ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव इत्यादी असल्याशिवाय करीत असलेल्या कामात यश येत नाही. आपण पुष्कळांना संजीवन देतात. तसेच मृत्युच्या दारातून वाचवले आहे व वाचवतात. याची प्रत्यक्ष उदाहरणे बरीच आहेत. पण जवळून बघितलेली व अनुभवलेली व्यक्ती श्री. सतीश कोल्हे, आदर्शनगर, जळगांव येथील होय. आपण शरीराला स्पर्श न करता चेहरा पाहून औषध देतात याचे नवल वाटते. फक्त आजारच बरा होत नाही तर पेशंटच्या मन, बुद्धी व शरीर याचा संपूर्ण नीट विकास होतो. याची आपण काळजी घेतात, त्याबद्दल धन्यवाद.

माणसास मन, बुद्धि व शरीर या तीन गोष्टी व्यवस्थित असल्याशिवाय कोणत्याच कामात यश येत नाही व मानसिक संतुलन

चांगले राहत नाही. आपण सगळ्यांना एक प्रकारचे मानसिक शक्ती व आत्मबल देतात, त्यामुळे आनंद वाटतो. जो नेहमी कार्यरत राहत नाही त्याला करमतही नाही व त्याच्यावर कृपाही होत नाही. आपल्या कष्टांना ईश्वरी कृपेची जोड आहे त्यामुळे प्रत्येक कामात यश मिळतेच व मिळेल. देव कष्ट करणाऱ्यांवरच कृपा करतो. ईश्वरी कृपेच्या अनुभूतीशिवाय जीवनानंदाची परिणती कशी अनुभवाला मिळणार? तुमच्या यशात ईश्वरी कृपेचाच वाटा महत्त्वाचा असल्याने तुम्ही स्वतः आनंदी राहून दुसऱ्याला आनंदी ठेवतात. जगण्याचा आनंद देतात. थोडक्यात, देतो तो देवच असतो ना! तेव्हा आपण जीवनानंद देणारे एक प्रकारचे ईश्वरी अवताररुपी डॉक्टर म्हणायला हरकत नाही. असाच आनंद निरंतर सगळ्यांना मिळो. शेवटी जीवन हे आपणच ठरवायचे. समोर असलेला पेला अर्धा भरलेला आहे म्हणायचा की अर्धा रिकामा म्हणायचा, हसत-हसत जगायचं की रडत-रडत हे ज्याचे त्यालाच ठरवावे लागते. जीवन संघर्ष एकट्यालाच करावा लागतो. जगण्यातही संघर्ष आहे तसा मरणातही संघर्षच आहे तो स्वीकारावाच लागतो. आपल्या हाताला यश आहे, ती ईश्वरी कृपाच आहे. आपण शतायुषी व्हावे, आनंदाने आपल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून, आपले आभार न मानता मी आपल्या सेवेत ऋणी राहू इच्छिते. आपण नॉनस्टॉप ड्रायव्हिंगसारखे विक्रमही केले आहेत. आपले करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

पुनश्च एकदा

अभिनंदन! अभिनंदन! अभिनंदन!

सौ. अनुराधा कुलकर्णी, भुसावळ

## हमारे परिवार के संरक्षक

आदरणीय सुनिलदत्त सा. सादर जय श्रीकृष्ण। आपके बारे में लिखना बहुत कठीन है। डॉक्टर कैसा होना? उसका डिसिजन कैसा होना? उसका इलाज सही उसको अंधेरे में नहीं रखना? ये बाते सभी डॉक्टरों में नहीं मिलती। आजकल डॉक्टरों ने अपनी सेवा को धंधे के रूप में परिवर्तीत कर लिया है। परन्तु यहाँ पर आपका काम सेवा करना होता है, धंदा करना नहीं।

डॉक्टरसाहब आपका स्वभाव इस प्रकार है की आपके पास आतेही दुःख भूल जाता है। ये विशेष बात है।
आप पेशंट की बात सुनते है, पूछते हैं, उसके बाद उसके इलाज का डिसिजन लेते है। आपसे पेशंट ठीक होता है, तो उसको दवाई देते हैं नहीं तो साफ मना कर देते हैं। होमिओपॅथीक एक ऐसी दवाई है जो देखने में छोटी पर फायदा बहुत है। व्यक्ति अगर विश्वास से दवाई लेता है तो घंटों में अच्छा होता है। अगर उसने जल्दी अच्छा होने का सोचा तो अच्छा होताही है।

जैसे एक नाव कोई कारण वश डूबने लगती है, उसे कोई सहारा मिल जाता है, किनारे लग जाती है तो प्रभू को धन्यवाद देते हैं। परन्तु मनुष्य पढा-लिखा समझदार है। उसे डूबने का मौकाही नहीं देना चाहिए। दवाई ही ऐसी है जो बचा सकती है। डॉक्टरसाहब के विषय में तो हमारे पास शब्द ही नहीं है। मुझे उनसे दवाई लेते हुए २२ साल हो गए हैं। आज स्वस्थ हूँ तो उनकी ही वजह से। मेरा पूरा परिवार उनकी ही दवाई लेता है। जलगाँव में दुसरे डॉक्टर को पहचानते भी नहीं। डॉक्टरसाहब जैसा बोलते हैं वैसा करते हैं।

बस इतना बोलना चाहूँगी की डॉक्टर सुनिलदत्त साहब जैसे डॉक्टर बहुत कम मिलते हैं।

धन्यवाद!

- श्रीमती कृष्णा सुभाषचंद्र बांगड

## दादा एक संजीवनी

डॉ. दादांच्या जीवनातील २५ वर्षांच्या अनुभवातून मी त्यांची पेशंट आणि माझा एक वर्षाचा अनुभव. त्या अनुभवातून माझ्या मतानुसार नक्कीच खात्रीने सांगते की डॉक्टर दादांचा मुख्य हेतू पैसा कमविणे नसून स्वतःजवळ असलेल्या महान ज्ञानाच्या देणगीतून दान करणे हा आहे. म्हणजेच रुग्णांची सेवा करून समाजसेवा करण्याचा आहे.

डॉक्टर दादा यांनी ईश्वरकृपेने व होमिओपॅथीच्या मदतीने रुग्ण बरे केलेच. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉक्टर दादा यांनी स्वतः एकप्रकारे ईश्वररुपाने व स्वतःच्या परिश्रमाने, विद्येने, बुद्धीने व विश्वासाने पेशंटला बरे केले. एवढेच नव्हे तर खूप जणांना जीवनदान दिले आणि मृत्युच्या दारातून व यमदूताच्या मुखातून पेशंटला वाचविण्याचे महान कार्य २५ वर्षांपासून दादा करत आले आणि यापुढेही त्यांनी करावे अशी विनंती राहील. ही सर्व दादांची खोटी वाहवा नसून एका पेशंटच्या मनातील व्यक्त केलेली सत्य भावना आहे.

"जय शंकर महाराज!"

कु. दिपाली पाटील, नामपूर

## भगवान का रूप

मान्यवर डॉक्टर श्री. सुनिलदत्त चौधरी यह एक डॉक्टरही नही हैं, धरती माता के उपर एक दुसरा भगवान का रूप है। मै तो यही मानती हूँ। क्योंकि इन्होंने मेरी कम से कम २५ साल से हर बिमारी सुधारी है। मै कभी भी कोई बिमारी में किसी दूसरे डॉक्टर के पास नहीं गई हूँ और उम्मीद है कि दुसरे डॉक्टर के पास जाने की कभी जरूरत ही नही पडेगी ऐसी ही एक आशा है। और ज्यादा क्या लिखू। मुझे माँ का दर्जा देकर हमेशा मेरा सम्मान रखते हैं। भगवान ऐसे डॉक्टर को लम्बी उम्र दे और साथ-साथ उन्हे मेरी भी उम्र लग जाए ऐसी भगवान से प्रार्थना करती हूँ। आपकी आभारी हूँ।

सौ. सीताबाई हनुमानजी शर्मा

## देवमाणूस

आदरणीय डॉक्टरसाहेब, नमस्कार ! तुम्हाला होमिओपॅथीमध्ये प्रॅक्टीस करून २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या २५ वर्षांत तुम्ही बरंच काही मिळवलं आहे. बरेच जण पूर्ण आयुष्यभर जे सुख, समाधान मिळवू शकत नाहीत ते तुम्ही फक्त तुमच्या अथक परिश्रमामुळे या २५ वर्षांत मिळवलं आहे. तुम्ही रुग्णांना फक्त रुग्ण म्हणून ट्रीट करीत नाही तर एक फॅमिली मेंबर म्हणून ट्रीट करता आणि तो रुग्ण केव्हा तुमचा फॅमिली मेंबर बनतो हे त्याच्यासुद्धा लक्षात येत नाही.

तुम्ही पेशंटला फक्त बरं करीत नाही तर त्याच्यात मानसिकरित्या जगण्याची आशा निर्माण करता. नकळत त्या पेशंटला वाटायला लागतं की आपण आता सुरक्षित आहोत. त्याचे जीतेजागते उदाहरण म्हणजे मी डॉ. सौ. छाया शामकांत देहाडराय. मी तर तुमच्याकडे आले तेव्हा मी जगण्याची आशा पूर्ण सोडली होती. कारण त्याअगोदर मी जळगांवमध्ये ब-याच डॉक्टरांचे औषध घेतले. पण कोणालाच काही समजत नव्हते आणि मी काही बरी होत नव्हते. काहींनी तर मला असेही सांगितले होते की तुम्हाला हायपरथेरॉडीजम आहे, तुमचं आता संपलं. तुमची ५-६ वर्षंच चांगली जातील. नंतर तुमचं काही खरं नाही. मी अक्षरशः रडत घरी आले होते. पण तुम्ही मला ठणठणीत बरे केले. आज ३-४ वर्षांपासून मला थेरॉईडची गोळीसुद्धा नाही. तरी मला काहीएक त्रास नाही. मग मी का म्हणून तुम्हाला माझा देव मानू नये. तुम्ही आम्हाला पाया पडण्यासाठी मनाई करता पण माझ्या या मानण्याला तुम्हीसुद्धा मला रोखू शकत नाही. कारण आज मी जी काही जिवंत दिसते ती फक्त तुमच्यामुळे आहे.

आज रोजी डॉक्टरलोक म्हणा किंवा कोणीही किती भरमसाठ पैसे कमावतात पण तो सत्कारणी फक्त तुम्हीच लावतात. तुम्ही जो देवधर्म करतात. त्यात पेशंटला सुद्धा सहभागी करून घेतात व त्यांनाही थोडाफार पुण्याचा वाटा मिळवून देतात. म्हणून येथे असे म्हणावेसे वाटते की तुमच्या परिसरूपी सहवासात राहून आमच्यासारख्या लोखंडाचेसुद्धा सोने व्हायला वेळ लागत नाही.

- डॉ. सौ. छाया शामकांत देहाडराय


|| जय जिनेंद्र भाऊ सा. ||
|| जय श्रीकृष्ण ||
|| जय हो ||
|| दादा राम राम ||
|| जय झुलेलाल... ||

## नि:स्वार्थी व्यक्तिमत्व

प्रिय डॉक्टर, खरंतर अभिप्राय काय द्यावा हेच सुचत नाहीये! इतक्या विचारांची वादळं घोंघावत आहेत की नेमके शब्द सूचत नाहीत. जानेवारी १९८९ मध्ये सेप्टीक टँकमध्ये पडून माझा मुलगा दगावला. तेव्हापासून मी बधीर झालो होतो. असेच कामकाज व्यवस्थित सुरू होते. परंतु काहीतरी चुकत होतं. खूप भीती वाटत राहायची किंवा मन हळवे व्हायचे. साध्या-साध्या गोष्टींनी डोके विचारांनी भरून जायचे. कायम उदासवाणे वाटायचे. कुठल्याच गोष्टीत मन रमत नव्हते. किंवा कुठल्या संभाषणात सहभागी होऊ शकत नव्हतो. सर्व जीवनच नाशवंत व क्षणभंगूर आहे असे जाणून जगण्याची उमेद नाहीशी होत चालली होती.

योगायोगाने तुम्ही भेटलात म्हणायचे की तुम्हाला आमची दया आली काही कळत नाही. २००४ मध्ये पत्नीच्या आजारपणावर यशस्वी उपचार केल्यावर आपण माझ्याकडे वळलात. मी उपचार मध्येच सोडून द्यायचा विचार करत होतो. पण तुम्ही परत-परत मला बोलावून त्या संपूर्ण दुष्टचक्रातून बाहेर काढलेत. नुसतेच बाहेर काढले नाही तर माझी भीती नाहीशी करून आत्मविश्वास वाढवला व जीवन जगण्याची जी उमेद नाहीशी झाली होती ती परत जागृत करून ताठ मानेने जगायची प्रेरणा दिलीत. आपण खरंतर आमच्यासाठी भगवान आहात. आपण फी घेता पण ती खरं म्हणजे दक्षिणा आहे. जी घेऊन तुम्ही आमचे दु:ख दूर करता. ईश्वर आपणास असेच खूप-खूप आयुष्य देऊन दु:खी-पीडित, गांजलेल्यांचे आयुष्य सुंदर करण्याची शक्ती देवो ही मनापासून प्रार्थना.

"जो कोई चौखट पे आया, वो कभी खाली नहीं गया,
किसीकी जिन्दगी संवर गई, किसी का कल्याण हो गया"

गोविंदराव देशमुख
भारतीय स्टेट बँक, जळगांव

# दिव्य पुरूष

आदरणीय गुरुवर्य बाबा प्रणाम... आरोग्यसेवेत 'होमिओपॅथिक तज्ञ' म्हणून आपणास नोव्हेंबर २०१० मध्ये २५ वर्षे होत आहेत. यानिमित्ताने आज आम्हांला तुमच्या सेवेबद्दल लिहिण्यास मिळाल्याने मन अगदी मोकळे झाल्यासारखे वाटले.

'समाजात वैद्यांचे (डॉक्टरांचे) स्थान म्हणजे ईश्वराचे दुसरे रूप असते' असे आम्ही ऐकून होतो. आणि आम्हाला तुमच्याकडे पाहून त्या वाक्याची खरी प्रचिती होते व ते वाक्य त्रिकालाबाधित सत्य असल्याचे जाणवते.

गुरुवर्य बाबा, तुम्ही केलेली रुग्णसेवा ही ईश्वरकृपेने व होमिओपॅथीच्या द्वारे शक्य व सफल झाली आहे. व ही तुमची 'शस्त्रे' आहेत असे आम्ही मानतो व याद्वारे तुम्ही रोगपीडितास आरोग्य दिल्यामुळे जीवनातील चारही पुरुषार्थ आपोआप दिल्यासारखे होतात म्हणून पुराणात म्हटले आहे -

धर्मार्थकाममोक्षाणां आरोग्य साधनं यतः।
तस्माद् आरोग्यदानेन तद्दातं स्याच्चतुष्टयम्।। (स्कंदपुराण)

**मराठी अर्थ :** शरीराचे आरोग्य हेच ज्या अर्थी धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांच्या प्राप्तीचे प्रमुख कारण आहे. ज्याअर्थी रोगपीडितास आरोग्य देण्यामुळे हे चारही पुरुषार्थ आपोआप दिल्यासारखे होतात.

आम्ही असे म्हणू इच्छितो की, औषधोपचाराने रुग्णास दिलेल्या आरोग्यामुळे तसेच भीतीने घाबरलेल्या व्यक्तीस अभय दिल्यामुळे व भुकेने व्याकूळ झालेल्या व्यक्तीस अन्नदान केल्यामुळे या तुमच्या श्रेष्ठ कार्यामुळे तुम्हाला अनंत पुण्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. ग्रंथातही वरील उल्लेख मिळतो तो असा,

"आकाशस्य यथा नान्तः सुरैरप्यवगम्यते।
तद्वद् आरोग्यदानस्य नान्तो वै विद्यते क्वचित।।" (स्कंदपुराण)

**मराठी अर्थ :** ज्याप्रमाणे आकाशाची मर्यादा, शेवट, अंत देवतांनादेखील समजत नाही, त्याप्रमाणे औषधोपचाराने रुग्णास दिलेल्या आरोग्यामुळे मिळणाऱ्या पुण्यांचादेखील कोणासही अंत लागत नाही.

शेवटी आम्ही असे इच्छितो की, तुमचे हे 'रुग्णसेवेचे कार्य' सतत वृद्धिंगत होवो व तुमच्या हस्ताने असेच प्राणी मात्रांचे कल्याण होवो हीच इच्छा व कोटी-कोटी शुभेच्छा...!

गुरुवर्य बाबांविषयी लिहिणे हा भाग्ययोग आहे. बराच काळ त्यांचे सानिध्य लाभल्यामुळे आणखीही पुष्कळ गोष्टी सांगता येतील. परंतु विस्तारभयाचे भान ठेवून त्यांच्याविषयीची लेखणी येथेच थांबवितो.

तरी गुरुवर्य बाबांची सर्वसाधारण कल्पना वाचकांना येईल अशी आशा वाटते.

"पक्का सिद्धांत, यशाबद्दल निश्चिंत
तत्त्व पक्के, यश शंभर टक्के
निष्ठा शास्त्रावर, तरच प्रसिद्ध वैद्यवर
योग रोगसंप्राप्ती, मिळे यश किर्ती, धनप्राप्ती"

\- दिलीप पंढरीनाथ चौधरी

## परिस स्पर्श

आदरणीय श्रीपुत डॉ. बाबांच्या चरणी सौ. बबीताचा साष्टांग दंडवत.  खरं तर माझ्या लिखाणाला कोठून सुरुवात करावी हेच समजत नाही. कारण मी काही इतकी मोठी नाही की डॉक्टर बाबांविषयी काही लिहू शकेन. पण आतापर्यंत मला स्वतःला  आलेला अनुभव मी वाचकांसोबत वाटू शकेल म्हणून हे लिहिण्याचे प्रयोजन.

डॉ. बाबांनी दवाखान्यात ज्यावेळेस बोलावले की, "मी पैसा कमविला?, जनसेवा केली?, समाजसेवा केली? की लोकांना आजारातून बरे केले ? याविषयी आपला अभिप्राय पाठवा" हे वाचून मला तर खूप आश्चर्य वाटले. कारण उघडपणे आपल्याविषयी लोकांचे मत मागविणे म्हणजे त्यासाठी मनाचा फार मोठेपणा हवा. कारण प्रत्येक मनुष्याला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे व स्तुती करावी. पण मत (अभिप्राय) मागविले म्हटल्यावर चांगल्यासोबत टीका करणारेही असणारच.

एखादी व्यक्ती ज्यावेळेस यशाच्या सर्वोच्च शिखरावर वाटचाल करीत असते त्यावेळेस त्या व्यक्तीच्या मित्रपरिवाराइतकेच किंबहुना जास्त निंदक, टीकाकार तयार होतात. आज बाबांविषयी भलतेसलते बोलणारे लोक कमी नाहीत. याची जाणीव असूनही बाबांनी अभिप्राय मागविले यात त्यांचेच मोठेपण आहे.

बाबांचा दवाखाना चालू होऊन २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या काळात त्यांना भरपूर पैसाही कमविला, जनसेवाही केली, समाजसेवाही केली, लोकांना दुर्धर आजारातून बरेही केले. परंतु मिळालेल्या पैशाचा उपयोग त्यांनी सदैवच आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतूच केला. त्यासाठी त्यांनी दोन-अडीच वर्षांपूर्वी 'अबोली प्रतिष्ठान'ची स्थापना करून त्यामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. मग तो कार्यक्रम धार्मिक, सामाजिक, प्रबोधनपर, आरोग्यविषयक का असेना. पण कधीच त्याचा गाजावाजा केला जात नाही. अगदी सगळेच कार्यक्रम होतात ते नावाप्रमाणेच अबोल राहूनच.

डॉ. बाबांसाठी 'जनसेवा न बोलता' हे ब्रीदवाक्य लागू पडतं. पेशंटला कितीही मोठा आजार असो ते औषधोपचार करीतच असतात व त्यांना पेशंटशीही मोजके व मुद्याचेच बोलायला आवडते. पेशंटला कितीही मोठ्या आजारातून बरे केले तरी ते कधीच त्याचा गाजावाजा करीत नाहीत की जाहिरातबाजीही करीत नाहीत. त्यांचे कार्य ते चालूच ठेवतात 'अबोल' राहूनच.

मी स्वतः एका दुर्धर आजारातून बरे झाले आहे ते ही बाबांमुळेच. १९९८-९९ साली माझी जळगांवातील एका नामांकित एम.डी. डॉक्टरांकडे

ट्रीटमेंट चालू होती. परंतु मी शंका बोलून दाखविल्यावरही त्यांनी माझे आजारपण सिरियसली घेतले नाही. त्यानंतर दोन-तीन महिन्यांतच माझी तब्येत जास्त खालावली. त्यावेळेस माझ्या मिस्टरांनी प्रथमच मला डॉ. सुनिलदत्त चौधरी (आमच्या डॉक्टर बाबांकडे) यांच्याकडे नेले. त्यांनी माझा एक्स-रे रिपोर्ट पाहताच माझ्या आजाराचे निदान केले. खरं तर त्यावेळेस मला रडायलाच आले. परंतु बाबांच्या शब्दांनी मला धीर आला. आज मला जे बोनस आयुष्य मिळाले आहे ते फक्त बाबांमुळेच.

बाबांच्या जुन्या दवाखान्यात एक वाक्य लिहिलेले होते, "आय ट्रीट, गॉड क्युअर्स" थोडक्यात "मी उपचार करतो, देव तुम्हाला बरे करतो." बाबांचे व्यक्तिमत्त्वच इतके अलौकिक आहे की त्यांनी कधीच कोणत्याही गोष्टीचे श्रेय स्वतःवर घेतले नाही. कुठल्याही गोष्टीचे श्रेय ते परमेश्वरालाच देतात. त्यांनी वैज्ञानिक ज्ञानासोबतच अध्यात्म व आधुनिकता यांचीही सुंदरपणे सांगड घातलेली आहे. आज जळगांवातील गल्लोगल्ली झालेले व दोन-चार वर्षांतच त्याजागी उभे राहिलेले बहुमजली टोलेजंग दवाखाने पाहिले की लक्षात येते की वैद्यकीय सेवा ही सेवा न राहता एक व्यवसाय झालेला आहे. परंतु डॉ. बाबांनी तर २५ वर्षे पत्र्याच्या शेडखाली आपला दवाखाना चालविला. ते नेहमीच सेवेला प्राधान्य देत आले. त्यांना आवश्यकता वाटली तरच ते एक्स-रे, सोनोग्राफी अथवा इतर टेस्टस् करायला लावतात. आजाराच्या प्राथमिक लक्षणांवरूनच त्यांना आजार लक्षात येतो.

२५-३० वर्षांपूर्वी 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पना होती. पण आज परिस्थिती बदलली आहे. आज एखाद्या डॉक्टरकडे गेलो तर ते आपल्याला स्पेशलिस्टकडे पाठवितात व या दवाखान्यातून त्या दवाखान्यात चकरा मारण्यात, रिपोर्टस्, तपासण्या करण्यातच पेशंट शारीरिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल होतो. पण आमच्या बाबांची तर गोष्टच निराळी आहे. अगदी नवजात शिशूपासून तर वृद्धापर्यंत कुणालाही हात न लावता हाताची नखे व जीभ पाहून ते आजाराचे निदान करतात. त्यांनी सांगितलेले काही उपचार अथवा पथ्य मनाला व बुद्धीलाही कधी-कधी पटत नाही. पण काही काळ लोटल्यानंतर लक्षात येते की डॉक्टर बाबांनी आपल्याला जी पथ्य अथवा उपचार सांगितले होते ते फक्त आपल्या भल्यासाठीच होते. परंतु बाबा कमी बोलतात अथवा आजाराविषयी काही सांगत नाहीत याचा अर्थ ते चुकीचे आहेत असे मुळीच नाही. किंबहुना त्यांना चुकीचे समजणे हीच आपली सर्वात मोठी घोडचूक आहे.

आजचे युग हे विज्ञानयुग व धावपळीचे युग आहे. कदाचित परिस्थितीमुळेच की काय पण माणसाचा दृष्टीकोनही प्रॅक्टिकल झाला आहे.

त्यामुळेच की काय नवीन पेशंटला वाटते की आपल्याला डॉक्टर बाबांनी आपल्या आजाराविषयी सांगावे, लवकरात लवकर आपल्याला आराम पडावा. परंतु बाबा हे एक असे व्यक्तिमत्त्व आहे की कुणीच त्यांना पूर्णपणे ओळखू शकलेले नाही. बाबांना मोजकेच बोलायला आवडते व त्यांनी आपल्याला जर आजाराविषयी काहीच सांगितले नाही तर नवीन पेशंटचाही त्यांच्यावर विश्वास बसत
नाही. तशी वेळ पडली तर बाबा आजाराची कल्पनाही देतात. पण येथे स्वतःसाठी थांबायला कुणाला वेळ नाही. त्यामुळेच की काय बरेचसे पेशंट मध्येच उपचार बंद करून टाकतात. मी तर सदैव त्या परमेश्वराची ऋणी राहील की त्या परमेश्वराने या जन्मी माझी डॉक्टर बाबांशी भेट घडवून दिली. आजच्या युगात त्यांच्यासारखे अलौकिक व्यक्तिमत्त्व तर शोधूनही सापडणार नाही.

थोडक्यात सांगायचे तर ते ज्ञानयोगी तर आहेतच तसेच कर्मयोगीसुद्धा आहेत. विज्ञान, अध्यात्म यांसारख्या विषयांचा गहन अभ्यास त्यांनी केलेला आहे आणि सोबतीला आपल्या नेत्रदीपक यशाने, स्वकर्तृत्वाने आणि अलौकिक कर्माची जोड देऊन आयुष्य खूप सुंदर केलेले आहे. ते आपल्या बोलण्यातून नव्हे तर कृतीतूनच आसपासच्या लोकांना मार्गदर्शन करीत असतात. परंतु आपण त्यांच्या त्या कृतीचा योग्य अर्थ लावण्यास कमी पडतो.

नोव्हेंबर २००३ मध्ये बाबांना टी.ओ.वाय.आय. पुरस्काराने त्रिवेंद्रम (बंगलोर) येथे सन्मानित करण्यात आले. टी.ओ.वाय.आय. म्हणजे टेन आऊटस्टॅंडींग यंग इंडियन (दहा असामान्य युवा भारतीयांपैकी एक). त्यानंतर १५ जुलै २००५ ला राष्ट्रीय सन्मान पुरस्कार नवी दिल्ली येथे देण्यात आला. जैन साधूंची विनामूल्य सेवा केल्याबद्दल १८ मे २००५ ला 'मानवता का मसीहा' हा पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर ३८४७ कि.मी. हे कन्याकुमारी ते लेह असे अंतर अवघ्या १४९ तास २५ मिनिटांत पूर्ण करून 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये त्यांच्या नावाची नुकतीच नोंद करण्यात आली व आजच कळालेली आणखी एक बातमी म्हणजे भारत सरकारच्या हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर मंत्रालयाच्या आयुष विभाग संचलित नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ होमिओपॅथी कोलकातातर्फे पहिली आंतरराष्ट्रीय होमिओपॅथी परिषद घेण्यात आली. यात डॉक्टर बाबांना त्यांनी होमिओपॅथी क्षेत्रात दाखविलेली दूरदृष्टी व विद्वत्तेबद्दल वैयक्तिक पातळीवर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अशा कित्येक सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आल्यानंतरसुद्धा ते नेहमीच प्रसारमाध्यमांपासून प्रसिद्धीपासून लांबच आहेत. अथवा कधी त्यांच्या वागण्या-बोलण्यातून गर्व, अहंकार झळकत नाही. म्हणूनच मी म्हटले की त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व शोधूनही सापडणार नाही. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोखंडरूपी व्यक्तीचे ते सोन्यात रुपांतर करून टाकतात. कधी-कधी तर त्या व्यक्तीला स्वतःत

झालेले परिवर्तन लक्षातही येत नाही. परंतु त्यांच्या आजुबाजूच्या लोकांच्या लक्षात येते की, लोखंडरूपी मनुष्याचे डॉक्टर बाबांनी आपल्या परीसस्पर्शाने सोनेरूपी मनुष्यात रुपांतर केले आहे.

अशा आमच्या डॉक्टर बाबांना त्यांच्या जीवनप्रवासात नेहमीच डॉ. सौ. स्मिताताई व चि. राघव यांची साथ लाभत आलेली आहे. परमेश्वर या सर्वांना दीर्घारोग्य देवो हीच प्रभू चरणी प्रार्थना. आज बाबांच्या कृपेनेच आमचे आयुष्य सुसह्य झालेले आहे.

डॉक्टर बाबांविषयी असलेल्या माझ्या भावना मी खालील ओळींच्या माध्यमातून प्रकट करू इच्छिते.

"आपल्यासारखे बाबा लाभणे हे केवळ भाग्य नसेल,<br>
तर मागच्या जन्मी केलेल्या सत्कर्माचे ते फळ असेल!"<br>
धुक्यात हरवलेली जीवनाची निशा,<br>
आपल्या बहुमोल मार्गदर्शनाने बदलली दिशा।<br>
दिवसागणिक होतो आमचा यशस्वी प्रवास,<br>
कारण आमच्यासोबत असलेला आपला सहवास।<br>
आपल्या दवाखान्याच्या रौप्यमहोत्सवाचे औचित्य साधून<br>
श्री स्वामी समर्थ चरणी विनवणी करणार,<br>
जन्मोजन्मी डॉ. बाबांचे प्रेम, शुभाशिष लाभावे म्हणून अट्टाहास करणार।<br>
आम्ही पामर आपल्याला काय देणार?<br>
आपलाच सहवास लाभावा ही स्वामीचरणी प्रार्थना करणार।

- बबीता

## खडे बोल डॉक्टरांचे...



डॉक्टर रिकामा आहे.
डॉक्टर वेडा आहे,
त्याला काय अक्कल आहे.

## सर्वगुणसंपन्न

वैद्य देव हमारे श्री. डॉ. सुनिलदत्त,
वैद्य गुरु हमारे श्री. डॉ. सुनिलदत्त,
गुणी हमारे श्री. डॉ. सुनिलदत्त,
दयाप्रधान हमारे श्री. डॉ. सुनिलदत्त,
करुणा सागर श्री. डॉ. सुनिलदत्त,
आनंदमय श्री. डॉ. सुनिलदत्त,
ज्ञान भंडार श्री. डॉ. सुनिलदत्त,
तेजःपुंज श्री. डॉ. सुनिलदत्त,
ध्यान मुद्रिका श्री. डॉ. सुनिलदत्त,
दुःखदर्द निवारक श्री. डॉ. सुनिलदत्त,
कर्म विधायक श्री. डॉ. सुनिलदत्त,
सौ-सौ साल जिए हमारे श्री. डॉ. सुनिलदत्त

- सौ. कुसुम लुंकड

## अनासक्त

डॉ. सुनिलदत्त चौधरी, आपने अहंता, ममता और जगत के पदार्थों की आसक्ति से उपर उठकर इस मंत्र को मिशन बना लिया है।

"परहित बस जिनके मन मांही।
तिनकह जग कछु दुर्लभ नाही।"

सोच, क्षमा, परदुःख कामरता आदि के अन्तर्गत के सब दैवी गुण आपको प्राप्त हैं। जो आप अपने मन में सदा परहित की भावना को संजोए कर रखते हो।

आपकी सहधर्मिणी पत्नी सौ. स्मिता चौधरी का भी बहुत सहयोग है। वह भी आपका पदानुसरण करती है।

- सौ. लता लुंकड

## कर्मविधायक

आत्मस्थ श्री श्री बाबाजी, आपल्यासारख्या 'समर्थ' व 'सर्वज्ञ' महापुरुषाबद्दल, आपण केलेल्या सर्व ज्ञात व अज्ञात कार्याबद्दल अभिप्राय लिहितांना एकच विचार मनात तरळून जातो तो हा की, 'भक्त हा कधीच आपल्या देवतेबद्दल बोलत नसतो. त्याने त्याला आपल्या मनाच्या गाभाऱ्यात 'श्रद्धेने' पुजलेलं असतं. भक्ताला आपल्या भावना व्यक्त करायला भाषासुद्धा अपुरी वाटत असते."

भगवंताचे कार्य कुणी लेखक, कवी, तत्त्वज्ञ किंवा विद्वान पूर्णपणे व्यक्त करू शकतो काय? तो फक्त एक आत्मानुभव आहे मनाला कळणारा. पण शब्दांत न मांडता येणारा.

शेवटी आपले कार्य उत्तरोत्तर वटवृक्षाप्रमाणे वृद्धींगत होऊन अजरामर होवो या आत्मेच्छेसह सदैव आपल्या सेवेच्या प्रतिक्षेत...

तुमचाच,

युव-या, डॉ. युवराज सुरवाडे, किनगांव

## मातृ-पितृ प्रेम

आदरणीय डॉ. दादासाहेब,    आपण करीत असलेल्या वैद्यकीय सेवेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याने त्याबद्दल आपले मनापासून हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

तसेच आम्हास आपल्याकडून वेळोवेळी सुचित होणा-या धार्मिक विधी मार्गाबद्दल आम्ही आपले आभार मानतो. त्याचप्रमाणे वेळोवेळी आमच्या आरोग्यास औषधोपचार केल्याबद्दल आम्ही तुमचे सदैव ऋणी आहोत. आपल्याकडून आम्हास वेळोवेळी मिळालेल्या औषधोपचार व मार्गदर्शनामुळे मिळालेले आयुष्य हे एका वरदानाप्रमाणेच आहे. त्याचबरोबर तुमचे अखंड मिळालेले प्रेम हे आमच्यासाठी मातृ व पितृ प्रेमाप्रमाणेच आहे.

आपल्या प्रेमाची थाप सदैव आमच्या पाठीवर अशीच पडत राहो व आपले वैद्यकीय मार्गदर्शन आणि धार्मिक कार्याबद्दल मार्गदर्शन सदैव मिळत राहो. मातृ-पितृतुल्य व मोठे बंधुतुल्य अखंड प्रेम करणा-या दादासाहेबांना दीर्घायुष्य लाभो व आपल्या हातून आमच्याबरोबर अनेकांची रुग्णसेवा अशीच घडत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

"हेचि दान देगा देवा, हेचि दान देगा देवा।<br>
विसर न व्हावा बाबा तुमचा, विसर न व्हावा।।"

श्री. सुनिल बारी - सौ. संगिता

## सद्गुणांचे भांडार

मा. दादासो. डॉ. सुनिलदत्त चौधरी, आपणास दवाखाना सुरू करून नोव्हेंबर मध्ये २५ वर्षे पूर्ण होत आहेत.
त्याबद्दल आपले सर्वप्रथम अभिनंदन.

डॉक्टर आपले थोरपण आम्हास जाणवते. अध्यात्मिकतेच्या परमोच्च शिखरावर असूनही रुग्णांचे दुःख दूर करणारे निराधारांचे आधार आपण आहात.

"जे का रंजले, गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा,

याची अनुभूती आम्हांस आली. आपली थोरवी आमच्यासारख्याने गावी म्हणजे सूर्याला प्रकाशाची महती पटवून देण्यासारखे आहे. आपण आमचे आराध्य डॉक्टर आहात. साक्षात सद्गुणांचे भांडार आहात. असे महान डॉक्टर आम्हास लाभले याचा आम्हास सार्थ अभिमान आहे.

ईश्वरीशक्ती व होमिओपॅथीक तज्ञ हे दोन्ही गुण असणारी व्यक्ती एकच आहे, ती म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरी होय.
दादासो डॉ. सुनिलदत्त चौधरी, आम्ही आपणास होमिओपॅथीक तज्ञांच्या रूपात देवच समजतो.

\- स्नेहा देशमुख

## अनुभव कथन

अनेकांना माझ्याप्रमाणे व्याधीमुक्त करणा-या डॉ. सुनिलदत्त चौधरी यांना विनम्र अभिवादन. माझा अनुभव सगळ्यांसमोर प्रकट करतांना मला विशेष आनंद होतोय, की फार गंभीर अथवा जीवघेणे असे माझे दुखणे नसले तरी त्रासदायक दुखण्यातून डॉक्टरांच्या औषधोपचाराने मला १०० टक्के बरे वाटले. मी एका नामांकित कंपनीत सेल्स डिपार्टमेंटला काम करीत होतो. त्यामुळे फिरस्ती व जेवणातही अनियमितपणा असायचा. १९९० नंतर वर्षातून २ ते ३ वेळा घसा आतून लाल होऊन सूज यायची. ईएनटी स्पेशालिस्ट यांच्याकडून औषधोपचार घेतल्यानंतर तात्पुरते बरे वाटायचे. पण पुढे-पुढे हे प्रमाण वाढले आणि ईएनटी विशेषज्ञ यांनी सांगितले की तुम्हाला धुळीची ॲलर्जी आहे, ती टाळा. २००५ साली हे घशाचे दुखणे जास्तच वाढले तेव्हा योगायोगाने डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याविषयी माहिती मिळाली. डॉक्टरांना मी माझ्या दुखण्याविषयी सर्व पार्श्वभूमी सांगितली आणि मला होणा-या घशाच्या त्रासामुळे मला गाता येत नाही. मला भक्तीसंगीत, नाट्यसंगीत गाण्याची आवड आहे. मला होणारा त्रास यावर काही उपाय आहे की नाही. डॉक्टरांनी त्यांच्या नेहमीच्या मिश्कील शैलीत सांगितले, 'काळजी करू नको. ५ ते ६ महिने औषधे घे पूर्णपणे बरे वाटेल' त्याप्रमाणे मी औषधोपचार घेतला आणि ६ महिन्यांनंतर लगेचच लक्षणीय फरक जाणवू लागला. आता मी अगदी व्यवस्थित आहे व पूर्ववत गातोही. एवढेच नव्हे तर कुटुंबीय मंडळींना प्रकृतीबाबत कोणताही त्रास असला तरी त्यांच्या संजीवनी औषधोपचाराने लगेच गुण येतो. त्यांच्या सहवासात आल्यानंतर कळले की ते एक फार मोठे साधक आणि सिद्ध पुरुष आहेत. त्याचबरोबर अबोली प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणारे थोर व्यक्तिमत्त्व आहे. अशा दैवी व्यक्तीस उदंड आयुष्य लाभो व समाजाची सेवा त्यांच्याकडून होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

डॉक्टरांचा ऋणी...
शंकर वामन पिंगळे, जामनेर

## सर्वधर्म समभाव

डॉ. सुनिलदत्त के बारें में जितना बोले, कहे, लिखे उतना कम है। मुझे गर्भाशय मे छोटी-छोटी पाँच गाठे थी। बाबा की दवाई से ऑपरेशन न करवाते गल गई। यह मेरे लिए कोई चमत्कार से कम न था। अगर मैं आज दादी बन पाई हूँ तो उनकी बदौलत है। उन्हें धर्म प्रति अथांग प्रेम है, उनकी शांत, गंभीर सुखमुद्रा मन को मोह लेती है। उनका ललाट दैदीप्यमान है। वे सर्वधर्म समभाव मानते हैं। उनके लिए कोई बडा-छोटा नहीं। सबको एक समान देखते है। मेरे लिए और मेरे परिवार वालों के लिए बाबा अलौकिक है। अल्प शब्दों में मैं विराम लेती हूँ।

- दमयंती एम. जैन

## आशा किरण

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याबद्दल मोजक्याच शब्दांत लिहायचे अथवा बोलायचे म्हणजे प्रश्नच आहे. कारण विश्वात नाव कमवायला ही त्यांची वैयक्तिक साधना आहे. कारण साध्य करावयाचे असेल साधन हवे. ते साधल्याशिवाय कारण साध्य होत नाही. रुग्णांजवळ पैसा जरी असला पण इलाज नसेल तर त्याला किंमत ती काय? जीवन तर अनमोल आहे. आत्म्याचे शरीर हे वस्त्र आहे, सगळ्यांना माहित आहे. माझे फाटले आहे हे न सांगताच फाटलेले दिसते. ही खरं तर परमार्थदायिनी बुद्धीच आहे. अशी दृष्टी ईश्वरकृपेने मिळालेल्या या सेवेला खरंच मोल नाही. अशी सेवा घेणारे आम्ही सगळे ऋणीच आहोत. आयुष्यात धूसर काळोख जाणवतोही पण आशेचा किरण दिसतो हा भगवंत प्रसादच होय. पैशात त्याची किंमत कोण मोजेल? तो सगळ्यांनाच मिळतो असे नाही. ज्यांना खरंच गरज आहे त्यांना मिळावा व आपल्या सर्वांसाठीच त्यांचे नित्य जीवन उत्तरोत्तर आनंददायी, मंगलदायी, फलदायी होवो ही श्रीमंगलमूर्तीला प्रार्थना!

धन्यवाद ! हरिः ॐ

## कृपा-दृष्टी

निःस्वार्थ होकर कार्य करे,
स्वार्थ की कही चाह नहीं।
अभिमान का कही लेश नही,
कष्ट की परवाह नही।
कुछ भी न करे अपने लिए,
सब कार्य हमारे लिए।
पूजा करे या पाठ करे,
सब प्रेम हमारे लिए।
सेवा बाबा की करे सदा,
हम सब है उसपर फिदा।
भाये हमे उसकी सेवा की अदा,
हमपर कृपादृष्टी रहे सदा...।

अखंड अविरत व्रत सेवेचे,
बोर बाभळीत पाय वाटेचे,
लिहून का हे समजायचे,
अबोल व्रत हे जनसेवेचे,
बोलून नाही समजायचे,
लीन होऊन मौन राहायचे...
शत जन्म तुम्हा घ्यावयाचे,
शत जन्म तुम्हा घ्यावयाचे...

- संग्रहकर्ता व मनोगत :

सौ. सुरेखा गोविंद सोमाणी




खडे बोल डॉक्टरांचे...

## त्यागी सेवाभावी चरित्र

आदरणीय डॉक्टर साहेब,   मी बघितलेले माझ्या जीवनातील दोन आयडॉल -

१. डॉ. अविनाश आचार्य          २. श्रीमान डॉ. सुनिलदत्त चौधरी

जीवनाला लांबी (वय), रुंदी (प्रकृती) आणि खोली (इतरांसाठी तुम्ही काय केले?) आहे.
माणसाचे खरेपण या तिसऱ्या मितीवर ठरते.

रुग्णाची गरज - त्याची जाणिव - त्याचा विश्वास समजून घेणारे व्यक्तिमत्त्व वरील आदरणीय आयडॉलमध्ये भगवंताने भरभरून दिले आहे.

सचोटी - सेवाभाव - त्याग या त्रिसूत्रीवर यश संपादणारे यशस्वी आयडॉल.

आदरणीय डॉक्टरसाहेबांनी मातृत्त्वाची भावना काय असते हे जाणून डॉक्टरांचा अचूक सल्ल्याने (मार्गदर्शनाने) - निदान - यशस्वी औषधोपचाराने अनेक माता-भगिनींना मातृत्त्व बहाल केलेले आहे (मातृ देवो भव).
'कलियुगातील संजीवनी (होमिओपॅथी)' तसेच बहुगुणी औषधोपचार पद्धत म्हणजे होमिओपॅथी !
शिर्डीच्या साईबाबांचे एक वचन आहे - "शिर्डीस ज्याचे लागतील पाय, त्या सर्वांचे टळतील अपाय." त्याचप्रमाणे आपल्या सहवासातील प्रत्येक रुग्ण हा आपल्या दृष्टीने - औषधोपचाराने - तंदुरुस्त होतो ! हा आमचा सर्व रुग्णांचा अनुभव.

अबोली प्रतिष्ठानच्या (वतीने) माध्यमातून आपण जे कार्य कार्यान्वित केले आहे ते अखंड चालू राहो!

धन्यवाद!

- प्रवीण मनोहर पाटील

# हरवली हो माझी माय...

हरवली हो माझी माय,
चूक येथे कोणाचीच नाही,
पण कुठे आहे सापडत नाही...

शेजारी जरी बसलेली असली तरी,
माझ्याकडे बघायला तिला जमत नाही...

हसायची जिला असायची घाई,
हसू तिला आता आठवत नाही,
खरंच हो! हरवली आहे कशात तरी माझी आई...

बोलल्या वाचून जिला कधी करमायचे नाही
ती तासन्तास काहीच बोलत नाही...

कामांबद्दल जिची कधी नसायची दिरंगाई,
आता तिच्या कामांची नुसती लाईनच पडून राही,
कुणीतरी शोधा हो! हरवली आहे माझी माय...

नोकरी विना जिला जगणं कठीण होतं,
आता नोकरीच्या नावानेसुद्धा सुद्धा रडायला होतं...

अशी नव्हती माझी माय,
शोधूनही मार्ग तिला सापडत नाय,
खरंच इतकी हरवली ही माझी माय...

तुमच्याकडे आहे एक महान शक्ती,
आणि आम्ही करतो तुमची भक्ती,
म्हणूनच करतो एकच गय,
शोधून द्या हो माझी हरवलेली माय...!

- डॉ. सुयोग सोमाणी

## मानवता का मसीहा

आदरणीय डॉ. सुनिलदत्त साहेब,

सूरज के साथ सूरज कि रोशनी रहती है,
चाँद के साथ आसमाँ में चाँदनी रहती है।
आपकी दवा के साथ हर इन्सान के लिए दुआ रहती है।
शुक्रगुजार है हम ईश्वर के
जिसने आप जैसे फरिश्ते को
दुनिया में भेज कर
धरती की शोभा बढाई है।
हमारी शुभकामना है आपसे
बेपनाह उँचाई पर आप चढते रहें
समाज सेवा आप निरन्तर करते रहे
जब तक है ये जिन्दगी
दुनिया में आप जैसे मसीहा अवतरित होते रहें।

- सौ. माधवी सुरेन्द्र आसावा

**आकाश अंत न कळुनिही अंतरिक्षी।**
**आकाश आक्रमिती शक्तनुसार पक्षी।।**

हे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून मी डॉक्टरसाहेबांचे व्यक्तिमत्त्व शब्दांत उतरविण्याचे एक फसवे धाडस करीत आहे. निव्वळ शब्दात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे किंवा न्याय देणे हे खरोखरच कठीण आहे व ते फारच मर्यादित होईल असेही मला वाटते. प्रथम मी त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन करतो. डॉक्टरांचे जीवन एक ज्वलंत प्रमाण आहे. त्यांच्या जीवनाची अनेक अंगे आहेत. डॉक्टरांचा त्यांच्या क्षेत्रातील अधिकार किती मोठा व विस्तृत आहे हे सांगणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखे आहे व तो कोणीही नाकारू शकत नाही. त्यांचे व्यक्तिमत्त्व नेहमीच हसतमुख, उत्साही, चैतन्यमय, आल्हादकारक व नित्यनूतन आहे.

जून १९९७ मध्ये संधीवातासारख्या असाध्य आजाराने आजारी पडल्यावर मी १३ जुलै १९९८ पासून डॉक्टरांच्या चरणावर लीन झालो. पहिल्याच भेटीत मला त्यांच्याविषयी विश्वास निर्माण होऊन त्यांना सोडून दुसरीकडे कुठेही जायचे नाही हे मी ठरवूनच टाकले. मी अगदीच अंथरूणाला खिळलो होतो. माझा जीवनावरचा विश्वास पूर्णपणे उडाला होता. मी पुन्हा कधीही चालू शकणार नाही व असाच पलंगावर वेदनांनी आयुष्य घालवणार असे मला वाटत होते. परंतु डॉक्टरांनी नवीन आशा पल्लवित करून वेळोवेळी सावरले व धीर दिला. उपचार सुरू केल्यानंतर तीन वर्षांनी मी थोडा चालायला लागलो व पाच वर्षांनी पूर्ण निरोगी झालो. डॉक्टरांनी मला जणू नवीन जन्मच दिला व मी पुन्हा एकदा आयुष्यात पहिले पाऊल टाकले. याचे श्रेय सर्वश्री डॉक्टरांनाच जाते. यात माझा संयम, विश्वास व श्रद्धा तर डॉक्टरांची चिकाटी, मेहनत, परिपूर्ण अभ्यास या गोष्टी नक्कीच महत्त्वाच्या ठरल्यात. आज मी माझ्या पायांवर उभा राहून संसाराला लागलो आहे व माझ्या संसाररूपी वेलीवर एक सुंदर फूल उमलले आहे. डॉक्टरांचे उपकार व ऋण या जन्मी तर मला फेडणे शक्यच नाही. म्हणून मी त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करेन. आई-वडील, गुरू, यांच्या पंक्तीतच त्यांना स्थान आहे. मला आज वाटत नाही की मी इतक्या मोठ्या आजारातून गेलोय. असे वाटते ते एक स्वप्न होते. इतका समूळ नाश त्या आजाराचा होऊन मला विसर पडला आहे. मला एकच प्रश्न पडतो की डॉक्टरांचे उपकार मी फेडू तरी कसे?
डॉक्टरांमध्ये अनेक पैलू दिसून येतात. त्यांच्यातला प्रत्येक पैलू अत्यंत सुंदर व नयनमनोहर आहे. तितकाच मोहक व आकर्षक

आहे. त्यांच्या परमपवित्र सहवासाने चित्त प्रसन्न होऊन मनास हुरूप येतो. निर्भिड, निर्लोभी, निरहंकारी, उत्साही, त्यागी, वास्तववादी, शुद्ध नैतिक आचरण, व्यासंगी, दानी, परोपकारी, विज्ञाननिष्ठ, वैचारिक बैठक, समाजप्रिय, तात्विक, संवेदनशील व धार्मिक असे प्रगल्भ व्यक्तित्व त्यांना लाभले आहे. दैवी गुण संपत्तीची खाण त्यांच्यापाशी आहे.

प्रत्येक ठिकाणी परमेश्वर येऊनच कार्य करीत असतो असे नाही तर काही वेळा परमेश्वर डॉक्टरांसारखे देवदूत पाठवून मानव जातीवर उपकारच करतो व ईश्वरी कार्य त्यांच्यामार्फत करवून घेतो. जी देवाची खरी माणसे असतात ती फारसे बोलत नाहीत. असेच काही डॉक्टरांचे आहे. त्यांच्यासारख्या उत्कट, पवित्र व महान जीवनातून एक जिवंत, चैतन्यमय मूर्तीमंत परमेश्वरच उभा राहतो. मानव जातीच्या उद्धारासाठीच त्यांचा जन्म आहे. समाजातील भावी पिढीसाठी त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे. पेशंटविषयी त्यांची तळमळ खूप जागृत असून ते कोणत्याही कार्याचे अवडंबर न करता राहतात. त्यांचे जीवन एक पुस्तकच होऊ शकते. ईश्वरी वरदहस्त लाभल्याशिवाय एवढे यश व कार्य होऊच शकत नाही यात शंका नाही.

साहित्यातील नऊ रसांपैकी 'अद्‌भुत' या रसाचा संपूर्ण अविष्कार डॉक्टरांच्या जीवनात दिसून येतो. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कर्तृत्वाने त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. खान्देशातील पहिले होमिओपॅथीक 'एम.डी.' होण्याचा त्यांचा मान सर्वोच्च आहे. त्यांनी केलेला विश्वविक्रम नक्कीच अभिमानास्पद आहे. अशा या सह्याद्रीच्या शिखराहून व हिमालयापेक्षाही उंच अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वास 'समाज महर्षि'च म्हटले पाहिजे. त्यांच्या कार्याने ते समाजाचे ऋण फेडीत आहेत. वेदनेतून का होईना मला त्यांचा सहवास लाभला हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांनी सुरू केलेल्या वैद्यकीय व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे पुन्हा मी मनःपूर्वक अभिनंदन करतो व पुढेही ही वर्षानुवर्षे अखंड रुग्णसेवा करण्यासाठी परमेश्वर त्यांना शक्ती देवो. निरोगी, निकोप व दीर्घायुष्य त्यांना लाभो हीच ईश्वरचरणी नम्र प्रार्थना।

- निलेश केशव बारी, जळगांव

Respected Baba, Firstly, very many thanks to you for giving me chance to write something about you. This is my good luck that you gave me this opportunity. Myself Mrs. Mamta Ashwin Khona and my family always feel proud for being a part of you.

मी जून २००७ मध्ये पहिल्यांदा दवाखान्यात आले. माझी बहीण १२ वर्षांपासून दवाखान्यात येते. मला मार्च २००७ मध्ये मुलगी झाली. आईकडे सगळेजण डॉ. बाबांकडे येत. मला पण ते म्हणाले की एक वेळा तू पण स्वतःला आणि मुलीला दाखव. पण मला वाटायचं की तिथे खूप वेळ नंबर लावून बसावं लागतं. पण जेव्हा दुसऱ्यांचे अनुभव ऐकले तेव्हा माझीही इच्छा झाली. जून २००७ मध्ये हिरीका (माझी मुलगी)ची आणि माझी ट्रीटमेंट सुरू केली. मला पाईल्सचा त्रास होता. थोड्या दिवसांतच तो त्रास कमी झाला. मला लगेच आराम पडला.

हिरीकाला सप्टेंबर २००७ मध्ये जेव्हा ती फक्त ६ महिन्यांची होती, खूप बरं नव्हतं. आधी डॉ. बाबांनी औषधही दिलं होतं. पण फरक जाणवत नव्हता. माझ्या सासरच्यांकडून तिची हालत पाहिली जात नव्हती. ते मला म्हणाले की आता तरी ॲलोपॅथी ट्रीटमेंट दे. मग परत होमिओपॅथी दे. पण माझा दादांवर खूप विश्वास होता आणि आजही आहे. मी घरात सगळ्यांचे बोलणे ऐकले पण हिरीकाला दुसऱ्या डॉक्टरकडे नेले नाही.

त्याच दिवशी माझ्या समाधानासाठी डॉक्टर बाबांनी मला एक्स-रे काढायला सांगितला. ज्यात तिला न्युमोनिया असल्याचे रिपोर्टमध्ये कळाले. ती फक्त ६ महिन्यांची होती. त्यामुळे मला फार टेन्शन आले. त्या दिवशी शुक्रवार होता. संध्याकाळी परत डोस घ्यायला बोलवलं होतं. संध्याकाळी मला विचार आला की आता २ दिवस दवाखाना बंद राहील. परंतु संध्याकाळी डोस देतेवेळी डॉ. बाबांनी माझा कॉन्टॅक्ट नंबर लिहून घेतला. नंबर कशासाठी घेतला माझ्या लक्षात आले नाही. परंतु त्याच दिवशी डोसमुळे हिरीका ५० टक्के बरी झालेली होती. सकाळी (दुसऱ्या दिवशी) ११ वाजता बाबांचा फोन आला आणि तिच्या तब्येतीची विचारपूस केली. २

दिवसांतच तिला बरं वाटू लागले. खरंच आज कोणते डॉक्टर आठवणीने आपल्या पेशंटची एवढी काळजी घेऊन विचारपूस करतात. मला तरी अजूनपर्यंत दुसरे कोणी असे डॉक्टर सापडले नाहीत. तुम्हाला सापडले आहेत का? त्या दिवसापासून माझ्या घरातल्यांचाही डॉ. बाबांवर विश्वास बसला. कारण ती फक्त डोसनेच बरी झाली होती. तिला कोणत्याच प्रकारची स्टीम वगैरे दिली नव्हती. मध्यंतरी मी खूप वाईट परिस्थितीतून गेले. त्यावेळेस मला डॉ. बाबांचा फार मोठा आधार मिळाला. आज मी जे काही सुखी जीवन जगत आहे ते फक्त बाबांमुळेच.

अशा या बाबांनी निव्वळ पैसाच नाही कमविला तर 'अबोली प्रतिष्ठान'च्या माध्यमातून त्या पैशांचा उपयोग समाजसेवेसाठी करीत आहेत. सोबतच पेशंटचे मानसिक आणि शारीरिक आजार पण दूर करीत आहेत.


थोडक्यात सांगायचे झाले तर मी माझ्या मनातील भावना खालील गाण्यातून सांगू इच्छितो.

"दीनदुखी के नाथ है बाबा, सब पेशंट के साथ है बाबा।।
अमृत की बरसात है बाबा, सब पे करे उपकार।।
आओ रे आओ सब लोग, चलो बाबा के द्वार।।
दर्शन दवाई से सब कष्ट मिटेंगे, होगा सबका बेडा पार।।"

अशा आमच्या बाबांना कोटी-कोटी प्रणाम आणि परमेश्वर आमच्या बाबांना दीर्घायुष्य देवो हीच प्रभू चरणी प्रार्थना.

- सौ. ममता अश्वीन खोना

## खडे बोल डॉक्टरांचे...



काही होणार नाही, मी बसलाय इथं, पाहतो कसा मरतो ते.

## नर की नारायण?

आदरणीय बाबा,  जय जिनेंद्र!

सदगुणांची व्याख्या त्यांच्याकडे पाहून करावी
विश्वाची व्याप्ती त्यांच्यात पहावी ।।१।।
वेदनेची वाट तेथे संपते
आरोग्याची वाट तेथून सुरू होते ।।२।।
धर्माची व्याख्या त्याने करावी
बोट पकडून त्याने वाट दाखवावी ।।३।।
सुंदरता तेथे वसते,
अलौकिकता तेथे अनुभवता येते ।।४।।
प्रेमाची गोडी तेथे चाखावी,
आशीर्वादाची महती तेथे अनुभवावी ।।५।।
तेथे गेल्यावर अहंकार हवेत विरतो
दुर्गुणांपासून नकळत दूर होतो ।।६।।
मंदिरासारखी पवित्रता तेथे वसते
हृदयाला हवीशी वाटणारी शांतता तेथे असते ।।७।।

मनातला चोर तेथे उघडा पडतो
नकळत सद्‌गुणांचा ठसा उमटतो ।।८।।
तेथे रोज वंदावं असं वाटतं
बोलावणं मात्र क्वचितच येतं ।।९।।
संयोग असून योग येत नाही
मनात असून स्वप्नात दिसत नाही ।।१०।।
त्या चरणांशी आहोत म्हणून भाग्यवान ठरतो
पण, समजून उमजत नाही म्हणून कर्मणेक असतो ।।११।।
भूक-तहान तेथे रावण विसरतात,
पान लावून हवेत तरंगतात ।।१२।।
उगाच का कोणी येथे रांगेत बसतात
मोठे-मोठे सन्मानसुद्धा येथे सन्मान पावतात ।।१३।।
सांगायचं ठरवून गेलेला तेथे सर्व विसरतो,
तरी पण न ऐकता तो सर्व समजतो ।।१४।।

हात न लावता पेशंट तपासतो,
रिपोर्ट न पाहता रोगाचे निदान करतो ।।१५।।
मायच्या भाषेत तो समजवतो,
औषध म्हणून होमिओपॅथीच्या गोळ्या देतो ।।१६।।
माय-बहीण म्हणत-म्हणत पेशंट बरा करतो,
रडत येणा-याला हसत परत पाठवितो ।।१७।।
वर्षभराचे नियोजन करतो
मनात येईल तेव्हा दवाखाना बंद करतो ।।१८।।
अशक्य ते शक्य करतो
पाच दिवसांत देशाला गवसणी घालतो ।।१९।।
व्यावहारिकतेच्या कक्षेबाहेर पैसे उधळतो
त्याचे गणित तोच समजतो ।।२०।।
स्वतःला तो वेडा म्हणवतो
आम्हाला मात्र वेड लावतो ।।२१।।
त्याला डॉक्टर म्हणावं का देव म्हणावं?
ज्याचं-त्याचं त्यानं ठरवावं ।।२२।।

तरीपण तुम्हीच सांगा, असा कां डॉक्टर कुठे असतो?
मी तर म्हणतो, देव हा भूतलावर वसतो ।।२३।।
देव हा भक्तांचाच असतो
त्यांचा अधिकारसुद्धा मोठा असतो ।।२४।।
लायकी नसताना भक्त एवढा माजला
आयुष्यात प्रथमच एकेरी उल्लेख केला ।।२५।।
आजवर असंख्य चुकांवर पांघरूण घातलं
यावेळेससुद्धा पदरात घ्यावं हेच आर्जव ।।२६।।

- रावण सेनेतला एक लहान रावण
**ध. र. सरदार ५०१**

# प्रांजळ...

वैद्यकीय व्यवसायामध्ये प्रांजळपणा तसेच प्रामाणिकपणाने मत मांडणे आणि सरळमार्गी धोरणाने वागणे हे अलिकडे दुर्मीळ झालेले आहे. आमचे डॉ. सुनिलदत्त चौधरी साहेबांमध्ये वरील सर्व गुण आढळतात.

होमिओपॅथी क्षेत्रातील साहेबांचा सखोल अभ्यास वादातीत आहे. विशेष म्हणजे जी औषधी साहेब देतात ती उच्च दर्जाची असतात. बरीचशी औषधी विदेशातून मागविली जातात. अचूक रोगनिदान आणि योग्य औषधोपचार ही साहेबांची वैशिष्ट्ये. केवळ जळगांव जिल्ह्यातीलच नाही तर इतर जिल्ह्यातून आलेले पेशंट मी स्वतः बघितलेले आहे. मी स्वतः डॉक्टरसाहेबांचा १९८९ सालापासून पेशंट आहे.

रुग्णसेवा हीच समाजसेवा हे व्रत डॉक्टरसाहेबांनी स्वीकारले आहे. ज्या व्यक्तीला डॉक्टरसाहेबांकडे पेशंट म्हणून जाण्याची इच्छा निर्माण झाली, त्याच्यावर ईश्वरकृपा झाली असे समजावे. अर्थातच साहेबांच्या औषधामुळे गुण येतो हे निश्चित आहे.

एका प्रांजळ डॉक्टरविषयी प्रांजळपणाने हे मत मांडलेली आहेत. यामध्ये कोठेही अतिशयोक्ती नाही. डॉक्टरसाहेबांच्या रुग्णसेवेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याबद्दल साहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. सुनिलदत्त चौधरी साहेबांना दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

धन्यवाद.

- नरेश एम. पाटील

## मानवतेचा मसिहा

माझ्या अनुभवाप्रमाणे मी बरे झाले. जे कोणत्याही डॉक्टरांनी केले नाही ते डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी केले. मला 'मायग्रेन' हा आजार होता. तो सर्वसाधारण सर्वच स्त्रीयांमध्ये असतो. डॉक्टरांनी रुग्णसेवाच केली व समाजसेवासुद्धा. आपण बरे झालो हेच फार महत्त्वाचं. जिथे उपाय नसतो तिथेपण त्यांच्याकडे उपाय आहे व गरीब व श्रीमंत सर्व समान.

डॉक्टरांनी जन्मास घालण्यापासून ते मरणाच्या दाढेतून काढण्यापर्यंतचे पेशंट मी दवाखान्यात पाहिले आहेत. त्यांना मानवतेचा मसिहा म्हणणेच योग्य आहे. दैवी शक्ती म्हणा किंवा अनुभवाने जर आजारी पडली तर पाय आपोआपच त्यांच्याकडे वळतात, इतका त्यांच्यावर विश्वास आहे.

त्यांच्या सेवेला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांनी ही सेवा अशीच सुरू ठेवावी. त्यांना माझा सादर प्रणाम. ते आदरणीयच आहेत. सर्वांना सामावून घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

सौ. मीना सैंदाणे

## दिशादर्शक

योग्य मार्गावरून चला नेहमी सांगणे,
श्रीमंत-गरीब सगळ्यांशी समान वागणे ।।१ ।।
तुमच्या दोन गोळ्यांनी येतो छान गुण
रुग्णाकडून फिटणार नाही तुमचे ऋण ।।२ ।।
प्रत्येकास तुम्ही दिला मानसिक आधार,
त्यामुळे सगळ्यांचे स्वप्न झाले साकार ।।३ ।।
भेटण्याची तुमची आहे वेगळीच शिस्त
गर्दी केवढी? जरी औषध नाही स्वस्त ।।४ ।।
जेव्हा गरज तेव्हाच भेटण्यास बोलवणार
दोन मिनिटांत रुग्णास वठणीवर आणणार ।।५ ।।
अपंग रुग्णांची करता कारमध्ये सेवा
कधी सांगणार दानपेटीत पैसे ठेवा ।।६ ।।
कधी देणार नाही ईमेल, फोन नंबर
तरी तुमचे रुग्ण असतात जगभर ।।७ ।।

सौ. सुवर्णा बेडेकर, नाशिक

## सुविचार

सत्कर्म करे और नर का नारायण बने।

"पुसणारं कोणी असेल तर
डोळे भरून यायला अर्थ आहे।
कोणाचे डोळे भरणार नसतील तर
मरणसुद्धा व्यर्थ आहे।।

।। ॐ साई राम ।।

विद्यार्थी - अबोली प्रतिष्ठान

## चौकस, जिज्ञासु व्यक्तित्व

श्री शिवराम देवी शालिनीसुता। सदा प्रसन्न दिससी।
गुरुदेवरुपी महान आत्मा। समग्रा समान साहसी।।१।।

सकळा हसवी बळे। महाज्ञानी प्राणतारक।
सुखदायी दुःखहारी । धन्वंतरीदूत नायका।।२।।

देवतारुपी दिनानाथा । भव्य ललाटपालका।
हरिहररुपी सुंदरा। सर्व देवी-देवता भजका।।३।।

जटा त्या ठेविल्या माथा। कानात बाळी वरी।
करी सुवर्णकडे । गळ्यात रुद्रधारी ।।४।।

उभा ठाकताच पर्वत भासे। असे प्रचंड बाहूधारी।
कटाक्ष टाकताच दिसे। महाविद्युलतेपरी।।५।।

अनेक वेळोवेळी जाऊनी। परदेश दौ-यावरी।
शोधून विशेष औषधीज्ञान। करसी माया रुग्णावरी।।६।।

करूनी अभ्यास। रात्रंदिवस स्वमनोगते।
टाकिसी मागे। औषधशास्त्रही स्वपरीक्षे।।७।।

पुरातन मूर्ती-मंदिरास। देसी नवरूप जिर्णोद्धारातूनी।
भक्तगणांस ऐकविसी देवकथा। प्रवचनकार महान बोलावुनी।।८।।

लेहतूनी निघालास। भारतध्वज घेऊनी हाती।
पाहता विराट रुपी तुझे। संकटे सर्व विरुनी जाती।।९।।

बाहू फुरफुरती, नेत्र जळजळती। पाहण्यास विवेकानंद समाधी।
उत्तर-दक्षिण टोके प्रवास करूनी।
भारतध्वज कन्याकुमारीत उभारी।।१०।।

अणुपासोनी ब्रह्मांडाएवढे। ज्ञानवत्र तुझे।
दिशोदिशी पसरे। यास तुलना नसे कोठे।।११।।

धनद्रव्य संपत्ती कमाऊनी। ना ठेविसी पदरी।
वाटसी सर्व भक्तजना। गोर-गरिबांवरी।।१२।।

गरिबी देखिली डोळा। ग्रासिले दुःख-दैन्याला।
बांधसी निवासी शाळा। दीन विद्यार्थी वर्गाला।।१३।।

आनंदरूप तुझे पाहता। रोगव्याधी चिंता नासती।
रौद्ररुप तुझे दिसता। भलेभलेही लटलटती।।१४।।

सर्व ठायी अग्रगणू। सर्व कुळी सन्मानु।
गुरुदेवरुपी अंतर जाणसी। दर्शनमात्रे दोष घालसी।।१५।।

हे पंधरा श्लोक खरी। तुज लाभती शोभती।
तुझसी राहती दृढ जे। अंती सर्व सुख पावती।।१६।।

इतिश्री-सोमनाथंकृत सर्व आनंददायक।
वैद्य श्री सुनिलदत्त स्तुती सुमन संपूर्णम।।

शब्दसुमनांजली सद्‌भावनार्पण!!!
दादासो श्री ओंकार पितांबर पोतदार, नांदगांव

## सामर्थ्य

चिटी यह कहकर अपनी चाल को नहीं रोकती कि
मैं हाथी की बराबरी नहीं कर सकती।

वह हाथी के समान नहीं चल सकती तो भी चलना जारी रखती है
और अपने खाने तथा घर बनाने का ऐसा प्रयत्न करती है
कि जिसे देखकर बडे-बडे वैज्ञानिकों को दंग रह जाना पडता है।
आप भी अपनी शक्ति व सामर्थ्य के अनुसार आगे बढने का
प्रयत्न कीजिए । यही आशीर्वाद है।

शुभकामनाएँ...

- श्री. हुकुमीचंदजी लुंकड

## सद्‌गुरु

ईश्वरकृपेने व होमिओपॅथीच्या औषधांद्वारे रुग्णांना बरे
केले. ते असे की मिळालेल्या आयुष्यातून पन्नास टक्के
आयुष्य हे ईश्वरसेवेसाठी खर्च करतात व मिळालेली
धनसंपत्तीमधून पन्नास टक्के धनसंपत्ती ईश्वरचरणी अर्पण
करतात. तुम्ही एक सद्‌गुरू आहात, अंतर्ज्ञानी आहात.
रुग्णांना औषधी देणं हे एक तुमचे निमित्त आहे.

- डॉ. जे. एम. पाटील, खेडीभोकरी

## सर्वधर्मसमभाव

अबोली या संस्थेचे प्रवर्तक माननीय श्री. डॉ. सुनिलदत्त चौधरी म्हणजे अजब, आश्चर्यकारक व परिणामकारक रसायन.
कोणत्याही जाती-धर्माचे क्रॉनिक रुग्ण, असाध्य रोगाने पछाडलेले वृद्ध, तरुण, लहान देवाघरची मुलं, कोणत्याही आजाराने कितीतरी ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून किंवा वैद्यांकडून औषधोपचार घेऊन थकल्यावर 'अबोलीत' येतात तेव्हा ही अबोली त्यांना बोलकी करतेच व अशा या असाध्य रोगापासून पूर्णपणे बरे होऊन ते सुखात आपले जीवन व्यतीत करतात.

गेल्या २५ वर्षांपासून मी व माझे पूर्ण कुटुंब म्हणजे दादा (आजोबा) आमची पाच मुलं, त्यांची मुलं-मुली जन्मल्यापासून आजपर्यंत २१ व्यक्तींचे कुटुंब अबोलीच्या उपचारामुळे आम्ही स्वस्थ आहोत. जैन साधुसंतांच्या औषधोपचाराबद्दल म्हणायचे म्हणजे आधी मला या डॉक्टरसाहेबांना नमन करून सांगावे लागेल की हे डॉक्टरसाहेब स्वतः गाडी चालवत जेथे आमचे जैन साधूसंत असतील तेथे जाऊन औषधोपचार करतात. गेल्या १५-२० वर्षांपासून जळगांवात जे-जे साधूसंत आले त्यांचे औषधोपचार डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी साहेबांनी केले व असे सर्व जैन साधू त्या-त्या आजारातून बरे झालेले आहेत. उदा. आदरणीय जैनाचार्य श्री. राममुनीजी महाराज साहेब, आचार्य श्री रत्नसुंदर विजयजी महाराज साहेब, महासतीजी सुमनप्रभाजी महाराज साहेब अशा कितीतरी साधूसंतांना या डॉक्टरसाहेबांनी बरे केले आहे.

तसेच माझी पत्नी सौ. लिलाबाई जैन यांना संधीवाताचा जबरदस्त त्रास होता. त्यांच्या हाताबोटाला सूज येत होती. त्यांना हातात बांगड्यासुद्धा घालता येत नव्हत्या. त्यांच्या मनगटाजवळ गाठी झालेल्या होत्या. त्यांनी पुणे येथील संधीवाताच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून ३ ते ४ वर्षे औषधोपचार घेतला. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाही. म्हणून त्यांना या डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले.त्यांच्या उपचाराने मात्र माझ्या सौभाग्यवतींना आता खूपच फरक पडला आहे. त्यांना डॉक्टरांच्या उपचाराची खात्री पटल्याने

डॉक्टरांबद्दल आदर निर्माण झाला. म्हणून घरात कोणालाही काहीही त्रास झाला तर त्या डॉक्टरसाहेबांकडेच नेतात. मलादेखील उंदरी व नागीनचा त्रास झाला होता. तोदेखील त्यांच्याच औषधोपचाराने बरा झाला आहे.

विशेष म्हणजे त्यांचा दवाखाना बंद राहण्याच्या तारखा ते ब-याच दिवसांआधी जाहीर करतात. त्यांच्याकडे पेशंटच्या रात्री १२ वाजेपर्यंत रांगा लागतात व औषधे घेऊन जातात. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दरवर्षी हे डॉक्टरसाहेब आपल्या खर्चाने आदिवासी डोंगराळ भागात जाऊन तेथील आदिवासींना ट्रक भरून कपडे, जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करतात व अन्नदानसुद्धा. अशा या अजब रसायन असलेल्या डॉक्टरसाहेबांना चांगले आरोग्य लाभो व ते शतायुषी होवोत. त्यांच्या हातून समाजातील सर्व स्तरातील लोकांना आराम मिळो ही प्रभू चरणी प्रार्थना.

धन्य हो... धन्य हो... अबोली धन्य होवो!

- दलूभाऊ जैन

## होमिओपॅथी आरोग्यसेवक : डॉ. सुनिलदत्त चौधरी

वैद्यकीय शास्त्रात अनेक डॉक्टर व्यक्तिमत्त्वे उदयाला येतात आणि पाहता-पाहता काही या वैद्यकीय सेवेत अयशस्वी होतात. या वैद्यकीय सेवेत केवळ पोट भरण्यासाठी उलटसुलट औषधोपचार, वैद्यकीय उपचार करणारे अनेक आहेत. पण होमिओपॅथी वैद्यकीय व्यवसायात स्वतःचा ठसा उमटविणारे फार थोडे आहेत. त्यात सा-यांच्या अनुभवातून सर्वप्रथम डॉ. सुनिलदत्त चौधरी हेच असावेत असे मला वाटते.

शेतकरी कुटुंबातील वडील, स्वकर्तृत्वाने डॉक्टर होतात आणि वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून 'कौस्तुभ' ते 'अबोली'पर्यंत होमिओपॅथीत एम.डी. ही वैद्यकीय शास्त्रातील उच्च पदवी घेऊन स्वकर्तृत्वाने मोठे झालेल्या माणसाचा हा पंचवीस वर्षांचा जीवनप्रवास. आई-वडिलांचे त्यागपूर्वक आशीर्वाद पाठीशी घेऊन, अखंड पंचवीस वर्षांचा वैद्यकीय प्रवास हा मोठा पल्ला यशस्वीपणे गाठणारे यशस्वी डॉक्टर म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरी हे आहेत.

स्वकर्तृत्वाने मोठं झालेल्या माणसांना जीवनात खडतर संघर्ष अन् नैसर्गिक, मानवनिर्मित संकटांच्या मालिका स्वागतासाठी उभ्या असतात. नियतीही त्यांची पदोपदी सत्त्व परीक्षा घेत असते. तरीही मोडून न पडता खंबीरपणे धीरोदात्त मनाने, स्वआत्मविश्वासाने संकटांवर स्वार होणं हे डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्यासारख्यांनाच जमू शकतं.

'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोचि खरा डॉक्टर असावा!'

याप्रमाणे तळागाळातील रोगग्रस्त, आर्थिकदृष्ट्या हतबल आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व उपेक्षित वर्गांनादेखील सुआरोग्याची सुविधा पाहिजे असते. त्यासाठी वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचाच वारसा पुढे चालविणारे डॉ. सुनिलदत्त चौधरी पंचवीस वर्षांपासून सुआरोग्याची सुविधा देण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. आपण एक धन्वंतरीचे व्रत स्वीकारले आहे. त्या वैद्यकीय व्यवसायाला (विशेष होमिओपॅथीत) न्याय द्यायचा या वृत्तीमुळे त्यांची पंचवीस वर्षांची कारकीर्द नित्य लोकोपयोगी ठरली आहे. लोकांचे व्यक्तिगत रोग जाणून घेतात. तितक्याच आस्थेने रोगग्रस्ताच्या मानसिक व्यथा, कथा, तितक्याच प्रेमभावनेने समजून घेतात. त्यावरही मार्गदर्शक विचारांची मलमपट्टी व्यथित मनास ते आस्थेने करतात. त्यांचा स्वकर्तृत्वाचा आवाका फार मोठा असून, त्यांनी लोकसेवेचे, लोककल्याणाचे अनेक उपक्रम 'अबोली प्रतिष्ठान'मार्फत सुरू केलेले आहे. आज ते अतिउच्च शिखरावर, विराजमान झालेले आहेत. लोक त्यांना देवत्वाने पाहतात.

हीच त्यांच्या वैद्यकीय शास्त्रातील पंचवीस वर्षे 'कर्मयोगा'च्या यशस्वीतेची साक्ष. लोकमान्य आणि किर्तीमान झाले आहेत.

डॉ. सुनिलदत्त चौधरींची विचारपद्धती ही मला आगळी वेगळी दिसून येते. ते म्हणतात, 'समस्या आहे म्हणजे उपाययोजनाही आहेच! जसे प्रश्न आहेत तसे उत्तरही असतेच!' त्यांचा ध्येयवाद, दुर्दम्य आशावाद, इच्छाशक्ती, शिस्तबद्ध जीवन, अथक परिश्रम आणि जीवनाविषयीचा सकारात्मक दृष्टीकोन यामुळे ते पंचवीस वर्षांच्या वाटचालीनंतर या 'देवत्व' स्थानावर पोहोचले आहेत.

स्वातंत्र्याच्या साठीनंतरही आडमार्गावरील गाव-खेड्यातील माणसांना अत्यावश्यक चांगली आरोग्य सुविधा ही वस्तुस्थिती डॉ. सुनिलदत्त चौधरी यांनी लक्षात घेऊन ज्या खेडेगावातील लोकांचे जीवन केवळ ईश्वरी भरवशावर चालले आहे, अशा तळागाळातील माणसाचे दुःख, रोगाची जाणीव लक्षात घेऊन त्यांनी एक दिवस मोफत वैद्यकीय होमिओपॅथी सेवा सुरू केली आहे. गावातील एकही वाडी, वस्ती, घर आरोग्यसेवेविना राहू नये. यासाठी युवकांना हाताशी धरून 'अबोली प्रतिष्ठान'मार्फत 'न्यु व्हीजन २०११'सारखी आरोग्य विकास प्रणाली राबविण्याचे त्यांचे स्वप्न आहे. 'युवाशक्ती' हे त्यांचे महत्त्वाचे आशा स्थान आहे.

रोगग्रस्तांनी आपल्याला भेटायला येण्यापेक्षा आपण एक दिवस गावात जाऊन त्यांना भेटावे, त्यांच्याशी चर्चा करावी अशी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांची भूमिका असते. त्याच चर्चेतून गावच्या सुआरोग्यविकासाबाबत मंथन होते. सतत रोगग्रस्त जनमानसात रमणारे ते खरे वैद्यकीय होमिओपॅथी सुआरोग्य सेवक आहेत व आम्हा सर्वांचे ते मित्र मार्गदर्शक आहेत. त्यांना त्यांच्या २५ वर्षांच्या या आरोग्यसेवेच्या रौप्य महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

थोर संत कबीरांच्या काव्यमय भाषेत सांगावयाचे झाल्यास -

"अकथ कहानी प्रेम की, कछू कही न जाय,<br>
गुंगे केरी सर्करा... बैठे और मुसकाय।" हेच सत्य!

भास्कर पाटील, जळगांव

## खडे बोल डॉक्टरांचे...





यापुढे दुधा-या
करायच्या नाही.

## चिमुकले बाबा

आदरणीय बाबांना सिद्धीचा साष्टांग नमस्कार. बाबा मला तुम्ही खूप आवडतात. कारण तुम्ही इंजेक्शन देत नाहीत व तुमचे औषध व गोळ्याही गोड असतात. शिवाय तुम्ही चॉकलेटही देता. पण तुम्ही आता मला चॉकलेट देत नाहीत व माझ्या लहान भावाला दात नसल्यावरही चॉकलेट का देता?

बाबा, तुम्ही मला 'पोपट' म्हटलेलं खूप आवडतं. पेपरमध्ये तुमचा फोटो पाहील्यावर मला खूप आनंद झाला. पप्पांनी सांगितले की तुम्हाला खूप-खूप मोठे ॲवार्ड मिळाले आहे.

बाबा काही कारण नसतांना पप्पा मला रागावतात, तेव्हा 'तुमचं नाव मी डॉक्टर बाबांना सांगेल' असे मी त्यांना सांगते. पण बाबा तुमचा 'बर्थ डे' कधी असतो? प्लीज मला सांगाल ना?

तुमच्यासोबत दिवाळी साजरी करायला खूप-खूप मजा येते.

- तुमची, सिद्धी

## देवदूत

पूर्वीच्या काळी म्हटलं जायचं की, डॉक्टर साक्षात परमेश्वर असतो. परंतु आता डॉक्टर हा सेवाभावी राहिला नसून, व्यावसायिक झाला आहे. असे असतांना वाळवंटात पाणी सापडावे तसे आमचे डॉक्टर सुनिलदत्त चौधरी आहेत. आजच्या धंदेवाईक डॉक्टरांमध्ये न शोभणारे आपले डॉक्टर हे आमच्यासाठी कायम देवदूत म्हणूनच राहावेत हीच परमेश्वरास प्रार्थना.

- अर्चना अट्रावलकर

## गुरू-शिष्यांचा संवाद

सुनिलदत्त चौधरी हा माझ्या अनेक विद्यार्थ्यांपैकी एक अगदी लक्षात राहण्यासारखा. प्रथमपासूनच खळबळजनक व्यक्तिमत्त्व. विद्यार्थीदशाही लक्षात राहण्यासारखी. त्याच्या बॅचचा तो प्रतिनिधी. एल.सी.ई.एच. चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाल्यावर उमेदवारीच्या काळात संबंधित वैद्यकीय शाखांचा अनुभव घेण्यासाठी प्रत्येकास काही काळ घालवावाच लागतो. डॉ. सुनिलदत्त व त्याचा मित्र डॉ. राज बोंडे होमिओपॅथी शिकण्यासाठी माझ्याकडे आले. या दुक्कलीने माझ्याकडे सुमारे दीड ते दोन वर्षे होमिओपॅथीतील शिक्षणाचे धडे घेतले. त्यावेळी त्यांची जवळून व खरी ओळख झाली. त्यांची या क्षेत्रातील जिज्ञासा जाणवली. वास्तविक या दोघांचेही वडील चांगल्यापैकी डॉक्टर आहेत व त्यांची त्यांच्या भागात चांगल्यापैकी प्रॅक्टीस चालू असताना प्रचलित प्रॅक्टीस सोडून माझ्याकडे होमिओपॅथी शिकण्यास आल्यावर प्रथम मला आश्चर्य व नंतर कौतुक वाटले. माझ्याकडून जमेल तेवढी शिदोरी घेतल्यावर व होमिओपॅथीत काहीतरी वेगळे व अद्‌भुत आहे हे पटल्यावर दोघांनीही स्वतंत्रपणे होमिओपॅथीतच प्रॅक्टीस चालू केली. दोघांनीही या क्षेत्रात चांगला जम बसविला.

डॉ. सुनिलदत्तने प्रामाणिकपणे व कष्टाने स्वतःच्या हिमतीवर जळगांवमध्ये होमिओपॅथीमध्ये उत्तम जम बसविला व या क्षेत्रात व्यवसाय दृढ केला. नंतरच्या काळामध्ये त्याने एम.डी. (होमिओ) ही पदवी संपादन केली. डॉ. सुनिलदत्तच्या वैद्यकीय कारकिर्दीस जवळपास पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. स्वकष्टावर व प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून होमिओपॅथी क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे व लोकांमध्ये विश्वासार्हता मिळविली आहे.

माझ्या प्राध्यापकीय व व्यावसायिक क्षेत्रातील जवळपास ३५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये अनेक विद्यार्थी जवळ आले, परिचयाचे झाले, त्यातील काहीच आपले व नंतर माझे झाले. त्यापैकी एक डॉ. सुनिलदत्त चौधरी अगदी विरळे व्यक्तिमत्त्व. डॉ. सुनिलदत्त चौधरी ईश्वरनिष्ठ आहे. आपल्या गुरुजनांचा सार्थ अभिमान असणारा आहे व त्यांच्याविषयी सहृद आदर असणारा आहे. स्वतःच्या मतांशी प्रामाणिक व एकनिष्ठ असणारा व स्पष्टवक्ता आहे. ज्या समाजामधून येथवर मजल मारली त्या समाजाची कदर करणारा

व धडपडणारा, स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे आलेला आहे. गोरगरिबांना मदत करणारा असा हा माझा विद्यार्थी!

डॉ. सुनिलदत्त चौधरीने आज व्यावसायिक क्षेत्रात उत्तम नावलौकिक मिळवून यशाच्या उच्च शिखरावर उभा आहे. त्याचा लोकसंग्रहही भरपूर आहे. डॉ. सुनिलदत्त कष्टाळू, गुणग्राहक, स्वाभिमानी, निश्चयी व व्यवहार चतुर या पंचकोंदणात उठून दिसणारा आहे. आज यानिमित्त मी त्यास अनेक शुभाशीर्वाद देतो. त्याचबरोबर त्याला साथ देणारी त्याची धर्मपत्नी डॉ. सौ. स्मिता (माझी विद्यार्थिनी) व सुपुत्र चि. राघव यांनाही अनेक आशीर्वाद देतो.

आम्हा सर्व कुटुंबियांकडून डॉ. सुनिलदत्त यास दीर्घायुष्य व आयुरारोग्य लाभो हीच सदिच्छा शुभेच्छा !

।। शुभं भवतु, शुभं भवतु, शुभं भवतु ।।

- डॉ. उदय कुलकर्णी, पुणे

## अध्यात्मीक पण आधुनिक

माझ्या मते तुम्ही ईश्वरीय कृपेनेच व होमिओपॅथीच्या औषधीद्वारे रुग्णांना बरे केले. कारण मी ॲलोपॅथी घेऊनही बरी होत नव्हते आणि माझा आजार दिवसेंदिवस वाढत चालला होता. आणि जेव्हा मला त्रास व्हायचा तेव्हा मला जगावसं वाटत नव्हतं. पण अंधाराच्या काळोखात जशी सूर्यप्रकाशाची किरणं येतात तसे तुमच्या बद्दल कळलं. दोन वर्ष झाली तुमची औषधं घेत आहे. मी हळूहळू अगदी बरी होत आहे.

- रेणू प्रसाद पांडे, भुसावळ

## वटवृक्ष

अमावस्या, पूर्णिमा आती है,
इसका श्रेय समय को जाता है।
बीज से वृक्ष बनता है,
इसका श्रेय अच्छी खाद और माली की देखभाल को जाता है।
नदी से सागर बनता है,
इसका श्रेय उसकी विहार यात्रा को जाता है।
परंतु रोगग्रस्त, दुखी आत्मा सुखी होता है,
इसका श्रेय डॉक्टर सुनिदलदत्त चौधरी को जाता है।

संग्राहक - लोकेश लुंकड

## परिपूर्णता

डॉक्टर साहब,
आप में संस्कार के साथ शिक्षण,
आप में नीति के साथ धन,
आप में संयम के साथ भोग,
आप में स्नेह के साथ संबंध,
आप में हीत के साथ सुख,
आप में मर्यादा के साथ सफलता
उपलब्ध है।

संग्राहक - विश्वास राजेंद्र लुंकड

Friends, Philospher, Guide - is what every person needs in life.

Another very important person in evry family is your 'Doctor'. Doctor the right word for the person taking care of your health. But apart from taking care of your health when he powers to be not only your friend, philospher, Guide, but also a person who's there for you to help you out in every sphere of your life, the one who's just a voice and a call away from you - ever ready for every care and guidence you need. That's what Dr. Sunildutta Chaudhari is to us "Grover's"

No doubt, He's taking care and guiding us in every aspect of our life. They ray when 'GOD' cannot be present for each person, each moment, he doe's send his messangers for his loved one's.

We Gurmit Singh Grover and Family will undoubtly be ever indebted to our Dear friend Sunil Dutta the co-operation, care, love and blessing he has showered on our family. Apart from his duties towards his patients he has always emerged as a person dedicating a major part of his life towards the welfare and betterment of the poor and downtrodden parts of the society. And those knowing him must be so much aware about the religious side of his personality and his immense devotion and aastha towards 'GOD'.

So we 'Grover's' earnestly wish to give our heart few Good Wishes to our atmost dear friend Sunil and on this aspicous and well deserved ocassion of completing his 25 years of the servival he has rendered towards his patients, his loved one's, society the poor and each one. We take the opportunity of thanking Dear Sunil for he has been doing for us without any expectations - though 'Thanks' the word is just not enough to repay his deeds.

All we can do is pray for him and wish 'God' to shower all his Blessings for 'Sunil' today and always. May this silver Jubilee soon turn to the Golden one. Our Best Wishes.

S. Gurmit Singh Grover

## परोपकारी

सतयुग गेला आणि कलीयुग आला. सत्ययुगात प्रत्यक्ष परमेश्वरांनी, साधू, संत यांनी जन्म घेतला. परंतु तुम्ही म्हणाल, सत्ययुग केव्हा येईल. तर जनता जनार्दन हो सत्ययुग येईल तेव्हा येईल. आता तर आपण कलीयुगात आहोत ना? तर कलीयुगात जनता मंदिरात २ धाम करून पुण्य कमविण्याचा प्रयत्न करतात. अर्थात ते या युगात करावयासच पाहिजे.

परंतु हे जनता जनार्दन हो परमेश्वरास ओळखणे इतकी साधी आणि सोपी गोष्ट आता तरी राहिलेली नाही. तरी तुम्हास मी सांगू इच्छितो, तुम्ही ज्या डॉक्टरांची म्हणजे श्री. सुनिलदत्त चौधरी यांची ट्रीटमेंट घेत आहेत त्यांना काय तुम्ही फक्त हुशार डॉक्टर समजतात. परमेश्वर कोणत्या रुपात या पृथ्वीतलावर जन्म घेईल हे सांगता येत नाही. तर डॉ. सुनिलदत्त चौधरी हे प्रत्यक्ष परमेश्वर अवतारी पुरुषच आहेत. त्यांच्यासमोर आपण ज्यावेळी औषध घेण्यासाठी बसतो, त्यावेळी तुम्ही ज्या कोणत्या परमेश्वरास मानतात तोच परमेश्वर प्रत्यक्ष तुमच्या समोर बसलेला असतो.

या महिन्यात त्यांच्या दवाखान्यास २५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या २० वर्षांच्या कालावधीत त्यांनी पैसा, कमविला हे जरी सत्य असले तरी त्याहूनही त्यांनी दानधर्म केलेत, पुष्कळ मंदिरांसाठी देणग्या दिल्यात. असे ते दानशूर आहेत. गोरगरिबांचे ते सतत कैवारी राहिलेले आहेत. त्यांना औषध तर मोफत देतातच, त्याचबरोबर त्यांच्या परीने त्यांना पैसेसुद्धा देतात. औषध दिल्यानंतर ते किती पैसे घेतात याला महत्त्व नाही. त्यासाठी त्यांना किती विचार करावा लागतो, तेसुद्धा २-३ मिनिटांतच. तसेच त्या औषधाची किंमतसुद्धा तशीच असते. हे सर्व मी तुम्हास तोंडी सांगत नाही तर प्रत्यक्ष माझ्यावर बेतलेल्या अनुभवावरून सांगतो.

साधारणतः ५ वर्षांपूर्वी माझ्यावर जॉईंट बदलण्याची वेळ आली होती. त्यासाठी तीन ते सव्वातीन लाख खर्च सांगितला. परंतु तीन ते सव्वातीन लाख खर्च करूनसुद्धा त्यांनी मला इतके पथ्य सांगितले की इतके पथ्य पाळणे मला शक्यच नव्हते. त्यांनी सांगितले

ऑपरेशन झाल्यावर सांधा १ महिना टिकेल किंवा १० वर्ष टिकेल. कारण मी त्यांना विचारले होते की सर मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे पैसे खर्च करण्यास तयार आहे. परंतु सांधा किती वर्षे टिकेल? तर त्यांनी वर सांगितल्याप्रमाणे या सर्व ॲलोपॅथीक डॉक्टरांनी मला उत्तर दिले. त्यावेळी मला काठी घेऊनसुद्धा चालता येत नव्हते. शेवटी मी हार मानली व आता आपले काही खरे नाही असे धरूनच चालत होतो.

परंतु म्हणतात ना भगवान के घर देर है अंधेर नहीं. त्याप्रमाणे मला परमेश्वराने बुद्धी सुचविली आणि मी श्री. डॉक्टर सुनिलदत्त दादा चौधरी यांच्याकडे आलो. त्यांनी ॲलोपॅथीक डॉक्टरांनी सांगितलेले एक्स-रे, तसेच सोनोग्राफी, तसेच एम.आय.आर. हेच पाहिले. त्यांनी मला कुठलीही टेस्ट करण्यास सांगितले नाही. फक्त ५ मिनिटांतच माझे डायग्नोसीस करून मला सांगितले की मी तुझा पाय (हिप जॉईंट) चांगला करून दाखवितो. नाही करून दाखविला तर माझे नाव डॉ. सुनिलदत्त सांगणार नाही. तर हे जनता जनार्दन हो मी आज तुमच्यासमोर उभा आहे ते केवळ श्री डॉक्टर सुनिलदत्त दादा चौधरींमुळे. त्यांनी कुठलेच पथ्य सांगितले नाही. फक्त मोटर सायकल चालवू नको एवढेच सांगितले. आणि चालवायचीच असेल तर बटन स्टार्ट स्कूटी चालव.

आता माझा सांधा अजिबात दुखत नाही. मी चालू शकतो, कीजीटला जाऊ शकतो. कारण मी सुद्धा एक डॉक्टरच आहे. फक्त सरांनी दिलेली औषधे वेळेवर घेत गेलो. आज तुमच्यासमोर मी उभा आहे. मला चालतांना पहा. मग तुम्ही म्हणाल की या डॉक्टरचा सांधा हिप जॉईंट खरंच खराब झाला होता की नाही. ते हे जनता जनार्दन हे ॲलोपॅथीक डॉक्टर तीन लाख घेऊन........................

डॉ. अत्तरदे, नांदेड




## खडे बोल डॉक्टरांचे...

## श्रद्धा के पुष्प

आदरणीय बाबा, मेरी श्रद्धा के पुष्प...
शब्दों में महकते हुए जिसे अर्पित करना चाहती हूँ
भावना के चंदन के साथ
मेरी आत्मा का साक्षात्कार अक्सर होता है ईश्वर के साथ
मैं नहीं जानती क्यों... दिल में,
एक पवित्रता का एहसास पनपता है उनके लिए क्योंकि
एक दैविकता का एहसास
आशीर्वाद देता दिखाई पडता है
आंसू जब मुस्कान में बदलते हैं
मुझे पता नही शायद इसे वे भगवान कहते हैं
लेकीन मै तो बस इस देवदूत को जानती हूँ
जिसकी पनाहोने मेरी निगाहों को रोशन किया
मेरी अंतरआत्मा से निकली हुई सांसो को
जिंदा किया है
मेरी श्रद्धा के पुष्प...

आपकी बेटी, अनुजा कांकरिया

## एक तीर्थक्षेत्र

सुंदर, स्वच्छ निर्मल दारात
नांदत आहे तिथे दत्ताचे अवतार
कष्ट स्वतः करतात अपार
दुःख स्वतः झेलूनी मदत करतात सर्वांना फार
गरीब विद्यार्थ्यांना देती ज्ञान
दीनदुखियांना करितात दुख निहार
तुमच्यासारखे जगामध्ये नाही कोणी देव अवतार
आशीर्वाद तुमचे मोतियाचे हार
तीर्थक्षेत्रासारखे श्रेष्ठ तुमचे हे गुरुद्वार
सकाळ-संध्याकाळ वाटतो तिथे मंदिराचा सहवास
राहतात तिथे देव अवतार
लिहायला शब्द अपुरे पडतात फार
सातही जन्म फेडू शकणार नाही
आम्ही तुमचे उपकार

- सौ. उज्ज्वला डिगंबरराव पाटील

मी सातारा येथे युनायटेड वेस्टर्न बँकेत १९९६ साली असताना जुलैच्या शेवटच्या आठवड्यात खान्देशात माझ्या गावी नेहमीप्रमाणे आलो व लगेच परत निघालो. त्या काळी आमच्या बँकेत नुकतेच संगणकीकरण चालू होते. त्यामुळे मी सतत कामात गर्क होतो. सहजगत्या पायाला कुरूप झाल्यासारखे वाटले. म्हणून ते ब्लेडने काढून टाकले. पण एके दिवशी अचानक माझे साडू माझ्याकडे आले, तेव्हा त्यांना घेऊन घरी आला तर सालीने प्रश्न केला, आपल्या हातास काय झाले? बोटं का सुजली? मी चकीत होऊन पाहिले तर खरोखर हाताच्या बोटांना सूज आली होती व खाज येऊन बोटं चोळली तर सूज वाढली व नंतर त्यातून पाणी येऊ लागले.

त्वचाविकार तज्ज्ञांना दाखवले तर त्यांनी काही औषधे लिहून दिली. परंतु लवकर फरक नाही. निदान केमोप्लाज्मा असे केले व काही दिवसांनी हात बरे झाले.

ही स्थिती पुन्हा १९९८ साली ऑगस्ट महिन्यात कोल्हापूर येथे असताना पुनरावृत्ती झाली. शंका अशी की कोऱ्या कागदावर काम करत असल्यामुळे झाले असावे. याही वेळा स्टेरॉईडस् वापरली. पुन्हा जळगांवी असताना ऑगस्ट महिन्यात एम.आर.सी.पी. प्रोजेक्ट करीत असताना प्रवास व जागरणामुळे परत लक्षणे दिसून पायावरही परिणाम झाला. तेथे एक एक्स मिलिटरी होते. त्यांनीही स्टेरॉईडस् दिली. तोंड अतिशय आले व पुन्हा त्यांच्याकडे गेलो असता सल्ला मिळाला, आता ॲलोपॅथी बंद करा. सतत रिकरन्स होईल व हाय स्टेरॉईडस् काम देणार नाहीत. शेवटी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याकडे आलो. प्रथम उपचारांती समाधान झाले, पण मध्यंतरी पुन्हा काही कारणास्तव मलम वापरले, तर पुन्हा त्रास वाढला. डॉक्टरांना दाखवले, ते रागावले पण शेवटी उपचार सुरू केला व काही पदार्थ - दूध बंद केले.

२००० ते २००७ या काळात त्रास झाला नाही, परंतु २००७ मध्ये घरी पाहुणे आले. त्यासोबत बासुंदी खाल्ली व हे दोन-तीन वेळा झाले, तेव्हा ऑगस्ट २००७ मध्ये त्रास वाढला. मुलगी डॉक्टर, तिने ॲलोपॅथी उपचार केला. पण दीड महिना अंथरुणात होतो. थोडे बरे वाटले. नंतर चालणे इतपत झाल्यावर डॉक्टरांकडे गेलो व हकिकत सांगितली. पुन्हा दरमहा तपश्चर्या सुरू झाली, पण आज स्वास्थ्य ठीक आहे. काय झाले माहित नाही, पण कोणी वाचवले ते विसरू शकत नाही.

| | | |
|---|---|---|
| सु | - | सुंदर मन |
| नी | - | निष्ठा कामातील |
| ल | - | लक्षात ठेवण्याची खुबी |
| द | - | दक्ष |
| त्त | - | प्रसन्न चित्त |
| चौ | - | चौकस वृत्ती |
| ध | - | धार्मिकता |
| री | - | रिकामपणातही सेवा वृत्ती |
| | | विसरू शकत नाही. |

- विजय महाजन, मालेगाव

## कल्पवृक्ष

आजही ते दिवस आठवतात. मी आणि माझी मुलगी दोघीजणी आजाराने अगदी चिंताग्रस्त झालो होतो. आम्ही मुंबईपर्यंत जाऊन पोहोचलो. असंख्य चाचण्या झाल्या. पण एकाही औषधीचा गुण लागला नाही. सांगायला बसलो तर या छोट्या-छोट्या आजारांचे मोठमोठे किस्से व त्यांचे रूपांतर कसे मोठ्या आजारात झाले, हा अनुभव अगदी अंगावर शहारे आणण्यासारख आहे.

एके दिवशी डॉ. सुनिलदत्त चौधरींबाबत कळाले व मी जळगावला जायचा निर्णय घेतला. तिथे दवाखान्यात जाताच एक शिस्तबद्ध, नियमबद्ध वातावरण अनुभवायला मिळाले. लहानपणापासून मला समाजसेवेची गोडी होती. पण इतकी निःस्वार्थ सेवा मला माझ्या मनाला फार सुखावून गेली. तेव्हापासून नकळत एक नातं जुळलं की, अबोली माझी व मी अबोलीची!

या दवाखान्यात आल्यावर प्रत्येकाला कळून चुकते की आपण आपल्यासाठी स्वतःच्या शरीरासाठी एक दिवस काढलाच पाहिजे व दिवसातून एक तास तब्येतीकडे लक्ष दिलेच पाहिजे. जीवनात काही नियम, मर्यादा, शिस्त असणे गरजेचे आहेच. बडे-बडे लोक येथे येऊन हजेरी देतात. वेळ झाला तर यादीत डोकावतात. घड्याळाकडे बघतात. पण दाराला कुलूप लागेल या भीतीने तासनूतास बसून राहतात. तिथे कुणाचा वशिला नाही. सर्वांसाठी एकच कायदा, समानता! रुग्ण अगदी चिंताग्रस्त तोंड घेऊन आत जातो व बाहेर आला की एक समाधानाचे हास्य त्याच्या तोंडावर झळकत असते. आता हे डॉक्टर माझ्यासाठी कुणी वैद्य नाही तर माझे वडील, माझे बाबाच मी मानते. तेच माझ्या परिवाराचे दैवत आहेत. ८०-१०० रुग्णांच्या रांगेत मी दिवसभर थांबते. पूर्ण दिवस गेला तरी एक विश्वास असतो की प्रतिक्षेनंतर मला योग्य निदान व समाधान मिळणार आहे.

गेल्या २५ वर्षांपासून बाबा सर्वांच्या सेवेत आहेत. अनेक सामाजिक उपक्रम ते राबवितात. पण त्याची कुठेच प्रसिद्धी नाही. परंतु प्रत्येकाच्या हृदयात मनोमनी बाबांच्या सेवेची, जिव्हाळ्याची, कळकळीची पावती आहे, साक्ष आहे!

"बाबा तुम्ही खरोखरच कल्पवृक्ष आहात,
आधार दुःखितांचे होतात हात तुमचे
सेवाच धर्म तुमचा, सेवेत तीर्थ तुमचे!"

कित्येकांना तुम्ही जीवनदान दिलेत. या अबोलीचे २६ व्या वर्षात पदार्पण म्हणजे आमचे सौभाग्यच! अनेकांना मी घेऊन आले आणि रोगमुक्त केले, याचे मला समाधान आहे. असेच होत राहावे, ही सदिच्छा!

"अर्धे आयुष्य वेचले सेवेत रुग्णांच्या सकळा
वर्ष २५ संपले... आज रुपेरी सोहळा"
या अबोलीला लक्ष-लक्ष शुभेच्छा!
"भेदभाव ना असे कुणाचा अशी शिस्त आपुली,
निःस्वार्थ कर्म शक्तीने किर्ती मनोमनी व्यापली,
सेवा न बोलता, ही एकमेव अबोली...
ही एकमेव अबोली...!"

सौ. मृणाल भूपेंद्र गुजराथी, चोपडा

## वरदहस्त

डॉक्टर साहब, जय श्रीकृष्ण! आपकी कृपासे मेरा परिवार सुख-समृद्धी से है, इसी प्रकार आपका वरदहस्त इस परिवारपर बना रहे। आपकी दवाईसे हमारे परिवार को बहुत फायदा हुआ है। मै आपकी दवाई २४ साल से ले रही हूँ। बस यही चाहती हूँ की मेरी दवाई आप बंद मत करना।

आपकी कृपादृष्टी सदा इसी प्रकार बनी रहे।

- सौ. विमला श्रीनिवास बांगड

## आमचे गुरू

आदरणीय डॉ. चौधरी, आपण आमचे गुरू आहात. आपला आशीर्वाद आमच्यावर आहे.

तरी हा वरदहस्त द्विगुणित करावा व आमचे गुरू व्हावे हीच इच्छा. आपले मार्गदर्शन आमच्यासाठी अमूल्य आहे.

- डॉ. महाजन प्रज्ञा, शहापूर

## सेवाव्रती दीपस्तंभ - डॉ. श्री. सुनिलदत्त

काही माणसं अलवारपणे आपल्या आयुष्यात येतात, आपल्या नकळत मनाचा ताबा घेतात,
आपल्या दुःखात भागीदार होतात, आणि सुखाचे क्षण वृद्धिंगत करतात..."

आदरणीय डॉ. श्री. सुनिलदत्त दादा! असं व्यक्तिमत्त्व की ज्यात कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व यांचा सुरेख संगम. तसं पाहिलं तर आदरणीय श्री. डॉ. दादांचं आणि आमचं नातं खूप जुनं. माझे सासरे कै. मनोहर रा. सफळे आणि श्री. दादांचे पिताश्री आदरणीय श्री. डॉ. एस.जी. चौधरी हे जीवश्च- कंठश्च मित्र. जवळजवळ ५० वर्षांचा कौटुंबिक स्नेह. तोच स्नेह पुढील पिढीतही शब्दांपलिकडल्या नात्यात गुंफला आहे.

श्री. दादांनी जळगावात प्रॅक्टीस सुरू केल्यापासून आम्ही सारे त्यांचे औषध घेतोय. साधा सर्दी-ताप असो की एखादा मोठा आजार, प्रथम श्री. दादांकडेच धावलं जातं. त्यांची औषधे मिळाली की आजार पळणार ही १०० टक्के खात्री. माझे सासरे तसेच माझे पती श्री. प्रदीप, मी, माझी मुलं चैतन्य, सिद्धी आम्ही सारेच दादांचे ऋणी आहोत. जीवनात कितीतरी प्रसंग आले. तब्येतीच्या वेगवेगळ्या तक्रारींना श्री. दादांनी त्यांच्या बहुगुणी होमिओपॅथी औषधांनी पळवून लावलंय.

आयुष्यात आतापर्यंत अनेक सुख-दुःखाचे क्षण आले. आनंदाच्या क्षणी आमच्या आनंदात अप्रत्यक्ष ते सहभागी झाले, तर दुःखद प्रसंगात हळुवार फुंकर घालून ज्येष्ठ बंधूची भूमिका पार पाडली आहे. अशाच एका प्रसंगाचा उल्लेख मला इथं आवर्जून करायचा आहे. तो दिवस होता ६ ऑक्टोबर २००४. मी आणि चैतन्य साडेअकराच्या सुमारास शाळेत जायला निघालो. इतक्यात फोनची रिंग वाजली. हे मुंबईला ऑफीसच्या कामासाठी गेले होते. त्यांचाच असेल म्हणून मी रिसीव्हर उचलला तर पलिकडून डॉ. पुष्पाताई श्री. दादांच्या भगिनी आणि माझ्याशी नणंदेचं नातं. ताईंचा फोन, "प्रिया, प्रदीप गाडीनं मुंबईला गेलाय का?" मी 'हो' म्हटलं. त्यांच्या

क्लायंटबरोबर ॲसेंटनं गेलेत, आज येतीलच.' त्या पुढं म्हणाल्या, "घाबरू नकोस, त्यांच्या गाडीचा चांदवड घाटात ॲक्सिडेंट झालाय. पण दुपारपर्यंत येथे येतील आणि डॉ. अनिल खडकेंकडे ॲडमिट करतील." दुपारी ४ वाजता यांना डॉ. खडकेंनी ॲडमिट केलं. हाताचं मोठं ऑपरेशन झालं. बरेच शारीरिक मानसिक त्रास सहन करावे लागले. हात ६ आठवडे गळ्यात बांधलेला. बोटांची म्हणावी तशी हालचाल नव्हती आणि मनगटसुद्धा जास्त दुखावलेलं. स्कुटर, कार चालवणं कठीण. डिस्चार्ज मिळताच धाव घेतली डॉ. श्री. सुनिलदत्त दादांकडे. त्यांनी सर्व कागदपत्रे पाहून, हात पाहून लगेच सांगितलं, "तुझा हात पूर्ववत करणे माझी जबाबदारी." कारण तत्पूर्वी दोन आर्थोपेडिक्स डॉक्टरांनी पुन्हा मनगटाचं ऑपरेशन करावं लागेल. त्यात यश किती मिळेल हे सांगता येणार नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. दादांनी उच्चारलेले आश्वासक शब्द आम्हा दोघांना हत्तीचं बळ देऊन गेले.

पाहता-पाहता ६ महिने झाले. दादांची औषधे नियमित घेतली आणि होमिओपॅथी - श्री. दादांच्या औषधी हातगुणांचा परिणाम म्हणावा, स्वामी समर्थांची कृपा, आई-वडिलांची पुण्याई आणि हितचिंतकांच्या शुभेच्छा, या साऱ्यांचा परिणाम यांचा हात एकदम ठणठणीत बरा झाला. श्री. दादा आम्ही तुमच्या ऋणात कायम राहू.

डॉक्टर दादांकडे जाणं म्हणजे भरपूर वेळ हाताशी धरून आपला नंबर लगेच लागेल त्या दिवशीचे भाग्यवान आपणच. पण पेशंटची जर हीऽऽ गर्दी असेल, तर निश्चितच वेटिंग लिस्टमध्ये थांबावं लागणार. या वाट पाहण्यानं अनेक फायदेही झालेत. बऱ्याच ओळखी झाल्या. महिनोन् महिने व भेटणाऱ्या मैत्रिणी तिथं भेटतात. बऱ्याच कथा, कादंबऱ्या वाचल्यात. एवढंच नाही तर शाळेची लिखाणाची कामं शांतपणे पूर्ण केलीत. हा झाला गंमतीचा भाग! या नंबरच्या शिस्तीत पेशंट जरी आप्तेष्ट, नातलग असला तरी नियम म्हणजे नियमच हे विशेष. पण इमर्जन्सी असेल तर श्री. दादांकडून लगेच औषध पाठविलं जातं हे विशेष. त्या त्यांच्या सेवासाधनेत सौ. स्मितावहिनींची अनमोल साथ त्यांना लाभलीय. चि. राघवसारखा गोड, बुद्धीमान सुपुत्र आहे. रौप्यमहोत्सवी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा!

आ. डॉ. श्री. सुनिलदत्त दादा, आपण होमिओपॅथीच्या विश्वात अनेक संशोधन केलंय. कितीतरी पुरस्कार, मान-सन्मान मिळविलेत.

आपल्या मानवसेवेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. हे सेवेचं व्रत अखंड राहण्यासाठी मी त्या ईश्वराकडं अंतःकरणपूर्वक प्रार्थना करते.

"जगण्यास अनेकांच्या दाखविली दिशा, संसारवेलीवर फुलविली बाळरूपी आशा,
असो व्याधी कोणतीही तना, तुम्ही धीर देता साऱ्या रुग्णांना,
आशेचे किरण तेवती हे जनी, निराशेचे सूर विझती जीवनातुनी,
एकता - समता - बंधूता दिसे आपुल्या ठायी, विनम्र भावे कर जुळती आमुचे आपुल्या पायी,
सदासर्वदा घडो रुग्णसेवा, तुम्हा लाभो दीर्घायू हेच मागणे देवा।।"

आपल्या अध्यात्मसाधनेस शतशः प्रणाम !!!

- सौ. प्रिया प्रदीप सफळे

## परमप्रिय

आदरणीय बाबा, नमस्कार!

बाबा तुम्ही दवाखाना कमीतकमी वेळा बंद ठेवा. कारण मला तुमच्या औषधाशिवाय दुसरे औषध घ्यायला आवडत नाही.

- कु. श्रुतिका श्रीकांत बांगड



**I treat,**
**he cures !**

## विशाल हृदयाचा सागर

बाबा आपल्या मुखात पान आहे, डोळ्यात पूर्ण प्रेमभाव आशीर्वाद आहे.
बाबा किती वर्णावी आपली स्तुती, मानवाला देतात आपण देवाची अनुभूती !

तुप, दूध, द्राक्ष व मध यांची गोडी कोणीही शब्दांनी विशेषरुपानं सांगू शकत नाही. याची गोडी केवळ रसना म्हणजे जीभच जाणू शकते. त्याचप्रमाणे बाबा आपले गुण, आशीर्वाद, प्रेम या गुणांचं मी काय वर्णन करू शकते? माझी जागा खूप छोटी आहे. माझी नजर फक्त आपल्या चरणावरच पोहोचते.

ज्याची दृष्टी शिव झालेली असेल, तोच आपल्याला ओळखू शकतो
ज्याचे हृदय विशाल असेल, तो आपल्याला त्यात बघू शकेल.

- सौ. इंदुताई राजेंद्र बारी

## ईश्वराचे प्रतिक

प्रणाम ! होमिओपॅथीद्वारा नक्कीच तुम्ही रुग्णांना बरं केलं आहे. परंतु तज्ञ डॉक्टर विश्वात खूप आहेत. आपल्याजवळ लागणारी रुग्णांची रांग आणि प्रत्येक रुग्णाची आपणावर जी आस्था आहे ती ईश्वरीकृपेशिवाय असूच शकत नाही हेही नक्कीच आहे.

- अजित शांतीलाल जैन

## गरुडझेप

डॉक्टर काकांना नमस्कार! प्रथम आपणास दिवाळीच्या शुभेच्छा! आणि माझ्या ऐकण्यात आले की, आपल्या डॉक्टरी पेशातील सेवेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. याबद्दल आपणास खूप-खूप शुभेच्छा! म्हणूनच मला आपल्याबद्दल काही लिहावेसे वाटले.

जसे सगळ्यांना नट-नटींचे आकर्षण असते. त्यांचे ते स्टाईल आयकॉन असतात. त्याचप्रमाणे माझे स्टाईल आयकॉन आपण आहात. खरे तर डॉक्टर काका आपल्या कार्याबद्दल मला फारसे ठाऊक नाही. पण मी आपल्याला जेवढे पाहिले, आपल्याशी संवाद साधण्याची मला संधी मिळाली, त्या सर्व गोष्टींवरून मी आपणास जेवढे ओळखले तेवढेच माझ्यासाठी आपण माझे आयकॉन बनण्यास कारणीभूत ठरलात.

होमिओपॅथीकडे बघण्याचा दृष्टीकोन माझा पार बदलून गेला आणि आपणास माझा आदर्श ठेवून मी या क्षेत्रात उतरले. अर्थात आपल्या नखाची सरदेखील मला येणार नाही.

Because your Ocean is so Great and my Boat is so small...

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आणि वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे! त्याचप्रमाणे आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाने मी भारावले.

Always charming face never excusted mind, simple afier, no attitude...

आपण इतक्या आजारी माणसांना तपासतात तेदखील इतक्यावेळपर्यंत. तरीही आपल्या चेहऱ्यावर थकल्याचे कुठेच भाव नसतात. सर्वात जे मला आवडते ते की आपण जीवनाचा पुरेपूर आनंद घेतात. मनात जे येईल तसेच मी करीन असा आपला ॲटीट्युड आहे. हे आणि अशा कितीतरी बारिकसारिक प्रसंगांची यादीच मी जमा केली आहे.

आपल्याकडे बघितल्यावरच अर्धे आजार पळतात. आपला तेजाळलेला चेहरा आणि आत्मविश्वासच रुग्णाच्या मनात आशेचा किरण उत्पन्न करून जातो. आणि मी बरा होणारच असा विश्वास देऊन जातो. हीच माझ्यालेखी आपल्या यशाची पोचपावती! आपली शिस्तबद्धता आणि सर्वांना समान वागणूक हेदेखील उल्लेखनीय आहे. गडबड गोंधळ न घालता ओ.पी.डी. शांततेने चालते. आणि आपला तर वन मॅन शो असतो. हे सर्व आपण एकटेच सांभाळतात! हे सर्व माझ्यासाठी कुतूहलाचे आणि आगळेवेगळेच आहे.

होमिओपॅथीमध्ये एवढे यश प्राप्त करणारे आपणच (माझ्या बघण्यात तरी). माझे स्वतःचे असे अनेक अनुभव आहेत. मी डॉक्टर होणार हे आपणच भाकीत केले होते. मी प्रथम आपणाकडे आठवीत असताना आले होते. तेव्हा माझी डोकेदुखीदेखील आपल्यामुळेच थांबली होती. हे सर्व इतके अचंबित करण्यासारखे होते की आपणच माझे आदर्श झालात.

ज्याप्रमाणे एक मेणबत्ती दुसऱ्या मेणबत्तीला पेटवते. पण तिला पेटवताना स्वतःच्या प्रकाशाची ज्योत विझू देत नाही. त्याप्रमाणे आपल्या सहवासात कितीही लोक आले तरी आजदेखील आपण सर्वांना तेवढेच उत्साहाने मदत करतात. आपण घेतलेली ही तर 'गरूडझेप'च आहे. असेच आपले कार्य उत्तरोत्तर वाढावे हीच इच्छा.

आपण नेहमी पूर्वेच्या क्षितिजावर राज्य करावे. पश्चिमेच्या क्षितिजाचा वारादेखील आपल्याला स्पर्श न करो हीच सदिच्छा.

आपल्याला आणि आपल्या परिवाराला दिवाळीच्या खूप-खूप शुभेच्छा!

- मधुरा काळे, बुलढाणा

## प्रसन्नचित्त

आदरणीय बाबा, सादर प्रणाम । हम आपके दवाखाने में ज्यादा दिन से नहीं आ रहे हैं। परन्तु हमको यहाँ का वातावरण और यहाँ अलग प्रकार की शान्ती मिलती हैं। मेरी बेटी सिद्धी का इलाज आपके पास चल रहा है। अभी कोई ज्यादा फर्क तो नहीं है। मुझे पूरा विश्वास है कि वह बहुत जल्द ठीक हो जाएगी। वैसे तो मेरे पति और मुझे आप को हमारी तबियत बताना चाहते हैं। पर कुछ कारणवश ऐसा नहीं कर सकते। जहाँ हम आप के कमरे में आते ऐसा लगता कम से कम आप ५ मिनिट तो आप दे। क्योंकि इतनी शान्ति मुझे मेरे जीवन में कही नहीं मिली पर आप तो सेकंड में ही हमे बाहर कर देते हैं। बाबा मुझे मराठी नहीं आती। जो कुछ मैंने समझा वह लिख दिया। बाबा परेशानी बहोत है। पहले मुझे अजीब लगा। आपके बारे में जो सुना फिर इतना अच्छा लगता कि यहाँ आने के लिए हमेशा तैयार रहती हूँ। बाबा आपको मेरी बाते सुनने और पढने का समय कम है, पर आपके यहाँ जो अनुभव हुए हैं उनका वर्णन करना मुश्कील है।

धन्यवाद !

- सौ. आस्था गीते, खंडवा, (म.प्र.)

## कर्तव्यतत्पर

मला वयाच्या ४ वर्षांपासून सर्दीचा त्रास होता. ॲलोपॅथीची बरीच ट्रीटमेंट केली. मधल्या काळामध्ये आराम जाणवत होता. परंतु वयाच्या ३६ व्या वर्षी म्हणजे २००८ मध्ये खूपच त्रास वाढला. ऑगस्ट २००८ पासून डॉ. सुनिलदत्त चौधरी यांची औषध घेणे सुरू केले. तर २००९ मध्ये पूर्ण आराम जाणवत आहे.

आपणास कोटी-कोटी धन्यवाद व प्रणाम ।

- शरद शिरसाट, अकोला

## सेवायज्ञ

परमप्रिय व परमपूज्य श्रीमान सुनिल मामा, यांसी शि. सा. नमस्कार! आपल्या पंचवीस वर्षांच्या सेवायज्ञात विचार करताना मन नकळत शतशः नतमस्तक झाले व मनांत आत्यंतिक प्रेमाभराने उठलेल्या भावतरंगांनी पुढील रूप धारण केले -

" डॉ. चौधरी सुनिलदत्त, आहे साक्षात भगवंत।<br>
जो मनोभावे शरण, न उरे व्याधी खंत। "

आपल्या अगणित चाहत्यांची आपणाबद्दल हीच भावना असेल असा मला विश्वास आहे. आपल्या या दिव्य सेवाज्ञानास माझे मनःपूर्वक शतशः प्रणाम व हा दिव्य सेवायज्ञ असाच सर्वोच्च यशाने तळपत अव्याहत तळपत राहो हीच प्रभुचरणी मनःपूर्वक प्रार्थना!

या अत्यंत आनंदाच्या प्रसंगी आपल्या कुटुंबियांसही मनःपूर्वक अभिवादन व आपणा सर्वांना अत्यंत हार्दिक शुभेच्छा!

आपली लाडकी भाची, सौ. अमृता अजय

## गुणवंत

दादासाहेब (डॉ. सुनिलदत्त चौधरी), यांना. स.न. मला अपचनाचा त्रास ३० वर्षांपासून होता. होमिओपॅथीची ट्रीटमेंट घेतल्याने पचायला लागले. डाळीचे प्रकार पचत नव्हते. ते पण पचत आहेत. अलर्जिक सर्दी होती, ती पण बरी झाली आहे. परंतु दोन वर्षांपासून जानेवारी १५ पासून फेब्रुवारीपर्यंत घशाची सूज व उबळीचा खोकला येतो तो लवकर बरा होत नाही. इतकाच त्रास बाकी आहे.

डॉ. विजय पाटील, वाकी बु.

# किर्तीवंत

गंधहीन खुरटे आपुले
भांडार आहे ज्ञानाचा
न बोलता सेवा आहे
(आपुली) प्रेम आहे सर्वांपरी
प्रत्येकाला वाटते आमचेच तुम्ही...

अबोल असेल गंधहीन
खुरटे जरी त्यात ज्ञानी
म्हणूनी वावरतात तुम्ही
व्रत आहे सेवेचा ध्यास
आहे काही नवीन करण्याचा
न बोलता होते कार्य पूर्ण
आपुले असे गंधहीन खुरटे

गंधहीन खुरटे असले जरी
सुगंध आहे कीर्तीचा
ज्ञान व अध्यात्माचा संयोग
असला तरी थोडाही अहंकार नाही
असाध्य रोगी आला असेल जरी
रोगमुक्त होऊन समाधान असेल
चेहऱ्यावरी असे गंधहीन खुरटे
असले जरी त्यास मानाचा
मुजरा असेल आमुचा...

- जितेंद्र पाटील, गिरड

## २५ वर्षांचे अखंड दिव्य तप !

आदरणीय डॉ. श्रीमान सुनिलदत्त चौधरी, यांसी सादर प्रणाम।  आपल्या रूपाने आम्हाला एक निष्णात डॉक्टर, एक अत्यंत प्रेमळ, उदार व समंजस असा जिवाभावाचा भाऊ व अडचणीच्या वेळी अचूक मार्गदर्शन करणारा उत्तम मार्गदर्शक, गुरू, साक्षात परमेश्वर भेटला। आपणाबद्दलची कृतज्ञता व आपली महती व्यक्त करायला शब्द अपुरे पडतात.

ज्ञानसाधनेचे अखंड प्रचंड तप व धार्मिक, अध्यात्मिक उपासनेचे हे अखंड प्रचंड तप ही दोन्ही तपे व तपश्चर्या आपल्या ठायी अद्भूतपणे एकत्रितपणे साकार झालेली पहावयास मिळालीत. या दोन्ही तपांचा समन्वय साधून रुग्णांना बरे करण्याचे आपले कौशल्य, आपली शक्ती अक्षरशः अद्भुत व वंदनीय आहे!

आपले वैयक्तिक व कौटुंबिक जीवन म्हणजे मानवतेसाठी अव्याहतपणे चाललेला एक यज्ञच आहे. आपल्या या दैवी शक्तीला, दैवी तपश्चर्येला व दैवी सेवायज्ञाला माझे व माझ्या सबंध परिवाराचे अत्यंत आदराने भावभक्तीने मनःपूर्वक अभिवादन! आपल्या या दिव्य तपसाधनेला आपल्या कुटुंबियांचे समर्थन व अधिष्ठान आहे म्हणून त्यांनाही विनम्र अभिवादन।

आपल्या या अद्भुत व दैवी क्षमता सदैव अधिकाधिक विकसित होत राहो व आपला हा सेवा यज्ञ असाच यशस्वीपणे अखंड व अव्याहत चालत राहो आणि आपल्याकडे येणारी शेकडो, हजारो माणसे व्याधिमुक्त व वेदनामुक्त होत राहोत हीच प्रभु चरणी मनःपूर्वक प्रार्थना।

आपणासोबतच आपल्या कुटुबियांनाही दीर्घायुष्य, सुख-समाधान, आरोग्य, आनंद व सदैव उत्कर्ष, समृद्धी यांचा लाभ होत राहो हीच प्रभू चरणी मनःपूर्वक प्रार्थना !

सुधाकर भावे - सौ. भावे




## खडे बोल डॉक्टरांचे...

## डॉक्टर की देव !

डॉ. बाबांविषयी काय-काय लिहावे तितके थोडेच आहे. डॉ. बाबांनी आजवर अनेक जणांवर उपचार करून त्यांना केवळ बरे केले, एवढेच नाही तर अनेकांच्या विविध समस्यांवर मार्गदर्शनही केले आहे. डॉ. बाबांनी केवळ उपचार न करता सर्वांच्या ह्रदयात आदराचे स्थान मिळविले आहे.

आम्ही डॉ. बाबांकडे उपचार घेत असताना एखादी समस्या त्यांना सांगितली तर त्यांनी अनेक वेळा अचूक मार्गदर्शन आम्हाला केले. आमच्यासाठी डॉ. बाबा डॉक्टररूपी परमेश्वर आहेत, असे आम्हांस वाटते. परमेश्वर प्रत्यक्ष कुणीही पाहिला नाही. पण जर परमेश्वर साक्षात असेल तर डॉ. बाबांहून निराळा कधीच नसेल.

आम्ही फक्त एवढेच म्हणतो की समुद्रात वादळ आले असताना एखादे जहाज त्यात सापडते मग त्या जहाजाला किनाऱ्याकडील दीपस्तंभाची ओढ लागते. जणू दीपस्तंभ नाविकास खुणावतो की मी येथे उभा आहे. तू याच दिशेने माझ्याकडे पोहोच.

आमच्या सर्वांच्या जीवनात दीपस्तंभासारखेच डॉ. बाबा मार्गदर्शन करतात. त्यांच्याविषयी आम्ही साध्या मनाने जे काही वाटते तेच लिहीत आहोत. अशा या देवमाणसाला दीर्घ आयुष्य लाभो व त्यांच्या हातून अनेकांचा आमच्याप्रमाणे उद्धार होवो हीच सदिच्छा!

कैलास बारी - सौ. आरती बारी

# धैर्यवान

डॉ. सुनिलदत्त चौधरी दादांचे औषध मार्च २००१ पासून घेत आहे. माझा १८-२० वर्षांपूर्वीचा सायनसचा आजार त्यांच्या औषधांमुळे बरा झाला आहे. माझ्या आईचा किडनीस्टोन १ महिन्यात बरा झाला, तर माझ्या दोन्ही बहिणींचे किडनीस्टोन केवळ १५ दिवसांच्या आत डॉ. दादांनी दिलेल्या औषधामुळे बरे झालेले.

डॉ. दादांचे व्यक्तिमत्त्व हे फणसासारखे वरून काटे पण आतून गोड गरे याप्रमाणे आहे. त्यांना नेहमी पेशंटचा खरा कळवळा असतो. आपला पेशंट लवकरात लवकर बरा व्हावा हीच त्यांची खरी तळमळ असते. डॉ. दादा नेहमी पेशंटला आपलेच मानून उपचार करीत असतात. म्हणून क्वचित प्रसंगी ते रागावले तरी त्यांच्या मनात नेहमी आपल्या पेशंटबद्दल हितच असते. म्हणून तर त्यांना मी फणसाची उपमा दिलेली आहे.

माझ्या पतीचे कॅन्सरचे खूप मोठे ऑपरेशन सन २००६ साली झाले. ऑपरेशननंतर लगेच ४ केमोथेरपी आणि ३० सीटस् रेडिओथेरपीचे घेतले. त्यामुळे त्यांना खांद्यावर, गालावर, कानाच्या खाली, हनुवटीला खूप जखमा झाल्या होत्या. त्या जखमा ४-५ महिने झाले तरी भरून निघत नव्हत्या. त्यातून सारखा रात्रंदिवस पस निघतच होता. आणि त्यातल्यात्यात त्यांना रात्रंदिवस झोपच येत नव्हती. खूप त्रास त्यांना व्हायचा. आणि आजाराचे स्वरूप हे भयंकर आणि मोठे असल्यामुळे कदाचित पुन्हा होण्याची शक्यतासुद्धा होती. आणि आमच्या घरातील व्यक्तींना तर माझ्या पतीच्या जगण्याची आशाच वाटत नव्हती. मग मी ही सर्व परिस्थिती डॉ. सुनिलदत्त दादांना सांगितली. डॉ. दादांनी सुद्धा ही परिस्थिती समजून घेऊन लगेचच औषध दिले व सोबत धीरसुद्धा दिला. आणि सांगितले की अजय लवकरच बरा होईल त्यामुळे माझ्या जीवात जीव आला. डॉ. दादांच्या औषधामुळे माझ्या पतींना झोप यायला लागली. जखमासुद्धा पस निघत-निघत हळूहळू भरायला लागल्या. ३-४ महिन्यातच एवढ्या सगळ्या जखमा त्यांच्या भरून निघाल्या. हे केवळ डॉ. दादांनी दिलेल्या औषधांमुळेच शक्य झाले. डॉ. दादांनी दिलेल्या धीरामुळे औषधांमुळेच त्यांची प्रकृती दिवसेंदिवस चांगली होत आहे. जगण्याची उमेद, उत्साह वाढत आहे. माझ्या जीवनातील अंधकार नाहिसा होऊन माझा संसार आनंदमय झाला आहे. माझे दुःखी मन आता

आनंदित झालेले आहे. हीच तर खरी डॉ. दादाची जनसेवा आहे. डॉ. सुनिलदत्त दादा निःस्वार्थीपणे, प्रामाणिकपणे, उत्साहाने, आनंदाने, धीराने, होमिओपॅथीच्या औषधांनी खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करीत आहेत. आम्हा पति-पत्नीसाठी डॉ. सुनिलदत्त चौधरी दादांचे व्यक्तिमत्त्व हे नेहमी आदर्शच राहील. मूर्ती लहान पण कीर्ती महान या म्हणीप्रमाणे त्यांची किर्ती सगळीकडे पसरो. त्यांच्या हाताला नेहमी यश मिळो हीच परमेश्वरचरणी विनंती.

- सौ. शुभांगी अजय चौधरी, भुसावळ

## आदर्शवादी

आदरणीय दादासो डॉ. सुनिलदत्त चौधरी, ठाकुरदास कादणा परिवार की ओर से सविनय सादर प्रणाम.

जैसा की आप पिछले २५ वर्षों से नित्य मरीजों की सेवा कर रहे हैं। आपका उद्देश्य पैसा कमाना नहीं, बल्कि ईश्वरकृपा व होमिओपॅथी के उपचार से अपने मरीजों के दुखों को दूर करने में विश्वास रखना है। आप इस धरती पर मसीहा बनकर आए हैं। हमारे दुःख हरने के लिए कई लोगों की मुफ्त में सेवा करते हैं एवं मरीज को ठीक करने में विश्वास रखते हैं न की औरों की तरह पैसे की लालच में मरीज को गुमराह करने में।

आपके सानिध्य में रहकर हम भी धन्य हो गए हैं, आपकी सेवा और ईश्वरभक्ति को बारंबार नमन व
आपकी जननी को साष्टांग प्रणाम!

सदैव आपका ऋणी, दास ठाकुर परिवार

## मानवसेवा

डॉ. हेमंत चौधरी यांचा डॉ. बाबांना चरणस्पर्श नमस्कार! मानवसेवा हीच ईश्वरसेवा या उदात्त विचारांचा संपूर्ण वारसा डॉ. बाबांना म्हणजेच आपणास लाभलेला आहे. आपण मानवसेवा करता, करताच ईश्वरसेवाही करतात. आपणास होमिओपॅथी तज्ज्ञ म्हणून २५ वर्षे पूर्ण होत असल्याने मनापासून आनंद होत आहे. होमिओपॅथी तज्ज्ञ म्हणून रुग्णास लवकर बरे करणे म्हणजे अवघड असूनही आपल्या हातात अशी काही जादू आहे की आपण त्यास सहजरित्या बरे करू शकतात.

होमिओपॅथीमध्ये अचूक निदान करून रुग्णांवर योग्य उपचार करतात, याचा खूप आनंद होत आहे.
आपण धार्मिक असल्यामुळे आपल्याकडून रुग्णसेवेबरोबर ईश्वरसेवाही आपोआप होतच आहे. आपणास होमिओपॅथी तज्ज्ञ म्हणून २५ वर्षे होत असल्याने आपणास आमच्या संपूर्ण परिवारातर्फे शुभेच्छा!

आपण अजून काही समाजोपयोगी उपक्रम जर हाती घेतले तर अजूनही जास्तीतजास्त समाजसेवा कराल. हीच ईश्वरचरणी प्रार्थना. पुनःश्च आमच्या परिवारातर्फे आपणास प्रेमपूर्वक दंडवत.

धन्यवाद!

डॉ. हेमंत चौधरी, नंदूरबार

## सेवाव्रती महारथी

समाजात डॉक्टरांबद्दल क्वचितच चांगले बोलले जाते. त्यांना पुरातन काळापासून 'यमराजसहोदर', लुटारू असे विशेषण लावलेले आहे. परंतु त्यालाही काही अपवाद आहेत. त्यांच्यापैकी अग्रक्रमावरील नाव म्हणजे 'डॉ. सुनिलदत्त चौधरी'. एखादा डॉक्टर चांगला की वाईट हे ठरविण्याचा माझ्या मते प्रमुख निकष म्हणजे 'त्या डॉक्टरबद्दल त्याचे पेशंटस् काय बोलतात हा आहे.' म्हणजे त्या डॉक्टरला शिव्याशाप देणाऱ्यांची संख्या अधिक आहे की दुवा देणाऱ्यांची संख्या अधिक आहे यावरून त्याची गुणवत्ता ठरवली पाहिजे. पैशाच्या मागे तर सर्वच लागलेले असतात. परंतु नैतिकतेने पैसे कमविणारे फार कमी असतात. या सर्व निकषांनुसार डॉ. सुनिलदत्त चौधरी हे एक सेवाव्रती डॉक्टर आहेत. त्यांच्या विषयात तर ते तज्ज्ञ आहेतच, परंतु आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांसाठी समर्पित भावनेने करणारे मानवतावादी व्यावसायिकही आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र फक्त जळगांवपुरते मर्यादित नसून, अनेक दूरदूरचे दुर्धर रोगाने पछाडलेले रोगी त्यांच्याकडून हसतहसत जातात. काही तर त्यांना 'देव' मानतात. तथापि त्यांना सडेतोडपणे सत्य मांडण्याची सवय असल्यामुळे काहींना त्यांचा रागही येत असावा. कारण सत्य कटू असते. 'मऊ मेणाहून परि कठीण वज्राहून' असा त्यांचा पिंड आहे. त्यांचे नियम कडक असूनही त्यांच्याकडे पेशंटस्च्या रांगा लागतात. कारण त्यांच्यातील 'धन्वंतरी'ची लोकांना खात्री पटलेली असते. ते रोज सतरा-अठरा तास न थकता आणि न कंटाळता काम करीत असतात. कोणत्याही धर्माच्या साधूकडून ते फी घेत नाहीत. त्यांनी स्थापन केलेल्या अचोली प्रतिष्ठानद्वारा धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी वेळ व पैसा सत्कारणी लावतात. हे त्यांच्या महानतेचे आणखी एक लक्षण आहे.

त्यांची यशोमार्गातील वाटचाल सातत्याने चालू राहो, अशी प्रभू चरणी प्रार्थना. त्यांना आणि त्यांच्या डॉक्टर अर्धांगिनीला व सुपुत्राला या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने शुभाशीर्वाद.

- डॉ. गो. दा. फेगडे, जळगाव

## बहुआयामी

सन्माननीय डॉ. सुनिलदत्त चौधरी,  महोदय... मी सौभाग्यवतींना घेऊन प्रथम आपल्या सेवासदनात डिसेंबर २००५ मध्ये आलो. कारण होते सौभाग्यवतींचा उजवा खांदा दुखणे, पाय दुखणे यासाठी. आपल्या सेवासदनातील पदव्या व सन्मानपत्र पाहिल्यावर वाटले क्षणभर आपण कुठे आहोत? आपल्यावर असलेली लोकांची श्रद्धा पाहिल्यावर मला संत पॉलच्या एका ग्रंथातील एक ओळ आठवली. ती म्हणजे, "माणसाला केवळ श्रद्धेनेच मुक्तता मिळू शकते." आपल्याकडील लोकांची गर्दी म्हणजे आपल्यावरील श्रद्धा. आपला औषधी प्रसाद घेऊन लोक आपल्या शारीरिक, मानसिक वेदनेपासून मुक्ती मिळवितात.

आम्हाला आपले दर्शन घडविण्याचा बहुमान जातो आमचा डॉक्टर मुलगा डॉ. प्रशांतचंद्र पाटील याच्याकडे. कारण त्यानेच त्याच्या आईला व मला या सेवासदनाचा मार्ग दाखविला. अनेकांच्या प्रतिक्रिया आपल्याबद्दल फारच बोलक्या आहेत. आपल्या सेवामंदिरात मन प्रसन्न करणारे वातावरण असून, शांत व संयमी सहकारी आहेत.

आपल्या सेवेला २५ वर्षे पूर्ण झालीत. त्याबद्दल आपल्याला हार्दिक शुभेच्छा देऊन आपली पुढील कारकीर्द उज्ज्वल यशाची होवो! आपल्या हातून जनतेची सेवा घडो. पीडितांची दुवा आपल्याला मिळो हीच प्रभुचरणी प्रार्थना !

धन्यवाद!

- प्रा. धनराज पाटील

## 'न भूतो न भविष्यती !'

सुनिलदत्त चौधरी उर्फ आमचे आदरणीय डॉ. बाबा एक आगळंवेगळं, असाधारण व्यक्तिमत्त्व. जे कदाचित पूर्वी झाले असतीलच अथवा भविष्यात होतील, पण माझ्या मते तर 'न भूतो न भविष्यती !'

डॉ. बाबा हे आमचे फॅमिली डॉक्टर आहेत. पण त्याहूनही अधिक ते आमचे मार्गदर्शक आहेत, गुरू आहेत. साधारणतः प्रत्येक व्यक्तीला असेच वाटते की आपल्या घरात दवाखाना घुसायला नको, आपली व आपल्या घरातल्यांची प्रकृती नेहमी ठीक राहायला हवी. पण असे वाटते की नाही आपण थोडं तरी आजारी पडायलाच हवे, म्हणजे त्या निमित्ताने का होईना आपल्याला बाबांचे दर्शन तर होतील. कारण आमचे बाबा आहेतच असे सुरुवातीला त्यांची थोडी भीती वाटते, पण त्यांचे खरे स्वरूप जाणल्यावर त्यांना वारंवार भेटण्याची इच्छा मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. प्रत्येक रुग्णाशी बाबांचे असेच नाते आहे. प्रेमाचे, मायेचे नाते. आणि म्हणूनच प्रत्येकच रुग्णाला वाटते की बाबा फक्त आपलेच आहेत. आपल्यासाठीच आहेत.

असो मला बाबांचा आलेला अनुभव असा की मला २ वर्षांपूर्वी मुतखड्याचा त्रास झाला होता. त्यासाठी मला माझ्या मोठ्या नणंदेने बाबांची ट्रीटमेंट सुरू करण्यास सांगितले. सुरूवातीला मी औषध घेतले पण त्यामुळे मला जास्तच सर्दी झाली, ताप आला आणि खरं म्हणजे तेव्हा मी मानसिकरित्याही डिस्टर्ब होते. म्हणून मी मध्येच औषधी बंद केल्या व ॲलोपॅथी ट्रीटमेंट सुरू केली. त्याच्याने मला तात्पुरता आराम पडला पण नंतर पुन्हा मला स्टोनचा त्रास सुरू झाला. मग मी पुन्हा बाबांची ट्रीटमेंट सुरू केली. तेव्हापासूनच मी अजूनही बाबांच्याच औषधीवर आहे. मला होमिओपॅथीपेक्षा जास्त बाबांवर विश्वास आहे. जसे मी आधीच सांगितले की बाबा हे एक असाधारण व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना साक्षात श्री स्वामी समर्थ यांचा आशीर्वाद लाभलेला आहे.

आजकाल गल्लोगल्ली डॉक्टर्स झालेले आहेत. पण बाबांसारखी माणुसकी आपुलकी आणि जिव्हाळा असलेले डॉक्टर मला तरी दिसले नाही. या इतर डॉक्टर्सचा फक्त एकच उद्देश असतो, तो म्हणजे केवळ पैसा कमावणे! साधी सर्दी, खोकला, असला ते सरळ ॲडमीट व्हा असे सांगतात. परंतु बाबांकडे असं काही नाही. बाबांना रुग्णांना हात न लावता नुसतेच हाताची बोटे व हात बघून आजाराचे

निदान करतात. इतर डॉक्टर्स नुसतेच हात लावण्याची (तपासण्याची) भरमसाठ फी घेतात आणि परिणामांचा पत्ताच नसतो. जसं मी आधी सांगितले, मला स्टोनचा त्रास झाला होता. मला डाव्या बाजूस स्टोन झाला होता तेव्हा नाही पण जेव्हा उजव्या बाजूस मला पोटात दुखू लागले होते तेव्हा मला आठवतं, मी सोनोग्राफी करून तो रिपोर्ट ॲलोपॅथीच्या स्पेशलिस्टकडे नेले. तेव्हा त्याने उजव्या बाजूसपण स्टोन आहे असे सांगितले. आणि तेच रिपोर्ट जेव्हा मी बाबांकडे नेले, तेव्हा मला बाबा म्हणाले की या रिपोर्टची फ्रेम करून देव्हा-यात ठेव आणि रोज पूजा कर. मला आधी तर काही कळलेच नाही. मग नंतर लक्षात आले की मला उजव्या बाजूस स्टोन नाही म्हणून बाबा असे म्हणाले. त्या स्पेशलिस्टवर मात्र माझा खूप संताप झाला. म्हणजे आपल्याला काही कळत नाही याचा हे डॉक्टर्स किती फायदा घेतात? पण डॉ. बाबा तसे अजिबात नाहीत. मला लिव्हरला सूज आल्याने त्रास झाला होता. त्यासाठी बाबांनी मला औषध पण दिले. यावरून हे तर पटले की बाबा इतर डॉक्टरप्रमाणे रुग्णांच्या भावनांशी खेळत नाहीत, त्यांना फसवत नाहीत.

असाच एक अनुभव माझ्या जावेच्या आईचा आला. त्यांना कानाचा त्रास आहे. त्यांनी कोण्या एका डॉक्टरकडे वेगवेगळ्या टेस्ट केल्या. तेव्हा त्या डॉक्टरने सांगितले कि तुम्ही जगाच्या पाठीवर कुठेही जा. तुमचा कान बरा होणार नाही. आणि आता त्यांना बाबांच्या औषधाने ब-याच प्रमाणात फरकही जाणवत आहे. आमच्या बाबांकडे यायचं म्हणजे 'साईच्या' दरबारात गेल्यावर जसे 'श्रद्धा व सबुरी' ठेवावी लागते ना! तसेच इथेही ठेवावी लागते. बाबांवर ईश्वरीय कृपा आहे हे सत्य आहे. याचाही एक अनुभव सांगते. माझ्या जावेची मुलगी दीड वर्षांची असेल तेव्हा तिने नाकात छोट्याशा पेन्सीलचा तुकडा टाकून घेतला. माझी जाऊ खूप घाबरली आणि रडायला लागली. त्यांनी तिला चाईल्ड स्पेशालिस्टकडे नेले. त्या डॉक्टरला काही तिच्या नाकातली पेन्सील दिसली नाही. म्हणून त्याने माझ्या जावेला एम.डी.कडे न्या असे सांगितले. त्यामुळे ते आणखीनच घाबरले. तेव्हा माझ्या लहान दिरांनी माझ्या जावेला व तिला बाबांकडे नेले. बाबांकडे आत निरोप देण्यात आला की तिने पेन्सील नाकात घातली म्हणून. तेव्हा आतून उत्तर मिळाले, 'पोरीच्या नाकात पेन्सील नाही, घाबरण्याचे कारण नाही, घरी जावे.' आता बाबांनी जर तिला पाहिलेच नाही तर बाबांना कसे कळले की पेन्सिल पडली आहे? याचाच अर्थ बाबांवर ईश्वरीय कृपाही आहे. बाबांचा शब्द कधीच फोल ठरणार नाही. आणि पैसा कमावणे,


नाव कमावणे हाच जर बाबांचा हेतू असता तर बाबांनी तिला कसलाही डोस दिला असता, औषध दिले असते आणि पैसे घेतले असते. पण बाबांनी तसे केले नाही. कारण गोर-गरिबांच्या सेवेसाठी त्यांनी स्वतःचे जीवन अर्पित केले आहे.

डॉ. बाबा हे 'अबोली' नावाची संस्थाही चालवितात. 'जनसेवा, न बोलता' म्हणूनच हे अबोली नाव आहे. गरीब लोकांच्या मदतीसाठी बाबांनी खूप काही केले आहे. ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. केवळ रुग्णांसाठी एकाच जागी तब्बल १५-१६ तास बसून राहणे हे सर्वसामान्य माणसाच्या विचार करण्याच्याही पलीकडचे आहे. पण बाबा तसे करतात. तसे तर बाबांच्या दवाखान्यातले नियम भरपूर जणांना आवडत नाहीत पण ते रुग्णांच्या चांगल्यासाठीच आहेत हे त्यांना कळत नाही. आपल्या तब्येतीची काळजी आपण घ्यायला हवी आणि त्यासाठी वेळेवर दवाखान्यात पोहोचायलाच हवे, हे आपल्यालाच आपले कळायला हवे. बाबांचे कोणतेच कृत्य वागणे चुकीच असूच शकत नाही. आणि म्हणूनच डॉ. बाबा आमच्यासाठी साक्षात परमेश्वर आहेत.

तर असे आहेत आमचे डॉ. बाबा! खरं म्हणजे आम्हा सर्वांसाठी बाबांचा विषय हा न संपावासा वाटणारा विषय आहे. कारण सगळ्यांनाच बाबांचे खूप छान अनुभव आलेले आहेत. आणि कदाचित म्हणूनच बाबांकडे नंबर लावल्यावर ३-४ तासच काय कधी-कधी ७-८ तासही बसण्याची आमची तयारी असते. आणि ७-८ तास वाट पाहूनही आत गेल्यावर ७-८ मिनिटेच जरी बसायला मिळाले ना तरी मनाला खूप-खूप समाधान मिळते.

अशा या असाधारण व्यक्तीमत्त्व असलेल्या व ईश्वरीय कृपा लाभलेल्या आमच्या बाबांसाठी आम्ही काय लिहिणार? तरीही त्यांनी आमच्यावर केलेल्या अनन्य उपकारांची परतफेड शब्दांमार्फत करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. आम्ही त्याच्या ऋणातून स्वतःच मुक्त होऊ इच्छित नाही. त्यांचे सदैव ऋणी राहण्यात आम्हाला आनंद आहे. तेव्हा आमच्या लाडक्या व आदरणीय बाबांना उदंड आयुष्य लाभो, अशी आमची ईश्वराजवळ विनवणी आहे. आमच्या बाबांचे कृपाछत्र असेच आमच्यावर राहो ही बाबांनाच विनंती आहे. शेवट करण्यापूर्वी बाबांना माझे वारंवार प्रणाम व मला उदार मनाने नेहमीप्रमाणे क्षमा करावी ही नम्र विनंती.

- सौ. दिप्ती गणेश बारी


सहज, सुंदर, सोपी
आणि गुणकारी उपचार पध्दती
- होमिओपॅथी.

## गवसलेलं उत्तर

परमप्रिय व परम आदरणीय डॉ. श्रीमान सुनिलदत्त चौधरी ऊर्फ सुनिल मामा, यांसी सा. नमस्कार!
आपण डॉक्टर आहात की देव आहात हा प्रश्न मला आपल्या पहिल्या भेटीत पडला होता. आपणाकडे येणाऱ्या अनेकांना ही असेच वाटत असेल असे मला निश्चितपणे वाटते.

आपण गेल्या कित्येक वर्षांच्या अनुभवानंतर आपण एक निष्णात डॉक्टरही आहात व आपल्या भक्तांवर, चाहत्यांवर असीम कृपा करणारे साक्षात परमेश्वरही आहात हे मला गवसलेलं उत्तर आहे! आपल्या गेल्या पंचवीस वर्षांच्या अथक, अखंड व यशस्वी दिव्य सेवायज्ञाला माझे व माझ्या परिवाराचे मनःपूर्वक अभिवादन! आपला हा दिव्य सेवायज्ञ यापुढेही असाच अखंडपणे तेजस्वी सुयशासह अव्याहत चालत राहो हीच प्रभुचरणी मनःपूर्वक प्रार्थना!

आपणा सर्वांना दीर्घायुरारोग्य, सुखसमाधान, आनंद, उत्कर्ष व समृद्धी लाभो हीच प्रभुचरणी मनःपूर्वक प्रार्थना!

सौ. तेजस्वीनी प्रशांत वैद्य, अकोला

## जीवनदाता

प्रिय डॉ. दादासाहेब,   आपण केलेल्या कामगिरीबद्दल २५ वर्ष पूर्ण होत आहेत. आपण रुग्णास जीवनदान तर दिलेच आणि देवदर्शन करून दिले आहेत. आमच्या कुटुंबास तुम्ही वेळोवेळी मार्गदर्शन करून दिल्याबद्दल मी तुमचा ऋणी आहे व यापुढेही तुमची रुग्णसेवा अशीच चालू राहावी अशी श्री प्रभुचरणी आमचे कुटुंबातर्फे प्रार्थना करतो आहे.

आपले छत्र आमच्या डोक्यावर सदा असेच राहो. पुनःश्च! पुनःश्च! प्रभू चरणी प्रार्थना करतो.

आपला सेवेकरी रुग्ण, राजेंद्र बारी

## सहयोगी

आधार दुःखितांचे होतात हात ज्यांचे, सेवेत धर्म ज्यांचा, सेवेत तीर्थ ज्यांचे, सहवास ईश्वराचा त्यालाच नित्य आहे."
सर्वच ठिकाणी परमेश्वराचा वास होऊ शकत नाही. मात्र ज्या ठिकाणी सत्य आहे, निःस्वार्थ सेवा आहे, कर्मसाधना आहे त्या ठिकाणी मात्र साक्षात परमेश्वर वसत असतो. असेच एक स्थान म्हणजे 'डॉ. सुनिलदत्त चौधरी यांचे चिकित्सालय.' हे मी अतिउत्साहात, अतिशयोक्तीने लिहीत नाही. जे खूप वर्षात मला अनुभवास आलं तेच लेखणीतून उतरलंय.

काय म्हणू मी डॉक्टरांना? डॉक्टर म्हणू ? भावोजी म्हणू? मोठे दातृत्व असलेले कर्मयोगी म्हणू? की दादा?
हो दादाच! दादा म्हणजे मोठा भाऊ आणि दादा म्हणजे दादागिरी करणारा. खरोखर चिकित्साशास्त्रात ज्याची दादागिरी आहे ते डॉक्टर दादा. जास्त बोलणं नाही, डोळ्यात जरब, एखाद्या अवलियासारखं रूप. ज्यांच्या केबीनमध्ये गेल्याबरोबर आपण शांतता अनुभवतो. तिथे गेल्यावर मनोमन अर्धा आजार दूर झाल्याचा भास होतो. असं ठिकाण म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरींचे चिकित्सालय.

खरंच आमची लायकी तरी काय होती या देवस्वरूप अवलियाला भेटायची. पण आमचं पूर्वसंचित की आमच्या मुलामुळे (हितेशमुळे) आम्ही डॉक्टरांकडे गेलो. खरंच सांगते जळगांवचे डॉक्टर म्हटले की अंगावर काटा येतो. इतर डॉक्टरांची पायरी चढतांनाच आपण आपल्या खिशाचा विचार करतो की आता कितीला चाट बसते देव जाणे, असे वाटल्याशिवाय राहत नाही. परंतु आम्हाला इथे मात्र वेगळाच अनुभव आला. या दत्त म्हणून समोर बसलेल्या डॉक्टरांनीच हितेशच्या वडिलांना बालपणीची ओळख देऊन मैत्रीचा हात पुढे केला हा किती मोठेपणा! (इतर डॉक्टरांना आपल्याला ओळख द्यावी लागते तरी सुद्धा या व्यवहारी जगात कुणी ओळख देत नाही.) किती उदारता ही आणि हो मलाही अगदी प्रेमाच्या नात्याने वहिनीच म्हणणार, आणखी किती मोठेपणा सांगू! अहो इतरांना ओळख करून देतांनाही सांगतात की ही डॉक्टरची वहिनी लागते. मी जरी डॉक्टरांची वहिनी असले तरी मला डॉक्टरांच्या दवाखान्यात गेल्यावर एखाद्या मंदिरात अवलियाच्या दर्शनाला आल्यासारखे वाटते. मी असं म्हणायला काही कारणं आहेत. आपण स्वार्थी, अतिसामान्य माणसं! चमत्काराशिवाय नमस्कार न घालणारी. पूर्वी वातावरणातील थोड्याही बदलाने बिछाना धरणारे मी व माझा मुलगा डॉक्टरांच्या औषधाने उभे आहोत. आज मला व मुलाला वातावरणातील बदलामुळे थोडाफार त्रास झाला. तरी पूर्वीसारखा बिछाना पकडावा

लागत नाही आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे मला या देवमाणसाने कधीही बिलासाठी अडविले नाही.

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या विधानाप्रमाणे डॉक्टरांचा स्वभावही वेगळाच. जसे मनात येईल तसेच होणार. आपल्याला जसे मंदिरात देवाच्या दर्शनासाठी प्रतीक्षा करत रांगेत तिष्ठत उभे राहावे लागते तसे यांच्या औषधरूपी प्रसादासाठी तीन ते चार तासांचा अवधी द्यावाच लागतो. आपण रागावतो, संतापतो (अर्थात मनातच) आणि त्याच मूडमध्ये डॉक्टरांच्या केबीनमध्ये गेलो आणि डॉक्टरांच्या प्रसन्न मुद्रेकडे पाहिले की लगेच राग, संताप जाऊन विचार येतो की आपल्याला थोडा वेळ लागला तर आपण कंटाळतो, नंतर चिडतो, परंतु डॉक्टरांकडे केव्हाही पहा प्रसन्न मुद्रेतच दिसतात. कुठून येत असेल डॉक्टरांमध्य एवढी शक्ती, सहनशीलता, चेहऱ्यावर थकल्याचा जराही लवलेश नाही. तेव्हा वाटतं आपण किती सामान्य.

डॉक्टरांवर मनापासून विश्वास ठेवला तर आपल्याला आपल्या दुःखातून, वेदनेतून निश्चितच सुटका मिळेल. याचा अनुभव म्हणजे माझ्या सासूबाई. त्यांना संधिवातामुळे उठणे, बसणे, चालणे अशा क्रिया करणे फार त्रासदायक झाले होते. परंतु डॉक्टरांच्या औषधांनी व मार्गदर्शनाने आज त्या हिंडू-फिरू शकतात. अशा सत्पुरुषाला काय म्हणावे? त्यांच्याबद्दल कितीही लिहिले तरी कमीच. कुणीही डॉक्टरांचा स्वभाव अनुभवला तर म्हणतील, 'काय हा माणूस विक्षिप्त!' परंतु डॉक्टर फणसाप्रमाणे आहेत. वरवर काट्यासारखे दिसणारे परंतु आतून मात्र फणसातील गोड गऱ्याप्रमाणे. शेवटी हेच म्हणता येईल डॉक्टरांबद्दल -

"जे का रंजले, गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।
देव तेथेची जाणावा। डॉक्टर (सुनिलदत्त) त्यालाची म्हणावा।।"

आपल्या अबोली प्रतिष्ठानामार्फत न बोलता, आपल्याला प्रत्यक्ष न दिसता डॉक्टर कितीतरी जनकल्याणाची कामे करीतच असतात. तसेच धार्मिक उपक्रमांच्या बाबतीत तर सांगायलाच नको!

सौ. हेमलता देशमुख (मास्तरीण)
मित्र - जग्या (जगदीश देशमुख)

## अथांग व्यक्तिमत्व

*"असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिन्धुपात्रे।*
*सुरतरुवर शाखा लेखनी पत्रउर्वी।।*
*लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालं।*
*तदपि तव गुणानामीश पारं न याति।।"*

**सारांश :** सर्व समुद्राच्या पाण्याची शाई केली, सर्व पृथ्वीचा कागद केला, आणि पर्वतांची लेखणी केली व स्वतः प्रत्यक्ष शारदादेवी लिखाण करू लागली तरी प्रभूंचे (शंभूचे) महत्त्व वर्णन करायला युगानुयुगे अपूर्ण पडतील. तद्वतच आपल्या गुणांचे महत्त्व वर्णन करणे या जन्मात तरी शक्य होणार नाही.

थोडक्यात व मोजक्या शब्दांत आपला मनोदय प्रकट करावा, असे वाचल्यानंर एका पानावर ते वर्णन करणे शक्य नव्हते. म्हणून हा एक असफल प्रयत्न करीत आहे. वैद्यक क्षेत्राच्या बाबतीत म्हणावे तर अशी कोणतीही व्याधी नाही की ज्याकरिता आपल्याजवळ उपाय नाही. नागीन, कॅन्सर, कोड, कुष्ठ किंवा ज्यांची नावे किंवा ती व्याधी आज अस्तित्वात नाही त्यांचीही कल्पना आपणास आधीच लागते व त्यावर तेव्हापासून इलाज सुरू करून रोग्याचा संभाव्य धोका आधीच नष्ट केला जातो. हा आपला होमिओपॅथी वैद्यक शास्त्रातला अभ्यास जवळून बघायला मिळतो. याची प्रचिती दवाखान्यात पाऊल टाकताच जाणवते.

लक्ष्मी व सरस्वती या एका ठिकाणी कधीच नांदत नाहीत. परंतु या नियमाला या ठिकाणी अपवाद आहे. कारण या दोघीही आपणाकडे सुखासमाधानाने नांदत आहेत. त्याचे कारणही तसेच आहे. कारण दोघींचा योग्य वापर करण्याची कुवत आपणात आहे. संपत्तीचा वापर सत्कार्य व भगवत्कार्य याकरिता केला जातो. आपल्या अबोली संस्थेमार्फत हीच कार्यें राबविली जातात. त्यामुळे सर्वांना भक्तीचा मार्ग दाखवून चांगल्या व योग्य कर्माची दिशा मिळते. याचा फायदा अनेकांना झालेला दिसतो.

प्रथमपासून डॉक्टर या नात्याने मानवसेवेचे व्रत घेतले असल्याने रोग्याची सेवा करण्याकरीता रात्रंदिवस कष्ट करणारे व पूर्ण रोग

बरा होईपर्यंत शांत न झोपणारे डॉक्टर आपल्या रुपात आम्ही पाहिले आहे. कोणतेही असे क्षेत्र नाही जे आपणास अशक्य आहे. नेपोलियन बोनापार्टच्या शब्दात सांगायचे झाल्यास "अशक्य शब्द मूर्खांच्या शब्दकोशात सापडतो," असे आपले मत आहे. याचाच अर्थ कोणतीही गोष्ट आपणास अशक्य नाही. याची प्रचिती दवाखान्यात असलेली प्रशस्तीपत्रक व सर्टिफिकेटस् पाहून सिद्ध होते.

निस्सीम गुरूभक्ती, कर्तव्य तत्परता, समाजकार्य व भगवतकार्य या चारही गुणांचा येथे उत्तम संगम झाला असून स्वतःचे जीवन सुखी करून दुसऱ्याचे आयुष्य सुखावह करणारे एक व्यक्तिमत्त्व फक्त त्यांचेच - डॉ. सुनिलदत्त चौधरी.

अशोक साखरे (साखरे गुरूजी)

## देव तेथेचि जाणावा।

आम्ही साताऱ्याला होतो. तेथे माझ्या पोटाचा व पाठीचा त्रास सुरू झाला. माझ्या मिस्टरांचे म्हणणे होते की चुकीचा व्यायाम केला म्हणून त्रास होतो आहे. मग आम्ही हाडाच्या डॉक्टरांना दाखविले. तरी फरक नाही. मग आमची बदली कोल्हापूरनंतर जळगाव येथे झाली. तेथे गेल्यावर माझ्या मिस्टरांना स्कीन डिसीज झाला. मग माहिती मिळाली की डॉ. सुनिलदत्त चौधरी हे चांगले डॉक्टर आहेत आहे. आपण त्यांना दाखवू. तेव्हा आम्ही त्यांना दाखवले. दोघांचा इलाज डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याकडे सुरू केला. काही दिवसांतच आम्हा दोघांनाही खूपच फरक पडला. आमच्या दोघांचीही तब्येत चांगली झाली. आमचा इतका डॉक्टरांवर विश्वास बसला की जगाच्या पाठीवर कुठेही आम्ही जाऊ, पण आम्ही डॉ. सुनिलदत्त चौधरींकडेच तब्येत दाखवू. काही दिवसांनी मला चिकनगुनिया झाला. त्याही त्रासाला डॉक्टरांनी इलाज केला. आज १० वर्षांपासून आम्ही डॉक्टरांकडे जात असतो. कुठलाही त्रास असला तरी आम्ही डॉक्टरांकडेच जातो. असे आमचे जगावेगळे डॉ. सुनिलदत्त चौधरी.

सौ. अल्पना महाजन, मालेगांव

# पाकिटावरील 'सु'-विचार



- नशिबात आहे तसेच घडते, पण नशीबही तर आपल्या कर्मानेच घडते.
- शब्द पुस्तकात असतात, त्यांचा अर्थ आयुष्यात असतो.
- जो शहाणा असेल त्याने समजून, आणि जो अडाणी असेल त्याने श्रध्देने बंधने पाळावीत.
- अकार्यक्षमतेवर पांघरूण घालणारा शब्द 'नशीब'.

## मनमिळावू

असंख्य स्वप्न उराशी बाळगून सतत नवनव्या उंचीचा वेध घेत उडणारे डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी.

क्षीरसागर के पानी में किसी को विष नहीं चढ सकता
जो दवा लाभदायक है वह किसी को मार नहीं सकती
अर्थात जो जैसा होता है उसका फल भी वैसाही शुभ या अशुभ होता है।
जो सुखी है, उसमें से सब के लिए सदा सुखही निकलेगा, दुख कदापि नहीं।
डॉक्टर आपके आश्रित मरीज भी सुख के अभिलाषी हैं।

- शांतीलालजी जैन (धुळे)

## अनंत उपकार

डॉक्टर बाबा, आपके उपकार के प्रति अपने अन्तर के उद्‌गार प्रकट करने में मैं उसी प्रकार असमर्थ हूँ।
जिस प्रकार की प्रथम बार गुड का रसास्वादन करनेवाला गूंगा गुड का स्वाद बताने में।

- चेतना राजेंद्र लुंकड

# संत पुरुष

आप केवल डॉक्टर सुनिलदत्त चौधरी के नाम से जाने जाते है।

वेद के शब्दकोश के अनुसार इसका अर्थ स्वच्छ जल दत्तक ऐसा होता है।
यह शब्द सूफी फकीर पुरुष - झेन फकीर पुरुष - संत पुरुष के अनुसार
वेद के शब्द कोश से लिया गया है।

इसका अर्थ है, सागर में विलीन हो जाना
डॉ. सुनिल दत्त के अनुभूती की व्याख्या तो होती है लेकिन व्यक्ती कहते हैं कि
अनुभोक्ता के संबंध में क्या?

इसके लिए हम स्वच्छ जल दत्त का प्रयोग करते है।
बाद में हमे पता चला के ऐतिहासिक रूप से सुदूर पूर्व में भी सुनिलदत्त
शब्द का प्रयुक्त होता रहा है।

इसका अभिप्राय है भगवत्ता को उपलब्ध व्यक्ती
जिसपर आकाश फुलों की वर्षा करता है।

- *वेद के शब्द कोश से*

जी. एस. पिंजारी, बिरबलजी शर्मा

## धन्वंतरी

सुनिलदत्त चौधरी यांना सविनय प्रणाम,  आपण आधुनिक युगातील हनीमन आहात. रोग्यांना नवचैतन्य देणारे धन्वंतरी आहात. रोग्यांना आजाराबद्दल अभय देणारे एक महनीय व्यक्ती आहात. म्हणून मी आपणाबद्दल माझे मनोगत व्यक्त करीत आहे. यात कुठलीही अतिशयोक्ती नाही. आपण खऱ्या अर्थाने एक समाजसेवकही आहात. आपण आपली आर्थिक प्राप्ती बऱ्याच वेळेला शैक्षणिक व सामाजिक कार्याला दिलेली आहे म्हणून आपण उदारहृदयी आहात. आपल्या अचोली प्रतिष्ठानद्वारे आपण आजपर्यंत बरीच रुग्णसेवा व समाजसेवा केली आहे. आपणाकडून बरे झालेले अनेक रुग्ण आहेत जे आपल्याबद्दल अत्यंत कौतुकास्पद शब्द व्यक्त करतात आता मीदेखील आपण आमच्या कुटुंबियांसाठी काय केले आहे हे या पत्राद्वारे लिहीत आहे. मी, माझे कुटुंब व आप्तेष्ट आपली दहा ते अकरा वर्षांपासून औषधी घेत आहोत. माझ्या गुडघेदुखीचा त्रास आपण रामबाण औषध देऊन कायमचा नव्हे तर बहुअंशी दूर केला. माझा मधुमेहाचा त्रास दूर केला. अलिकडेच मला काविळीचा खूपच त्रास होत होता. परंतु आपण इतकी सुयोग्य औषधी दिली की कावीळ कुठल्या कुठे भुर्रकन पळून गेला. याहीपेक्षा एक उल्लेखनीय गोष्ट अशी की माझ्या पत्नीला मानसिक अस्वस्थेतचा त्रास होता. ती अस्वस्थताही आपण संपूर्णपणे घालवून तिचे जीवन निरामय केले.

खरे म्हणजे आपणाबद्दल बरेच लिहिण्यासारखे आहे. परंतु आपण प्रसिद्धीविन्मुख आहात म्हणूनही अती लिहिणे योग्य वाटत नाही. आपणासारख्या देव माणसाला प्रदीर्घ आयुष्य लाभो, यापेक्षा आणखी कुठली प्रार्थना प्रभुचरणी मी करू शकतो?
आपल्या यशामध्ये आपल्या पत्नीचाही निश्चितच सहभाग आहे. असे म्हणतात आणि ते खरेही आहे की प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे त्याची सहधर्मचारिणी असते आणि आपल्याबाबतीतही ते लागू पडते.

आपण कधीही कट प्रॅक्टीस केली नाही, हे आपल्या प्रॅक्टीसचे वैशिष्ट्य आहे. श्रीमंत होण्याची पुष्कळ संधी असूनही आपण पैशामागे धावत आलेले नाहीत. प्रसिद्धीची ही खूप संधी असूनही आपण तिच्यामागे लागत नाही. आपला स्थायीभाव सेवा हाच आहे. आपल्या कार्याबद्दल पुनःश्च आपले अभिनंदन करतो व आपली रजा घेतो.

आमच्या कुटुंबियांची जी सेवा केली त्याबद्दल धन्यवाद.

- श्री. दत्तात्रय नथ्थु चौधरी

## निर्भयी

१८ फेब्रुवारी २००९, रोजी आदरणीय डॉक्टर 'श्री. सुनिलदत्त चौधरी' यांच्या दवाखान्यात एक जाहीर निवेदन करण्यात आले. ते असे की डॉ. श्री. सुनिलदत्त चौधरी यांनी त्यांच्या डॉक्टरी व्यवसायाच्या गत २५ वर्षांच्या कारकिर्दीत रुग्णांची सेवा केली ? की नुसताच पैसा कमवला? की ईश्वराच्या कृपेने व होमिओपॅथीद्वारे रुग्णांना बरे केले? या संदर्भात इच्छुकांनी आपला अभिप्राय कळवावा. मला जेव्हा हे कळले तेव्हा मला तर खूपच आनंद झाला. कारण आपला ज्यांच्यावर विश्वास आहे, श्रद्धा आहे अशा व्यक्तींबद्दल बोलायला किंवा लिहायला कुणाला आवडणार नाही? आणि म्हणूनच प्रथमतः मी आमच्या आदरणीय डॉ. बाबांची आभारी आहे की त्यांनी आमचं मन जाणून आम्हांला इतकी छान संधी दिली. आमच्या संपूर्ण पेशंट परिवारातर्फे मी बाबांचे मनापासून आभार मानते. तसेच काही लिहिण्यापूर्वीच मी सर्वांतर्फे त्यांची क्षमाही मागू इच्छिते. कारण बाबांचे आम्हा सर्वांवरच अनन्य उपकार आहेत ज्याची परतफेड आम्ही करू शकत नाही. पण आभार व्यक्त करू शकतो. तरीही त्यांच्यासाठी काही लिहिणे म्हणजे 'लहान तोंडी मोठा घास घेणे' असेच होईल. आणि आमच्या बौद्धिक पातळीनुसार जे काही लिहू त्यात भावनेच्या भरा काही कमी-जास्त जर लिहिले गेले तर त्यासाठी दादांनी आम्हांला त्यांची मुले समजून क्षमा करावी ही नम्र व प्रामाणिक विनंती.

सौ. दिप्ती गणेश बारी

## यशवंत

चिकाटी व ध्यास म्हणजे उत्तुंग असे यश हेच डॉ. सुनिलदत्त यांचे होमिओपॅथीक, अध्यात्मिक, सामाजिक व कौटुंबिक यशाचे गमक आहे.

- डॉ. प्रमोद जोशी, कन्सल्टींग होमिओपॅथ

## समर्थ बाबा

आदरणीय बाबांबद्दल लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी माझ्यावर केलेल्या उपकारांसाठी मी त्यांचे आभार मानते आणि त्यांच्यासाठी थोडक्यात जे लिहावेसे वाटते ते प्रथमतः लिहीत आहे.

मधूर स्मृतींना घेऊन आला आहे आजचा हा दिवस
तुमच्याच आशीर्वादाने झाले आमचे जीवन सुरस,

तुम्हीच आमचे मार्गदर्शक आहात तुम्हीच आहात गुरू,
परमेश्वर दर्शनासाठी का आम्ही ठायी-ठायी फिरू?

अनंत तुम्ही उपकार केले 'धन्य' केले आम्हां
तुम्हीच आमुचे शिवशंभू अन् तुम्हीच आहात 'ब्रम्हा'.

तुमचा महिमा लिहिण्यास मी खरंच असमर्थ आहे
'आभार' व्यक्त करण्यासाठीचा हा केवळ क्षुल्लक 'प्रयत्न' आहे !

आत्मविश्वास जागवणारे तुमचे आश्वासक शब्द,
नेहमीच दरवळतात मनात जगण्यासाठी आम्हांस प्रेरणा नवीन देतात.

रचतात एक आत्मीयतेची चिरंतन प्रार्थना,
मनापासून केलेली प्रामाणिक 'साधना'...

एक सार्थ जाणीव आधाराची, आपुलकीची
आजवर, तुम्हीच आम्हांस दिली,
निःस्वार्थी भावनेने नेहमीच माया आम्हांवर केली...

म्हणूनच, आदर हा केवळ एक शब्द नसून,
कृतज्ञतेचे प्रतीक बनतो,
...जेव्हा तो असतो तुमच्या संदर्भात.
तुमच्याहून विशेष कोणी नाही, आम्हांसाठी या विश्वात...

तुमच्या मायेचे छत्र असेच सदैव आम्हांवरती राहो.
समाधान आणि सौख्यपूर्ण असे दीर्घायुष्य, बाबा तुम्हांस लाभो...
... हीच कृतज्ञतापूर्वक शुभेच्छा !

सौ. दिप्ती गणेश बारी

# देवत्व !

आदरणीय बाबा, जय जिनेंद्र.

चेह-यावरच्या तेजस्वीतेत असणारी शांतता,
शब्दांच्या लवचिकतेमध्ये असलेली स्पष्टता
नजरेच्या शून्यतेतून डोकावणारी निरागसता,
विचारांच्या शुध्दतेत असलेली तीव्रता
आचरणांच्या साधुतेत असलेली शास्त्रीयता
दुःख विसरायला लावणा-या हास्यात असणारी निर्मलता
पण...
चेह-यावरची शांतता मनात नसते
शब्दांवरची पकड विलक्षण असते
नजरेतुन काही सुटत नाही...
कितीपण लपवलं तरी...
त्यांच्यापासून काही लपत नाही
विचारातली श्रीमंती परिधानात नसते
आचरणातली साधूता व्यवहारातही आदर्श असते
चेह-यावर उमलणा-या हास्यामागे असंख्य वेदना असतात
आमच्या चुकांची शिक्षा तेच भोगत असतात
रोज पाहावं, काहीतरी नवीन समजत...
बरंच तर कल्पनेच्या पलीकडील असतं...
सांगता-सांगता ते बरंच काही अर्ध्यावर सोडून देतात
आमच्या डोक्याला मात्र मुंग्या येतात
बोलता-बोलता त्यांची नजर शून्यात स्थिरावते

आमची मात्र मती गुंग होते
आता... तुम्हीच सांगा...
देव का यापेक्षा वेगळा असतो?
तरीपण... मन कळवळते
कोणाला देवत्व देऊ नये
कारण, देवत्त्व दिल्यावर...
घेतले जाणारे कष्ट समजत नाही
त्यांची तळमळ कळत नाही
करुणेपोटी वाहणारे अश्रू दिसत नाहीत
महामानवाचे मोठेपण देवत्वात विलीन होते
भक्तांचे कर्तृत्व कमी होते
व्यर्थ अपेक्षांचे ओझे वाढत जाते...
म्हणून तुम्ही कोणाचे भाऊ, कोणाचे जावई...,
कोणाचे पोर, कोणी बायकोचे भाऊ,
तर कोणी तुमचे जावई,
एकंदरीत आमच्या सगळ्यांचे लाडके बाबा...
बस... फक्त बाबा...
... लाडके बाबा...
... परमप्रिय बाबा...
अंतरीच्या भावना या समर्पित करतो चरणांशी
अज्ञानी जीव हा चुकला असेल,
तरी राहू द्या चरणांशी,
भव-भव भटकतो कुठे न मिळाली सावली,
आलो तुमच्या दारी, आता इथेच राहू द्या माऊली,

- रावण सेनेतील एक लहान रावण... **फौलादी बुलेश्वर**

## माझे बाबा

आदरणीय बाबा,    आपण विचारलेल्या प्रश्नांना अभिप्राय देण्याची माझी लायकी नाहीये. पण तरी मी हा गुन्हा करणार आहे. कारण बाबा आपल्याबद्दल जी व्यक्ती अज्ञात असेल त्या व्यक्तीला सुद्धा या जगात माझ्या आणि आम्हा सर्वांच्या बाबांचे व्यक्तिमत्त्व कळायला हवे.

बाबा आपण ईश्वरकृपेने आणि आपल्या होमिओपॅथीच्या ज्ञानाद्वारे रुग्णसेवाच केली. आपण पैसेसुद्धा कमविले पण फक्त आणि फक्त समाजसेवेसाठीच! बाबा आपण रुग्णसेवा आणि समाजसेवेसाठी फार कठीण परिश्रम घेतले आहेत आणि त्याच परिश्रमांचे फळ आज आपल्याद्वारे आम्हा सर्वांना मिळत आहे.

या जगात मनुष्याने निःस्वार्थी असावे असे म्हटले जाते, पण बाबा आपल्याबाबतीत मी स्वार्थी होऊ इच्छितो. आणि गर्वाने सांगतो की बाबा माझे आहेत. मनुष्याने नशीब हे त्याच्या कर्मावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती ज्यावेळेस बाबांच्या सान्निध्यात येते तेव्हापासून त्या व्यक्तीचे कर्म आपोआप सुधारतात आणि त्या कर्मामुळेच नशीब बदलायला सुरूवात होते.

बाबा आम्ही आपणास बाबा म्हणतो म्हणजेच आपणास वडिलधारे मानतो. म्हणूनच मी जे काही माझे मत व्यक्त केले आणि माझे विचार मांडले त्यात काही चूक झाली असेल नसेल तरी पण मी क्षमस्व आहे.

बाबा आपल्या मायेच्या छायेत आणि सहवासात आमचे जीवन असेच जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!


आपल्याकडे
लॉजिंग बोर्डिंग नाही...

## दयासागर

आदरणीय डॉ. बाबांविषयी लिहायचे म्हटले तर खूप काही आठवतं, पण बोलताही येत नाही आणि लिहिताही येत नाही. कारण हेच की आपल्या 'गुरू'बद्दल काय लिहावे? असं वाटतं की आपण लहान तोंडी मोठा घास घेतो आहे. आपण लिहिलेलं आपल्या मनातल्या तोडक्या-मोडक्या भाषेत लिहिलं जाईल म्हणून मी माझे 'गुरू' डॉ. बाबा यांची क्षमा मागू इच्छितो.

१९९८ नोव्हेंबर महिन्यात माझी मोठी मुलगी बबीता एम.ए.,बी.एड. झालेली अचानक जास्त आजारी झाली. तिला आमच्या फॅमिली डॉक्टरांच्या औषधीनेही फरक पडत नसल्याने माझे मोठे जावई मला म्हटले की आपण एक वेळा फक्त डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्याकडे घेऊन जाऊ. मग ते स्वतःच तिला डॉ. बाबांकडे घेऊन गेले. डॉ. बाबांनी ट्रीटमेंट सुरू केल्यावर तिचा आजार हळूहळू बरा होत गेला. काही दिवसांनी तर आमची हरवलेली बबीता बाबांच्या आशीर्वादाने आम्हास परत मिळाली. कारण तिच्या वडिलांची ती जीव की प्राण होती. डॉ. बाबांनी त्या काळात जेव्हा बबीतावर उपचार करून तिला पूर्ण बरी केली, तेव्हा तर आमच्या घरातील काय पण नातेवाईकांनीसुद्धा तोंडात बोटे घातली. आणि अशाप्रकारे डॉ. बाबांनी आमच्या जीवनाची वादळात सापडलेली नाव किनाऱ्याला लावली. म्हणूनच म्हणावेसे वाटते -

"गुरुदेव मेरी नैया। उसपार लगा देना।
अब तक तो निभाया है। आगे भी निभा लेना।।"

मी आणि माझा पूर्ण परिवार स्वतःला खूप धन्य समजतो की आम्ही डॉ. बाबांचे पेशंट आहोत. (माझे मुलं, मुली, सुना, जावई, नाती) व इतर सगळ्यांना तर वाटते...

गुरुदेव तुम्हाला भेटाया। जीव तळमळतो किती सांगू या।
भव सिंधूमधूनी चरणाला। नाही दुसरा जगती या।
आम्हा द्या ठाव चरणाचा। जीव तळमळतो किती सांगू या।।

जेव्हापासून माझे सर्व कुटुंब डॉ. बाबांकडे यायला लागले तेव्हापासून मी सर्व प्रकारची काळजी सोडली. मला फक्त एकच वाटते की डॉ. बाबांच्या दरबारात (दवाखान्यात) जो आला त्याची सर्व प्रकारची दुःखे नाहिशी होतात. बाबांना भेटायला येणारा प्रत्येकजण बाहेर हसतहसतच येतो.

**डॉ. बाबांचे बोलणे म्हणजे 'दगडावरील कोरीव रेषा' होय.** अनेक प्रसंग गेलेत पण मी बी.पी, डायबिटीसची पेशंट फक्त बाबांमुळेच सगळे काही विसरून माझ्या मुला-बाळांकरीता जगत आहे. १७ एप्रिल २००७ रोजी माझ्या मुलांचे 'पितृछत्र' हरपले. आजी-आजोबा नाहीत तर 'मामा'सुद्धा नाहीत. पण डॉ. बाबांच माझ्या मुलांकरिता, परिवाराकरिता आधारस्तंभ आहेत. आमच्या परिवारात माझ्यापेक्षा कोणीच मोठे नसल्याने आम्ही फक्त डॉ. बाबांच्या आशीर्वादाने प्रत्येक प्रसंगाला तोंड देत आहोत. काहीही समस्या असल्या तरी फक्त बाबांच्या आठवणीनेसुद्धा मार्ग सुचतात. बाबा हे माझे गुरू तर आहेतच, त्याबरोबरच माझ्या मुला-बाळांकरीता ते माझे 'थोरले बंधू' आहेत. माझ्या परिवारातर्फे या दोन ओळी डॉ. बाबांच्या चरणी -

नाम तुमचे घेता बाबा होई समाधान
तुमच्या पदी लागो माझे तन, मन, ध्यान
नाम तुमचे घेता बाबा होई समाधान।।धृ।।
आधार तुम्ही आमचे। गूढ तुमचे ज्ञान।
मनुष्यजन्मी येऊनी। करिसी कार्य ते महान।
दर्शनास बाबा तुमच्या। तरसती प्राण।
भेट तुमची होता बाबा। मन होई शान्त।
नाम तुमचे घेता बाबा । होई समाधान।।१।।
काम, क्रोध, माया भुलवी। मन धाव घेई।
मोह मायेचे हे जाळे। जगी ठायी-ठायी।
आहात तुम्ही अंर्तज्ञानी। तुम्हा सर्व जाण।
अल्प बुद्धी माझी बाबा। भक्त मी अजाण।
नाम तुमचे घेता बाबा होई समाधान।।२।।
नदी ह्र-यासही असते। ओढ सागराची।
आशा म्हणे ऐका बाबा। हाक पामराची।
तुम्हा विना बाबा। आमुचे हरपते भान।
बंधू माय बाप तुम्ही। तुम्हीच आमची शान।
नाम तुमचे घेता बाबा। होई समाधान।।३।।

आमचा संपूर्ण परिवार काहिही कार्यक्रमानिमित्त एकत्र जमलो तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत एखाद्याने जरी म्हटले,
'डॉ. बाबा कुणाचे?'
सर्वांचे एकच उत्तर, 'डॉ. बाबा आपल्या सर्वांचे!'

माझी भगवंताला एकच मागणी आहे की हे देवा! माझं आयुष्य डॉ. बाबांना लाभू दे, त्यांना शतायुष्य दे.
माझ्याकडून जर काही कमी-जास्त लिहिलं गेलं असेल तर बाबा मला माफ करतीलच कारण ते आहेतच दया के सागर.

- श्रीमती आशा विठ्ठल बारी

## Adarniya Dr. Kaka,

Tumhala Namaskar ! I dont know if my page could have a place in your book. I wish you hearty congratulations for your successful 25 years practice.

Thanking you,

- Pooja Daruwala

## सुनिल... मूर्तिमंत उत्साह !

ॐ श्री: ५।

[illegible]

[illegible] आत्माराम,

अर्पण.

महाभारतात एक श्लोक आहे. माणसाच्या जीवनातील परस्पर सहवासावर विदारक प्रकाश टाकणारा तो श्लोक प्रसिद्ध आहे.

'यथा काष्ठंच काष्ठं च समेयातां महादधौ।

समेत्यच व्यपेयातां तद्वत भूतसमागमः।।'

ग.दि. माडगूळकरांनी याच श्लोकाचा अनुवाद गीतरामायणातील 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' या गीतात असा केला आहे -

'दोन ओंडक्यांची होते सागरात भेट

एक लाट तोडी दोघां पुन्हा नाही गाठ।।'

माणसा-माणसातील गाठी-भेटी याच स्वरूपाच्या असतात. अंतर इतकंच की लाकडांचा त्या सहवासाच्या काळात परस्परांवर काहीच परिणाम होत नाही आणि माणसं परस्परांवर परिणाम केल्याशिवाय राहत नाहीत. मी आणि सुनिल - दोघांत असंच घडलं! व माझा सहवास सुमारे १९८०-८१ ते आजतागायत, या काळाचा, या तीस वर्षांत आम्ही 'अस्थिचर्म देहाचे' पण चैतन्य असलेले 'ओंडके' इतके जवळ आलो, आमच्यात इतकी घसट झाली की मैत्रीचे व्यवहारी नाते ओलांडून 'सहृदय' केव्हा झालो ते कळलेच नाही!

धोंडूमामा साठे होमिओपॅथिक महाविद्यालयात आमच्या दोघांचाही प्रवेश एकाच वेळचा. मी पहिल्यापासून पुण्याचा, तर सुनिल जळगांवकर! चष्मा घातलेली एक किडकिडीत तरुण व्यक्ती माझ्याच शेजारी बाकावर येऊन बसली. त्यानंतरची ३-४ वर्षे आम्ही सतत बरोबर असू. सुनिल जगन्मित्र, पण माझ्याशी त्याचे नाते अधिक आतले, जवळचे व घट्ट असे राहिले. या काळात आम्ही दिवसरात्र एकत्र असू. अभ्यास एकत्र, गप्पा एकत्र, खाणे एकत्र. मी, सुनिल व राजू बोंडे, आम्ही तिघे म्हणजे 'तीन तिघाडा' अशी परिस्थिती होती. पण 'काम बिघाडा' मात्र कधीच झाले नाही. सुनिलचा स्वभाव म्हणजे स्वच्छ आरसा! अतिशय प्रेमळ, सर्वांना मदत करणारा, स्मितमुखी, अतिभाषी, निःस्वार्थी. सुनिल सर्वांना प्रिय होणे आश्चर्य असे काहीच नव्हते. सार्वजनिक कामामध्ये त्याला अतिशय उत्साह. अर्ध्या रात्रीसुद्धा कुणालाही मदतीला तयार असे. चांगल्या केलेल्या गोष्टींचा गवगवा न करण्याची वृत्ती, केलेली मदत या हाताची त्या हाताला कळू न देणे हा उपजत बाणा - पुढे-पुढे न करण्याची प्रवृत्ती असूनसुद्धा सुनिल सतत पुढेच राहिला!

त्यावेळेस आमच्या महाविद्यालयाच्या वार्षिक निवडणुका म्हणजे एक मोठा महोत्सव असे. सर्व प्रकारचे (बहुधा चांगले) राजकरण चालत असे. सुमारे ३ ते ४ महिने प्रचार, घोषणा, परिपत्रके, भित्तीपत्रके, प्रचारसभा यांची रणधुमाळी माजत. रोज रात्री मी, सुनिल व राजू बोंडे आमची सुनिलच्या खोलीत खलबते चालत असत. आज आपण ज्याला 'थिंक टँक' म्हणतो, तसे मी व राजू असू. उमेदवार ठरविण्यापासून ते उमेदवार फोडण्यापर्यंत, प्रचाराची पद्धत, विरोधकांच्या विखारी प्रचाराची उत्तरे, भाषणाचे मुद्दे, अशा निरनिराळ्या विषयांबद्दलच चर्चा होऊन निर्णय ठरत असे व त्याची अंमलबजावणी होत असे. दोन फुटू शकणा-या मतदारांना, मतदानाच्या दिवशी आमच्याच दोन कार्यकर्त्यांबरोबर नटराज सिनेगृहात सकाळी ९ च्या खेळापासून ते रात्री ९.३० च्या खेळापर्यंत एकच चित्रपट

दाखविल्याचेही आठवते! अर्थातच सुनिलसकट आमचे पॅनेल नेहमीच प्रचंड बहुमताने निवडून येत असे. गुलालाची उधळण करीत, ढोल ताशांच्या निनादात डेक्कन जिमखान्यावरील पूना कॉफी हाऊसमध्ये आमची मेजवानी रंगत असे.

सुनिल इतका सर्वप्रिय विद्यार्थी त्यानंतर पुन्हा महाविद्यालयात झाल्याचे माझ्या पाहण्यात नाही. अगदी प्राचार्यांपासून शिक्षकांपासून ते अगदी तृतीय-चतुर्थ श्रेणीतील शिक्षकेतर कर्मचा-यांपर्यंत सर्वांचे त्यांच्यावर प्रेम असे. तो सर्वांनाच आपला मानत असे, पण त्याला आपले मानणा-यांची संख्याही थोडी नव्हती! अभ्यासाचे त्याला विशेष प्रेम नव्हते. शरीररचनाशास्त्राच्या (ॲनाटॉमी) परीक्षेच्या आदल्या दिवशी शरीररचनेच्या अभ्यासाऐवजी एखाद्या मित्राकडे हाडांचा समुदाय (बोन सेट) अभ्यासासाठी नाही असे कळल्यावरून भरपूर हिंडून त्याला तो मिळवून देण्यात ५-६ तास गेले तरी त्याला त्याची खंत नसे. त्याला जर शक्य असते तर स्वतःची हाडेसुद्धा अभ्यासासाठी त्याने दिली असती, इतकी त्याची दुस-यांना मदत करण्याची तळमळ असे!

दुस-यांना आनंद मिळाल्यानंतर चेह-याकडे पाहतांना सुनिलच्या डोळ्यातील भाव मी अनेकदा टिपले आहेत ! त्याच्या स्वभावात काही वेळेला एक विलक्षण, आग्रही हट्टीपणा असे. (आजही तो आहेच!) एखादी गोष्ट करायची असे त्याच्या मनाने घेतले की कितीही विरोध वा निंदा झाली तरी त्याची पर्वा न करता तो कार्यवाही करीत असे व इतरांनाही ते मान्य करावयास लावीत असे. जवळजवळ लादत असे म्हटले तरी चालेल. अशावेळी सूक्ष्मदृष्टी नसलेल्या लोकांचा गैरसमज होत असे, ते दुखावले जात असत. पण या सगळ्यामागे थोडीशी अव्यावहारीक पण प्रेमळ हक्क गाजविण्याची बालसुलभ भावनाच असे हे मी खात्रीने सांगू शकतो. 'अगम्य, अतर्क्य, अचानकता' हा सुनिलचा स्थायीभाव आजही तसाच आहे. त्याच्या आयुष्यातील अनेक निर्णय, घटना या अशाच आहेत. विलक्षण गुप्तता बहुधा इतरांना अस्वस्थ करीत असे. आमच्या दोघांच्या संबंधातील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी आजही आहे की तो माझ्याशी मोकळेपणाने बोलतो. (असे मला वाटते!) अगदी महाविद्यालयात असतानासुद्धा त्याचे व माझे चर्चेचे विषय वेगळे असत. अध्यात्म, तत्वज्ञान, साधना हेच आमच्या चर्चेचे विषय असत. तो, मी व राजू असे आम्ही तिन्ही मित्र पुण्याच्या आसपासच्या बुवा, महाराजांकडे जात असू. त्या दिवसांतही काही गुप्त साधना तो करीत असे. अत्यंत स्वच्छ व नीटनेटक्या त्याच्या खोलीत उदबत्ती लावलेली असे. गंधाचा

बारीक टिळा लावलेला प्रसन्नहास्य सुनिल मनापासून सर्वांचे स्वागत करीत असे.

आज महाराष्ट्रात होमिओपॅथीची पदवी (बी.एच.एम.एस.) अभ्यासक्रम सुरू होण्यामागे सुनिलचा मोठा हात आहे हे किती जणांना ठाऊक असेल? आम्ही धोंडू मामा साठे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी फार मोठा संप केला होता. माजी खासदार श्री. प्रदीप रावत (तेव्हाचे पतित पावन संघटनेचे अध्यक्ष) हे आमच्या पाठीमागे सतत होते. पुण्यातील सर्व महाविद्यालये बेमुदत बंद करण्यापासून - पुणे-मुंबई रस्ता बंद ठेवण्यापासून ते आमरण उपोषणापर्यंत सर्व गोष्टीत सुनिल अग्रणी होता. अखेर सरकारने आम्हाला वाटाघाटीला बोलावले. पदवी अभ्यासक्रम सुरू झाला! एखाद्या योजनेचे - समारंभाचे नियोजन करावे तर ते सुनिलनेच! प्रत्यक्ष समारंभात मात्र सर्वांत मागे उभा राहून सर्वांचा आनंदोत्सव भरल्या डोळ्याने पाहणारा सुनिल आगळाच!

अत्यंत मनमोकळा स्वभाव, आत-बाहेर नाही, स्पष्टवक्ता असलेला सुनिल म्हणूनच सर्वांना हवाहवासा वाटे. आज इतक्या वर्षांनंतरही आमचे प्रेम अजूनही तसेच टिकून आहे. अजूनही तो एखादी बातमी अचानक देतो, अचानक गुप्त असतो, दूरभाष उचलत नाही. अचानक फोन केला तर २-२ तास बोलतो. कधी रात्री ३ वाजता दूरभाष करेल वा संदेश (एस.एम.एस.) पाठवेल! तो असाच आहे! अत्यंत मनस्वी व उत्कट! तो असाच मला आवडतो. साधक म्हणूनही त्याची प्रगती जोरात असणार याची मला खात्री आहे. श्रीमद्‌भगवतगीतेत वर्णिलेले सात्विककर्त्याचे गुण सुनिलमध्ये दिसतात व म्हणूनच तो सतत प्रसन्न असतो - दिसतो! यश त्याचा पाठलाग करते. हजारो आजारी माणसांना म्हणूनच त्याचा खूप आधार वाटत असणार, यात मला शंकाच वाटत नाही.

बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या सुनिलबद्दल जेवढे सांगावे तेवढे कमीच पडेल. त्याला त्याच्या भावी आयुष्यातील प्रवासासाठी अंतःकरणपूर्वक शुभेच्छा देण्याव्यतिरिक्त मी आणखी काय करू शकणार?

।। इति शम् ।।

- डॉ. परिमल मधुकर जोशी, पुणे

## डॉक्टरांचे डॉक्टर

सुनिलदत्त यांच्या चाहत्यांनी त्यांच्यावर एक लेखमाला लिहिण्याचे ठरविले. अचानक मलाही वाटले की आपणही लिहावे. २९ वर्षांपूर्वी माझी मोठी मुलगी अम्रिता खूपच आजारी झाली. पॅथॉलॉजी रिपोर्टमध्ये नक्की कारण कळत नव्हते. ॲलोपॅथीची खूप औषधे दिलीत पण परिणाम होत नव्हता. त्यात औषध घेतले की तिला उलटी व्हायची. डॉ. सुनिलदत्तने नुकतीच प्रॅक्टीस सुरू केली होती. मी तिच्या पप्पांना न सांगता तिला डॉ. सुनिलकडे नेले. त्यांना माझी अडचण कळली. एक ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करणाऱ्या त्यातही सर्जनची मुलगी! मग काय त्याने सांगितले, आपण युरीन टेस्ट करू. तर त्यात पससेल्स निघाले. त्याने दोन दिवसांचे औषध दिले. गोड गोळ्या खायला माझी मुलगी राजी. तिसऱ्या दिवशी तापही नव्हता आणि पससेल्सही युरीनमधून गायब.

मग मात्र मी हे सर्व तिच्या पप्पांना सांगितले. स्वतःच्या मुलीला काहीही आजार झाला तर प्रत्येक आई-वडिलांना वाटते, काहीतरी जादू व्हावी. आणि आपले बाळ लवकर बरे व्हावे. अम्रिताचे पप्पा म्हणाले की अलॉपॅथी, होमिओपॅथी किंवा आयुर्वेद कुठलीही पॅथी असो, ती चांगलीच असते. पण ती प्रॅक्टीस करणाऱ्याच्या बुद्धीवर आणि कौशल्यावर, ज्ञानावर अवलंबून असते.

आजही आमच्याकडे कुठलीही लहान मुले किंवा क्रॉनिक सर्दीचे पेशंट आले की डॉक्टर त्यांना सांगतात, माझ्या ॲलोपॅथीने तुला आराम पडत नसेल तर होमिओपॅथी घेऊन बघ. कुठूनही आपल्या पेशंटला तो लहान असेल तर बरा व्हावा असेच आम्हाला वाटते. डॉ. गुप्ता स्वतःही कधी ॲसिडीटी किंवा पोटाच्या विकारांवर डॉ. सुनिलदत्तकडून औषध मागवतात आणि त्यांना त्याचा गुणही येतो. डॉ. सुनिलने असंख्य लोकांना त्यांच्या औषधाने बरे केले आहे. प्रत्येक ठिकाणी अपवादही असतात. अशा वेळी वेगवेगळ्या पॅथींनी विचार करून उपचार केले तर त्याच्या उपयोगच होतो. आमच्या त्यांना खूप-खूप शुभेच्छा आणि त्यांना सतत यश लाभो ही सदिच्छा!

- सौ. अलका गुप्ता

# गुरुभक्त

श्री. सुनिलदत्त चौधरी हा आमच्या कॉलेजचा एम.डी.चा विद्यार्थी नव्हे अभ्यासार्थी. सुरुवातीस याचा माझा तसा परिचय नव्हता, खरा परिचय झाला तो हा एम.डी. पास झाल्यानंतर. कारण संबंध भारतात एम.डी. (रेपरेटरी) एम.डी. (होम.)मध्ये जे काही मोजकेच लोक होते. त्यात हा अतिशय कमी वयातला एम.डी. । प्रोफेसर, प्राचार्य या पदावर असतांना अनेक विद्यार्थी हाताखालून गेलेत, सी.सी.एच.च्या जबाबदा-या व पदाधिकारामुळे भारतभर हिंडणे होते. परंतु याच्यासारख्या तल्लख, बुद्धीवान व तेवढ्याच तळमळीने होमिओपॅथीच्या प्रचार व प्रसारासाठी कार्यरत व्यक्ती माझ्या पाहण्यात नाही.

गुरुभक्ती बघाल तर तोडच नाही. याने माझ्या नावे आरोग्य विज्ञान विद्यापीठात गुरुप्रेमापोटी गोल्ड मेडल प्रायोजित केलेले आहे. असा डॉ. सुनिलदत्त चौधरी सालस व ज्ञानोपासक आहे. ब-याच ठिकाणी होमिओपॅथीक परिषदा अथवा कुठल्या कार्यक्रमानिमित्त गेलो असता तेथे मी बीडचा म्हटल्यावर महाराष्ट्र समोर येतो व जळगांवच्या डॉ. सुनिलदत्त चौधरींचे नाव निघते.

सर्वात अविस्मरणीय प्रसंग असा मला वाटतो की, मी प्राचार्य असताना सुनिलदत्त एम.डी. झाला व नंतर त्याच्या यशोकिर्तीमुळे मी प्राचार्य असतांनाच कॉलेज व मॅनेजमेंटने त्याचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला.

असा हा गुरूभक्त, सालस, तेवढाच सरळ व प्रेमळ मनाचा आमचा विद्यार्थी आज पूर्णपणे होमिओपॅथीक प्रॅक्टीसची २५ वर्षे पूर्ण करीत आहे. रामकृष्ण परमहंसांना विवेकानंदांची किर्ती ऐकून जेवढा आनंद होत असेल, तोच आनंद व गहिवर याचा अनुभव डॉ. सुनिलदत्त चौधरीमुळे मी अनुभवीत आहे.

त्याच्या पुढील यशो कारकिर्दीस अनेकोत्तम शुभेच्छा शुभाशिर्वाद.

डॉ. अरुण भस्मे
प्राचार्य, एस.के. होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज, बीड

## बाबांसाठी सर्व एक समान

आदरणीय पुज्य डॉ. साहेब, आपण होमिओपॅथी मार्फत रूग्णांची व रूग्णांसाठी जी शिस्तबद्ध सेवा दिली त्या सेवेचा माझा परिवार व मी ऋणी आहे. आपल्या बद्दल इतकेच सांगू इच्छीतो की "नियत कितनी भी अच्छी हो दुनिया आपको आपके दिखावेसे जानती है, और दिखावा कितना भी अच्छा हो ईश्वर आपको आपके नियत से जानता हैं।"

आपण कधी ही लोकांना चांगले वाटावे म्हणून तसा देखावा केला नाही. व त्यासाठी कोण काय म्हणेल याची पर्वा केली नाही. आपण रूग्णासाठी केलेले कार्य हे रूग्ण व देवासाठी समर्पीत केले असाच भास होतो. म्हणून देवाचा सदैव आपल्या प्रामाणिक कार्याला आशीर्वाद लाभला आहे. कोणत्या ही रूग्णात कोणताही भेद न ठेवता सर्वांना एकच नियम ही आपली वृत्ती हेच सांगते की, आपण पैशासाठी कधीही काम केलेले नाही.

११ वर्षांनी मला मुलगा झाला नाव प्रीतम ही आपलीच देण आहे, आपण सदैव आपला आशीर्वाद आमच्या पाठीशी ठेवावे ही विनंती.

- श्री. राजेश श्रीराम लखोटे
जामनेर

## बाबा, आम्ही तुमच्यावर नाराज आहोत

आदरणीय बाबांना सिद्धीचा सा.न., बाबा मला तुमच्यासोबत दिवाळीच नाही तर सर्व सण साजरे करायला आवडेल. पण, तुम्ही माझ्या मम्मी पप्पांनाच बोलवतात. मला व भगवानला बोलवत का नाही?

बाबा! आम्हांला तुम्ही खूप खूप आवडतात.

"तू अंतर्यामी, सबका स्वामी."
"तेरे चरणोंमें चारो धाम."

- सिद्धी

## हृदयस्थ - डॉ. बाबा

आदरणीय, आमचे डॉ. बाबाश्री यांना भावसार परिवाराकडून चरणस्पर्श करतो. सौ. वैशाली, प्रमोद व घरातील सर्व परिवार आई-वडील-भाऊ आणि बाल गोपाल-लोकेश-परेश आम्ही सर्वजण डॉ. श्री सुनिलदत्त (बाबाश्री) यांचे होमिओपॅथी औषधी घेतो. आम्हाला सर्वांना होमिओपॅथी औषधीचा १०१ टक्के फायदा होतो. जवळ पास आम्ही बाबांकडे १९९८ सालापासून जात आहोत.

आमच्या परिवारात प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळे प्रसंग आले. उदा. माझी पत्नी सौ. वैशालीचे पोट दुखायचे. ॲपेन्डीसचे ऑपरेशन न करता होमिओपॅथी ट्रिटमेंन्टमुळे ती आज फार सुखी आहे. त्यानंतर आम्हाला संतती सुखपण होमिओपॅथी औषधीने प्राप्त झाले. आणि त्यांच्या आशीर्वादाने दुसरा प्रसंग म्हणजे माझ्या भावाच्या डोक्यावर अचानक परिणाम झाल्यामुळे तो वेड्यासारखा वागत होता. आम्ही खूप परेशान झाले होतो. त्यावर धागे दोरे भगत-भोपे यांचा पण काही उपयोग झाला नव्हता. मी भावाला डॉ. बाबांना दाखविले तेव्हा बाबांनी होमिओपॅथी औषधी देऊन त्याला अवघ्या सहा महिन्यांमध्ये चांगला केला. (101%)

तिसरा प्रसंग सांगयचा झाला तर तो माझ्या स्वतः वरचा आहे. तो म्हणजे माझ्या पायावर अचानक सूज येवून पोटरी मध्ये दुखत होते आणि पोटरी फार सुजून पाय चालू देत नव्हता. मला घरातल्या घरात चालणे मुश्कील झाले होते. पण बाबांनी मला अवघ्या २ महिन्यात परिपूर्ण चांगले केले. असे अनेक मोठे-मोठे प्रसंग बाबांनी छोटे करून कुठल्याही मोठ्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट न करता होमिओपॅथी द्वारे छोटे करून कमीत कमी खर्चात चांगले केले.

डॉ. बाबांनी प्रत्येकाला आपले समजून, कोणी श्रीमंत असो वा गरिब असो, अन्यथा कोणीही असो. सगळ्यांना आपल्या परिवारातील व्यक्ती म्हणून प्रत्येकाशी भगवंताचे नाते आहे ह्या भावनेतून बाबांनी सर्वांना चांगला सल्ला देऊन चांगले औषधे देऊन निस्वार्थ पणे सेवा करत आहेत.

मी आणि माझा परिवार श्री बाबांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो की आजच्या या युगात होमिओपॅथी औषधीची आणि डॉक्टरांची शक्ती

परिपूर्ण आहे. ज्या प्रमाणे सुर्य पूर्ण आहे. पौर्णिमेचा चंद्र पूर्ण आहे. ब्रह्म पूर्ण, श्रीराम कृष्ण पूर्ण आहेत. त्या प्रमाणे या जगात डॉ. बाबा आणि होमिओपॅथी औषधी पूर्ण ब्रह्म आहे.

डॉ. नेहमी प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने कार्य करीत आहे. निरिक्षण जर केले तर बाबांच्या गाडीचा नंबर ४३२१ असा आहे. बाबा सुद्धा नदीच्या पूराच्या पाण्यात विरूद्ध दिशेने लढत आहेत. आज या भवसागरात बाबांना ओळखणे कठीण आहे. पण मात्र बाबांनी प्रत्येक व्यक्तीला (पेशन्टला) आपल्या घरातील नात्याप्रमाणे नाते जुळवून प्रत्येकाशी नाते बाबांनी जुळवले आहे. बाबा हे डॉक्टर नसून ते आज एक मोठे महापुरूष आहेत. (गुरू) आहेत. म्हणून मी अशा महापुरूषांबद्दल ह्रदयापासून मनःपूर्वक प्रार्थना करतो की त्यांना भगवंत निर्मळ व दीर्घ आयुष्य देवो ही प्रभू चरणी प्रार्थना.

होमिओपॅथी औषधीमुळेच बाबा हर्ष या जीवनात.

सगळया मनाच्या चिंता या कमी झाल्या क्षणात.

बघेल जो तुम्हाला तो मोठा नशिबान असेल

तुमचा हास्य चेहरा (मुद्रा) औदार्यपूर्ण तया दिसेल.

सुंदर ते झळाळे तेज शोभिवंत तो सुगंध तुमचा सुखकंद मूर्तीमंत.

बाबा तुम्हाला देणेची ठाऊक रे घेणे नाही ते मनात.

कोणी असो या इथे गरीब श्रीमंत तो पहा हो नम्र नम्र आत.

तुम्ही हर्ष या वाऱ्याचे प्रसन्न स्रोत झाले. भव्य - दिव्य सागराचे हे ज्ञान ही तुमच्याकडे आहे. आभार कसे मानू तुमचे हे सर्व शब्दापलीकडचे आहे. या ह्रदयात सारे समजालना तुम्ही ते तुमच्यामुळेच बाबा आनंद या जीवनात

- श्री व सौ. वैशाली प्रमोद भावसार
धानवड

## तूची ब्रह्मा विष्णू महेश ...

ज्यांच्या नावांत ब्रह्मा, विष्णु व महेश या त्रिअवताराचे नाव जोडले आहे. (सुनिलदत्त) त्यांच्या बद्दल जे काही लिहिले ते कमीच होईल.

बाबांच्या दारी (दवाखान्यात) जो कोणी व्यक्ती ज्या दिवशी येईल त्या दिवशी त्याचा भाग्योदय झाल्याशिवाय रहाणार नाही. (आजार कोणताही असो बरा झालाच समजा)

बाबांजवळ होमिओपॅथीच्या डिग्री तर आहेच परंतु अध्यात्मीक शक्ती देखील आहे. असे आमच्या परिवाराचे मत आहे. आधी दवाखाना म्हटला की, कंटाळा व भिती वाटायची. जेव्हा पासून (मागील ५/६ वर्षापासून) बाबाकडे यायचे सुरू झाले तेव्हा पासून बाबाकडे केव्हा जायला मिळेल असे मनाला सारखे वाटत असते. बाबांबद्दल दोन ओळी लिहावयाशा वाटतात.

बाबा, तुम्ही असता जिभेवर (दिलेल्या गोळ्या)
आजार रहातात दूर
वाचा रहाते मधूर
मन रहाते शांत
शरीर रहाते स्वस्थ

परमेश्वर बाबांना उदंड आयुष्य देवो. हीच परमेश्वरा जवळ प्रार्थना करतो.
बाबा आमच्या परिवारावर तुमची सदैव कृपा दृष्टी राहू द्या.
अनावधानाने व बाबांवरील प्रेमामुळे वरील लिहितांना काही चूक झाली तर मोठ्या मनाने क्षमा करा.

- श्री. निलेश वासुदेव बारी
जळगाव

# जरा हटके ...



## तूची विठ्ठल आमुचा तूची साई

परिवारातील एक आदर्श म्हणजे आमचे बाबा परिवार, संसार म्हणजे सुख, दुख, संकट, आनंद, हर्ष, मोद, घात, अपघात, आपत्ती, आजार यांनी व्यापलेला एक महा सागर आहे. त्यात परमेश्वराला साक्ष ठेवून त्याने जसे ठेवले तसे आनंद मानून समाधानात मनुष्य जीवन जगतो. त्यात कम नशिबी लोक असे असतात की परमेश्वराला दोष देऊन स्वतः दुखी कष्टी होतात. व आयुष्य बरबाद करतात.

अशातच आजार म्हणजे मनुष्याच्या जीवनातील मोठा शत्रु आहे. आणि तो प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतो. अश्यातच आजार बरे करणारे नामवंत. कीर्तीवंत व धन्वंतरी असे आजार बरे करणारे देव असतात. त्यात असे काही देव असतात की त्यांचे वर्णन करावे तेवढे थोडे असते.

आमच्या आयुष्यात असा काही एक देव सापडला की त्याला पंढरपूरचा पांडुरंग म्हणावे की शिर्डीचे साईबाबा काय उपमा द्यावी असे शब्दच नाही. आजार कसाही असो. बाबांच्या दर्शनाने अर्धा बरा होतो आस्थेने विचारपुस करून पाव भाग बरा होतो व होमीओपॅथी औषधीने पूर्ण बरा होतो. असे आमचे दैवत बाबा म्हणजे.

सु लक्षणीय सुंदर व प्रसन्न पणे
नी दान करून होमीओपॅथीने
लवकर आजार बरे करतात आशीर्वादाने
दत्त अवतारी
चौकस पणे आजार बरे करणारे
धरून न ठेवणारे
रीतसर फी घेणारे

आजारातील दुःखसागरातून तारून नेणारे देव म्हणजे आमचे बाबा ....
डॉ श्रीमान योगी सुनिलदत्त चौधरी
.... जळगाव चे दैवत

- श्री. व सौ. शोभा दिलीप पगारे
नामपूर, ता. सटाणा

## होमिओपॅथीतले 'श्रीमंत योगी'

'अबोल प्रवास सेवेचा' या स्मरणिकेच्या दुसऱ्या आवृत्तीला मनापासून शुभेच्छा. आपला अखंड, अविरत, अबोलपणे सेवेचा प्रवास चालूच आहे. तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल भरभरून लिहितांना पुस्तकाची पाने अपुरी पडतील. अशा अनेक आवृत्यादेखील कमीच पडतील. सामाजिक बांधिलकी म्हणून आपण अनेक वर्ष सेवेचे व्रत जोपासत आहात. अनेक माध्यमांतून तुम्ही लोकांना सुखद आनंद देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलाय. या प्रवासातील सहप्रवासी या नात्याने आम्हीही तो उपभोगतोय कायम तुम्ही दात्याची भूमिका पार पाडत आहात. कोणाला आरोग्य, कोणाला ज्ञान, कोणाला व्यवसायात मदत, कोणाला पैसा मिळविण्याकरींता मार्गदर्शन, कोणाला कौटुंबिक क्लेशांतून मुक्ती मिळविण्याकरीता मार्गदर्शन असे बरेच काही... आणि आपल्या अवती भोवती असणाऱ्यांच्या हृदयात आपला एक वेगळाच ठसा उमटवून ठेवलायत.

काही दिवसांपूर्वी एक बातमी ऐकली. होमिओपॅथीच्या क्षेत्रांत आपणांस एक नामी संधी चालून आली आहे. आपण त्या संदर्भात द्विधा मनःस्थितीत आहात निर्णय होत नाही. परंतु आपला या क्षेत्रांतील बोलबाला बराच ऐकून आहोत. इतरांसाठी काही करण्याचे ठरविलेत तर बरेच काही करून दाखवू शकाल. आपण 'निश्चयाचे महामेरू' आहांत. म्हणूनच 'बहुतजनांसी आधार' वाटता. होमिओपॅथीमधले 'श्रीमंत योगी' आहांत म्हणून लिहिण्याची किंवा आपणास सुचविण्याची लायकी नसतानांही वैयक्तीक मत मांडण्याचे धाडस करत आहे.

आपण ज्ञानरूपी मंदीरातले 'देव' आहांत हे देवपण आपणांस टाकीचे अनेक घाव सोसूनच प्राप्त झाले आहे. त्यामुळे या क्षेत्रांतले दुःख काय ते आपण जाणताच आहात. गेला महिनाभर वृत्तपत्रात प्रकाशित होणारे तुलनात्मक युद्ध (होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी) वाचून खूप वेदना होतात. होमिओपॅथीचा होणारा दुःस्वास आपण जाणता आहातच. डॉक्टर डिग्री घेतांना दोन्ही पथींमध्ये रूग्णांच्या आजारांचे परिक्षण करण्याकरिता लागणारे पायाभूत शिक्षण सारखेच, शैक्षणिक वर्षे सारखीच दोन्ही ठिकाणी मेहनत सारखीच खर्ची करावी लागते. फक्त औषधांचा अभ्यासक्रम तेवढा वेगळा मग असे असतांना त्यांना सन्मानाने वैद्यकीय सेवेत समाविष्ट का करू शकत नाहीत. याचे उत्तर तुम्हीच शोधू शकता. या क्षेत्रात तुम्ही माहीर आहात. तुम्ही आपल्या कार्यसिद्धीने तुमचा पाय एवढा घट्ट रोवून ठेवलात की तिन्ही पॅथीच्या डॉक्टरांच्या तोडांत फेस आणलांत. त्यांच्या तोंडचे पाणी पळवलेत. तुमच्या स्वतःचा दबदबा तयार केलात. परंतु हे सर्वानाच शक्य नाही. भावी पिढी

(भावी डॉक्टर) तुमच्याकडे आशाळभूत पणे बघत आहे. या क्षेत्रांत नव्याने येणाऱ्याला सन्मान मिळवून देण्याची क्षमता तुमच्यात नक्की आहे. कारण खऱ्या अर्थाने या दुःखद वेदना आपणच जाणू शकता. आतापर्यंत या क्षेत्रांतील मान्यवर नुसतेच खुर्चीला बांडगुळासारखे चिकटून बसलेत. परंतु सरकार दरबारी अपयशी ठरले. आपणांस आमंत्रित केलेला पद्‌भार आपण स्वीकारलात तर त्या खुर्चीचाच सन्मान वाढेल. त्या खुर्चीच्या रूपाने आपणास इतरांचा आवाज उठवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होईल. खात्री आहे आज ना उद्या या क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी क्रांतीची एक एक वीट रचणारे आपणच असाल. नुसतेच महाराष्ट्रातच नव्हे. संपूर्ण देशात पार परदेशातसुद्धा होमिओपॅथी सन्मानाने प्रवेश करेल.

स्वानुभवानुसार मी परदेशांत बघीतले, तिथे नर्सिंग कोर्स केलेल्या व्यक्तीला, फिजीओथेरोस्पीटला सुद्धा सन्मानाने वैद्यकीय सेवेत सामावून घेतले जाते. परंतु होमिओपॅथी डॉक्टरला तेथील सेवेत सामावून घेतले जात नाही यासारखे दुसरे दुर्दैव ते काय?

अहो घरांतील लोकसुद्धा एक मुल ॲलोपॅथी डॉक्टर तर दुसरे होमिओपॅथी डॉक्टर असेल तर दुजाभाव करताना मागेपुढे पहात नाही कधी कधी त्यांच्या अज्ञानाची कीव करावीशी वाटते तर परदेशातला दोष देण्यात काय अर्थ आहे?

माझी आपणांस प्रांजळ विनंती आहे किंवा माझा स्वार्थ समजा परंतु आपण समाजासाठी सेवेचा लाभ देता तेव्हा हीसुद्धा क्रांती तुमच्याकडून घडावी असे मला मनापासून वाटते. होमिओपॅथीचे जनक यांनी होमिओपॅथीचा शोध लावून क्रांती घडवली आपण होमिओपॅथीला सन्मान मिळवून देऊन क्रांती करावी.

कदाचित माझ्या अज्ञानापोटी मी आपल्या शरिरस्वास्थ्याचा विचार केला नाही, आणि आपणांस कळकळून विनंती करण्यास आग्रही राहीले, तरी उदार अतःकरणाने आपण नेहमीसारखे माफ कराल अशी आशा बाळगते.

आपल्या वैद्यकीय क्षेत्रांतील कार्यकक्षेचा वटवृक्ष असा काही बहरलाय की त्यांत या पदभाराच्या सुरपारंब्या चार चाँद लावतील.

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते, त्या ज्ञानाचे मंदीर हे !<br>
सत्य शिवाहून सुंदर ते... सत्य शिवाहून सुंदर ते !

- सौ. दारूवाले, मुंबई

## बाबा म्हणजे अजब रसायन

आदरणीय बाबांच्या चरणी सौ. बबीताचा साष्टांग दंडवत. वि.वि. अभिप्राय लिहित असतांना काही चूक झाल्यास क्षमा असावी. पुन्हा स्मरणिकेची आवृत्ती निघत आहे हे वाचून खूप आनंद झाला. खरं तर अशा भरपूर, अगणिक आवृत्या आपल्या समरणिकेच्या निघतीलच यात शंका नाही. मी अगोदरच्या स्मरणिकेत एक अभिप्राय दिलेला असुनही पुन्हा अभिप्राय देत आहे. कदाचित भविष्यात पुढे ही अभिप्राय देईल. कारण मागच्या वेळेला अभिप्राय दिल्यानंतरही अपूर्णच दिला गेला असे वाटते म्हणून पुन्हा लिहीत आहे.

परमेश्वराचे विराट रूप काय असते ते माहीत नाही पण इथे साक्षात बाबांच्या वेगवेगळया रूपांचा अनुभव येत आहे. कधी ते आईच्या साक्षात मायेने सांगतात. तर कधी वडीलांप्रमाणे सल्ला देतात. कधी डॉक्टर, कधी शिक्षक तर कधी वडील बंधू व अनेकदा मित्रच बनतात. सर्व नाती, सर्व रुपे, त्यांच्यात सामावलेली आहे मग या All in one अजब रसायनाला परमेश्वराचे विराट रूपच म्हणणार ना!

मध्यंतरी बाबांची तब्येत ठीक नव्हती. त्या वेळेस मनात काहीही विचार येत होते. आम्हां सर्वांच्या आयुष्यात बाबा इतके सामावलेले आहेत की त्यांच्या शिवाय आयुष्याची कल्पनाच करवत नाही. पण माझी बाबांना एकच विनंती आहे की, तुम्ही ज्याप्रमाणे इतरांची देखभाल करतात, त्यांच्या तब्येतीची काळजी घेता तसेच "स्वतःलाही जपा" कारण "बाबा! तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत."

जसजसा काळ पुढे सरकत आहे तसतसे बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक-एक पैलु उलगडत आहे. पण अजुनही "बाबा" या व्यक्तिमत्त्वाचे ना गुढ उकलले आहे ना ते आम्हांला समजलेले आहे. बाबांचा सर्व प्रवास हा 'अबोल' राहूनच चालू आहे. ते बोलतात कमी परंतु आपल्या कृतीतून देहबोलीतून खूप काही सांगत आहेत. मी माझ्या निर्बुद्धीने काही गोष्टींचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे तरी काही चुकल्यास बाबा मला क्षमा करावी. मी सदैव बाबांची ऋणी राहू इच्छिते की, ज्यांच्यामुळे आम्हांला काय खावे, कसे बोलावे, कसे राहावे इतकेच नव्हे तर काय वाचन करावे हे सुद्धा कळाले. धन्य! धन्य! ते आई-बाबा ज्यांनी बाबांसारख्या व्यक्तिमत्त्वाला जन्म दिला. अर्थातच त्या अन्नपूर्णेचे म्हणजे सौ. स्मिताताईंचेही आभार मानावे तेवढे कमीच आहे. कारण बाबांनाही त्यांची तेवढीच सोबत आहे.

परमेश्वरचरणी एकच विनंती आहे की, त्यांनी बाबांना व त्यांच्या परिवाराला सुख, समाधान व दीर्घायुष्य द्यावे.
शेवटी एकच सांगावेसे वाटते...

"असो तुम्हांला बाबा माझा सदा नमस्कार, तुमच्या दया दातृत्वाला अंत नाही पार"

- सौ. बबीता

## तुम्ही सुखदायक वरदायक तुम्ही

प्रिय बाबा,

सुखदायक अन् वरदायक तुम्ही

नीतीधर्माचे महानायक तुम्ही

लहान आम्ही आपुले बालक

दत्तअवतारी तुम्हीच पालक

चौफेर करता तुम्ही रक्षा अशी

धन्वंतरीची आहे आम्हावर कृपा जशी

रीमझिम बरसो तुमच्यावर शुभेच्छा अखंड.....

प्रार्थना करतो तुम्हास लाभे आयुष्य उंदड !

- श्री. पीयुष सुनील न्याती
जळगाव

## निरपेक्ष सेवेचा वटवृक्ष

बाबा,

तुम्ही करता सेवा निरपेक्ष,

रूग्णाची श्रध्दा हिच साक्ष.

डोस नाही म्हणून आमचा लटका राग,

औषध असतांना पाठविणे हा त्यातला भाग.

आमच्या आरोग्याबाबत तुम्हीच असता दक्ष,

ग-हाण्यावर आमच्या तुम्ही देता लक्ष.

शांत व्यक्तीमत्व हाच तुमचा ठेवा,

यशस्वी वाटचालीसाठी आमच्या शुभेच्छा देवा.

- अनिल, सविता, मंयक न्याती
जळगाव

## ज्ञानी सहनशील कर्म योगी

प्रिय आदरणीय बाबा,
आम्हाला खुप काही लिहिता येत नाही,
मनातली श्रद्धा शब्दात मांडता येत नाही.
आम्हास आपला परिवार मानतात,
न सांगता आमच्या व्यथा जाणतात.
आपल्याकडे ज्ञानाचे भांडार आहे,
सहनशक्ती अन् संयम फार आहे.
शारीरिक व्याधी पळवून लावता
मनानेही आम्हाला खंबीर बनविता
आपल्या व्यक्तीमत्वापुढे आम्ही नतमस्तक होतो
यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा मनःपूर्वक देतो.

- सौ. ललीता, पियुष, सुनील न्याती
जळगाव

## माय-बाप

माय म्हणूनी संबोधिले तुम्हाला
बाप म्हणूनी संबोधिले तुम्हाला
माझ्यातला मी ही गेला
आणि तुमच्यातला तुम्ही गेला
काय म्हणून भय मला
उरले फक्त जिवाचे नाते
उरले फक्त जिवाचे नाते

- श्री. जितेंद्र पाटील
गिरड

## येथे आलो, इथलाच झालो !

डॉक्टर ह्या नावावरून माझा विश्वास उडला होता. पण एक दिवस माझ्या मित्राने मला जबरदस्तीने येथे आणले व माझ्या जवळ एका माणसाला बसविले. याला येथून नको जाऊ देऊ असे सांगितले. पण दवाखान्यात आत बसताच माझीच इच्छा जाण्याची झाली नाही. आत आल्यावर मला असे वाटले की, मी एखाद्या मंदीरातच आलो. दारावर लावलेल्या देवीच्या फोटोकडे पाहतच राहिलो डॉक्टर देवीचे भक्त आहेत. येथे आपला इलाज होईल असा मला विश्वास आला. नंबर लागल्यावर जेव्हा आत प्रवेश केला, मध्ये साधू सारखा डॉक्टर पाहून मी आश्चर्य चकीतच झालो. येथे डॉक्टर नसून एक बाबा होते, आणि माझा विश्वास आणखी वाढला. बाबांची पहिली भेट मी कधीच विसरणार नाही. कारण पहिल्या भेटीतील त्याच्या संवादानेच मी ५० टक्के बरा झालो. त्यांनी नाव विचारल म्हणाले, अरे तू जवान मुलगा आहेस, असा घाबरू नको. आपलं औषध घे आणि बरा हो.

दुसऱ्या डॉक्टराकडे जायचो तर ते सांगत, तुला कोणताच आजार नाही. सर्व चाचण्या चांगल्या आहेत. खोकला येतो सांगल्यावर इतर डॉक्टर सांगत ॲलर्जी सुधरत नाही. याच्यावर उपायच नाही. नंतर माझे आजार वाढतच गेले. मी आशा सोडून दिली होती. पण मित्राने येथे आणले व मला आधार मिळाला. आता येथून जावसं वाटत नाही. पूर्ण बरा झाल्यावर सुद्धा !

- श्री. छोटू राज बबनराव साळुंखे
एरंडोल

## बाबा म्हणजे स्वामींचे अवतार

आदरणीय, श्री डॉ. बाबांना शि.सा. नमस्कार, बाबा, आपणांबद्दल काय बोलावे? काय लिहावे सुचत नाही तरी मी माझ्या तोडक्या शब्दात माझे अनुभव (विचार) लिहू इच्छिते.

डॉ. बाबा म्हणजे मला स्वामी समर्थांचे रूप वाटतात आपण काहीही न सांगता आपला आजार त्यांना कळतो तसेच त्यांच्या औषधीमुळे आपला आजार समूळ नाहीसा होतो.

माझा मुलगा इ. ९वीत शिकत असतांना त्याला किडनीस्टोनचा त्रास सुरू झाला. तेव्हा मला माझ्या मोठ्या बहिणीने डॉ. बाबांकडे जाण्याचा सल्ला दिला. मग आम्ही डॉ. बाबांकडे आलो डॉ. बाबांच्या उपचारामुळे माझ्या मुलाचा किडनी स्टोनचा त्रास समूळ नाहीसा झाला आज तो बाबांच्या आशीर्वादाने व उपचारामुळे एकदम ठणठणीत आहे.

आज डॉ. बाबा आमच्या घरातील प्रत्येक सदस्याचे प्रेरणास्त्रोत आहेत. अशीच बाबांची कृपा माझ्या घरातील प्रत्येक सदस्यांवर राहावी व असेच आमचे व बाबांचे नाते घट्ट राहावे हीच इच्छा.

मी एक कविता वाचली ती कविता वाचली तेव्हा मला वाटले ही कविता बाबांच्या व आमच्यासारख्या नात्यासाठी असावी. कारण बाबा आमच्यासाठी गुरू, देव तसेच मार्गदर्शक आहेत.

नाते प्रभुशी जोडले
दुःख द्रारिद्र्य सरले
नाते नभाशी जोडता
चंद्र सूर्य घरी आले.

नाते जोडले बिजासी
तरू अंगणात उभा
घरादारावर छाया
मिळतो चैतन्याचा गाभा

नाते जोडले पान्हयासी
तृप्त भरे देहमन
आता कोठली गा चिंता
माय बाप नारायण

असी माझी जवळीता
सीमा जाय विरघळून
मिळे समुद्राला थेंब
थेंब जाई समुद्रुन

काही चुकले असल्यास क्षमस्व... - सौ. सोनाली संजय चौधरी

## बाबा के कारण हम निश्चींत

बाबा,
जिंदगीके है पहलू कई,
बिमारीकी हमे चिंता नही
आपके वो गोलीयोंका होता है असर,
बुखार हो खाँसी, हो जाये छू मंतर।
आपको परेशान करनेपर आपका डाँटना,
हम बेचैन होते है तो हमे आपका समझाना।
आपके आशीर्वाद का दौर यूँही चलता चले,
आपको जीवनमे बहोतसी खुशिया मिले।

- सौ. नयना, मिनल, संकेत धुप्पड
धुळे

## अलौकीक शक्तीचे प्रतिक

बाबा,
तुम्ही आहात अलौकीक शक्ती,
देवावरची अतुलनीय भक्ती,
रूग्णांची करतात तुम्ही रोगमुक्ती।
सेवा करता तुम्ही अखंड,
विश्वासात आमच्या न पडणार खंड,
आम्हांकडून आपणास शुभेच्छा प्रचंड।

- सौ. विभा राजेश बुब
नाशिक

## संकट मोचन बाबा

आदरणीय श्री डॉक्टर, माझा कोटी कोटी नमस्कार

मी तुमच्याकडे कसा आलो हे मला आजपर्यंत आठवत नाही. मला कोणी आणले मी कसा आलो हे पण माहित नाही. पण मला हे आठवते की मी तुम्हाला जेव्हा पहिल्यांदा बघितले तेव्हा माझे मन खूप खूप प्रसन्न झाले.

बाबा मला आठवते आहे की मी तुमच्याकडे Laptop बाबतीत काम केले होते. त्यानंतर काम झाल्यावर तुम्ही मला तुमच्या हाताने टि-शर्ट दिला होता. आज पर्यंत तो टि-शर्ट सांभाळून ठेवला आहेत. मग त्या कामानंतर १५ दिवसांनी मी तुमच्याकडे पोट दुखण्या बाबतीत आलो होतो.

बाबा जेव्हा तुमचे पहिले 'अबोल प्रवास सेवेचा' पुस्तक प्रकाशन झाले. तेव्हा मला फोन आला की बाबाच्या अबोल प्रवास सेवेचा या पुस्तकामध्ये तुझा फोटो आला आहे. तर मला खूप खूप आनंद झालेला आहे. मला आठवते आहे, की माझ्यावर खूप मोठे संकट आले होते. तेव्हा बाबांनी मला खूप मदत केली होती.

बाबा मला तुमच्या विषयी खूप काही लिहायचे आहे पण अक्षर हे मला जोडता येत नाही. मन खूप लिहिण्याची इच्छा करते पण ती मी काही कागदावरती लिहीत नाही कारण ती माझ्या मनामध्ये आहे.

माझी ईश्वर चरणी एकच प्रार्थना आहे की त्या लोकांनाही बाबापर्यंत पोहचविण्याचे मार्ग मिळू दे आणि आमच्या अशा रागवणा-या बाबांना प्रेमळ सुखी संपन्न व निरोगी असे दीर्घ-आयुष्य लाभू दे.

- श्री. यशवंत किरंगे
जळगाव

## ईश्वरी अवतार

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्या स्मरणिकेनिमित्त मला दोन शब्द लिहण्याचा योग आला आहे हे मी माझे भाग्य समजतो. कारण असे की, साक्षात परमेश्वराविषयी आपण काय लिहावे असे विचार मनात घोळत होते. तरी देखील मोठी हिंमत करून मी लिहण्यास सुरूवात करीत आहे.

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्या विषयी सांगायचे झाले तर ते माझ्या परिवारास माझा मुलगा डॉ. युवराज यांच्यामुळे लाभले ही मी व माझा परिवार, भाग्याची गोष्ट समजतो. जर ते लाभले नसते तर माझ्या संपूर्ण परिवाराची वाट लागली असती. केवळ ते डॉ नसून चांगले विचार, संस्कृती व माणसाला वाईट विचारातून बाहेर काढणारे एक आदर्श व्यक्तिमत्व आहे. शिस्त शिकावी तर डॉ. कडूनच. मी पेशाने शिक्षक जरी असलो तरी माझ्या जवळ शिस्त नाही. या विषयी सांगायचे झाले तर मी एकदा सुरूवातीलाच डॉ. कडे औषधीसाठी गेलो. पावसाळ्याचे दिवस होते. जायला थोडा उशीर झाला. दवाखान्यापर्यंत गेलो तर गेट बंद, मला वाटले घेतील आत मध्ये संपूर्ण पेशंट औषधी घेऊन बाहेर पडले. मी सिस्टरला सांगितले की मी दोनच मिनिटे उशिरा आलेलो आहे. डॉ. मला तपासतील का? सिस्टर ने चक्क नकार दिला आणि गेट बंद करून निघून गेल्या, माझ्या सोबत पत्नी देखील होती तिला मी म्हटले चल संध्याकाळी येऊ, असे म्हणून पुढे गेलो. आणि नकळत माझ्या तोंडून शिवी निघाली.

संध्याकाळी आलो नंबर लावला थोडया वेळाने माझा नंबर लागला. डॉ. समोर बसलो तो काय आश्चर्य की मी जी शिवी दिली होती ती तशीच्या तशीच मला विचारली. मग काय माझा चेहरा खरकन खाली उतरला, माझ्या थोबाडात मारल्या सारखे झाले, पण डॉक्टरांनी हसतच मला विचारले, बोला! काय त्रास आहे. अशी व्यक्ती मिळणे दुरापस्त असते. पुनःश्च माझ्या परमेश्वराविषयी डॉ. सुनिलदत्त चौधरी यांना दोन्ही कर जोडून शतशः प्रणाम!

"जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा" या संतांच्या उक्ती प्रमाणे खरोखरच ते परमेश्वर आहेत असे मी खात्रीने सांगतो.

- श्री. प्रकाश सुरवाडे
किनगांव

## डॉक्टर - देव अन् माय-बाप ही.

आदरणीय बाबा, शि. सा. दंडवत. मला आलेल्या अनुभवावरून तरी मला असे वाटते की आपण रूग्ण सेवा मनापासुन करतात. माझ्या अनुभवा वरून तरी आपण डॉक्टर व देव सुद्धा आहेत. कारण मी जेव्हा २०१० मध्ये अचानक खूप आजारी पडले तेव्हा ॲलोपथिक औषधाने जे भरपूर घेऊन व ॲडमीट करून मला गुण आला नाही. तो मला त्या वेळेस जीवन-मरण्याच्या दारात आली असताना त्यावेळेस मी फक्त बाबाजी आता फक्त तुम्हीच अशी मनापासून हाक मारली आणि सोबत माझे पती होते व त्यांनी सुद्धा तुम्हाला माझ्यासाठी जी विनंती केली. आपण जसे आमच्या पाठीशी उभे आहात असे वाटते. क्षणाचा विलंब न करता आणि आजारी पडण्याआधीची जी ह्या दुखण्यावरची देखील नव्हती. ज्या ४-५ गोळ्या होता त्या एक-एक अशा करून मी घेतल्या व ती काळरात्र काढली. त्या रात्रभर तुम्ही आमच्या सोबत आहे असे वाटले. आणि दुसरा दिवस उजाडला तो केवळ आपल्या आशीर्वाद व होमिओपॅथीक गोळ्यांमुळे. याचा आम्हा दोघांना साक्षात्कार झाला की आपण देव सुद्धा आहात आणि डॉक्टर सुद्धा ! त्या दिवसा पासून तर आता पर्यंत आम्ही आपले औषधी घेत आहोत. तेव्हा पासून बराच फरक पडला आहे.

असा एक अनुभव माझ्या जवळ आहे. मी २००४ मध्ये गर्भवती होती. तेव्हा डॉक्टरानी सांगितले की बाळ वाचविण्याची शक्यता खूप कमी आहे. केव्हा ही ॲबॉर्शन होऊ शकते. त्या वेळेस देखील आपण मला जी औषधी ९ महिने दिली. त्या होमिओपॅथिक औषधाने माझे बाळ सुरक्षित राहून जेव्हा या जगात आले तेव्हा त्यामागे आपली औषधी व आपला आणि आई सप्तश्रृंगी देवीचा आशीर्वाद यांची जाणीव आम्हा दोघांना स्मरणात राहुन गेली असे बरेच अनुभव आहेत. पण लिहिण्याची मर्यादा व मोजके शब्द सांगितल्यामुळे मी लिहू शकत नाही. पण सांगण्यास मी कधीच विसरणार नाही माझे डॉक्टर देव, आणि डॉक्टर तसेच माझे आई-वडिल आहेत. पण मी अजून यांना आई-वडिल न म्हणता माझी माय-बाप म्हणून घेण्यास स्वतः खुप भाग्यवान समजते कारण आतापर्यंत त्यांनी मला मुलगी म्हणून जो आपलेपणा दिला तो मला कधीच विसरता येणार नाही. म्हणून मला असे डॉक्टर, देव, माय-बाप कधीच विसरता येणार नाही कायम त्यांच्या ऋणात रहावे लागणार. असे आमचे डॉक्टर बाबाजीस पुन्हा शि.सा.दंडवत.

- सौ. विद्या खेडकर
भुसावळ

## एक अलौकीक दैवी पुरूष

माननिय डॉ. सुनिलदत्त चौधरी, यांना भास्कर राणे चा शिरसाष्टांग नमस्कार. बाबा मी आपल्या पहिल्या स्मरणिकेच्या आवृत्तीसाठी काही लिहू शकलो नाही, तरी क्षमस्व. परंतु आता मला काही लिहायची इच्छा आहे. तुमच्या होमिओपॅथी औषधांमुळे माझा आजार तर बरा झालाच. परंतु माझे अज्ञान, अंधश्रद्धा सुद्धा दूर झाल्यात. माझी संपूर्ण जीवनशैली बदलून गेली. बाबा तुम्ही मला वेगवेगळी उदाहरणे देऊन वाईट विचाररूपी आजार बरे केले. तुम्ही माझे आचार, विचार, उच्चार, आवडी, निवडी तसेच संसार बदलवून मला ख-या अर्थाने माणूस बनविल. एवढेच नव्हे तर माझी पुढची पिढीसुद्धा बदलविली. एवढा सर्व बदल घडवून आणणे हे समाज सेवेपेक्षाही महान काम आहे. अशाप्रकारची कामे करणे ही साधारण माणसांचे नसून ती एका 'महान' माणसाचच काम आहे. मग या सर्वांमध्ये पैशांचा काय संबंध? तसदीबद्दल क्षमस्व !

- श्री. भास्कर राणे

## सर्व गुण संपन्न बाबा

श्रीमानजी डॉक्टर साहेब, ख-या अर्थाने आपणास जे जुने पेशंट आहेत. ते कधीही डॉक्टर म्हणताच नाही. तर बाबाच म्हणतात. जर बाबा म्हटले म्हणजे त्यात जिव्हाळा आलाच मग त्या ठिकाणी डॉक्टरचा रोल राहत नाही. आपणास जे हवं असत मनासारखे (आजाराबाबत) ते शक्य नसलेले शक्य. कारण बाबांजवळ कुठलही पेशंट की ज्याला बाबांनी औषधं दिली तो पेशंट मला म्हणत नाही की माझा आजार बरा झाला नाही. तर तो म्हणेल की मी आजारातून मुक्त झालो. आणि मला ख-या अर्थाने जीवन समजले कारण की, बाबांकडे येणा-या पेशंटवर बाबा उपचारच करत नाही तर, बाबांच्या नजरेतून बरेच काही शिकण्यासारखे आहे. शांतस्वभाव, मृद बोलणे, निर्भयपणा, आत्मविश्वास, नम्रता, प्रामाणिकता चारित्र आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्पष्टवक्तेपणा आणि आध्यात्म हे सर्व गुण बाबांकडून शिकायला मिळतात. पण ते फक्त ओळखणा-यालाच तर मग अशा व्यक्तीस कोणीही डॉक्टर म्हणणारच नाही. तर ते ख-या अर्थाने "बाबा" आहेत तर अशा माझ्या बाबांना माझे मनापासून सहस्त्र नमस्कार. कारण त्यांच्यासाठी कितीही लिहले तर कमीच पडेल यात शंकाच नाही.

- श्री. मुकेश प्रल्हाद आमले
म्हसावद

अबोल बोल...



• ३३ कोटी देवांची माय... हाय माझ्या पाशी...!



मांसाहार ऽऽऽ
नको रे बाबा !

## दश अवतारी... एकच अवतार - 'बाबा'

गुरूवर्य बाबाश्री प्रणाम... बाबा, बाबा आणि फक्त बाबाच...!

प्रत्येकाची बाबांची व्याख्या वेगळी, बाबांसाठी प्रत्येकाची भाषा सुद्धा वेगळी, प्रत्येकाची बाबांवर विश्वास ठेवण्याची रित पण वेगळी, पण तरी सुद्धा बाबा हे एकच, तरी वेगवेगळ्या रूपात नेहमी सदर नजरेतून व्यक्त होणारे, अबोल राहुनही बोलून जाणारी देवांची अनेक रूपे म्हणजेच साक्षात बाबांचीच... बाबांचे चमत्कार सागराप्रमाणे अथांग पसरलेले आणि मी नदीसारखा वाट काढत काढत बाबांच्या दरबारी आलेलो. बाबांचा दरबार हा जसा जणु सर्व देवी देवतांचे तिथे सदैव वास्तव्य आहे असे अनुभवास नेहमी मिळत असते....

बाबा सुर्या सारखे प्रखर आहे ...!<br>
बाबा चंद्रा सारखे सौम्य आहे ...!<br>
बाबा पृथ्वी प्रमाणे सगळ्यांना सांभाळतात ....!<br>
नदी प्रमाणे परिस्थितीनुसार स्वतःला बदलतात ...!<br>
हिमालया सारखे ताठ मानेनं जगायला शिकवतात ...!<br>
सागरा सारखे सर्वांचे दुख स्वतः उदरात घेत बाबा मात्र जगत असतात ...!<br>
रूग्ण सेवा केली? पैसे कमवले? का जनसेवा केली?<br>
न त्वंह कामयें राज्यं न स्वर्गं नडपुनर्भतम्।<br>
कामये दुःखतप्तानं प्राणिनाम् र्तिनाशतम्।।

राज्याची अपेक्षा नाही वा स्वर्गाची किंवा मोक्षांची सुद्धा अपेक्षा नाही. फक्त दुःखाने ग्रस्त झालेल्या प्राणिमात्रांच्या वेदना होमीओपॅथिद्वारे त्याचा नाश व्हावा एवढीच अपेक्षा असते आपल्या बाबांची...!

"का ईश्वराच्या कृपेने पेशंटला बरे केले?" स्वतः बाबा ईश्वराचे रूप असून लोकांना आजार व अनेक कारणांपासून त्यांना सदैव्य मुक्त करतात. तर या पेक्षा दुसरा ईश्वर किंवा देव ह्या भुलोकाच्या पाठीवर बाबां शिवाय कुणीच नाही...!

बाबांची कृपा जर पेशंटवर असेल तरच तो पेशंट बाबांच्या दरबारात येतो. दरबाराच्या सुर्याद्वारा वर पाय देताच बाबांच्या आशीर्वादाने त्यांचे पूर्ण दु:ख निवारण होते. हे फक्त तुम्ही करू शकतात मग ईश्वर व देव फक्त तुम्हीच आहात...

आम्हाला तर कधी वाटणार पण नाही बाबांनी फक्त स्वत:साठी काही केले असेल, जे केले ते आमच्यासाठीही.
प्रत्येक आजारावर बाबांनी दिलेल्या गोळ्या कार्य करता असे नव्हे तर आपण बाबांवर किती प्रमाणात विश्वास व श्रद्धा ठेवतो हे महत्वाचं व त्यापेक्षा त्या ठिकाणी असलेली बाबांची आदिशक्ती तेथे काम करत असते. कधी कधी बाबा मला खूप ताप व पोट दुखत असतांना सुद्धा फक्त चॉकलेट देऊन हाकलुन देतात व चॉकलेट खाल्याने अवघ्या १० ते १५ मिनिटात माझे पोट व ताप पण उतरून गेला असतो. व दुसऱ्या दिवशी मी बाबांना सांगायला गेलो तर बाबांच्या दरबारात पाय ठेवतो तेवढ्यात बाबा म्हणायला लागतात की, "वेड्या बाबांच्या नांदी काय लागला आहे! काही समजत नाही बाबाले भो तुया"

असे तर खूप चमत्कार मला बाबांच्या सान्निध्यात आल्यानंतर पदो पदी प्रत्येक सेकंदाला बाबांचे अनुभव येत असतात. एक माझा महत्वपूर्ण अनुभव आहे... पण मी तो अनुभव नमुद करू शकत नाही... पण त्या अनुभवा वरून एवढेच सांगतो की, बाबांनी आम्हाला त्यांच्या पदरात घेतलं म्हणून आज आम्ही जिवंत तरी आहोत नाही तर आमचा तर नामो निशाणच राहीला नसता.
आपण सर्व अडचणी व दु:ख बाबांना सांगतो व ते बाबांच्या कानी पडतात त्याचे निवारण होते. व आपले काम सुरळीत होते. पण ते काम करण्यास बाबांना किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार आपण कधीच करत नाही ना...?

अस मानायला हरकत नाही की...

बाबा वडिलांसारख आपल्याला प्रोत्साहन देतात...
बाबा आईसारखी आपली काळजी घेतात...
बाबा भावा बहीणी सारखं प्रत्येक कामात मदत करतात...
बाबा एका सख्खा मित्र-मैत्रींणी सारख सुख-दु:खात साथ देतात...
बाबा माणुसकी जपायला शिकवितात...

मग अजून काय हवं असतं आपल्याला बाबांकडून... एक चांगल जबाबदार व्यक्तीमत्त्व बनायला बाबा मदत करत असतात...
म्हणुन म्हणतो बाबा जर मला आयुष्यात भेटले नसते तर मी या जगात पाण्याच्या बुडबुडया प्रमाणे झालो असतो हे निश्चित...!

मी कोण एवढा श्रेष्ठ वाया चाललो आहे की बाबांच्या या चार प्रश्नांची उत्तरे देवू शकेल? या चार प्रश्नांची उत्तरे द्यायला तर खूप सारे जन्म अपुरे पडणारच...

बाबांचे खरे रूप कोणालाही समजले नाही, तर मी कुठे लागलो? म्हणून सांगावयास वाटते की,
बाबांना पुस्तकात बसणारे व्यक्तीमत्व नाहीच...

जसे अठरा पुराण आहेत... तसे कदाचित १८०० पुराणांचे एक पुराण होईल

हिंदू धर्मासाठी... श्री भगवद्‌गीता
ख्रिश्चन धर्मासाठी .... बायबल
मुस्लिम धर्मासाठी... कुरान
शिख धर्मासाठी... गुरू ग्रंथ साहीब
अबोला धर्मासाठी... अबोल प्रवास सेवेचा

तसेच बाबांच्या धर्मात बसणारेंसाठी अबोल प्रवास सेवेचा ही गीते प्रमाणे श्रेष्ठ असून ही गीता कधीच लिहून पूर्ण होऊ शकत नाही ही अबोल प्रवास सेवेची गीता बाबां प्रमाणेच युगोनी युगे अबोलच राहणार...

- "बाबा ४०८ कारभारी..."

## बाबा आमचे दीपस्तंभ....

माणसाचं मन ही एक अनाकलनीय गोष्ट आहे. वरवरच्या चेहऱ्यावरून एखाद्याच्या मनात काय हालचाली चालल्या आहेत याची कल्पना येत नाही. आली तरी ती बरोबरच असते असं नाही. प्रचंड तणावाखाली राहणारी व्यक्ती ही वरवर आनंदी असल्याच भासवते. तसच आनंदी असणारी व्यक्तीही आतुन पोखरलेली, दुःखी असू शकते. आपण कायम सुखी, आनंदी आहोत अस दुसऱ्याला वाटत रहावं आणि त्यासाठी तसं पुर्णपणे वाटण्याचा प्रयत्न करणं ही गोष्ट कठीण परंतु आवश्यक अशी आहे. सर्वांना ते जमत नाही. किंबहुना आपली तब्येत, अडचणी, तणाव त्या व्यक्तीला तसं जगू देत नाही; असो.

काही व्यक्ती अशा असतात की, त्यांच दर्शन आपल्याला नको वाटतं. मग त्याचा आपला संबंध असो नसो! परंतु काही व्यक्ती अशा असतात की, त्यांच्या दर्शनासाठी आपण हपापलेले असतो. त्याचं दर्शन झाल्यावर आपणाला मनस्वी आनंद होतो. असेच एक दिव्य व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. बाबा. मी जेव्हा पं.पू. डॉ. बाबांना बघतो तेव्हा ते मला देवाच्या रूपातच दिसतात. त्यांचे चेहऱ्यावरचे स्मितहास्य, दुसऱ्या बद्दलची आस्था, प्रेम, सद्‌भाव या सर्व गोष्टी एकवटलेल्या मला दिसतात.

मला तो क्षण आजही आठवतो, योगायोगाने मला अबोली प्रतिष्ठानच्या आरोग्य शिबिरात वैजापूर येथे जाण्याची संधी मिळाली. तेथे पोहचल्यावर साधारणतः ५० रूग्ण बसलेले आम्हाला दिसले. आम्ही रूग्ण तपासणीला सुरूवात करताच रूग्णांची संख्या जवळपास २०० ते २५० झाली व ते बघून आम्हाला घाम फुटला. आमचे हाल बघून बाबांनी स्वतःरूग्ण तपासण्यास सुरूवात केली व बघता बघता फक्त दीड ते दोन तासात संपूर्ण रूग्ण व्यवस्थित तपासून संपवले. हा सर्व चमत्कार माझ्या डोळ्यासमोर घडला तरी माझा यावर विश्वास बसत नव्हता मी परत येईपर्यंत त्याच गोष्टीचा विचार करत होतो.

त्यामुळे बाबा, तुम्ही ईश्वर कृपेने रूग्णसेवा करीत आहाता व त्याचबरोबर अनेक प्रकारे समाजसेवा सुद्धा करीत आहात व भविष्यात तुमचे कार्य असेच वृध्दींगत होवो अशा ब्रह्मांड शुभेच्छा!

बाबांविषयी लिहीण्यासारखे खूपच आहे. परंतु शब्दात ते सर्वच उतरविणे अशक्य आहे. बाबा तुमचे जीवन खरोखरच एका दीपस्तंभासारखे आहे. आपल्या ह्या यशस्वी वैद्यकीय कार्यकीर्दीत डॉ. सौ. स्मितातार्इंचा सिंहाचा वाटा आहे. हे नाकारता येणार नाही.

बाबांविषयी अधिक काय सांगावे,

बाबा तुम्ही नेहमीच आनंदाने उमलत राहा
आशीर्वादाचे हात उभवून ऊर्जा देत, दरवळत राहा
बाबा, तुम्ही आहात आमची उज्वल - ओली प्रेरणा
पणती होऊन उजळणाऱ्यांची होते संत-सज्जनात गणना।    (संग्रहीत)

असे बाबा आम्हाला जन्मो जन्मी मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!

- श्री. डॉ. निखिल चौधरी, जळगाव

## बाबांशिवाय शून्य

गुरूवर्य बाबाश्री प्रणाम...

माझ्या भावना नकळत बाबांच्या मनालाही समजतात...
बाबांच्या त्या अबोल प्रेमाची फुले माझ्या मनी उमलतात...
जेव्हा बाबा जळगांवात नसतात तेव्हा बाबांच्या आठवणी असतात...
जेव्हा बाबा असतात तेव्हा मला काही शब्दच सुचत नसतात...
बाबांच्या शिवाय जगण्याचा विचार ही करता येत नाही...
बाबा जेव्हा जळगांवात नसतात तेव्हा जळगाव हे मुक्यासाठी अबोल असते
आणि जेव्हा असतात तेंव्हा अबोल असुनहि खूप काही बोलते
बाबा सुखी आहे प्रत्येक दुःखातही, अबोलीच्या माय बोलीत, अबोलीच्या माय बोलीत.

- श्री. मुक्या...

## अंतर्यामी बाबा

गुरूवर्य बाबांना प्रणाम ! माझ्या आयुष्यात देवांचे श्रद्धा स्थानी असतील तर ते फक्त आपले बाबांच. बाबांच्या दरबारात गेल्यानंतर दरबाराच्या उंबरठयावर पाऊल ठेवताच क्षणी बाबांच्या मुखातून राम राम सासुबाई (मामी) शब्द कानावर पडल्यानंतर असे वाटते की आपण आपल्या शहरातल्या जावयाला भेटलो. तेथे माझे अर्धे दुखणे कमी होते.

रूग्ण सेवा केली? पैसे कमवले? का समाजसेवा केली? ईश्वराच्या कृपेने पेशंटला बरे केले. मला तर कधीच असे वाटले नाही की बाबांनी पैसे कमवले कारण की एक वेळा माझा लहान मुलगा बाबांन सोबत शिबीरसाठी गेला होता. तो जेव्हा घरी आला तेव्हा मी त्याला विचारले की तुमचे शिबीर कसे झाले तेव्हा त्याने सांगितले की बाबांनी शिबीरसाठी सर्व प्रकारची औषधी आमच्या सोबत ट्रायव्हलर भरून घेतली होती. ती औषधी बाबांनी त्या गरीब लोकांना मोफत वाटली. त्यांचे रोग निदान केले. मला असे वाटते बाबा कधी पैसे न कमवता ईश्वराच्या कृपेने रूग्ण सेवाच करतात.

माझ्या आयुष्यातील एक खूप मोठा प्रसंग तो म्हणजे माझ्या मुलीचे लग्न बाबांच्या इच्छेने झाले आहे. ती आता बाबांच्या आशीर्वादाने संसारात खूप सुखी आहे. बाबा हे अंतरज्ञानी आहेत. याची प्रतिची म्हणजे माझ्या मोठया मुलाचे बी.ए.एम.एस. पूर्ण झाल्यावर आम्ही बाबांकडे गेलो. आमच्या मनातील प्रश्न बाबांनी ओळखून बी.ए.एम.एस. नंतर एम.एस. करायचे असे उत्तर दिले व आज बाबांच्या आशीर्वादाने तो एम.एस. करीत आहे.

माझ्या आयुष्यातील महत्वाचा अनुभव म्हणजे माझ्या मिस्टरांना वयाच्या पस्तीस वर्षापासून दम्याचा त्रास होता. इतका त्रास होता की त्यांना दररोजची अंघोळ करणे सुद्धा संकट वाटत असे परंतु ईश्वर कृपेने व बाबांच्या संजीवनीमुळे तो दमा जणू सर्दी खोकल्या सारखा नाहीसा झाला. आज ते बाबांच्या कृपेमुळे दररोज २ ते ३ किलो मीटर पायी चालतात.

खरे म्हणजे बाबांबद्दल बरेच लिहिण्यासारखे आहे परंतु सर्व लिहू शकत नाही. आमच्या परिवाराला बाबा भेटले नसते तर आमचा परिवार हा पोरका राहीला असता. आम्हाला बाबांनी पदरी घेतल्यामुळे आमच्या संसाराचे गाडे सुरळीत चालू आहे.

ईश्वराच्या चरणी अशी प्रार्थना करते की माझे उदंड आयुष्य बाबांना लाभो व त्यांची कृपा दृष्टी आमच्यावर राहो. म्हणून मला असे वाटते की...

दु:खात साथ देणारे
सुखात वाहून नेणारे
आयुष्याचे कल्याण करणारे
ह्रदयात जपावे असे आमचे बाबा.

माझे काही चुकले असल्यास क्षमा करावी व करतीलच !

आपलीच (मामी)
- सौ. प्रमिला चौधरी

## बाबांची उंची अशक्यप्राय....

गुरूवर्य बाबा, प्रणाम !

बाबा मला तुमचा खूप अभिमान आहे. मला तुमचे औषध खूप आवडते कारण ते कडू नसते. माझ्या पप्पांच्या औषधा प्रमाणे. बाबा मी आईला नेहमी सांगत असतो, माझी उंची वाढव. म्हणून त्या दिवशी तुम्हाला मम्मी ने सांगितले वैष्णव असे म्हणतो. तर तुम्ही मला म्हणालात, उंची काय बाजारात मिळते. त्या दिवशी मला ते पटले त्या दिवसापासून मी म्हणत नाही मम्मी उंची वाढव. मी तर मम्मीला सांगतो, अग बाबांचे औषध दे, मग माझी उंची बघ.
अमिताभ बच्चन पेक्षा हि उंच होते की नाही.

- वैष्णव चौधरी
नंदुरबार

## महागुरू बाबा !

गुरूवर्य बाबा प्रणाम ! तास तास बाबाची वाट पहाणे, ह्या सारख्या यातना नाही. पण... आम्ही बाबानां भेटणार आहोत, ह्या जाणीवे सारखं सुख मात्र नाही! अशी मी बाबांची मुलगी सासरहून माहेरी येते. तेव्हा कधी बाबांना भेटू आणि कधी नाही असे झालेले असते. बाबांचे रूप जसे...

"पाहता तुमचे नयन दर्पणी दिसते मला देवाचे प्रतिबिंब"
"तुमच्या आसमानी नजरेत भिजून होते मी चिंब!"

असे माझ्या बाबांचे महाराजा प्रमाणे रूप व देवाचेच प्रतिबिंब आहे. आज माझे लग्न बाबांच्या आशीर्वादाने झाले असून माझा सुखाचा संसार आहे.

रूग्ण सेवा केली? समाज सेवा केली? कि पैसे कमवले? ह्या प्रश्नाची उत्तरे दिली तर लहान तोंडी मोठा घास घेतल्या सारखा होईल. म्हणून ह्या प्रश्नावर कमी बोललेलच बरे, ह्या देवाला प्रशंसा केलेली सुध्दा आवडत नाही. जे काही करतात ते रूग्णासाठी करतात असाच माझा जीवनातील अविस्मरणीय अनूभव मी तुम्हाला सांगू इच्छिते माझा लहान मुलगा (भुषण) हा चार महिन्याचा असताना त्याला किडनी स्टोन आहे हे आमच्या लक्षात आले. तेव्हा आम्ही त्याला बाबां कडे घेऊन गेलो. सोनोग्राफी केल्या नंतर त्याला बारा स्टोन आहेत, हे ऐकून आम्ही घाबरून गेलो. बाबांच्या दरबारी आल्या नंतर बाबांनी रिपोर्ट बघून सांगितले आपण न ऑपरेशन करता आपल्याला १२ स्टोन किडनीतून काढावयाचे आहे. बाबांचे औषध चालू असतांना गव्हाच्या दाण्यायेवढा खडा लघवीच्या जागी येऊन अडकला. त्यावेळी मी नंदुरबार येथे होती माझ्या सासरची सर्व मंडळी मला सांगत होती ह्याला आपण ॲडमिट करू आपरेशन करून खडा काढून घेवू, पण मला बाबांनी सांगितले होते की मुलाला काहीही त्रास झाला तर पोराला उचलायचे आणि दरबारात घेवून यायचे. मग मी सासरच्या विरोधात जाऊन बाबांकडे येण्यासाठी जळगावच्या गाडीत बसली आणि काही कारणास्तव लेट उतरल्यामुळे बाबांचा दरबार मंगल झालेला होता. मी तेथे बाहेर रडत उभी होती आणि बाबांचे दरबाराचे दार वाजवले पण उपयोग नव्हता बाजूला उभे असलेले भाऊ म्हणाले ताई आत कागद लिहून पाठवा.

मग माझ्या जवळ एक्सरे चे कागद होते. तेच फाडून त्याच्या वर लिहून आत टाकले व दार वाजवून सांगितले बाबा जवळ द्या बाबांनी आतून डोस पाठवून भुषणला देण्यास सांगितले उज्वला ताई जवळ मी पुन्हा निरोप पाठवला ताई भुषणला खूप त्रास होत आहे. तुम्ही बाबांना सांगा मग आतून पुन्हा निरोप आला बाबा फोन करणार आहे घरी जाण्यास सांगितले. सांगितल्या प्रमाणे बाबांचा रात्री दहाला फोन आला व मला बाबांनी सर्व विचारले. बाबांनी मला सांगितले की खडा सेट झालेला आहे. घाबरण्याचे कारण नाही. औषध देत रहा. पुन्हा फोन करतो. अडीच वाजता बाबांचा फोन आला. फोन आला बाबांनी विचारपूस केली फोन ठेवतांना सांगितले आता मी झोपतो. माझ नशीब की बाबा रात्रभर जागले असे साक्षात देवच करू शकतो बाकी दुसरे कोणीच नाही. बाबांनी त्याला चहा पाजवण्यास सांगितले बाबांचा चहा रूपी औषधानी त्याचा खडा पडला हा बाबाच्या औषधाचा चमत्कार असून दुसरे काहीच नाही. बाबा फक्त औषधाने किडणीतील स्टोन काढू शकतात. असा माझ्या जीवनातील सर्वात मोठा अविस्मरणीय क्षण मी कधीही विसरू शकत नाही. असेच अधिक क्षण माझ्या आयुष्यात आहेत. तसेच मी दुसऱ्या दिवशी बाबांना भेटण्यासाठी गेली तेव्हा बाबांना एक प्रश्न विचारण्याची इच्छा व्यक्त केली. तर बाबांनी मला हू.... ह्या भाषेत होकार दिला नंतर मी विचारले बाबा तुम्ही दरबार का बंद ठेवता? तेव्हा बाबानी उत्तर दिले तुम्हा सर्वांचे पुढचे दिवस चांगले जावे म्हणून मी दरबार बंद ठेवतो. ह्या देवाला मला कधीच ओळखता येणार नाही. माझ्या आयुष्यातील श्रद्धा स्थान असलेले "बाबा".

बाबा, एकच म्हणावेसे वाटते,

> "गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णु गुरूर्देवो
> महेश्वरा गुरू साक्षात परब्रम्ह
> तस्मे श्री गुरूदेव नमः।"

- सौ. कोमल चौधरी
नंदुरबार

## देव-तुल्य बाबा माझे...

आदरणीय बाबा, दोन शब्द माझ्या बाबां करता... तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय की कितीतरी वेळ मी व माझे पती आम्ही बाबांशी बोलतो आहे. अजूनही विश्वास बसत नाही. बाबा म्हटले पेशंट पाहून बोलतो तुमच्याशी पण जो पर्यंत पेशंट संपले तो पर्यंत असे वाटले की आपण काही तरी वेगळे आहोत बाहेर बसल्या- बसल्या अनेक विचार डोक्यामध्ये पण जेव्हा शिंपी आवाज दिला. आत मधे गेलो एक वेगळा भास, मी बाबांच्या चेहऱ्याकडे बघतच होते. बाबांचे प्रत्येक अवयव बोलतात बाबांचे डोळे तर भगवतीचे आणि दाढी तर साईबाबांची मी पहातच राहीले बोलणे झाले पण घरी आल्यावर काही उमजेच ना सारखा चेहरा डोळ्यासमोर पण आनंद ही तेवढाच, गगना ऐवढा!
एवढेच म्हणते बाबा,

गुरू - मात - पिता, गुरू बंधुसखा,
तेरे चरणो में, मेरे कोटी प्रणाम!

दवाखाना ह्या शब्दाचा मला फरक कळला, नाहीतर दवाखान्यात गेल्यावर माझी आई म्हणते डॉ. काय सांगता तसा फोन कर, तिला वाटतो तो दवाखाना..... जिथे टेस्ट सांगतात की सोनोग्राफी की ॲडमिट करतात की अजून काही तरी, पण अगं! बाबांच्या दवाखान्यात जाते आहे. हा दवाखाना या शब्दांचा मोठा फरक आणि तिला फोन वर सांगण्या इतपत बाबा माझ्याशी बोलतिल का? मला तपासतील का? मग माझच मला हसू येते. मग तिचा फोन येतो आणि म्हणते, काय सांगितले डॉक्टरांनी? मी म्हणते बाबा म्हटले होवून जाईल. ती म्हणते बस एवढचं? मग मी म्हणते आहे की नाही, देव-तुल्य बाबा माझे!

बाबा सदैव आमच्या सोबत रहा. आणि आहेत हेच गृहीत धरून आम्ही चालतो म्हणून तुमच्या मुळेच मी निर्भय झाले.
बाबा, कोटी कोटी प्रणाम.

- तुमची मुलगी
सौ. ज्योती शिंपी

## बाबा - महादेव

मा. कृपासिंधू डॉ. बाबा यांना आम्हा परिवाराचा चरण स्पर्श.

प्रथम मी आपली क्षमा मागतो की अबोल प्रवास सेवेचा या प्रथम अंकात मी माझे मनोगत व्यक्त करू शकलो नाही.

आपल्या सेवेत २५ वर्ष पूर्ण झालीत आपले अभिनंदन! परमेश्वराजवळ एकच विनंती की आपली रूग्ण सेवाधर्म असाच अनंत काळ चालू राहो. आपणास उंदड आयुष्य लाभो आपल्या कृपाछत्राचा लाभ असाच मिळो. आम्ही आपल्या सेवेचा सन १९९५ पासून लाभार्थी आहोत गेल्या १७ वर्षात आम्हास भरपूर चमत्कार अनुभवण्यास मिळाले. त्यातले निवडक अनुभव एक उजाळा, मागे वळून पाहतांना येथे नमुद करावेसे वाटतात.

माझ्या लग्नानंतर पत्नीच्या आजारपणामुळे आपल्या प्रथम दर्शनाचा योग आला तो मित्राच्या सांगण्यावरून त्यावेळेस मला भेटी अगोदर सांगण्यात आले होते की, एक दाढीवाले बाबा कडे जावयचे आहे. त्यास डॉ. म्हणतात. माझ्या पत्नीचे रोजच आठवडयात तीन ते चार दिवस डोके दुखायचे व तो आजार तिला अनुवंशीक होता. तिच्या घरातील भरपूर मेंबर यांना होता. पण आज आपल्या कृपा दृष्टीने आपल्या उपचारांनी रूपयातून एक टक्का शिल्लक राहीला. तर तिच्या नातेवाईकांना अजून ही कृपा दृष्टी न झाल्याने त्यांचे दुखणे आहे तसेच आहे, कारण ते आपल्या पर्यंत पोहचू शकलेले नाहीत माझे असे मत आहे की देवाने बोलवल्या शिवाय त्यांच्या मर्जी शिवाय त्यांची कृपा दृष्टी झाल्या शिवाय तो त्याच्या दर्शनाचा अधिकार (लाभ) कोणालाही देत नाही.

तसेच माझी मुलगी ४ ते ५ महिन्याची असतांना तिला भरपूर कफ झाल्यामुळे तिला निमोनीया झाला होता. पण आपण तीला पाहताच निमोनीया झालेला आहे ते कोणतेही प्रकारचे एक्स-रे न काढताच सांगितले तेच निदान लहान मुलाचे जळगाव शहराचे ख्यातीचे तज्ञ डॉ. पुर्ण चेकअप व एक्स-रे काढून झाल्यानंतर सांगितले. त्यानंतर काही दिवसानी मुलीच्या पायाच्या घोटण्याजवळ खेळताना थोडे खरचटले होते पण आम्ही त्याकडे लक्ष न दिल्याने तीच्या पायाचा घोटा भरपूर दुखू लागल्याने आपणाकडे दाखवण्यास आणले असता वरून पायाचा मामुली खरचटलेला भाग दिसत होता. कोणतीही सुज वैगेरे काही नव्हते पण आपल्या पाहिल्यानंतर आपण सांगितले की, तिच्या पायाच्या हाडामध्ये पस झाला आहे. ताबडतोब मा. डॉ. अस्थितज्ञ यांची भेट घेण्याचे सांगितले व ते काय सांगतात ते येऊन मला सांग. नंतर मी औषधी देईल मी आपल्या सांगण्यानुसार डॉ. ची भेट घेतली त्यानी मुलीच्या पायाचा एक्स-रे काढला व मला आपण जे सांगितले ते त्यांनी

चेक करून एक्स-रे पाहून सांगितले त्या वेळेस मला आपल्यातील तिसऱ्या डोळयाचा साक्षात्कार झाला.

तसेच माझ्या जीवनातील सर्वात मोठा अनुभव की आम्हा परिवाराला आपण नवीन जगण्याची सर्वात मोठी संधी दिली ती अशी की माझी मुलगी अडीच ते तीन वर्षाची असतांना तिच्या रक्तामध्ये दोष निर्माण झाला. तिच्या त्वचेवर होणाऱ्या परिणामाने मी अत्यंत दुःखी व घाबरून गेलो होतो. मुलीची जात असण्याने जास्त भीती वाटत होती. इथे लिहताना मला अजुनही भीती वाटते. भगवंत असे दुःख कोणलाही देवू नये. तो संपूर्ण प्रकार (आजार) पाहता मला आपण पहीला प्रश्न विचारला की माझी कुलस्वामिनी कोण आहे? तीचे लग्नानंतर किंवा लग्नाआधी दर्शन घेतले आहे काय, घेतले नसेल तर आपण ताबडतोब सर्व कामे सोडुन पूर्ण परिवारासह कुलस्वामीनीचे दर्शन घेण्याचा आदेश दिला व दर्शन घेऊन ये असे परत परत बजावले. त्यानंतर आपण आजारावर ३ ते ४ वर्ष सलग केलेला उपचार आपली मेहनत व आई कुलस्वामिनीचा आशीर्वाद याने माझी मुलगी त्या आजारापासून पूर्णतः बरी झाली आहे. ती आज १२ वर्षाची आहे. ती नवीन जीवन जगत आहे. त्यामुळे माझ्या पूर्ण परिवारास आपल्यामुळे नवा जन्म मिळालेला आहे. आम्ही आज सुरक्षीत आहोत आपल्यामुळे. यावरून मला असे वाटते की आपण काही आलतु फालतु डॉ. यांच्याकडे औषधी घेत नसून एक महान त्रिकाल ज्ञानी दूरदृष्टीने तज्ञ डॉ. अवलीया बाबा यांच्या संरक्षणात आहोत.

जुन्या काळामध्ये १८ व्या, १९ व्या शतकात लोक स्वतःचे संरक्षण करण्यासाठी तेव्हाचे झालेले अवलीया बाबा म्हणून आजचे प्रख्यात श्री. गजानन महाराज (शेगांव), श्री साई नाथ बाबा (शिर्डी), आपल्या भाषेतील टकल्या म्हणजे श्री स्वामी समर्थ (अक्कलकोट), यांचे जर आपण चरित्र वाचल्यास ते डॉ. नसतांना त्यांचे चमत्कार, मुडीपणा, त्यांनी केलेली समाज सेवा. रूग्णसेवा न बोलता, कोणतीही अपेक्षा न करता, सेवा हाच धर्म असे समजते. वरील हे सर्व दत्ताचे अवतार आहेत. तसेच आपण प्रथम काढलेली स्मरणीका वाचली असता आपण केलेली सेवा पाहता व स्वतः अनुभवता आपल्या नावातील दत्त शब्द. खरोखरच शोभून दिसतो.

२१ व्या शतकातील दत्तावतारास (अवलीया बाबास) शतशः प्रणाम आपल्या बद्दल लिहण्यास शब्द कोषातील शब्द सुद्धा अपुरे पडतील. माझे मराठी व्याकरण फारच कच्चे आहे. मी जे लिहले आहे. माझा अनुभव शब्दात लिहिताना केलेले धाडस आहे. भीती फक्त कुठे आपण चुकलो तर नाही? याची. काही चुकीचे वाटल्यास पुन्हा क्षमा असावी.
गुरूदेवास पुन्हा नमन.

- श्री विजय नागपुरे (बारी)

## बाबांसारखे...बाबाच !

बाबा माझे गुरू, बाबा कल्पतरू, सौख्याचा सागरू, बाबा माझे।
प्रितीचे माहेर, अमृताची धार, मागल्याचे सार, बाबा माझे।

लोग कहते है की डॉक्टर तो डॉक्टर होते है, मगर मैं मानता हु कि मेरे लिये डॉक्टर बाबा भगवान है। सन २००४ मैं मेरी पत्नी को लेकर बहोत परेशान था और उसका बडे से बडे एम.डी. के पास इलाज करवाया। फिर भी कोई असर नही हुवा, और मेरा बेटा एक से दो साल का था मै बहुत टेन्सन मै था। तब मेरे निलेश भाऊ ने मुझे डॉक्टर बाबा के बारे मे बताया और जाने के लिये कहा। फिर सुबह के समय नंबर लगाया और फिर मै मेरी पत्नी को लेकर बाबा के पास गया, उनके सामने गया, फिर बाबा ने पुछा कि राठोड तेरी कितनी पत्नी है? फिर मैने कहा एक ही है, फिर बाबा ने कहाँ कि तेरी पत्नी को कुछ नही होगा और कभी कुछ हो भी गया तो मै तेरी पत्नी को जैसी कि वैसी भर के दुंगा। तब मुझे एकीन हुवा कि डॉक्टर रूप मै भगवान मेरी मदत करने आये है, और वो मेरे लिये भगवान से कम नही है। तब से लेकर आज तक मेरे जिन्दगी मे दुःख दर्द हमारे पास नही आया। और आया भी है, तो बाबा चुटकी मैं भगा देते है और आज मेरी पत्नी का वजन ४० से ५० किलो के तक है।

अखेर मी एवढेच म्हणेन...

तुम्हाला घ्यावे, तुम्हाला गावे,
तुम्हाला पुजावे बाबा,
जगात अवघ्या तुझ्यासारखे
दुसरे दैवत नाही.

- श्री. हरिराम राठोड

अबोल बोल...



न बोलता सेवा... शक्य आहे का ?

आपण फक्त
आपलं काम करायचं,
फळ येईलंच !

## बाबा एक आधारस्तंभ !

आदरणीय बाबा, "आपले मनोगत थोडक्यात व मुद्देसुद लिहा" यामुळे आम्हाला खूप मोठा प्रश्न पडला की, या अबोल, ईश्वरानुभूती असलेले, होमिओपॅथी तज्ञ, कल्याणकारी व आमच्यासाठी एक "विशाल कल्पवृक्ष" ज्याच्या छायेत व आधारासहीत आश्रमात आम्ही खूप सुखी झालो. अशा या हक्काच्या व प्रेमळ व्यक्तीमत्वाबद्दल मोजके लिहणार कसे? म्हणूनच....

जीवनाच्या एक दुःखद काळात तुम्ही आम्हाला योग्य जीवन जगण्याची एक वाट व योग्य दिशा दिखविली त्यामुळे आज आम्ही सुखद आयुष्य जगण्याचा यशस्वी प्रयत्न करीत आहोत. आमच्यासाठी बाबा तुम्ही केवळ एक कल्पवृक्षच नाही तर एक आधारस्तंभ आहात कारण आमच्या प्रत्येक Problem वर Best Solution मिळाले, ज्याप्रमाणे इंदौर येथील पं.पु. नाना महाराज तराणेकर यांचे आम्हाला आलेले अनुभव, व साक्षात्कार पदोपदी जाणवतात. त्याचप्रमाणे तेच अनुभव बाबांना भेटल्यावर व मार्गदर्शन मिळाल्यावर येतात. आणि म्हणूनच बाबांना आम्ही पती-पत्नी (भुषण व सौ. मनिषा) गुरू केले आहे. त्यासाठी दोन शब्द.....

"संसाररूपी भवसागरात, तारावया एक गुरू समर्थ,
यांच्यास्वये सद्गुरू कर्मधार, त्याच्या आधारे भव होई पार,
हा मानवी जन्म असे वरिष्ठ, परी सद्गुरू पाहिजे तेथे श्रेष्ठ,
गुरू विन नाही गती ज्ञानजिवा, गुरू विन तो शिण हा होत जिवा,
असा गुरूचा महिमा अपार, चरित्र लीला विस्तार सार,
ज्याच्या कृपेचे फळ अपरंपार, ज्याचे तया अर्पण हे विचार".

अनुभव - आमचा चि. ध्रुव सहा महिन्यांचा होता तेव्हा पासून आम्ही बाबांकडे येतो. बाबा आम्हाला खरे तर राठोड भाऊ यांच्यामुळे भेटले असो. ध्रुव दोन महिने आजारी होता, अनेक बाल रोग तज्ञांना दाखविले त्यांचे निदान प्रत्येकाचे वेगळेच, कोणी सांगितले बाल दमा, कोणी निमोनिया, कोणी मलेरिया सर्व प्रकारचे औषधी घेतली पण त्याची Reaction आली आणि ध्रुव जास्तीच आजारी झाला.

त्यावेळी श्री राठोड भाऊ यांच्या मदतीमुळे बाबा भेटले व माझा ध्रुव वाचला त्यामुळे आम्ही बाबांच्या ऋणात आहोत पण आंम्हाला ते फेडायचे नाही. कारण आम्ही लहान आहोत याची जाणीव आम्हाला होत राहते. म्हणूनच बाबांना भेटण्यासाठी व त्यांच्या हातुन संजीवनी रूपी औषधी घेण्यासाठी कीतीही वेळ बसण्यासाठी आम्ही तयार असतो. शेगाव येथे गेल्यावर तासंतास रांगेत उभे राहुन "श्री गजानन महाराजांची प्रसन्न मूर्ती" पाहिल्यावर सगळा थकवा दूर होतो व मन आनंदी होते, त्याच प्रमाणे बाबांच्या दवाखान्यात (मंदिरात) आल्यावर वाटते.

"अबोली प्रतिष्ठान" यांच्या द्वारे श्री त्रिविक्रम मंदिराचा जिर्णोद्धार होत आहे, त्यासाठी होणारा त्रास व व्यवस्था यासाठी आम्ही क्षमाप्रार्थी आहोत. आपल्या यशाची आम्ही सदोदित त्रिविक्रमाचरणी प्रार्थना करतो व काही चुकले असल्यास त्याची क्षमा मागतो.

।। जय त्रिविक्रम ।।

- सौ. मनिषा भुषण देवकर
श्री. भुषण शिरीष देवकर, शेंदुर्णी

## पोपटाची बाबा भाषा

प्रिय बाबा सा.न. मी गौरी (पोपट), मला तुम्ही खूप-खूप आवडतात व तुमच्या गोळ्या सुद्धा. बाबा मला खूप हुशार व्हायचे आहे व तुमच्या सारखे खुप बक्षिसे मिळवायचे आहे. त्यासाठी मला अभ्यास करायची प्रेरणा व तुमचे आशीर्वाद हवे आहे.

माझे बोलणे नीट केल्याबद्दल Thanku. परंतु माझे बाबा (भुषण देवकर) हे मला खूप रागवत असतात. त्यांना थोड नीट समजवा.

- कु. अक्षदा भुषण देवकर
शेंदुर्णी

## "The Baba"... vast & the never ending meaning

काही तरी मनात होत, कुणाला तरी सांगायच होत.... पण.... मनातलं गुपित फोडायचं नव्हतं. म्हणून मी सहारा घेतला तो या निर्जीव आणि प्रामाणिक Diary चा. तिलाच सांगितलं सगळ आणि सांगता-सांगता, मलाच नकळत उमगला त्या भावनांच्या गोतावळ्याचा हर्षदायी, सुंदर आणि माझ्याच मनात दडलेला 'तो' अर्थ

'तो' अर्थ ज्या वेळी मी सांगत होते, तेव्हांच तयार झाले हे माझ्या डायरीस मी लिहीलेलं पत्र. त्यातला मजकुर थोडा तुटक-तुटक आहे. हे पत्र आज मी तुम्हा सर्वांसाठी प्रस्तुत केलं आहे. हे पत्र मी लिहीलं होत इंग्रजीत आणि 'तो' अर्थ होता माझ्या 'बाबांचा', 'आव्वाकाकांचा' होय. ते बाबाच माझे आव्वाकाका पण आहेत.

तर ते पत्र असं होतं......

Dear Diary,

Have you ever seen any miracle ....??? No !!! then just listen and try to understand. when my father's father 'Baba' become my dearest uncle 'awakaka' the first miracle in my life happened and till continues. It was then, when I understood the meaning of relations in my life.

He is the man whom I feared and loved the most.... 'WHAT A CONTRADICTION'..... and since then desirable contradictions played an important role in my life.

'Baba', 'Awakaka' the great man is the living statue of simplicity, affability. conscientiousness, diligence, placidity, love, sacrife and such never ending good qualities. He is still down to earth..... and this situation is awe for me. He is bonzer in every sphere of life.

You know..... usually people label great people as mad but the mad (according to people) whom I met is

madest of all. Today I pray to god to bless me with such great people in my every birth, so that, I can understand the word 'Baba' to the fullest.

You don't know and can't even imagine the things he had done for me and my entire family (aboli parivar). He always stood beside us in every situation of life and helped us to choose the right path.

I am the biggest fool and stupid fellow who had made a small try to write about the 'HORIZON'..... knowing it has no limits and its depth & greatness can't be measured. Dictionaries and different languages have explained very narrow meaning of 'Baba' because 'The Baba' I know has vast and never ending meaning can't be explained in words.

हे वाचल्यावर जर काही चूक असल्यास मला माफ करा. मी हे लिहण्यास फार छोटी आहे तरी समजून घेणे.




- Your Friend & Awakaka's
**Yedi**

## बाबा - डॉक्टर देव

डॉ. सुनिलदत्त चौधरी ह्यांच्या कार्याविषयी लिहायचे म्हटले तर पूर्ण पुस्तकच अपुरे पडेल. माझ्या मुलीची ओठाची एकदा सर्जरी करावी लागली व तिला फरक पडला नाही तेव्हा मी घाबरून डॉ. कडे गेली तेथे मला माझ्या मुलांसाठी व सर्व परिवारासाठीच विश्वासू अशी व्यक्ती भेटली. मी सर्वांना सांगितले की, डॉक्टरांच्या फी ला नांव ठेवू नका. तेथे इलाज आहे विश्वास आहेच. सर्वानांच त्यांच्यात देव सुद्धा पाहायला मिळतो. मला माझे सद्‌गुरूच (रामकृष्ण क्षीरसागर महाराज, नगर) त्यांच्याठायी दिसतात.
म्हणून डॉक्टरांनाच आम्ही म्हणतो,

त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा।।
नेतीनेती शब्द न ये अनुमाना।
सुरूवर मुनीजन योगी समाधि न ये ध्याना।।

- सौ. ज्योती मनोज पाटील, जळगाव

## बाबांशिवाय शून्य

तीर्थरूप डॉक्टरांन बद्दल शब्द कागदावर लिहिणे म्हणजे कठीण काम, बोलायला सांग... चांगल एक तास बोलू शकतो एवढे चांगले अनुभव. तीर्थरूप डॉक्टर म्हणजे आम्हाला आमचं दैवत. डॉक्टर म्हटलं की खूप सा-या टेस्ट, खूप मोठी लिस्ट. पण आमचे बाबा म्हणजे फक्त एका छोट्या काचेच्या बाटलीत साबुदाण्या सारख्या गोळ्या. पण प्रत्येक गोळीत चमत्कार व आम्हाला स्वताला 100% विश्वास बरे होण्याचा. आमची सर्वांची परमेश्वरा कडे एकच प्रार्थना आहे, आमच्यातल्या या माणुसरूपी परमेश्वराला सुख दे, शांन्ती दे, आणि खूप चांगलं आरोग्य दे. बाबांसाठी दोन ओळी लिहायला मिळाल्या हे आमच दोघांच भाग्यच!

- सौ. उज्वला खुशाल राणे
श्री. खुशाल दिनकर राणे

## डॉक्टरी व्यवसाय में आदर्श व्यक्ती

डॉ. साहब से मेरा एवं परिवार का संबंध पुराना है, लगभग १९९४-९५ से हम सभी उनका चिकित्सा परामर्श ले रहे हैं। शुरवात में चिकित्सा विज्ञान की इस शाखा, होमिओपॅथी पर मेरा किंचित विश्वास था परंतु धीरे धीरे यह विश्वास पक्का होता गया। बिमारी कैसी भी हो, अपने कौशल्य एवं अनुभव के आधार पर, बिना किसी अनावश्यक एवं खर्चिक जांच के उसका अचूक निदान, आपने किये निदान पर जबरदस्त भरोसा, अत्मियता से दिया हुआ उचित परामर्श/ सलाह, पेशंट-डॉक्टर संबंधो को दिया हुआ भावनिक आधार, उच्च कोटी के नैतिक एवं व्यावसायिक मूल्यो का पालन, डॉ. साहब की कार्यप्रणाली की विशेषताएँ कही जा सकती है। कई बार ऐसे लगता है जैसे कोई ईश्वरीय शक्ति इस सब के पीछे काम कर रही हो और इसका अनुभव भी किया जा सकाता है। हमारे लिये बिमारी छोटी हो या बडी, सरल हो या जटील, एक बार डॉ. साहब को दिया और निश्चिंत हो गये, इतना सीधा एवं सरल समीकरण है।

तेजी से धंदे का रूप ले चुके डॉक्टरी व्यवसाय में 'डॉ. सुनिलदत्त चौधरी' एक अनुकरणीय अपवाद है। ईश्वर उन्हे लम्बी उम्र एवं उत्तम स्वास्थ देंवे यह प्रार्थना।

शुभकामनाओ के साथ।

- प्रा. डॉ. वि. ल. माहेश्वरी

## GOOD AND GOOD...... MY BABA

Bhushan c. (Ndb.)

## तुमच्या सारखे तुम्हीच

नमस्कार डॉक्टर साहेब, मागच्या वेळेस लिहायचं राहून गेलं पण या वेळेस पुन्हा संधी मिळाली, धन्यवाद.

मी गेल्या वीस वर्षांपासून आपल्या संपर्कात आहे. १९९३ साली अस्थम्याच्या उपचारासाठी मी आपणांकडे आलो होतो. त्याआधी मी मुंबई पर्यंतचे दवाखाने फिरून चुकलो होतो. होमिओपॅथी बद्दल मला व माझ्या कुटूंबियांना काहीच माहिती नव्हती परंतु तेव्हा आपला आत्मविश्वास बघितला व आजपर्यंत दुसऱ्या कुठल्याही डॉक्टरकडे जाण्याची गरज भासली नाही. गेल्या वीस वर्षांत माझे इंजिनिअरींगचे शिक्षण झाले नोकरी लागली, लग्न झाले व आता माझी बायको वैशाली, मुले अनुष्का व पृथ्वी सुद्धा आपलीच औषधे घेणे पसंत करतात. माझे व माझ्या कुटूंबियांचे तब्येतीबाबतचे सर्व प्रश्न आपण सोडविलेले आहेत.

आपल्या जवळजवळ सर्वच Patient शी आपले वैयक्तीक नाते आहे तुम्ही त्यांच्यावर औषधेपचारा सोबतच आत्मविश्वास वाढविण्याचे काम ही फार व्यवस्थित करतात.

व्यक्तीगत जीवनात आपण अबोली प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजसेवा करत आहात, शिवाय कन्याकुमारी ते लेह प्रवास करून आपण लिमका बुक मध्ये आपले नाव नोंदविलेले आहे. शिवाय ज्योतीषशास्त्राबद्दल आपला चांगला अभ्यास आहे. यामागे आपली मेहनत व चिकाटी दिसून येते.

तरी यापुढे आपल्या हातून समाजाची सेवा अशीच घडत राहो व आपणांस उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

- श्री. प्रितम खेडकर

# A Precious gift from God...

Doctor - a word everyone is afraid of but for me doctor is the person because of whom i am alive today. All of us know doctor sunildatta chaudhari very well. He is also called baba in many homes. Baba means father and really, he deserves to be called Baba. I am short of word for expressing my gratitude and feelings for him.

Today if I am writting all this it is because of him. Not just me, my full family is thankful to him. I remember, when I was small, I was suffering with pnemonia. My parents were very tensed. If Baba Would have not been in our life, it was for sure that my parents had to loose me. Not just once but this happened thrice. But..... He saved me.

Today, if my sisters are fit and fine, it is because of him. My elder sister was in Amravati during engineering. Suddenly she got very sick there when she returned baba asked her to check her haemoglobin. her haemoglobin went down to 4.5 But ......... He Saved Her.

Where doctors admit patients and tell them to do operations there only one dose of baba is sufficient. There is everyone on this earth who goes through ups and downs. My family has also experienced some sorrows which can not be expressed. At those dreadful times Baba was there with us. He never discriminates between rich and poor. For him everyone is equal.

In My home not a single thing is done without asking him as he is always right. whatever he says, it happens I Dont know if Baba would have not been in our life, were would we. I think I am very Lucky and proud of having such a great peronality as my mama who named me.

Thank you for touching my life in ways you may never know. My riches doesn't lie in material wealth but in having a doctor like you as a precious gift from God.

- Dimple Suresh Kumar. Punjabi

## बाबांनी दिले नवे जीवन

श्री श्री श्री बाबाजी, जय श्री क्रिष्ण! बाबाजी मला लिहिता येत नाही पूर्ण जीवन मी रक्ताच्या नात्यासाठी कष्ट केले आहे. मला तुम्ही आपल्या जवळ घेतल्या ने हे कळाले की जगात देव, गुरू जे कोणी आहे तर ते माझे बाबाजी।

मला थोडे चालल्यावर छाती भरून यायची मला माझे मित्र मिनेषभाई आणि पप्पुमामाजी बाबाजी कडे घेऊन गेले. बाबाजी नी आम्हाला ना टेस्ट, रिपोर्ट करण्याचे सांगितले. मला गरज नाही. तुम्हाला करायचे असेल तर करा. या गोष्टी वर आम्ही बाबाजींना सांगितले आम्हालाही गरज नाही. बाबाजी च्या औषधी ने मी पुर्ण पणे बरा झालो. आता मला असे वाटते की मला नवीन जीवन मिळाले आहे.

मोठा मुलगा २० वर्षाच्या धर्मेशला लहान पणा पासुन हाताच्या हडया आवाज करायचे. बाबाजी नी १५ दिवसांच्या औषधीने बरे केले. लहान मुलगा रूपेश ला कावीळ झाला होता. बाबाजी नी आम्हाला दुसऱ्या हॉस्पीटल मध्ये ॲडमीट करायचे सांगितले. मी बाबाजी समोर लहान मुला सारखा रडायला लागले कारण मला दुसऱ्या डॉक्टरच्या रूपात राक्षस दिसतो जो फक्त पैसे साठी लोकांचा आजार दूर करण्याचा ढोंग करतो. पण आजार दूर करत नाही आणि लोकांवर राक्षसा सारखी वागणूक करतो. बाबांनी सांगितले मी तुला औषध देतो. तू फक्त सलाईन लावण्यासाठी घेऊन जा. माझा मुलगा दोन दिवसात बरा झाला.

जगात देवा पेक्षा मोठे गुरू मानले जाते. देव हा फक्त देण्यासाठी राहतो. गुरू हा चांगली शिकवण देण्यासाठी राहतो परंतु जगात देव आणि गुरू पेक्षा श्रेष्ठ कोणी असले तर फक्त आमचे बाबाजी. आंम्हा सर्व पेशंन्टला सुखदुखात कस राहायच आणि आपला संसार सुखी समृद्धी आणि आनंदीत कसा ठेवायचा हे बाबाजीच्या जवळ राहील्याने समजले. आई जवळ राहिल्याने लहान मुलाला कोणात्याही गोष्टीची भीती वाटत नसते. तसेच आम्हा सर्व पेशंन्टला बाबाजींजवळ राहील्याने जगातल्या कोणत्याही संकटाची भीती वाटत नाही.

बाबाजींबाबत कितीही लिहिले तरी कमी आहे. देवा बरोबर डायरेक्ट कनेक्शन असणाऱ्या ऋषीमुनी यांना बाबाजी औषधी देऊन बरे करतात. बाबाजी नवीन पेशंन्टला कितीही जुना आजार असेल, पण बरा होत असेल तरच औषध देता. अथवा नाही. ही सर्वात मोठी गोष्ट आहे.

- श्री. गोटया (गीरमीट धारी)

## आशेचा किरण

डॉ. सुनिलदत्त चौधरी यांच्या बद्दल मोजक्याच शब्दांत लिहायचे किंवा बोलायचे म्हणजे प्रश्नच आहे, कारण विश्वात जगात नाव कमावणे म्हणजे ही त्यांची वैयक्तिक दैवीक साधना आहे. म्हणजे साध्य करावयाचे असेल तर साधन हवे ते साधल्याशिवाय कारण साध्य होत नाही. पेशंटजवळ पैसा जरी असला पण इलाज नसेल तर त्या पैशाची किंमत काय? जीवन तर अनमोल आहे. आत्म्याचे शरीर हे वस्त्र आहे. सगळ्यांना माहीत आहे. माझे फाटले आहे हे न सांगताच फाटलेले दिसते सर्वांचे. ही खंर तर परमार्थदायिंनी बुध्दीच आहे. अशी दृष्टी ईश्वरकृपेने मिळालेल्या या सेवेला खरंच शब्दांत मोल नाही. अशी सेवा देणारे एकमात्र म्हणजे डॉ. चौधरी आहेत. असा माझा आणि माझ्या परिवाराचा विश्वास आहे.

डॉ. चौधरी तुम्ही पेशंटला फक्त बरं करीत नाही तर त्याच्यात मानसिकरित्या जगण्याची आशा निर्माण करतात. नकळत त्या पेशंटला वाटते की, आता आपण सुरक्षित आहोत. ते सांगायचे म्हणजे मी 'कोमल बोरा' माझा ॲक्सिडेंट ३० ऑक्टोबर २००६ मध्ये झाला. माझ्या मज्जातंतुला खूप इजा झाल्या. मंज्जातंतु म्हटले की खूपच नाजुक व उपचारास कठीण असते. या जगात इलाज (या आजारावर) होत नाही असे पुणे, मुंबई, औरंगाबाद, धुळे, नासिक च्या सर्व तज्ञ डॉक्टरांनी सांगितले. मज्जातंतुला जगात इलाज नाही. मी खूपच खचून गेले होते. नंतर माझ्या पाठीच्या मणक्याचे ऑपरेशन २००७ मध्ये झाले. २०११ मध्ये माझ्या पाठीच्या मणक्यात रॉड, स्क्रु आणि कनाल ब्लॉकेजचे ऑपरेशन करणे आवश्यक होते. पुणे, मुंबई, दिल्ली चे तज्ञ डॉक्टरांनी ऑपरेशन करण्यास नकार दिला. माझे नशिब चांगले कि सौ. समता हेमंतजी ललवाणी ह्या नाशिक मध्ये भेटल्या त्यांनी मला डॉ. चौधरी बद्दल सांगितले आणि माझ्या घरचे लोक डॉक्टरांना भेटले. डॉ. चौधरी यांनी पुणे येथे पाठवले. डॉक्टरांच्या प्रयत्नाने व आशीर्वादाने, औषधाने माझे ऑपरेशन सक्सेस झाले. कसलाही त्रास न होता, आता मला नेहमीप्रमाणे खाली वाकण्यास त्रास होत नाही. माझ्या बद्दल डॉक्टर चौधरी यांच्या मार्गदर्शनासाठी मला निलेश ललवाणी, हेमंत ललवाणी, तेजस जैन, समता ललवाणी हे खुपच सहकार्य करतात मी आणि माझ्या परिवाराचे सदस्य खूप-खूप आभारी आहेत.

मला डॉ. चौधरी यांनी जगायची उमीद दिली आहे. डॉक्टरांनी सांगितले कि कोमल नक्कीच चालणार व डॉ. माझ्यासाठी खुप प्रयत्न करत

आहेत. डॉक्टरांच्या आशिर्वादाने मी नक्कीच चालणार, मी बरी होणार मला चालत डॉ. च्या हॉस्पिटल मध्ये जायचे आहे. मला डॉक्टरांनी आशेचा किरण दिला आहे. माझा डॉक्टरांवर पुर्णपणे विश्वास आहे. मला ते बरेच करणार डॉ. चौधरीबद्दल खूप काही लिहावेसे वाटते पण शब्द अपुरे पडतात, पेनातली शाई संपेल पण माझे हात थांबणार नाही. मला माझ्या जीवनात खूप मोठे दैवत भेटले आहे.

Life is Best ! Not For Rest !! But For Test !!!

मी डॉ. च्या कॅबिन मध्ये गेले की मला वाटले मी स्वर्गात आहे. खरचं खुपच प्रसन्न वाटते. कॅबिन च्या बाहेर येण्याचे मनच नव्हते.
जिंदगी बहुत सुंदर है। झगडे क्यू, प्यार से रहो। मुस्कुराते रहो।

Every thing is OK

- कु. कोमल सुरेशजी बोरा
बीड

## बाबा जादुगर है

मेरे बाबा दुनीया के सब से अच्छे डॉक्टर है।
मेरे बाबा की दवाई मे जादु है।
मेरे बाबा मेरे लिये मेरे भगवान है।
मेरे पापा मेरे बाबा को डरते है।
मुझे खेलते खेलते चोट आती है तो मुझे सबसे पहले बाबा की हि याद आती है।
जब कोई नही आता मेरे बाबा आते है मेरे दुःख के दिनो मे वो बडे काम आते है।

- कु. श्रद्धा हेमंत ललवाणी
इ. ३ री, (जामनेर)

## चक्रव्युह भेदणारा अभिमन्यू

गुरूवर्य बाबा, जीवनात ब-याचवेळा वाचतांना, लिहितांना, बोलतांना व ऐकतांना 'परिसाच्या दृष्टांतांविषयी' माहिती होती. परंतु जेव्हा प्रत्यक्ष त्याची दिव्य अनुभूती अनुभवली तेव्हा आमच्या जीवनाचे सोने झाले.

वज्रा सारखे कठीण, मेणासारखे मऊ, चंद्रासारखे शीतल,
सूर्यासारखे प्रखर तेजस्वी, अमृतासारखे शब्द ओजस्वी.

ही खरी ओळख आहे आमच्या बाबांची या योगी मूर्तीशी आमचा परिचय झाला वर्ष २००३ मध्ये आणि परमेश्वराचे साक्षात खरेखुरे रूप आमच्या समोर होते. ते म्हणजे डॉ. सुनिलदत्त चौधरी की ज्यांना आम्ही प्रेमाने बाबा म्हणतो. बाबांचा वैद्यकिय व्यवसाय म्हणजे फक्त रूग्ण आणि डॉक्टर एवढच नात नव्हे तर, रूग्णांच्या पलीकडचे आप्त - स्वकिय आणि डॉक्टरच्या पलिकडचा देव माणूस या नात्याने बाबांनी आपल्या सेवेला जनसामान्यांपर्यंत पोहचविले. 'होमिओपॅथि औषधोपचार' ही त्यांची उपचार पद्धती त्यांचा आपल्या उपचार पद्धतीवर असलेला गाढा विश्वास व अपार श्रद्धा यामुळेच त्यांचा गुण रूग्णांना आजारपणातून बरा करायचा बाबांच्या उपचारामुळे ब-या होणा-या रूग्णांची संख्या भरपूर आहे. परंतु जेव्हा मला साक्षात याचा अनुभव आला तेव्हा जणू काही हा परमेश्वराचा साक्षात्कारच आहे याची प्रचिती मला आली. बाबांविषयी सांगावे तेवढे कमी आहे. परंतु जेव्हा जीवनात एखादा प्रसंग असा येतो की संपूर्ण जीवनच कुठेतरी नकोसे होते अशाही अवस्थेतून बाबांच्या दिव्य प्रकाशामुळे आमचे आयुष्य पुन्हा तेजोमय झाले. त्याविषयी मी सांगणार आहे.

"चारही बाजूंनी सामना होत होता दुखाःशी,
तेव्हा बाबांचाच आशीर्वाद होता आमच्या पाठीशी"

२० ऑक्टोबर २००९ ला माझा मुलगा उत्कर्ष हा एका मोटरसायकल अपघातात जखमी झाला. त्याला हात-पाय व डोक्याला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली. मेंदूला इजा झाल्याने तो बेशुद्ध पडला. आमच्या कानावर अपघाताची बातमी पडली आणि आयुष्य संपले असे वाटले. तेव्हा आम्ही पती-पत्नींच्या दोघींच्या तोंडून एकच शब्द निघाले बाबा आहे ना! ते सर्व ठीक करतील. बाबांवर असलेली अपार श्रद्धाच आम्हाला मुलाजवळ दवाखान्यापर्यंत घेऊन गेली. महाभारतातील अभिमन्यू प्रमाणे माझा मुलगा मृत्युशी एकाकी झुंजत होता. जामनेर-जळगाव व मुंबई मला त्याचा प्रवास ज्या ना त्या डॉक्टरांचा सल्ला घेतला परंतु कुणीही खात्रीने सांगत नव्हते. मुलगा कोमात, क्षण आणि क्षण जसा मृत्यू त्याच्या जवळ येत होता. आणि आम्ही व डॉक्टर सारे काही हतबल होऊन पाहत होतो.

दगडाच्या मूर्तीप्रमाणे आम्ही हालचाल करीत होतो. पोटच्या गोळयाला या अवस्थेत एका ठिकाणावरून दुस-या ठिकाणी उपचारसाठी नेत होतो आणि हे सर्व करीत असतांना बाबांच्या एका संदेशाची वाट पाहत होतो. कारण बाबा त्यावेळेस जळगावला उपस्थित नव्हते धारणीच्या शिबीरासाठी ते गेले होते. 'ना फोन, ना निरोप, ना संदेश' परंतु बाबांविषयी असलेली अपार श्रद्धा आम्हाला इथ पर्यंत सावरून होती. जळगावच्या डॉक्टरांनी मुंबईला तात्काळ नेण्याचा सल्ला दिला. परंतु उत्कर्षची तब्येत मालेगांवजवळ अत्यंत बिघडली अस वाटल... संपलसारं काही. तोंडांत फक्त एक नाव ते म्हणजे 'परमेश्वर स्वरूप बाबांच' आणि मग वाटतेच नाशिकला 'व्होकार्ट हॉस्पिटल' मध्ये तात्काळ थांबावे लागले. व्होकार्ट हॉस्पिटल मध्ये उत्कर्षवर मेंदूवरील शस्त्रक्रिया करून त्याला 'व्हेंटीलेटरवर' ठेवण्यात आले. डॉक्टरांनी ७२ तासांची मुदत दिली. आमचा बाबांचा धावा येथेही सुरू होताच. की एक तरी संदेश बाबा तुम्ही द्या. आम्ही समजायच ते समजून जावू. इथपर्यंत तुम्हीच पोहचवील आता येथूनही या दुखातून तुम्हीच आमची सुटका कराल! आणि 'याची देहा याची डोळा' याची साक्षात प्रचिती आली. बाबांचा संदेश आला सर्व ऐकल्यावर बाबांनी फक्त एवढच म्हटले.

चिंता करू नको, एवढया शुल्लक ऑपरेशनसाठी एवढी चिंता! उत्कर्षला काहीच होणार नाही आणि मनातील सर्व भीती क्षणात दूर झाली. बाबांनी उत्कर्षसाठी होमिओपॅथी औषधी पाठविली परंतु ही औषधी व्हेंटीलेटरवर असतांना देण्याची परवानगी नाशिकच्या डॉक्टरांनी नाकारली. आम्ही पुष्कळ प्रयत्न केले. डॉक्टरांना समजावून सांगितले शेवटी आमची बाबांवर असलेली श्रद्धा पाहून डॉक्टरांनी ती देण्याचे ठरविले. कारण आमच्यासाठी ती एक प्रकारची संजीवनी बुटीच होती. बाबांचा विश्वास होता. १५ दिवसात मुलगा ठीक होईल नाही तर माझ्या औषधीचा तो पराभव मी समजेल पण, बाबांच्या असामन्यपणाचे ते मूर्तीमंत उदाहरण उत्कर्षमध्ये सुधारणा झाली. बाबांच्या औषधीचा तो चमत्कार होता. उत्कर्षला जणू पुनर्जन्म बाबांमुळे मिळाला आमचा विश्वास कायम झाला. आज उत्कर्ष अगदी ठणठणीत व सुरक्षित आहे. शेवटी एवढच म्हणेल...

दिव्यत्वाची जेथे प्रचिती। तेथे माझे कर जुळती।।
जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्या गुरू केला जाण।
गुरूसी आले अपारपण। जग संपूर्ण गुरू दिसे।।

- सौ. समता हेमंतकुमार ललवाणी
जामनेर

## हार-तुरे, मान-सन्मान...










आपली हुशारी सजवून-चढवून-मढवून दिलेली वस्तु म्हणजे मोमेन्टो.

## बाबांमुळे माझे सर्वस्व अबाधीत

आदरणीय बाबा, सा. नमस्कार ! आपण विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याची व अभिप्राय देण्याची माझी लायकी नाही. पण तरी मन मानत नाही. म्हणून हा छोटासा क्षम्य असलेला गुन्हा.

बाबा, आपण एवढ्या वर्षात काय केलेत, यांची मोजदाद आम्ही काय करणार. आपण कधीही पैश्याला महत्व न देता ईश्वरीय कृपेने व ईश्वरीय देणगीरूपी होमिओपॅथी द्वारे रूग्णसेवा, समाज सेवा व असंख्य लोकांची असाध्य रोगांपासून सुटका केली व कुठलाही गाजावाजा, बडेजावपणा न करता अनेकांना जीवनदान दिलेले आहे. बाबा, आपले कार्य व सेवा एखाद्या हिमशिखरा प्रमाणे आहे. ज्याचे आमच्या सारख्यांना केवळ वरचे टोक दिसते. परंतु त्याच्या उंचीचा व क्षेत्राचा अंदाजही आम्ही लोक घेऊ शकत नाहीत. बाबा, केवळ आपणामुळेच माझे पितृछत्र आजही माझ्यावर अबाधीत आहे. माझा मुलगा ईशानही आपल्यामुळे ठणठणीत आहे. माझी मुलगी लक्ष्मी ही तर मी मानतो की आपण मला दिलेला प्रसाद आहे.

बाबा, आपल्या कार्याची, सेवांची व आमच्या सारख्यांना असंख्य वेळी आलेल्या अनुभवांची महती शब्दबद्ध करून येथे लिहिणे ह्या जन्मी तरी शक्य नाही. आपणाकडे येऊन जाणवते की मी अगदी योग्य ठिकाणी आलो आहे. फार झाले भटकून मनाला शांतता, स्थिरता लाभते. नवीन आशा पल्लवित होतात. नवीन मार्ग सुचतात. आपल्या दर्शनाने आपल्या सहवासात राहण्यासाठी मन सदैव आसुसलेले असते. बाबा, आपण माझ्यासाठी व माझ्या सारख्या अनेकांसाठी 'सर्वस्व' आहात. आपल्या बोललेल्याचा संदर्भ, अनुभव फार नंतर लागतात. तेव्हा आठवतात आपले बोल.

येथे लिहिणे थांबवावेसे वाटत नाही, शब्द सुचत नाही. अज्ञानामुळे नकळत काही चुकल्यास क्षमा असावी. बाबा आपली गुरूकृपा, मार्गदर्शन, मायेची छाया व आपल्या नजरेतून न सुटणाऱ्या गोष्टी व त्यापोटी मिळणारे खडतर बोल माझ्यासह परिवारावर कायम राहो. जेणेकरून मी वाट चुकणार नाही. आपले कार्य, सेवा अखंडपणे चालो हीच ईश्वर चरणी व आपल्या चरणी प्रार्थना.

- सदैव आपल्या सेवेत...
श्री. योगेश सुभाष बारी

## न समजूनही समजल्यासारखा...

१९८६ साल. मला वारंवार सर्दी होत असे. होमिओपॅथी नवीनच माहिती झाली होती. ॲलोपॅथीच्या Side effects ची भीती होतीच, आजही आहे. डॉ. सुनिलदत्त चौधरी हे नाव बऱ्याच जणांकडून समजल. पूर्ण बऱ्या केलेल्या केसेस ऐकायला मिळाल्या व प्रथमच होमिओपॅथीकडे पाऊल टाकलं. तरूण छोटा डॉ. नवीनच असलेला पण ख्याती लवकर पसरलेली. जिल्हापेठेतील छोटेखानी दवाखाना नंबर लावुन जावे लागते. उपचार सुरू केला. डॉ. लहान असून बोलणं एखाद्या पटाईत अनुभवी डॉ. सारखं. आत्मविश्वास, बिनधास्त, मोकळा ढाकळा, मस्त. डॉ. कडे पाहून औषधावर विश्वास वाटला व खरोखरच सर्दी पहाता पहाता गायब. आज २०/२५ वर्ष झाली. पण सर्दीने कधी तोंड ही दाखवलं नाही. व होमिओपॅथीची सोबत ही पक्की झाली.

ह्यांना व भाईला ही मूळव्याध होता. डॉ. चा प्रश्न 'मिरच्या केव्हा खाणार', चेष्टा करताहेत डॉ., असवं वाटल पण खरच होतं. आज तागायत मूळव्याधीने कधी डोक वर काढलं नाही. बदल्या होत गेल्या पण साबुदाण्याच्या गोळ्यांनी साथ सोडली नाही.

२००३ ला पुन्हा जळगावी आलो एखाद्या देवस्थाना इतकी श्रध्दा या डॉक्टरवर असल्यामुळे भेटीला गेलो. तोच दुकान वजा दवाखाना. बदल अपेक्षित होता. पण बंगल्याच्या Out House मधील २ खोल्यांच तेच दुकान. फक्त अधिक गजबजलेल, गर्दीनं भरलेलं. धों-धों प्रॅक्टीस असूनही हा दवाखाना का सुधरवत नाही? डॉ. मध्ये कणभरही फरक नाही. आता विचार Fast येऊ लागले. हा डॉ. सामान्य माणूस नसल्याच्या अनेक खुणा त्याच्या अंगाखांद्यावर, आसपास अभिमानाने मिरवित होत्या. दाढीवाले हे 'बाबा' मस्करी, फजिती, चेष्टा, मिष्किलपणा, विक्षिप्तपणा करीत प्रॅक्टीस करत असतात. प्रत्येकाची कुंडली पाठ! अचाट स्मरण! सगळ्या लेकी, सुना, नाहीतर आया असतात. तोच जिव्हाळा तीच खबरदार वृत्ती.

दवाखान्याच्या दारात ५/२५ माणसं उभी राहुन-राहुन थकलेली, बसलेली, उभी, काही वाहनावर विसावलेली. गप्पा ही संपत चालल्यामुळे उगिचच् आल्या-गेल्याला निरखत बसलेली. दारातून आत आल्याबरोबर उजव्या हाताला चपलांचा खच्. जागा मिळेल तसे चार एक बाक टाकलेले त्यावर सर्कशीत बसवित तशी कसरती करत एकमेकांना खेटुन बसलेली माणसं. पाण्याचा फिल्टर उजव्या हातास. वेळ घालविण्यासाठी म्हणून देखील लोकं पाणी पीत रहातात. कदाचित पाणी-थेरपी असावी डॉक्टरांची. खेटरांसोबत पुस्तकं, मासिक यांचा ढिग. कचऱ्यातून पिशव्या शोधाव्या तशी मासिके शोधणारे Patient हवं ते वाङ्मय मिळवा.

माणसं इतका वेळ थांबतात कां? या बाबाने माणसांना Hypnotize केलयं की काय? समोरील भिंतीवर मिरच्या लिंबू असेलेली एक काळी बाहुली टांगलेली. हा काय प्रकार कशासाठी? डॉ. असून अंधःश्रध्दा? वर उंचावर पुसतकांच Shelf, हातही लावता येणार नाही. अध्यात्मिक + अभ्यासाची. होमिओपॅथीमधे अध्यात्मिक पण base लागत असावा कां? उजव्या भिंतीवर नाना सूचनांचे फलक त्यात लक्ष वेधून घेणारं काय

असेल, तर संपूर्ण वर्षाच Time Table वर्षभर पुढे? इतकं आखिव? इतका विश्वास? की व्यवहार?

चिंचोळ्या डाव्या भिंतीवर चांदीच शिल्ड अवघडल्यासारखं, धुपाच्या वासात सारं वातावरण बांधल्यासारख. कुणाकुणाचे सद्‌विचार, शुभेच्छा सदिच्छा वाचता वाचता रटाळ होउं लागतात. ढीगभर सर्टीफिकेटस्, मोमेंटोज, डॉक्टरांचं कर्तृत्व दाखवत भिंतीवर बसवलेली. हिंदी-मराठी भाईभाई नांव नोंदवून घेणारी स्त्री पोस्टमनच्या वृतीशी एकरूप! निर्लेपपणे औषधं वाटप करण्यात व्यस्त. नंबराच्या आशेने प्रत्येकजण तीच्याकडे लक्ष देऊन. नंबर आला रे आला की, गुहेत आत शिरायची घाई. दरवाजा बंद होतो. तो बाहेरच्या लोकांचं कुतुहल जागं करण्यासाठी.

आत Deam lights; पेशंटने झपाटल्याप्रमाणे एक एक न्याहाळाव. ८x१० च्या भिंतीवर आखलं अध्यात्म. वारीतील डॉ. चा फोटो. एक Black & White फोटो वाढीतील, कुणाचा असावा? डॉ. तर नाहीत? पुण्याच्या शंकर महाराजांचा कडक पहारा देणारा फोटो डाव्या बाजूला जुन्या कपडयात लाकडी काष्ठ त्यावर कमल बीज माळ? बरेच फोटो सरसरत जातात. डॉ.च्या उजव्या हाताला स्वामी समर्थांचा फोटो. डॉ. वर लक्ष ठेवायला बसल्यासारखे. डॉक्टरचं हे सार प्रदर्शन कशा करिता? स्वतःच्या प्राप्तीमागे जरूर एखादा मार्ग असावा पण हे सार काय? मागच्या भिंतीवर दगडातील स्त्री देवतेच कॅलेंडर छान आहे. पण सोबत स्वामी कोण? व तो लहान मुलाचा फोटो त्यांच्या मुलाचाच असावा. वैयक्तिक आयुष्यातील इतकाच पुरावा. बाकी सार गुढ !...

डॉक्टरांचे रूंद भरीव डोळे विवेकानंदांसारखे. हसतात इतके लहान बालकासारखे आणि दात तंबाखूने काळे पडलेले! दाढी वाढलेली, स्वभावासारखा चेहरा ही बोलका. चैतन्य असलेला. कपाळ मुळातच भव्य त्यात वर चढत चाललेल. नशिब! या बाबाने कपाळावर गंध, कानात बाळ्या आणि गळ्यात रूद्राक्ष माळा घातलेली नाही. पुढे ह्यांचा आयुष्याचा प्रवास कसा असणार आहे? विरक्ती, संन्यास की, काही निराळ? हातातील पेन तर्जनी न चिकटवता लिहीण्याची सवय! पेशंटला त्याच्याच भाषेत त्याच्याच पद्धतीने विचारपूस करण्याची हौस! पण ही विचारपूस हा भाग गाभ्या सारखा! माहेरी जाऊन आपल्या वडिल, भाऊ, भाचा यांना भेटावं असं अप्रुप प्रत्येकिला! वाट बघून कंटाळलेला पेशंट हुरूप घेउनच बाहेर यायला पाहिजे.

एक अनाकलनीय व्यक्तिमत्व! कुतुहल जाग करणार! या अवलियाची जीवन-धारा समजुन घ्यावी असं प्रत्येकाला कधीना कधी वाटलेलचं. डॉ. असल्यामुळे परिणामांचा विचार करूनच आपला मार्ग निवडलेला असणार, निश्चितच! पण या वल्ली विषयी इतकं कुतुहल का जाणवावं? एकीकडे International level वर भारताच प्रतिनिधित्व करणारा तर दुसरीकडे खेड्याची नाळ जपणारा. जळगावात हाताच्या बोटावर मोजावेत इतके स्वच्छ लोक मिळतील, त्यातीलच हा असावा? १९८६ ते २०१२ जसा पाहिला आहे तसाच हा माणूस.

- नयना पाटकर

## बाबांसारखे गुरू म्हणजे परम भाग्याचा योग

भौतिक कलेच्या ज्ञानाचे संस्कार आत्म्यावर होत नाही
बरे-वाईट कर्म मात्र जन्मोजन्मी पाठ सोडत नाही
ज्याने साठवले तो फे-यातुन सुटत नाही
परोपकारात लुटवणारा मात्र कुठेच अटकत नाही
जे लुटवायच असत तेच आम्ही साठवतो,
जे नेमक साठवायच असत, तेथे सुरूवात पण होत नाही..,
कळत बरच.., पण, काही फायदा नाही..,
प्रत्येक विचाराने फक्त गोंधळातच भर पडते..,
जो पर्यंत कळते.., तो पर्यंत आयुष्य संपलेले असते..,
स्वतःच आयुष्य आपण स्वतःसाठीच जगत नाही...,
इतरांचा विचार करता गणित काही जुळत नाही..,
जेथे बेरीज करायची असते तेथेच नेमकी वजाबाकी होते..,
प्रत्येक पावलावर चुका होतात.., उत्तर काही मिळत नाही..,
जे सुख समझतो.., तेथेच नेमकी दुःखाची सुरूवात असते..,
व जेथे दुःख समझुन पाठ फिरवतो..., तेथेच खरे सुख दडलेले असते..,
खोटया प्रतिष्ठे करता ख-या शांतीचा बळी देतो..,
प्रतिष्ठा फक्त भ्रम आहे.., ते मात्र कळत नाही..,
जगाला मुर्ख बनवणारे., स्वतःच मुर्ख झालेले असतात..,
स्वतःला हुशार म्हणवणारे थप्पीला लागलेले असतात..,
आयुष्याची गणितं त्यांनाच सुटतात.., ज्यांना गुरू भेटलेले असतात.,
त्यांचीच  उत्तर एका ओळीत सुटलेली असतात..,
म्हणुनच गुरूशिवाय जिवन हे व्यर्थ आहे..,
समर्पणा शिवाय जगण्याला तरी काय अर्थ आहे..?

- धर्मरक्षक

## एक अनोखा व्यक्तिमत्त्व

डॉक्टर नाम सुनते ही आज लोगों के मन में एक अलगही भावना उभर कर आती है। जैसे, जो रुबाब में बोलता है, सेवा के नाम पर लोगों की जेब खाली कराने में दक्ष और पैसा ही जिसका एकमात्र लक्ष्य होता है। अपने स्वार्थ की पूर्ती के लिए मरीज को सही सलाह नहीं देना और दवा बदलकर मरीज को प्रयोगशाला बनाकर रखता है।

लेकिन लोगों की इन मनोभावनाओं को असत्य सिद्ध करनेवाले चन्द डॉक्टरों मे एक नाम है डॉ. सुनिलदत्त चौधरीजी का। जिन्हें हम लोग आदर से बाबा कहते हैं। मै और मेरा परिवार वर्षों से आपके पेशन्ट हैं। आपके हाथ में मानो कोई जादू है, जिस बिमारी का इलाज करना आपने स्वीकार कर लिया, उसे कुछ दिनों में दूर कर मरीज को स्वस्थ बना देते हैं। यदि आपको लगता है कि पेशन्ट को दवा की आवश्यकता नहीं है तो उसे सही सलाह देकर भेज देते है, जो बहुत मुश्किल है। अपने स्वार्थ के लिए पेशन्ट को गुमराह करना आपके स्वभाव में ही नहीं है। सेवाभावना तो आपमें कूट-कूटकर भरी है। कई संत-सतियों ने आपकेद्वारा स्वास्थ लाभ प्राप्त किया है। आप एक मिलनसार, दयालु, स्पष्टवक्ता, सेवाभावी के रूप में विख्यात हैं। आपके मितभाषी स्वभाव के कारण कई लोग कहते है कि बाबा बहुत कम बोलते हैं। लेकिन हमें तो लगता है कि बाबा आप बहुत बोलते हो। आप शब्दों से नहीं, अपने सत्कार्यों से बोलते हो। जिन्हें हम अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, मन्दिर निर्माण आदि कई कार्यों के माध्यम से सुनते हैं।

गत २५ वर्षोंसे आप जलगाँव में सेवारत हैं, यह हम जलगाँववासियोंका सौभाग्य है। आपके यहा निरन्तर बढ रही मरीजोंकी संख्या देखकर हम अंदाजा लगा सकते हैं कि यह अभिवृद्धि आपके प्रेमपूर्ण व्यवहार, सही मार्गदर्शन और उचित दवाका ही परिणाम है। बाबा, आप हमारे लिए सिर्फ डॉक्टर ही नहीं साक्षात भगवान का अवतार हो। आपकेद्वारा इसी प्रकार अनेकानेक लोगों को स्वास्थ्य लाभ प्राप्त होता रहें और आपको सुदीर्घ आयु प्राप्त हो, यही शुभकामना!...

- सौ. ममता पगारिया, निलेश पगारिया

# अंधःकार घालविणारे गुरू - 'बाबा'

गु - अंधःकार... रू - घालविणारा...! बाबा! नाही, मित्र!, बंधु!, वडील!, गुरू!, आई!, कि आणिक काही!

अशा अनेक रूपात त्यांना मी अनुभवले आहे. अनेक नाना त-हेचे मार्गदर्शन त्यांनी केले. १९९२ मध्ये सर्व प्रथम निलेश ललवाणी यांच्या सोबत मी दवाखान्यात गेलो. प्रथम ओळख झाली. आज मी कुठल्या आजाराच्या कारणाने त्यांच्या कडे गेलो होतो ते विसरलो आहे.

१९९५ साली माझ्या आणि मोठया भावामध्ये काही कारणांनी भांडण झाले. एकल व्यवसाय आहे. भांडण विकोपाला गेले. मी जळगाव सोडण्याचे ठरवले. निलेशला भेटलो. सर्व ठरले की जळगावात आता आपल्याला नाही रहायचे. निलेश यांनी सांगितले आपण बाबांना भेटु आणि निर्णय घेऊ. संध्याकाळी दवाखान्यात गेलो. त्यानी सर्व माझे म्हणणे ऐकुन घेतले आणि मला सांगितले, माझे ऐकशील, मी हो म्हणालो उद्या पासुन एक शब्द न बोलता पुन्हा दुकानात जायचे, पुढे काय ते मी बघेल. आणि पुढील तीन वर्षात माझे पुर्ण जिल्हाभर नाव झाले. पुढे दुस-या राज्यात सुद्धा नाव झाले. मोठ्या भावाने दुकानाची चाबी हातात दिली. यापुढे तु संपुर्ण व्यवहार बघ म्हणुन सांगितले. त्यांच्या कृपा आशिर्वाद व मार्गदर्शन यामुळे हे साध्य झाले.

मोठी बहीणीच्या लग्नाची जबाबदारी माझ्यावर होती. पायाने ती अधू होती, तीच्यासाठी मुलगा बघण्यासाठी आम्ही खुप भटकलो, परंतु कुठेही लग्न जमेना. शेवटी बाबाकडे गेलो, त्यांनी मला सांगितले. ते आजच्या भाषेत असे की, 'खडेवाले बाबांना शरण जा, ते, जे देतील ते त्या पद्धतीने धारण करा, अनं काय चमत्कार! आश्चर्य म्हणजे पुढच्या गुरूवारी बहीणीचे लग्न ठरले.

माझी पत्नी गर्भवती असतांना तिला कावीळ झाला. ती खुपच अशक्त झाली. फक्त बाबाचे औषध चालु होते. एक आठवडा पुर्ण झाला होता तरी बरे वाटत नव्हते. घरी आई, घरची मंडळी सारखी आग्रह करत होती कि तिला ॲडमीट कर. पहायला येणरे नातेवाईक सुद्धा नाना प्रकारचे सल्ले देत होते. त्या दिवशी शुक्रवार होता यापुर्वी सकाळ सध्यांकाळ बाबांना रिपोर्ट करत होतो. दोन दिवस पुढे दवाखाना बंद रहाणार होता बाबाची भेट होणार नाही. पोटात गोळा उठला, काय करावे सुचेना. मनात ॲलोपॅथी नाही दयायचे ठरवले होते. बाबांना काही बोलण्याची हिंम्मत होत नव्हती, आत गेलो रडु कोसळले, बाबांनी तीन डोस दिले (आपल्या कडे लॉजींग बोर्डींग नाही) म्हणजे विनाकारण ॲडमिट करण्याची व्यवस्था नाही. अर्ध्या-अर्ध्या तासाने रात्री तीला डोस देवुन झोपलो. मागील पाच दिवसा पासुन तिच्या पोटात अन्न नव्हते, काही खाल्ले तरी वांती होत होती.

आश्चर्य म्हणजे सकाळी ती चक्क उठुन बसली आणि म्हणते आहो मला भुक लागली आहे खायला द्या. डोस देताना बाबाचे वाक्य.... तिच्या गळ्यात पाटी लाव! "मेली तर सुनिलदत्त चौधरीच्या दारात हिला ठेवणे" बाबांनी निरोप ठेवायला सांगितले होते निरोप ठेवला, पुढचे वाक्य.... मध्या साबुदाणे मे दम है ना!

२००६ मध्ये मला घर घ्यायचे होते, पैसे जेमतेम होते, एक घर बघुन आलो आवडले होते किंमत जास्त होती, माझ्या जवळ होते त्या पैशाच्या दुप्पट. बाबांना विषय सांगितला त्यांनी हिंमत दिली, घेवुन टाक! बाबा, पैसे कमी आहेत, होईल तु घे. आणि पुढील पैश्याची व्यवस्था कशी झाली हे आजपर्यंत मला कळले नाही.

२००९ मध्ये माझ्या जिवावर आणि परिवारावर फारच बिकट प्रसंग आला माझी मोठी रक्कम एका मायेफीरू व्यापारी माणसाने देण्याचे नाकारले, रक्कम इतकी मोठी होती की, मला माझे घरदार दुकान विकुन सुद्धा फेडता आली नसती. आपण देशो धडीला लागणार हे दिसत होते, दुपारी ही घटना झालेली, दवाखाना बंद, पाठीशी सर्व मित्र मंडळी होती, राजेंद्र शेठ लुंकड, निलेश ललवाणी, मिनेश शाहा, धर्मेंद्र जैन सर्व सध्यांकाळची वाट पाहत होते सर्वांनी आपल्या आपल्या त-हेने मदत करण्याचा प्रयत्न केला. संध्याकाळी दवाखान्यात गेलो, बाबांना हकीकत सांगितली बाबांनी सांगितले प्रयत्न करा, आपली रक्कम परत मिळेल. मनातले नाना त-हेचे आलेले विचार क्षणात संपले मनाला धिर आला दोन दिवसात सर्व रक्कम परत मिळाली. त्या दिवशी माझ्या घटने मुळे बाबांनी दवाखाना सुद्धा लवकर बंद केला. प्रत्येक तासाला त्यानी झालेल्या प्रकाराची माहिती घेतली, जणु बाबांच अजय शेठ ललवाणींच्या रुपात हा गुंता सोडवीत होते.

अश्या ब-याच घटना मध्ये एक परिवाराचा सदस्य म्हणुनच मला त्यांनी ठेवले. काही गोष्टी बद्दल तर त्यांनी मला ब-याच वर्षा अगोदर सांगितले होते की, हे असे घडेल आणि मी असा एक नाही शेकडो लोक आहेत त्यांनी हा अनुभव घेतला आहे.

बाबांच्या सहवासात राहुन आरोग्यचं नाही आचार, विचार, सुध्दा सुधारले व आयुष्याच माझे बदलले.

स्मरणीकेत माझा लेख हेच माझ्यासाठी अमूल्य आहे. जिथे आजपर्यंतच्या आयुष्यात बाबा फक्त देतच आलेले आहे. त्यांना घेणे माहितच नाही ह्या जन्मात मी अबोली परीवाराचा आहे आणि त्याच्या सारखी व्यक्ती माझ्या जीवनात आहे की ज्यांना मी कुठल्याही नात्यात अथवा अवतारात बांधु शकतचं नाही! माझे परम आराध्य ईश्वरकृपा प्राप्त्, परम पुज्य, गुरूरूप, मातृस्वरूपी....

'बाबा' यांच्या पदकमली

- हॅरी गुरूजी, पापखुची महाप्रभु

## अंतर्यामी परोपकारी बाबा

ज्या वेळेस लवकर येतो
तेव्हा गर्दी असते, नंबर उशिरा लागतो
जेव्हा यायला उशिरा होतो
तेव्हा नेमका दवाखाना बंद झालेला असतो
जेव्हा मला घाई असते
तेव्हा नेमक सर्वात शेवटी बोलावतात
नाही तेव्हा ध्यानीमनी नसताना
घरी औषध येतात...
दवाखाना बंद पाहुनच जणु...
घरात आजार येतात...
अपघाता शिवाय कोणतीच emergeney नसते.
तरी हे तुम्ही दरवेळेस सांगत असतात.
केव्हा केव्हा निष्काळजीपणा आम्हास भोवतो
सांभाळुन घ्यायला तुम्ही समर्थ असतात.
आमचे त्रास आम्ही विसरतो..,
तुमच्या मात्र, ती लक्षात असतात..,
जशी 'हरि' ची ईच्छा म्हणताना
हरि ची इच्छाच तुम्ही जगत असतात

तुमची इच्छा असुन सुद्धा
अनेक मार्ग आम्ही शोधलेली असतात.
म्हने कई समझे...? में कई मङ्ग हुँ..?
म्हणताना व्यवहार तुम्हीच पाळत असतात.
मङ्ग असुन ., स्वार्थ सोडुन.,
बाकी व्यवहार आम्हास समजत नसतात.
'में भी जैन बनग्या' म्हणतांना
जैन धर्माचा सार तुम्ही आत्मसात केलेला असतो.
संपुर्ण आयुष्यभर जैन म्हणवुन घेणाऱ्या आम्हास
जैन धर्माचा गंध सुद्धा शिवलेला नसतो.
सर्व प्रश्नांची उत्तर मिळालेली असतात
जेव्हा तुम्ही सोबत असतात.
इतर वेळेस मात्र डोक्यावर
प्रश्नांचीच बोचकी असतात.
चुकांवर चुका केल्या तरी शेवटी
तुम्हीच सांभाळुन घेत असतात.
मुल जरी आमची असली...,
मायेच पांघरूण तुम्हींच घालत असतात.

आमच्या भल्या करता; आमच्या मनाविरूद्ध निर्णय घेतांना
तुमच्या डोळ्यातुन अश्रु ओघंळत असतात.
प्रत्येक मनात उठणारा भावनांचा कल्लोळ
तुम्हीच समजुन घेत असतात.
'बाबा मात ग्यों'! असे सांगताना
पुढचा विचार तुम्हीच करत असतात.
आजचा विचार पण पुर्ण करू न शकणाऱ्या
आमच्या सारख्यांचे भविष्य तुम्हीच सावरत असतात.
प्रत्येक प्रश्नांची उकल करतांना, प्रत्येक निर्णयाची
शास्त्रीय बैठक तुम्हीच उकलुन दाखवत असतात.
Intention Must be fair जगण्याचे तत्व
प्रत्येक प्रसंगी तुम्हीच अधोरेखीत करत असतात.
आमचा मुर्खपणा दाखवताना सुद्धा
'बाबा वेडा आहे'! असे तुम्ही म्हणत असतात...!
प्रत्येकाशी नाते जोडुन जगुन दाखवताना
'माझे कुठे रक्ताचे नाते आहे' असे म्हणत असतात.
जणु प्रत्येक प्रसंगी तुम्ही आम्हास..,
नाते कसे जगावे? हेच दाखवत असतात.

कोणाचा ताप., तुम्हाला मनस्ताप..,
नसती उठाठेव अंगावर घेत असतात.
बरीच प्रश्न भेडसावतात.., वाटत काहीवेळा
तुम्ही पण चुकत असतात..,
नव्हे.., मनुष्य जन्माच्या वेदनाच जणु
तुम्ही सहन करीत असतात.
तुमच्या क्षमतेचा शोध केव्हाच थांबला आहे
आमच्या पात्रतेचा शोध आता सुरू झाला आहे.
तुमच्या वागण्या-बोलण्याचा अर्थ ब-याच वेळा लागत नाही...
कितीपण डोकं खाजवलं तरी प्रकाश काही पडत नाही...
नाही तिथे तर्क लावतो.., हाथी काही लागत नाही..,
बजरंगा सारखी भक्ती असावी समजुन उमजत नाही..,
कर्माचे फेरे देवा, अजुन कसे संपत नाही
माहीती बरीच गोळा केली, ज्ञानाचा दिवा काही पेटत नाही.,
'बाबा म्हारे पाछळ छे' ही वृत्ती दृढ झाली
कळत नकळत बेफिक्री रूढ झाली

पुर्नजन्मापासुन मुक्ती देऊ शकणारा सोबत असताना
निरर्थक प्रश्न रवंथ करत मस्तीची अती झाली.
उंबरावरचे किडे-मकोडे उंबरी करती लिला...,
शब्दश खरी ठरली..,
म्हणुन....
आर्जव करतो देवा.., आता तरी विचार करावा
सुख-दुखाच्या पुढे ठेवा.., जगण्याला अर्थ हवा
लोभ-माया-पापा पासुन वाचवा,
श्रध्दा, भक्ती, त्यागाचा ठेवा द्यावा.,
तुमच्या चरणी अर्पितो देवा
जन्मा हा सार्थकी व्हावा...

- न्हानकडो

## स्वर्ग नको, स्वर्ग बनवायचं कर्तृत्व द्या

गुंते सोडवा, पण गुंतु नका
नियम बनवा, पण नियमाच्या आधिन राहु नका.,
प्राप्य असा, विशिष्ट इमेज बनवु नका
विशाल कर्तुत्व तुमचे., चौकटीत राहु नका
भावना समझा भावनेच्या आहारी जाऊ नका.
तुम्ही जरी देव आमुचे, मनुष्यत्व सोडु नका
तुमचा मार्ग जरी खरा असला तरी,
अनेकांत वाद नजरे आड करू नका
अवताररूपी कार्य तुमचे
इतरांशी तुलना करू नका
साधेपणाने जीवन जगतात, हा मोठेपणा,
पण मोठ्यांच्या वेदना सुद्धा मोठया असतात ते विसरू नका
मानवतेला आदर्श देण्यासाठीच जन्म तुमचा
लहान - सहाण गोष्टीत स्वतःला गुंतवु नका

इकडच्या-तिकडच्या गोष्टी करणा-यांकडे
दुर्लक्ष करा, त्यांच्या बोलण्यात येऊ नका
आदेश झेलायला सज्ज नजरा
त्यांना दुर्लक्षीत करू नका...
आजारी त्रस्त जन-जन
दार लवकर बंद करू नका
वेदना गरीबांना पण असतात
आता फी वाढवू नका
विधी लिखीत भुमिका पार पाडाव्या लागतात.
कर्मांचे भोग भोगावे लागतात
त्याला छेद देणारी भुमिका घेऊ नका,
सुख-दुखाच्या पुढे स्थित प्रज्ञ व्हा
कर्मकांडाच्या आहारी जाऊ नका
तुमची तग-तग पाहवत नाही
मनाला त्रास करून घेऊ नका

तुम्हीच माऊली, गुरू आमुचे
मार्ग दाखवा, अंधारात ठेऊ नका
भरपूर लाड केले आमचे
आता आणखीन माजवु नका
आयुष्य नको, जगण्याचा मंत्र द्या,
लाचारी नको, लढण्याची हिम्मत द्या
मागण्याची नाही सोडण्याची वृत्ती द्या,
स्वर्ग नको, स्वर्ग बनवायच कर्तुत्व द्या,
द्यायचीच असेल तर देवा
तुमच्या चरणी जागा द्या
आता waiting list वर ठेऊ नका
उपदेश नाही, शबरीची उष्टी बोर देवा
गोड माना, गैरसमज करून घेऊ नका

- भगवान ट्रिपल टेन्शन लालजी

## BABA- The most respectful person on the earth

"Leaders who win the respect of others are the ones who deliver more than they promise". One such personality is our baba Dr. Sunildatta Choudhary. I have seen the only giving person to everyone who comes in contact with him. While doing this he never keeps his hand back. either it may be advice, medicine, happiness, guideline, help and many more. He does not have any personal interest in doing so. His first motive is betterment of others. No one returns empty handed from his door. I havn't seen such a personality in my life. Such people are born very rare.

During these years our faith, respect & honor towards him has reached the peak. Many a times than after that we are privileged being one of his large family the most important point I would like to mention here is because of him we all are united and will always be He gives his valuable time for us and spends hours on thinking on it which makes him More Respectful More admirable More honorable person on the earth...

- Mrs. Shilpa Vadnerkar

"गै-हच मातेल
काम आहे अठी..."

"हुंडा घ्यायला नाही म्हणतो
मंग त्या पोरात खोट अशीन..."

**शि**वराम - शालू चं शेंबडं, रडकं पिरपिरत डॉक्टर झालं,

M.S. करायला जळगांव सोडलं, L.C.E.H. करून परत आलं.

"पोरं नाही
त्याहीले अजून..."

"मांडवात तिच्याकडून
पुजा करायची नाही,
तिले कुठे पोरं झाले ?"

कृपा डॉ. उदय चिंतामण कुलकर्णी यांची,

टोच्या होण्याऐवजी होमिओपॅथिक तज्ञ म्हणून कामास लागलं.

कारे शिवराम ? तुझ्या पोराला अक्कल नाही, तुला पण कयत नाही ?

साबुदाणा खाईसन कोणी बरे होते ?

सुनिल मूर्ख आहेस तू , होमिओपॅथिक प्रॅक्टीस सुरू करून तू,

तुझेही आयुष्य वाया घालवले व माझ्या एकुलत्या एक मुलाला

पण त्याच रस्त्याने जायला सांगून

त्याचे पण आयुष्य बिघडविले.

"बामणाची आहे व
माय ती..."

## गेल्या २५ - ३० वर्षाच्या प्रतिक्रिया...

"निपुत्रिक आहे बरं तो..."

"तिच्या हातचं
आपल्या पोरांना देऊ नये,
लगेच मुलं आजारी पडतात..."

"फॉरेन रिटर्न डॉक्टर
हाताने दवाखाना झाडतो व पुसतो,
कंझर दिसता ते,
पोर द्यायची नाही रे भो तठे..."

दोनच प्रतिक्रिया टोच्याच्या मुलाने मार्ग बदलल्याच्या...

स्तब्ध झालो, अबोल झालो पण नव्या उमेदीने कार्यान्वित राहिलो.

ज्याला जे गवसले, ज्याला जे उमजले.

माय - बापाची पुण्याई कामा आली,
गुरुजनांचे मार्गदर्शन फळाला आले.
कर्तव्यपूर्ती मधून स्वकर्तृत्वाने भरारी घेतली,
होमिओपॅथी "acceptable" झाली.

जे आले ते स्विकारले,
कर्ज घेऊन परतही दिले.
संसारासाठी काही न उरले,
तो सोडला हरी वरती.

श्री दत्त कृपेने हरी भेटला,
"जितना दम है उतना लुटा ले,
भूलना मत बाप तेरा सावकार है।"
हे सांगता गायब झाला.

फाटकं लेवून लूटत राहिलो,
बायको झाली लंकेची पार्वती,
तक्रार नसे आमची कुणासाठी.

एक दिवस त्या हरीस पुसले ?
कारे बाबा, माझ्यासाठी काय ?
लबाड हसून तो काळ्या म्हणतो
मी आहे ना, पितांबर नेसून विटेवरी !

वेध लागती निवृत्तीचे,
कदाचित सुवर्ण महोत्सव आपणांसाठी नसावा.
हात जोडूनी विनवितो आपणां,
असा आदर्श आपणां नसावा.

Because, as Raju said...
"Production defects are rare."



सुनिलदत्त शिवराम चौधरी (नेहते)
पाडळसेकर





बाबांचीये द्वारी, सत्वर उपचारी.

# सानुरोध धन्यवाद


दुसऱ्या आवृत्ती निमित्त .... ६
अजय ललवाणी ............ ८
जवानसिंग राजपूत .......... १०
निधी दारुवाले ............... १०
सौ. ज्योती शिंपी ........... ११
डॉ. भरत बंब ............... ११
डॉ. महेश बोरा ............. १२
महेंद्र बंब, पुणे .............. १३
राजेश ललवाणी ............ १५
सौ. हर्षदा कुलकर्णी ........ १७
सौ. स्मिता चौधरी ......... १८
सौ. शोभा शिंदे ............. २०
स्नेहल देसाई ................ २१
पाटणकर परिवार .......... २१
अमेरीकन लॉली ............ २२
सुनिल गुजराथी ............ २४
भूषण सुरवाडे ............... २७
सुरेंद्र गुजराथी .............. २८
कैलास अग्रवाल ............ ३०
जीतू कुकरेजा ............... ३१
हेमंत ललवाणी ............. ३२
सतीष चौधरी ............... ३४
आशा सुदीप मुथा .......... ३७
बाबा दिक्षीत ................ ३८
नरेंद्र पानवाले ............... ३९
जयंत नेवे ................... ४०
सौ. संगीता ललवाणी ...... ४२
अखिल अग्रवाल ............ ४५
सौ. नीला देसाई ............ ४६
आईसाहेब, मुंबई ........... ४८
सौ. पुजा बंगाळे, लंडन..... ५१
निलेश ललवाणी ........... ५२
डॉ. अरुण ओझा ........... ५४
पद्मा कुकरेजा ............. ५५
विसराणी परिवार .......... ५७
बाजी दारुवाले, मुंबई ...... ५८
अश्विनी सुरवाडे ........... ५९
दीपक संघवी ................ ५९
सौ. मानसी शाह ........... ६१
सौ. संतोष अग्रवाल ........ ६२
मधुसुदन वडनेरकर ........ ६२
सुरेश निकम ................ ६३
सौ. पुनम चौधरी ........... ६४
रोशन पगारिया ............. ६४
शिल्पा पगारिया ............ ६६
र. भि. बडगुजर ............ ६७
प्रकाश राजपूत ............. ६९
राजेंद्र वर्मा .................. ७०
कमलाकर ..................... ७१
सौ. उज्वला भामरे ......... ७२
सौ. सुषमा महाजन ........ ७५
अंजली पंजाबी .............. ७६
प्रकाश किरण .............. ७७
मयुर सोनवणे .............. ७८
गणेश बारी .................. ८०
आर्कि. नवीन जांगिड ...... ८३
सौ. वैशाली बांगड ......... ८३
सुनिल न्याती ............... ८४
सुभाष बारी ................. ८५
मनोहर बारी ................ ८६
सौ. वंदना गुजराथी ........ ८८
श्रीश्रीश्री कांडेश्वरजी ....... ९१
डॉ. महेंद्र बागुल ............ ९४
डॉ. अनिल गांधी ........... ९९
अपर्णा श्रॉफ, पुणे ......... १०१
सौ. अनुराधा कुलकर्णी .... १०३
श्रीमती कृष्णा बागड ....... १०५
कु. दिपाली पाटील ........ १०६
सौ. सिताबाई शर्मा ......... १०६
डॉ.सौ. छाया देहाडराय ..... १०७
गोविंदराव देशमुख ......... १०९
दिलीप चौधरी .............. ११०
बबीता ...................... ११२
सौ. कुसुम लुंकड ........... ११७
सौ. लता लुंकड ............ ११७

## सानुरोध धन्यवाद


डॉ. युवराज सुरवाडे.........११८
सुनिल बारी .................. ११९
स्नेहा देशमुख ............... १२०
शंकर पिंगळे ................. १२१
सौ. उज्वला भामरे ......... १२२
दमयंती जैन .................. १२२
सौ. सुरेखा सोमाणी ........ १२३
प्रविण पाटील ................ १२५
डॉ. सुयोग सोमाणी ........ १२६
सौ. माधवी आसावा ....... १२७
निलेश बारी .................. १२८
सौ. ममता खोना ........... १३०
ध. र. सरदार ५०१ ........ १३३
नरेश पाटील ................. १३५
सौ. मीना सैंदाणे ........... १३६
सौ. सुवर्णा बेडेकर ......... १३७
विद्यार्थी - अबोली .......... १३७
श्री. ओंकार पोतदार ....... १३८
श्री. हुकुमीचंदजी लुंकड ... १३९
डॉ. जे. एम. पाटील ....... १३९
दलुभाऊ जैन ............... १४०
भास्कर पाटील ............. १४२
सिध्दी ..................... १४५
अर्चना अद्रावलकर ........ १४५
डॉ. उदय कुलकर्णी, पुणे ... १४६
रेणू प्रसाद पांडे ............ १४७
लोकेश लुंकड ................ १४८
विश्वास लुंकड .............. १४८
गुरमितसिंग ग्रोवर .......... १४९
डॉ. अत्तरदे, नांदेड .......... १५०
अनुजा कांकरिया ............ १५३
सौ. उज्वला पाटील ........ १५३
विजय महाजन ............... १५४
सौ. मृणाल गुजराथी ....... १५६
सौ. विमला बांगड ......... १५८
डॉ. प्रज्ञा महाजन ........... १५८
सौ. प्रिया सफळे ............ १५९
कु. कृतिका बांगड ........ १६१
सौ. इंदुताई बारी ........... १६३
अजित जैन .................. १६३
मधुरा काळे ................. १६४
सौ. आस्था गीते, खंडवा ... १६६
शरद शिरसाट, अकोला .... १६६
सौ. अमृता अजय ........... १६७
डॉ. विजय पाटील ......... १६७
जितेंद्र पाटील, गीरड ...... १६८
सुधाकर भावे................. १६९
कैलास बारी ................. १७१
सौ. शुभांगी चौधरी ......... १७२
दास ठाकुर ................... १७३
डॉ. हेमंत चौधरी ........... १७४
डॉ. गो. दा. फेगडे ......... १७५
प्रा. धनराज पाटील ........ १७६
सौ. दिप्ती बारी ............ १७७
सौ. तेजस्विनी वैद्य ......... १८१
राजेंद्र बारी .................. १८१
सौ. हेमलता देशमुख ...... १८२
अशोक साखरे .............. १८४
सौ. अल्पना महाजन ....... १८५
शांतीलालजी जैन .......... १८७
चेतना राजेंद्र लुंकड ......... १८७
जी. एस. पिंजारी .......... १८८
बिरबलजी शर्मा ............ १८८
श्री. दत्तात्रय चौधरी ....... १८९
सौ. दिप्ती गणेश बारी...... १९०
डॉ. प्रमोद जोशी............. १९०
सौ. दिप्ती बारी.............. १९१
फौलादी बुलेश्वर ............ १९२
श्रीमती आशा बारी ........ १९५
पुजा दारुवाला .............. १९७
डॉ. परिमल जोशी, पुणे.... १९८
सौ. अलका गुप्ता .......... २०२
डॉ. अरुण भस्मे, बीड...... २०३
राजेश लखोटे, जामनेर .... २०४
सिध्दी ..................... २०४

## सानुरोध धन्यवाद


सौ. वैशाली भावसार ....... २०५
निलेश बारी ................. २०७
सौ. शोभा पगारे .......... २०९
सौ. दारूवाले, मुंबई ........ २१०
सौ. बबीता .................... २१२
न्याती परिवार ............... २१३
जितेंद्र पाटील ................ २१४
छोटू राज साळुंखे .......... २१५
सौ. सोनाली चौधरी ....... २१६
सौ. धुप्पड, धुळे ............ २१७
सौ. विभा बुब, नासिक ..... २१७
यशवंत किरंगे ............. २१८
प्रकाश सुरवाडे ............... २१९
सौ. विद्या खेडकर .......... २२०
भास्कर राणे ................ २२१
मुकेश आमले ................ २२१
बाबा ४०८ कारभारी ...... २२३
डॉ. निखिल चौधरी ......... २२६
श्री. मुक्या ..................... २२७
सौ. प्रमीला चौधरी.......... २२८
वैष्णव चौधरी................ २२९
सौ. कोमल चौधरी .......... २३०
सौ. ज्योती शिंपी ............ २३२
विजय नागपुरे ............. २३३
हरिराम राठोड ............... २३५
सौ. मनिषा भुषण देवकर .. २३७
अवाकाका'ज येडी........... २३९
सौ. ज्योती पाटील .......... २४१
सौ व श्री खुशाल राणे .... २४१
डॉ. माहेश्वरी ................. २४२
भुषण सी. .................... २४२
प्रितम खेडकर................. २४३
डिंपल सुरेश कुमार.......... २४४
श्री. गोट्या .................... २४५
कोमल बोरा, बीड ........... २४६
श्रध्दा ललवाणी ............. २४७
सौ. समता ललवाणी ....... २४८
योगेश बारी .................. २५१
नयना पाटकर ............. २५२
धर्मरक्षक ...................... २५४
सौ. ममता पगारिया ........ २५५
हॅरी गुरूजी .................. २५६
न्हानकडो .................... २५८
भगवान द्रिपल टेन्शन ...... २६०
सौ. शिल्पा वडनेरकर....... २६१
डॉ. सुनिलदत्त चौधरी....... २६२
सानुरोध धन्यवाद............ २६५



घोत निरामय वातावरणाचे, मन शांत व्हावे रुग्णाचे.